<u>**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**</u>

**पृ.शी.**: पेण अर्बन बँकेत कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे.

**मु.शी.**: पेण अर्बन बँकेत कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे या विषयावर सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, राजन तेली, धनंजय मुंडे, संजय केळकर, सय्यद पाशा पटेल, चंद्रकांत पाटील, रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री किरण पावसकर, दिवाकर रावते, परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विजय सावंत, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे,

केशवराव मानकर वि.प.स.यानी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 10.00 ते 11.30 पर्यंत दीड तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेसाठी दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर 10.00 ते 11.30 पर्यंतचा वेळ दाखविण्यात आलेला आहे. त्यापैकी उत्तराच्या भाषणाला किती वेळ मिळणार आहे ते आपण सांगावे.

**उप सभापती** : उत्तराच्या भाषणासाठी आपल्याला किती वेळ लागणार आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, अल्पकालीन चर्चेचा विषय बराच मोठा असल्यामुळे उत्तराच्या भाषणासाठी मला अर्धा-तास वेळ लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ठीक आहे. या अल्पकालीन सूचनेवर एक तास चर्चा होईल. अर्धा-तास माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासाठी देण्यात येईल. उत्तराच्या भाषणासह या चर्चेसाठी दीड तास वेळ देण्यात येत आहे.



श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

" रायगड जिल्हयातील पेण अर्बन बँकेत कोटयवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे ऑक्टोबर, 2010 मध्ये उघडकीस येणे, रिझर्व बँकेने या बँकेवर दिनांक 23/10/2010 रोजी आर्थिक निर्बंध आणून 5 सदस्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करणे, बँकेच्या अध्यक्ष, सरव्यवस्थापक व काही संचालकांना सी.बी.आयने चौकशीसाठी ताब्यात घेणे, त्यांची मालमत्ता जप्त करण्याचे जिल्हाधिकारी यांनी आदेश देणे, बँक सुमारे 600 कोटी रुपयांना बुडणे, 1 लाख 82 हजार ठेवीदार संकटात येणे, बँकेच्या बनावट पावत्या करुन केंद्रातील कॉर्पोरेशनला तारण म्हणून देणे, हवाला रक्कम हस्तांतरणाबाबत बँकेची कोटयवधी रुपयांची उलाढाल होणे, या सर्व गैरव्यवहारामुळे बँकेचे ठेवीदार, खातेदार आणि गुंतवणूकदार यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत गुंतवणूक धारकांना व ठेवीदारांना रकमा तातडीने परत देण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील ही चौथी अर्बन बँक बुडालेली आहे.रायगड जिल्हयामध्ये भूविकास बँक, गोरेगाव अर्बन बँक, रोहा अर्बन बँक, पेण अर्बन बँक या चार बँका खऱ्याअर्थाने लागोपाठ बुडाल्या आहेत. दुर्दैवाने या सगळया बँकांचे नेतृत्व अरुण भाईच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केलेले आहे.

श्री. अरुण गुजराथी (बसून) : या बँकांशी माझे नाव कशासाठी जोडता?

**उप सभापती** : आपले नाव रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, दुर्दैवाने पेण अर्बन बँकेच्या आधी बुडालेल्या बँकांची साईज छोटी होती. गोरेगाव अर्बन बँक 60 कोटी रुपयांची होती. रोहा अर्बन बँक 40 कोटी रुपयांची होती. भूविकास बँक 5 कोटी रुपयांची होती. तेथे ठेवीदारांचे पैसे नव्हते. पेण अर्बन बँक 750 कोटी रुपयांची होती. ती ठेवीदारांची बँक होती. राज्य शासनाने पैसे द्यावेत अशी मागणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठेवीदार करीत आहेत. या ठेवीदारांना काही वेळेला सांगण्यात येते की, आम्ही तुमचे पैसे देण्याचा प्रयत्न करु, रिझर्व बँकेला सांगू. तसेच राज्य मंत्री मंडळातील मंत्री सांगतात की, आम्ही तुम्हाला पैसे देऊ. त्यामुळे ठेवीदारांचा गैरसमज होत आहे.

यानंतर श्री. बरवड......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

या राज्याचे तत्कालीन अर्थमंत्री कर्जतला गेले आणि त्यांनी सांगितले की, मी रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरशी बोलतो आणि पैसे देण्याची काही तरी तरतूद करतो. यासंदर्भात काही नियम आहेत. आपण ज्या पदावर आहोत त्यांनी जबाबदारीने बोलले पाहिजे. सर्वसामान्य लोकांचे आणि विशेषत: पेन्शनरांचे पैसे तसेच रायगड जिल्ह्यामध्ये शेतजमिनीला मोठी किंमत येते म्हणून शेतकऱ्यांनी शेती विकण्याचा सपाटा लावलेला आहे आणि त्या शेतकऱ्यांनी शेतजमीन विकून ठेवलेले पैसे खऱ्या अर्थाने बुडविलेले आहेत. 1 लाख 75 हजार ठेवीदारांचे हे पैसे मिळालेले नाहीत.

सभापती महोदय, या ठिकाणी वेळ अपुरा आहे. माननीय मंत्री महोदय म्हणाले ती गोष्ट खरी आहे की, त्यांना उत्तर देण्यासाठी दोन तास सुध्दा अपुरे पडतील एवढी मोठी प्रकरणे या बँकेमध्ये घडलेली आहेत. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, या बॅंकेमध्ये कर्जदार गेला आणि त्यांनी 10 हजार रुपयांचे कर्ज मागितले तर ताबडतोब त्यांना 10 हजार रुपये नगद काढून द्यावयाचे आणि फॉर्मवर, विड्रॉवलवर सह्या घेऊन टाकावयाच्या आणि मागाहून 10 हजाराचे 10 लाख केलेले आहेत. 1 लाख रुपयांचे कर्ज मागितले असेल तर नंतर 1 लाखाचे 1 कोटी रुपये केलेले आहेत. मी जिल्हा बँकेचा चेअरमन असल्यामुळे माझ्याकडे 200-300 कर्जदार येऊन गेले. ते म्हणाले की, आम्ही फक्त 10 हजार रुपये घेतले. आमची प्रॉपर्टी लिहून घेतली. आता 10 हजाराचे 10 लाख रुपये केलेले आहेत. कायदेशीरपणे पाहिले तर आता ते 10 लाख रुपयांमध्ये गुंतलेले आहेत. असे एक माणूस नाही तर 200 माणसे बोलत आहेत. काही माणसे माननीय मंत्रिमहोदयांना भेटले असतील. 1 कोटी, 2 कोटी रक्कम दाखविलेली आहे. त्यांच्या मालमत्तेची किंमत आता 4-4 कोटी रुपये झ ाालेली आहे. जेव्हा त्यांनी पैसे घेतले तेव्हा रायगड जिल्ह्यामध्ये जमिनीची किंमत कमी होती. आता जमिनीची किंमत 1 कोटी रुपये, 2 कोटी रुपये, 3 कोटी रुपये झालेली आहे. आमच्या अलिबागमध्ये 20 कोटी रुपये एकर भाव आता चालू आहे. एवढा भाव झाल्यानंतर ती जमीन बँकेकडे गहाण आहे. 20 कोटी रुपये एकर दर झालेला आहे. पनवेलमध्ये 6 कोटी रुपये, 7 कोटी रुपये एकर भाव चालू आहे. पेणमध्ये दीड ते 2 कोटी रुपये एकर भाव चालू आहे. त्यांची मालमत्ता त्या ठिकाणी फसलेली आहे. मला माहीत आहे की, राज्य शासन पैसे देऊ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील ....

शकत नाही. कारण तशी तरतूद नाही. तशी मागणी सुध्दा मी करणार नाही. एवढी वर्षे मी सहकारामध्ये काम केलेले आहे त्यामुळे या पध्दतीची मागणी मी करणार नाही. परंतु ज्या लोकांनी हे करावयास लावले, ज्या अधिकाऱ्यांनी हे करावयास लावले, ज्यांनी ऑडिट केलेले आहे, ज्यांनी वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत त्यांची चौकशी करण्याचा अधिकार शासनाला आहे.

मी निश्चितपणे सांगतो की, 2005 सालीच ही बँक बुडाली होती. या बँकेमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे किंवा एवढे आर्थिक घोटाळे आहेत याची मला जाणीव नव्हती. जिल्ह्यातील सगळ्यात जुनी बँक म्हणून या बँकेचा नावलौकिक आहे. ही बँक खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झाली. जिल्हा बँकेचा चेअरमन म्हणून या बँकेमध्ये माझे 55 कोटी रुपये सध्या अडकलेले आहेत. ते पैसे मी दिले नसते तर ही बँक 2005 मध्येच बुडाली असती. त्या ठिकाणी एवढे भयानक प्रकरण आहे की, या बँकेने पाच वर्षे सातत्याने 180 कोटी रुपयांची खोटी इक्विटी दिली. मी म्हणतो की, आमच्याकडे आमचे स्वच्छ प्रशासन आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांना माहीत आहे. आमचे जे अधिकारी आहेत. पूर्वी त्यांना पैसे दिलेले आहेत. कर्जाचे हप्ते फेडण्याच्या आधीच त्यांचा हप्ता येतो. पण आमच्या बँकेचे जे प्रशासन आहे ते त्यांनी जवळून पाहिलेले आहे. असे असताना माझ्या बँकेचे अधिकारी सुध्दा त्यामध्ये फसलेले आहेत. 180 कोटी रुपयांची खोटी इक्विटी एमएससी बँकेमध्ये जमा आहे असे दाखविले गेले. तीन वर्षे एमएससी बँकेचा संचालक या नात्याने मी त्या ठिकाणी मागणी केली. सन्माननीय उपमुख्यमंत्री सुध्दा एमएससी बँकेचे संचालक आहेत. गेल्या बोर्डाच्या बैठकीमध्ये त्याची चौकशी करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. 180 कोटी रुपयांची इक्विटी कशा प्रकारे दाखविली गेली हा संशोधनाचा विषय होईल.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

त्याबाबत मंत्री महोदयांना माझा सवाल आहे. त्याठिकाणी ऑडिटर गेले, जॉईन्ट रजिस्ट्रार गेले, रिझर्व्ह बँकेचे अधिकारी गेले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अधिकारी गेले. जिल्हा बँकेचे अधिकारी गेले, परंतु हे सर्व अधिकारी गेल्यानंतरही कोणाच्याही लक्षात आले नाही. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी मागणी करणार आहे की, याची चौकशी करावी. कारण यासारखी आणखी दुसरी बँक बुडू नये. कारण आता एकच बँक यांच्याकडे शिल्लक आहे, ती सुरक्षित राहिली पाहिजे असे माझे म्हणणे आहे. ती सुरक्षित ठेवण्यासाठी शासन काही कडक धोरण आखत आहे, जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुध्द कारवाई करीत आहे, महाराष्ट्रामध्ये असा संदेश या चर्चेतून बाहेर गेला पाहिजे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, 1960 साली सहकार कायदा केला त्यावेळी राज्य सरकारने थ्री टायर सिस्टिम स्वीकारलेली आहे. रिझर्व्ह बँक, नाबार्डने एक सूत्र दिलेले आहे. इक्वीटीचे पैसे किंवा सहकारी संस्थेचे पैसे शिखर बँकेमध्ये ठेवण्याचे कायद्याने बंधनकारक आहे. पेण अर्बन बँक एकटी बुडालेली नाही, ही बँक रायगड जिल्हयातील 25 पतपेढया घेऊन बुडत आहे. हे खूप गंभीर आहे. ज्या पतपेढया चांगल्या होत्या, त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांच्या सुध्दा पेणमध्ये 3-4 पतपेढया होत्या . शेतकरी कामगार पक्षाची बँक आहे, या बँकेत 1 टक्के जादा व्याज मिळते म्हणून त्यांच्या पतपेढयांनी पैसे ठेवले होते. परंतु ते चुकीचे करीत होते. सोसायटीचे पैसे जिल्हा बँकेमध्ये ठेवण्याचे बंधनकारक आहे. परंतु सहाय्यक निबंधकांना 5 हजार रुपये दिले की, ते ताबडतोब ऑर्डर काढून तात्पुरत्या स्वरुपात पैसे ठेवण्याची परवानगी देतात. या अधिका-यांवर तरी शासन बंधन आणू शकते. पतपेढयांचे पैसे अर्बन बँकेत ठेवता येत नाहीत, राष्ट्रीयकृत बँकेत सुध्दा ठेवता येत नाहीत. ते शिखर बँकेतच ठेवले पाहिजेत, कारण कायद्याने शिखर बँकेला संरक्षण आहे. नांदेडची जिल्हा बँक बुडाली होती, त्यावेळी शासनाने त्या बँकेला 300 कोटी रुपयांची मदत केली. तत्कालीन मुख्यमंत्री हे नांदेडचे होते म्हणून दिले असे नाही तर ती बँक शिखर बँक आहे म्हणून ते पैसे दिले गेले. शिखर बँकेला कधीही बुडू दिले जात नाही. जिल्हा बँक कधी बुडल्याचे ऐकलेले नाही. वर्धा जिल्हा बँकेत घोटाळा झाला, नागपूर जिल्हा बँकेत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.जयंत प्र.पाटील......

घोटाळा झाला, उस्मानाबाद जिल्हा बँकेत घोटाळा झाला, परंतु या बँका बुडाल्या नाहीत. त्या बँकांना सुध्दा राज्य सरकारने व केंद्र सरकारने वेळोवेळी मदत केलेली आहे. त्यावेळी सहकार कायदा करताना चुकीचा तयार केलेला नाही. मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करतो की, आपल्या कारकीर्दीमध्ये हे बंधन आणले पाहिजे. ज्यांनी कायद्याच्या बाहेर जाऊन अर्बन बँकेत पैसे ठेवले त्यांच्यावर कारवाई करावी. अर्बन बँकेला सुध्दा सहकारी बँकेत पैसे ठेवण्याचा अधिकार नाही. ही बँक 25 पतपेढयांना घेऊन बुडत आहे. रोह्या मधील दिनदयाळ व वंदे मातरम् या पतपेढयांचे 3 कोटी रुपये गेले आहेत. यासंदर्भात शासनाने निर्णय घ्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. ज्या अधिका-यांनी हे पैसे रुटीन म्हणून दिले असले तरी शासनानेच आता कायदा केला पाहिजे. कोणत्याही अर्बन बँकेला जिल्हा बँकेशिवाय अन्य कोणत्याही बँकेत पैसे ठेवता येणार नाही. सभापती महोदय, हे एवढयावरच थांबलेले नाही. रायगड जिल्हयातील सहकारी संस्थांनी जवळजवळ 300 कोटी रुपये काढून घेतले आहेत. विविध संस्थांनी जिल्हा बँकेतून 90 कोटी रुपये काढले आहेत. त्यामुळे सहकारी संस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सहकाराबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्या अर्बन बँका चांगल्या आहेत त्यांनी सुध्दा पैसे काढून घेतले आहेत. त्यामुळे त्या बँका सुध्दा अडचणीत आल्या आहेत.

माजी मंत्री श्री.रवि पाटील यांची 40 कोटींची बँक आहे. त्यांनी 40 कोटी रुपये गोळा केले. या 40 कोटींपैकी 15 कोटींची इक्वीटी ठेवली. बाकीच्या पैशाचे त्यांनी कर्ज वाटप केले.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:15

श्री. जयंत प्र. पाटील...

लोक 20 कोटीचे कर्ज मागायला आले. पण पैसे कोठून देणार ? त्यांची बँक बुडालेली आहे. पाताळगंगा आणि सिद्धिविनायक बँकेमध्ये दिवाळीच्या दिवशी लोकांच्या पैसे काढण्यासाठी रांगा लागल्या. मी स्वत: माझ्या बँकेतून 3 कोटी रुपये दिले आणि लोकांना सांगितले की, ही बँक बुडालेली नाही. बँक वाचविण्यासाठी मी माझ्या बँकेतून पैसे दिले. 32 कोटीचे कर्ज, 18 कोटी इक्विटी, 5 कोटी गव्हर्नमेंट सिक्युरिटी. आयत्यावेळी बँक पैसे आणू शकत नाही. मी देखील या पेण बँकेला पैसे द्यायला घाबरलो. ही बँक बुडाली तर काय करायचे, असा प्रश्न माझ्या समोर होता. अनेक शिक्षण संस्थांचे पैसे बुडाले. खालापूर शिक्षण प्रसारक मंडळ हे राष्ट्रवादीचे. बँक शेतकरी कामगार पक्षाची असल्यामुळे त्या बँकेत त्यांनी पैसे ठेवले नाही. आता त्या मंडळाकडे शिक्षकांचे पगार देण्यासाठी पैसे नाहीत. त्यांचे पॉलिटेक्निक कॉलेज बंद पडले. शिक्षकांना दोन महिन्यापासून पगार नाही. मी काल दोन दिवसासाठी मुंबईला गेलो होतो. त्यावेळी मी या शिक्षण प्रसारक मंडळाला 2 कोटी रुपये दिले. कारण शिक्षण संस्था जगली पाहिजे हा त्या मागील माझा उद्देश आहे. संस्था उभी करणे आणि ती टिकवणे, जगवणे यासाठी किती कष्ट पडतात याची मला कल्पना आहे. संस्था उभी करणे फार कष्टप्रद आहे पण ती बुडवणे सोपे आहे. म्हणून प्रत्येक संस्था वाचविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना आम्ही माननीय सहकार मंत्र्यांकडे एका वेगळया नजरेने पहातो. तेव्हा पेण अर्बन बँकेमध्ये जो आर्थिक घोटाळा झालेला आहे त्याची पुनरावृत्ती कुठे होणार नाही याची दक्षता मंत्री महोदयांनी घ्यावी. या बँकेतून कर्ज कसे दिलेले आहे ? तर गवत तारण ठेवून 40-40 लाख रुपयाचे कर्ज दिलेले आहे. सभापती महोदय, आपण मला सांगावे की, 40 लाख रुपये कर्जासाठी कोठे गवत तारण म्हणून ठेवले जाते काय ? त्या गवताला आग लागली तर मग काय करायचे ? केवळ एका प्रकरणामध्येच नाही तर 40 प्रकरणामध्ये गवत तारण ठेवून 40-40 लाख रुपयाचे कर्ज दिलेले आहे. मग ऑडिटरने काय केले असा प्रश्न निर्माण होतो ? आमच्या पेण तालुक्यातील खारपाडा गावामध्ये भोईर हे गवताचा धंदा करतात. गवत तारण ठेवून या बँकेने कर्ज दिलेले आहे.

..2..

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, श्री. धारकर हे चेअरमन असलेली स्पेस मर्कण्टाईल कंपनी 2008साली दुस-याला विकण्यात आली. हे सर्व प्लॅनिंग करुन केलेले होते. श्री. शिशिर याला मी विचारले की हे काय चालले आहे ? त्याने सांगितले की, आम्ही 2008मध्येच कंपनी विकून टाकली. त्या कंपनीशी आता आमचा काही एक संबंध नाही. त्या कंपनीवर करोडो रुपयाचे कर्ज असून कंपनीने करोडो रुपयाचा व्यवहार केलेला आहे. ज्यांनी सुवर्णरेखा बँकेचे ऑडिट केले ते पुण्यातील किर्तने आणि पंडित हे ऑडिटर्स सांगतात की, बँकेचा व्यवहार काही कळत नाही, कोणती एण्ट्री कुठे फिरवली हे कळत नाही. पैसे कोठे गेले याचा पत्ता ऑडिटरला अद्यापपर्यन्त लागलेला नाही.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

याठिकाणी मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, ऑडिट पारदर्शक झाले पाहिजे. ऑडिटमध्ये कोणा-कोणाकडे पैसे गेले आहेत याची तपासणी झाली पाहिजे. ज्या एंट्री केलेल्या आहेत त्यामध्ये स्पेस मर्कंटाईलमध्ये अंदाजे 2 हजार कोटी रुपयांचा व्यवहार झालेला दिसतो. ही रक्कम हवालामध्ये गुंतलेली दिसते. 2 हजार कोटी रुपये ठेवले आणि 2 हजार कोटी रुपये काढले. मंत्रीमहोदयांना हे सर्व माहिती आहे. याचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. खऱ्याअर्थाने तपासामध्ये याची पाहणी करुन या प्रकरणातील मूळ शोधून काढले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, वेगवेगळया मार्गाने आम्ही या प्रकरणाचा छडा लावण्याचा प्रयत्न केला. प्रशासक मंडळ नेमावे म्हणून प्रयत्न सुरु झाले. मी माननीय मंत्रीमहोदयांना भेटलो. माझा कामाचा व्याप असताना मंत्रीमहोदयांना भेटल्यानंतर त्यांनी ताबडतोब आदेश थांबविले आणि सांगितले की, असे करु नका. प्रशासक मंडळ ठेवा. पूर्णवेळ प्रशासक ठेवावयाचा असेल तर ठेवा असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले पाहिजे. ज्या संस्थांचे पैसे या सहकारी बँकेत आहेत त्यांचे प्रतिनिधी प्रशासक मंडळामध्ये असले पाहिजेत. तो त्यांचा अधिकार आहे. त्याबद्दलचे स्पष्टीकरण मंत्रीमहोदयांनी सभागृहाला दिले पाहिजे. हवालामार्गे पैसे आले कसे? बँकेने पैशाचे काय केले? राजन तेली यांच्या नावावर 5 कोटी रुपयांची ठेव ठेवली. दुसरीकडे राजन तेली यांना त्याच दिवशी 5 कोटी रुपयांचे कर्ज दिले. त्याची पावती घेतली. केंद्र सरकारच्या महामंडळामध्ये पैसे ठेवण्यात आले. 400 कोटी रुपयांच्या बोगस पावत्या गोळा केल्या. त्या बदल्यात 400 कोटी रुपयांची एनसी घेतली. सोने पाठवितो म्हणून सांगितले. सोने पाठविले, परंतु तेथेच त्यांनी ते सोने विकले आणि त्याबदल्यात 400 कोटी रुपये घेऊन स्पेस मर्कंटाईल या कंपनीत गुंतविले. या सभागृहात या प्रकरणाची सर्वात जास्त माहिती असलेला मी एकमेव सदस्य आहे. या बँकेत ज्यांनी पैसे गुंतविले आहेत त्या सर्वसामान्य लोकांना न्याय मिळाला पाहिजे. पेन्शनर, गरीब नागरिकांचे पैसे आहेत. माझ्या देखत विषाची बाटली घेऊन 4-5 महिला आल्या. त्यांनी सांगितले की, आमच्यापुढे आता विष घेण्याशिवाय पर्याय नाही. 20-20, 40-40 लाख रुपये बुडाले आहेत. ते पैसे परत मिळावेत म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत एवढाच दिलासा या ठेवीदारांना या सभागृहाच्या माध्यमातून म्ळिाला पाहिजे. त्यांचे पैसे परत मिळावेत म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोत याची त्यांना शाश्वती मिळाली पाहिजे म्हणून तळमळीने बोलण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

SGB/ D/ MMP/ 10:20

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, ज्यांनी ऑडिट केले त्या ऑडिटरला काय शिक्षा करणार आहात? या राज्यात ही पध्दत सुरु झाली आहे. बँक बुडवायची आणि बुडविलेला पैसा आपण पचवू शकतो अशा प्रकारचे वातावरण या महाराष्ट्रामध्ये निर्माण होत आहे. हे वातावरण बदलण्याचा या चर्चेच्या निमित्ताने प्रयत्न झाला पाहिजे. रोहा बँक बुडविण्यात आली. रोहा बँकेतून ज्यांनी कर्ज घेतले तेच कर्जदार या पेण अर्बन बँकेचेही कर्जदार आहेत. गोरेगाव बँकेचे जे कर्जदार आहेत तेच या पेण अर्बन बँकेचेही कर्जदार आहेत. याची खुलेआम चर्चा सुरु आहे. विधानसभा सदस्य श्री.धैर्यशील पाटील गावांमध्ये फिरले. ते मला म्हणाले, काका मी फिरलो. लोक म्हणतात, तुम्ही आम्हाला निवडणुकीच्या काळात 25 रुपये चहा पिण्यासाठी दिले. तुम्ही 1000 रुपये, 5000 रुपये, 10 हजार रुपये द्यायचे असे कळले. हा आमचाच पैसा आम्हाला द्यायचा असे आता लोक बोलू लागले आहेत. अशा प्रकारची चर्चा पेणमध्ये सुरु आहे. रायगडचा आर्थिकदृष्टया सुरु असलेला विकास थांबला. कर्जत, खालापूर, खोपोली, पेण या भागात दिवाळी साजरी झाली नाही. बाजारपेठा सुन्न होत्या. बाजारपेठेत कोणी माणूस नव्हता. सर्वपक्षीय लोकांनी बाजारपेठा बंद करण्याचा निर्णय घेतला. जवळजवळ 10 ते 12 वेळा रायगडच्या वेगवेगळया बाजारपेठा बंद झाल्या. संपूर्ण रायगड बंद झाले. तीन वेळा रास्ता रोको करण्यात आला.

नंतर एफ.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील..........

ज्यावेळेस हे ठेवीदार हतबल होऊन बोलत होते, तेव्हा अत्यंत काळजी वाटत होती. मी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना मला हे समजले. त्यानंतर सर्व जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आम्ही बैठक घेतली व या कर्जाच्या वसुलीसाठी प्रयत्न केला तसेच रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांसोबत देखील चर्चा केली. ज्या रकमेचा फ्रॉड झाला होता तेवढी रक्कम बाजूला ठेवून बाकीची रक्कम वसूल करण्यासाठी मी माझ्या बँकेची संपूर्ण यंत्रणा कामाला लावली व 25 कोटीची वसुली केली. परंतु 100 कोटीची वसुली झाली तरच बँक वाचू शकते अशी परिस्थिती होती. त्यावेळेस मात्र कोणीही मंत्री अथवा शासनाचा प्रतिनिधी समोर आला नाही. ही 25 कोटीची रक्कम गोळा केल्यानंतर दरम्यान सीबीआयने संबंधित लोकांना ताब्यात घेतले आणि त्यांनी सांगितले की, जमा केलेली 25 कोटीची रक्कम सीबीआयकडे वर्ग करावी. आम्ही एवढे प्रयत्न करुन सीबीआय साठी ही रक्कम जमा करायची काय असा प्रश्न तेव्हा निर्माण झाला. आम्ही ती रक्कम देण्यास नकार दिला. परंतु सीबीआयने सांगितले की, 400 कोटी एवढे रक्कम जोपर्यंत जमा होत नाही तोपर्यंत कोणत्याही ठेवीदाराच्या ठेवी परत करायच्या नाहीत. या अनुषंगाने सीबीआयशी मंत्री महोदयांनी चर्चा केली पाहिजे, अशी मी विनंती करतो. तसेच आरबीआयचे जे नॉर्म्स आहेत त्यात देखील बदल केला पाहिजे. कारण सध्याच्या निकषांप्रमाणे ज्यांची 5 हजार रुपयांची ठेव आहे त्यालाही 1 हजार रुपये आणि ज्यांची 5 कोटीची ठेव असेल त्यांनाही फक्त 1 हजार रुपये, म्हणून या निकषात बदल केला पाहिजे. त्याचबरोबर बँकेच्या कर्जदारांसाठी जी विम्याची व्यवस्था केलेली आहे ते पैसे कसे मिळतील, क्लेम सेटल्ड कसे होतील यादृष्टीनेही प्रयत्न केले पाहिजे. त्यातही जे ठेवीदार आजारी असतील, कोणाचे हृदयविकाराचे आजार असतील अशा जेन्युइन केसेस पाहून त्यादृष्टीने वेगळ्या प्रकाराने विचार केला पाहिजे.

महोदय, शेवटचा मुद्दा म्हणजे जेवढी कर्जवाटपाची प्रकरणे आहेत त्यासंबंधीच्या कोणत्याही इतिवृत्ताला संचालक मंडळाची मान्यता घेतलेली नाही. कर्ज वितरण समितीचे चेअरमन म्हणून व्हाईस चेअरमनच आहेत व त्यांच्याच सह्या सर्व कर्ज मंजुरीच्या प्रकरणांवर आहेत, चेअरमनची एकाही ठिकाणी सही नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे आहे की, माझी सही कोठेच नाही. कर्ज वितरण समितीने कर्जासंबंधीच्या बैठकीचे इतिवृत्त संचालक मंडळाच्या एकाही बैठकीत मान्यतेसाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.........

ठेवले नाही अशी परिस्थिती असताना मग त्या बँकेचे ऑडिटर तसेच सह निबंधक काय करीत होते, सहकार विभाग काय करीत होता? तसेच ही आजचीच परिस्थिती नाही तर गेल्या 10-15 वर्षांपासून हा प्रकार सातत्याने सुरु आहे, एकदम अशा चुका झालेल्या नाहीत, तरीही शासनाचे व शासनाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. यासंबंधी बोलण्यासारखे भरपूर आहे परंतु मी थोडक्यात एवढेच सांगणार आहे की, ज्यांच्या ठेवी असतील, जे पेन्शनर आहेत, व्याजावर जगतात म्हणून त्यांनी आपली आयुष्याची पुंजी या बँकेत ठेवली असेल तसेच गरीब व मजुरांचीही रक्कम त्यात गुंतलेली आहे अशा गरजू लोकांना दिलासा देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती करतो. तसेच या गरीब ठेवीदारांचे संरक्षण करुन न्याय कसा देता येईल हे पहावे अशी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विधान परिषद नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सहकारी चळवळीचा उद्‌गाता म्हणून सबंध हिंदुस्तानात महाराष्ट्र हे राज्य ओळखले जाते. सर्वात जास्त कार्यक्षम सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत. नफा कमविणा-या सर्वात जास्त सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत. सहकारी पतपेढयांच्या माध्यमातून साखर कारखाने, आजारी साखर कारखाने चालविण्याची शक्ती सहकार क्षेत्रात आहे. दुर्बल माणसाला शक्ती देणारी आणि ताठ मानेने उभी करणारी चळवळ म्हणून सहकार चळवळीकडे बघितले जाते. राज्यात मार्च 2010 अखेर 2 लक्ष 12 हजार 344 संस्था सहकार क्षेत्रात आहेत. महाराष्ट्रात पतपेढयांची संख्या 24,167 एवढी आहे. या पतपेढयातील ठेव 56,294 कोटी रुपयांची आहे. पतपेढया आणि अर्बन बँकांच्या माध्यमातून शासन जे काम करु शकणार नाही ते काम पूर्ण करण्याची शक्ती पतपेढया आणि अर्बन बँकेमध्ये आहे. एकूण 24 हजार संस्थांपैकी तोटयातील संस्था 6159 आहेत. एकूण संस्थापैकी जवळपास 25 टक्के संस्था आजारी आहेत. एकूण 62,388 कोटी रुपये येणे आहे व त्यातील थकीत कर्ज 8,269 कोटी रुपयांचे आहे.

सभापती महोदय, आपण आता पेण अर्बन बँकेच्या संदर्भात विचार करु या. पेण अर्बन बँकेत 600 कोटी रुपये थकीत आहेत, अशी बातमी वृत्तपत्रात छापून आलेली आहे. 1 लक्ष 82 हजार ठेवीदार यामुळे अडचणीत आलेली आहे. एक अर्बन बँक 2 लक्ष ठेवीदारांचे संसार उध्वस्त करते, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. याला जबाबदार कोण ? याला 5 संस्था किंवा 5 व्यक्ती जबाबदार आहेत. पहिले म्हणजे संचालक मंडळ, दुसरे व्यवस्थापन, तिसरे ऑडिटर, चवथे व्हॅल्यूअर आणि पाचवा क्रमांक सरकारी अधिकाऱ्यांचा आहे. या पाचही लोकांची जबाबदारी आहे की, कोणतीही पतपेढी किंवा अर्बन बँकेत घोटाळा होणार नाही, ही संस्था अडचणीत येणार नाही. ठेवीदारांच्या ठेवी परत केल्या जातील, हे पाहण्याचे काम त्यांचे आहे. या संदर्भातील जबाबदारी पाच संस्थांनी किंवा व्यक्तींनी घेतली पाहिजे. अर्बन बँकेत किंवा पतपेढयांमध्ये लोक पैसे ठेवावयास घाबरतात. विश्वास आणि विश्वस्त भावना ही सहकारी चळवळीचा पाया आहे. केवळ हा प्रकार पेणमध्येच झालेला आहे, अशातला भाग नाही. आमच्याही जिल्हयात असाच प्रकार झालेला आहे. आमचा जिल्हाही यामध्ये मागे नाही. माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2...

श्री. अरुण गुजराथी ....

मंत्रीमहोदयांना यासंदर्भात माहिती आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी यासंदर्भात चांगला निर्णय घेतल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. तापी सहकारी पतपेढीच्या संपूर्ण महाराष्ट्रात 100 च्या वर शाखा आहेत. परंतु आता तापी सहकारी पतपेढी एक रुपयाही ठेवीदाराला परत करु शकत नाही, अशी परिस्थिती आहे. ही एक प्रवृत्ती झालेली आहे. ही प्रवृत्ती नष्ट करण्याची जबाबदारी शासनाला आणि समाजाला घ्यावी लागणार आहे.

सभापती महोदय, मी चार्टड अकाऊंट पेशाचा असल्यामुळे ऑडीटर म्हणून मी एक वर्ष प्रॅक्टीस केलेली आहे. ऑडिट म्हणजे पोस्टमार्टेम. एक वर्षाचा हिशेब झाल्यानंतर 2-3 महिन्यांनी ऑडिटर येतो व 3-4 महिन्यांनी किंवा सहा महिन्याच्या आत निर्णय देतो. माझी आपल्याला विनंती आहे की, पतपेढया आणि अर्बन बँका अडचणीत येणार नाही, ठेवीदार अडचणीत येणार नाही यासाठी आपल्याला काही निर्णय घ्यावे लागणार आहेत. यासाठी आपल्याला कंटीन्यूअस ऑडिट करावे लागणार आहे. एक महिना झाला की, त्या एक महिन्याचे ऑडीट झाले पाहिजे. त्याची संपूर्ण जबाबदारी इंटर्ननल ऑडिटरवर ठेवली गेली पाहिजे. इंटर्नल ऑडिटरचे क्वालीफिकेशन तुम्हाला वाढवावयाचे असेल तर ते आपण वाढवा. परंतु एक महिन्यानंतर ऑडिट झालेच पाहिजे. कारण पेतपेढया आणि अर्बन बँकावर रिझर्व्ह बँकेचे कोणत्याही प्रकारचे बंधन नसते. शेडयूल बँका रिझर्व्ह बँकेमध्ये येत असतात. परंतु रिझर्व्ह बँकचे बंधन पतपेढया आणि अर्बन बँकेवर नसल्यामुळे यासंदर्भातील जास्त जबाबदारी आपण घेतली पाहिजे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, नुकसान झालेल्या व्यक्तीला सरकार 10 हजार रुपये नुकसान भरपाई देते. यामध्ये सरकारची काय जबाबदारी आहे ? बँकेत ठेवी ठेवीदारांनी ठेवायच्या, त्यांनी उठाठेव करायची मग त्याचा सरकारशी काय संबंध आहे ? ठेवीदारांनी कोणत्या बँकेत ठेवी ठेवाव्यात याबाबत जनजागृती झाली पाहिजे. काही सहकारी बँकांमध्ये अनेकांच्या पेन्शन, प्रोव्हीडंट फंडाची रक्कम, ग्रॅज्युईटी इत्यादी रकमा ठेवलेल्या आहेत. परंतु बँक बुडाल्यामुळे ठेवीदारांचे आयुष्य उद्‌ध्वस्त झालेले आहे. तेव्हा या संदर्भात एक कडक कायदा करण्यात यावा अशी माझी सरकारला विनंती आहे.

सभापती महोदय, काही सहकारी बँका "अ" वर्गातील असतात. काही बँका "ब" व "क" वर्गातील असतात. माननीय मंत्रीमहोदयांनी सहकारी बँका चालविलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना या संदर्भातील माहिती चांगली आहे. हात ओले केले की बँकांना "अ" वर्ग प्रतवारी मिळते. ज्या बँकांना "अ" "ब" वर्ग अशी प्रतवारी मिळालेली आहे त्यांची एकदा रॅन्डम तपासणी केली पाहिजे.

सभापती महोदय, एकूण 109 कर्ज प्रकरणांपैकी फक्त 24 प्रकरणांतील कागदपत्रे उपलब्ध आहेत. अन्य कर्जदारांची कागदपत्रे उपलब्ध नाहीत. या संदर्भात ऑडिटरवर फार मोठी जबाबदारी असते. तसेच संचालक मंडळावर देखील जबाबदारी असते. कारण संचालकांनी बुडविले आणि ऑडिटरने बुडविण्यास मदत केली असा तो भाग आहे. तेव्हा या प्रकरणामध्ये जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. जर सी.ए.असतील तर त्यांच्यावर ॲक्शन घेतली पाहिजे. 'Institute of Chartered Accounts of India' यांना सांगून त्यांचे लायसन रद्द केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे 2 लाख ठेवीदारांचे आयुष्य उद्‌ध्वस्त झालेले आहे. तेव्हा ही सर्व जबाबदारी ऑडिटरवर येते. या संदर्भात कोड ऑफ कंडक्ट असणे आवश्यक आहे किंवा कडक कायदा असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, मध्यंतरीच्या काळात अनेक सहकारी बँका बुडाल्या. त्यावेळी सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करावी अशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतला होता. तो कायदा कशाप्रकारे वापरण्यात आला मला माहीत नाही.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

सभापती महोदय, ठेवी आणि कर्ज याचे प्रमाण व्यस्त आहे. तेव्हा या संदर्भात एक रेशिओ काय असावा याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे संचालक मंडळाला कर्ज घेता येत नाही. मग ते संचालक मंडळ आपल्या घरातील सालगडी, स्वयंपाकी, नोकर, शिपाई यांच्या नावाने कर्ज घेतात. तेव्हा आपण हे कायद्याद्वारे कसे थांबविणार आहात हे मंत्रीमहोदयांनी सांगावे. आता आपण कुठे चाललो आहोत याचा बोध घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, काही सहकारी बँकाच्या वार्षिक सभा अवघ्या पाच-दहा मिनिटांत पार पाडल्या जातात. सभेमध्ये प्रश्नोत्तरे देखील होत नाहीत. वार्षिक सभेमध्ये आरडाओरड करुन पाच-दहा मिनिटांमध्ये सभा आटोपती घ्यावयाची असे प्रकार सुरु आहेत. वार्षिक सभेमध्ये ठेवीदारांना बोलू देखील दिले जात नाही. तेव्हा या संदर्भात देखील जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच सरकारने देखील अशा बँकांकडून अहवाल मागितला पाहिजे. त्याचप्रमाणे अशा सहकारी बँकामध्ये ठेवीदारांचे एक मंडळ तयार करुन त्या मंडळाने बँकांच्या दैनंदिन व्यवहारात ढवळाढवळ न करता ठेवीदारांच्या ठेवीचे कसे रक्षण करता येईल हे पाहिले पाहिजे. त्यांना ओव्हरलॅपिंग पॉवर असू नयेत. तसेच त्यांना माहितीच्या अधिकाराखाली माहिती देखील घेता येईल. हा माझ्या मनात आलेला विचार आहे. काही बँकामध्ये सोने तारण ठेवून त्यावर कर्ज देण्यात येते. यामध्ये व्हॅल्युअरचे मत फार महत्वाचे असते. कारण एखाद्याने बनावट सोने तारण ठेवून त्यावर लाखाचे कर्ज घेतले आणि त्याची परतफेड केली नाही, कर्जही गेले आणि सोनेही बनावट निघाले. तेव्हा व्हॅल्युअरवर देखील फार मोठी जबाबदारी आहे.

सभापती महोदय, सहकारी बँका तोट्यात जाऊ नयेत यासाठी सी.ए., ऑडिटर, डी.डी.आर. यांच्या संदर्भात कडक नियम झाले पाहिजेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

ज्या बॅंका बुडाल्या आहेत त्यांच्या बाबतीत आता फारसे काही करता येणार नाही परंतु येथून पुढे तरी महाराष्ट्रात या बॅंका आणि सहकारी पत संस्था बुडणार नाहीत यासंबंधी कोणती नियमावली व कोणता कायदा करण्यात येणार आहे या बाबातीत माननीय सहकार मंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) सभापती महोदय, नियम 97 अन्वये या ठिकाणी पेण अर्बन बॅकेतील गैरव्यवहारासंबंधी जी अल्पकालीन चर्चा सुरु आहे त्यात भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर चर्चा करीत असतांना सरकार आपल्याला काही दिलासा देणार आहे अशा प्रकारची आशा या बँकेचे ठेवीदार, सभासद यांना आहे. तेव्हा सरकार या ठेवीदारांना दिलासा देणार आहे की फक्त बध्याची भूमिका घेणार आहे ? या प्रकरणी सरकारने बघ्याची भूमिका न घेता त्यात लक्ष घालावे अशी माझी शासनाला विनंती आहे. या बॅकेतील सामान्य ठेवीदारांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून चर्चेला उत्तर द्यावे अशी माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये सहकार चळवळ मोठ्या प्रमाणावर रुजली नाही परंतु काही सहकारी पतसंस्था आणि अर्बन बॅकाच्या माध्यमातून काही प्रमाणात सहकार चळवळ रुजलेली आहे. ती सहकारी चळवळ उद्ध्वस्त करण्याचा काही लोकांचा डाव आहे काय असे वाटू लागले आहे .काही लोक सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर कोकणातील गोर गरीब व्यक्तीला सहकारी बँका, पत संस्थाच्या माध्यमातून छळण्याचा प्रयत्न करतात असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते.रायगड जिल्हयात आतापर्यत तीन बँका बुडल्या आहेत आणि पेण अर्बन बँक ही चौथी बॅक आहे. त्यामुळे ज्या गरीब व्यक्तीने या बँकेत ठेवी ठेवल्या आहेत तो उद्ध्वस्त झाला आहे. पेण अर्बन बँक ही 1935 साली स्थापन झाली असून 75 वर्षानंतर 742 कोटी रुपयांच्या ठेवी असलेली ही मोठी बँक आहे ती बुडाल्यामुळे रायगड आणि आजूबाजूच्या भागातील सर्वसामान्य माणूस उद्ध्वस्त झाला आहे. सभापती महोदय, अनेक सहकारी संस्थांचे मी ऑडिट केलेले आहे. आणि सहकारी संस्थेतील काही गोष्टी मी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत त्यामुळे त्यांनी माझ्या कडून ऑडिट करुन घेणे बंद केले होते.अनेक ठिकाणी सहकारी संस्था आणि ऑडिटर यांच्या संगनमताने गैरव्यवहार सुरु असतात. पेण अर्बन बँक ही मोठी असून पेण,वडखळ,कर्जत,खोपाली, उरण, माथेरान,वासंबे,पोलाड,पोयनाड, पाली,रोहा, चिंचपाडा आणि मुंबईत काही ठिकाणी बँकेच्या शाखा आहेत पेण अर्बन बॅकेत गैरव्यवहार झाल्याचे व बँक बुडीत निघाल्याचे उघडकीस आल्यानंतर मी पाच सहा शाखांना भेटी दिल्या होत्या. सामान्य माणूस, पेन्शनर्स, मजूर,शेतकरी, शिक्षक, वृध्द


VTG/ D/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 10.40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

व्यक्ती, मासळी विकणा-या महिला इत्यादीनी आपल्या ठेवीचे पैसे मिळावेत यासाठी मोठया रांगा या बँकेच्या शाखेसमोर लावल्या असल्याचे मला दिसून आले होते. काटकसर करुन या व्यक्तींनी रोजगारासाठी पैसे जमा केले होते, काही व्यक्तींनी आपल्या मुला मुलीच्या लग्नाचा खर्च भागविण्यासाठी पैसे गोळा करुन या बँकेत ठेवी म्हणून ठेंवले होते.अशा प्रकारे एका एका व्यक्तीने पाच ते दहा लाख रुपयापर्यत पैसे ठेवले असतांना त्यातील फक्त एक हजार रुपये परत मिळावेत यासाठी बँकेच्या समोर मोठया रांगा लावल्या होत्या. सभापती महोदय, या बँकेच्या वडखळ शाखेस भेट देण्यासाठी मी गेलो असता त्या बॅकेचा दरवाजा लहान आणि लोकांच्या मोठया रांगा लागल्या असल्याचे मला पहावयास मिळाले त्या ठिकाणी जमलेल्या जमावाला आवर घालण्यासाठी पोलिसांना बोलवावे लागले व त्यांना शांत करण्यासाठी विनंती करावी लागली.त्याचबरोबर एक काऊन्टर ऐवजी जास्त काऊन्टर सुरु करावेत अशी विनंती त्या बँकेच्या अधिका-याना करावी लागली होती. ज्या सामान्य माणसांनी या बँकेत पैसे ठेवले होते त्यांना एक हजार रुपये मिळविण्याकरता सतत चकरा माराव्या लागत आहेत. तेव्हा या लोकांना दिलासा देण्याकरता काय उपाययोजना करण्यात येणार आहे या बाबतीत माननीय मंत्र्यानी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, या सामान्य ठेवीदाराचे वस्त्रहरण चालले असतांना सरकार जर बध्याची भूमिका घेत असेल तर या चर्चेला काही अर्थ राहणार नाही. इचलकरंजी सहकारी बँकेसंबंधीचा मुद्दा या पूर्वी सभागृहात उपस्थित केला होता मध्यंतरी कोकणातील ठेवीदारांना इचलकरंजी सहकारी बॅकेत ठेवलेल्या ठेवी मिळविण्याकरिता चकरा माराव्या लागल्या होत्या. सहकारी कायद्याच्या मर्यादेमुळे आम्ही काही करु शकत नाही असे सांगून सरकार बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे सामान्य ठेवीदार अडचणीत आला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, या बँकेचे 1 लाख 82 हजार ठेवीदार आहेत आणि 109 बडे कर्जदार आहेत. त्यांना या बँकेने कशासाठी कर्ज दिले? अशाप्रकारच्या मोठया बँकांचा उपयोग छोटया छोटया लोकांना या बँकेच्या माध्यमातून 10 हजार, 25 हजार, 50 हजार ते 1 लाखापर्यंत मदत करुन त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी होतो. परंतु या बँकेने केवळ 109 लोकांना मोठया प्रमाणात कर्ज दिले. त्यामध्ये 10 लोकांना 11 कोटींचे कर्ज दिले. जणू काही इंटरनॅशनल बँक असल्यासारखे या पेण अर्बन बँकेने काम केले आहे. हे कर्ज देतांना बँकेने काही वेळेला तारण घेतले आहे तर काही वेळेला अर्धतारण घेतले आहे. पूर्ण तारण न घेता कर्ज दिले आहे. जणू काही खिरापत वाटल्यासारखे त्यांना पैसे वाटण्यात आले आहेत. या कर्जदारानी यापूर्वी कर्ज घेतले आहे की नाही. या पूर्वी कर्ज घेतलेल्या दुसऱ्या बँकेला सुध्दा याच लोकांनी डुबविले आहे. या 109 लोकांना 11 कोटींच्या वर कर्ज दिले गेले आहे. सभापती महोदय, यामध्ये 2 कोटी ते 5 कोटींपर्यंत कर्ज दिलेले 5 लोक आहेत आणि 1 कोटींवर कर्ज दिलेले 45 लोक आहेत. म्हणजे या बँकेने सामान्य लोकांना कर्ज न देता कोटयाधीश लोकांना कर्ज दिले आहे. त्यामुळे याच लोकांनी ही बँक डुबविली आहे. सभापती महोदय, रायगड जिल्हयामधील या बँकेतील ठेवीदारांची यादी माझ्याकडे आहे त्यामध्ये या बँकेचे 34 हजार ठेवीदार आहेत आणि कर्जदार फक्त 3 हजार आहेत. त्याचप्रमाणे वडखळमधील 14 हजार लोकांनी पैसे गुंतविले आहेत आणि कर्जदार फक्त 500 लोक आहेत. खोपोलीमधील 23 हजार लोकांनी पैसे गुंतविले आहेत आणि कर्जदार फक्त 648 आहेत. कर्जतमध्ये 26 हजार 348 लोकांनी पैसे गुंतविले आहेत आणि कर्जदार फक्त 516 आहेत. हे पैसे गेले कुठे? हे पैसे मुंबईमध्ये दादर, गिरगाव, पार्ले इत्यादी ठिकाणी असलेल्या लोकांना कर्ज वाटण्यामध्ये गेले आहेत. रायगडमधील सामान्य माणसांच्या ठेवींचे हे पैसे आहेत. त्यामुळे याठिकाणी केवळ पैश्याचा गैरवापर किंवा चुकीच्या पध्दतीने कर्ज दिले नाही तर यामध्ये हवाला रॅकेट देखील निर्माण झाले आहे.

या प्रकरणी सी.बी.आय. तर्फे चौकशी झाली,संचालकांना अटक करण्यात आली. तरीसुध्दा बँकेचे इतर संचालक ईकड-तिकडे फिरत आहेत. म्हणून माझ्या याबाबत असलेल्या ठराविक मागण्यांना 11 वाजता सुरु होणाऱ्या मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणामध्ये ठोस आश्वासन मिळाले पाहिजे. माझी पहिली मागणी अशी आहे की, 109 लोकांना कर्ज वाटतांना बँकेने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात दिली. बँकेने त्यांना सांगितले की, जमिनीवर टाच आणण्यापूर्वी त्या जमिनी विकून पैसे घेऊन मोकळे व्हा, ही बँक डुबली तरी चालेल, अशाप्रकारची जाहिरात दिलेली आहे. त्यामुळे अशाप्रकारे कर्जदारांबरोबर व्यवहार केला जात आहे, त्यावर ताबडतोब बंदी आणली पाहिजे. कोणत्याही प्रकारचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होता कामा नयेत ही माझी पहिली मागणी आहे. जे कर्जदार आहेत त्यांच्या कर्जाची वसूली आपण कशापध्दतीने करणार आहात? त्याबाबत शासनाकडून असे उत्तर मिळेल की, याच्याशी आमचा संबंध नाही, याबाबत ऑडिट रिपोर्ट येईल. रायगड जिल्हयामध्ये या बँकेच्या माध्यमातून मोठे राजकारण सुरु आहे. कुणी म्हणते की कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस यांच्यामध्ये आपापसात मारामारी सुरु आहे. त्याच्याशी आम्हाला काहिही देणे-घेणे नाही. आमच्या सामान्य ठेवीदारांना न्याय मिळणे याच्याशी आमचे घेणे-देणे आहे. सहकार चळवळ ही कोणत्याही पक्षाशी संबंधित नाही, असे म्हटले जाते तर मग या बँका कुणी बुडविल्या? या बँकेचे पुढारी कोण आहेत? या बँकेचे संचालक कोण आहेत? याबाबत माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी उदाहरण दिले की, निवडणुकीच्या काळात आमच्याकडे लोकांना चहा पाजण्यासाठी सुध्दा पैसे नसतात. परंतु त्याठिकाणी मतदारांना एकेका मतासाठी 1 हजार, 2 हजार, 5 हजार रुपये देण्यासाठी कुणाकडून पैसे आले? हे पैसे कोण देत आहे? यावरुन आपल्या लक्षात येईल की, यामध्ये कर्जदारांनी परत केलेल्या कर्जाच्या रकमेमधून मिळालेले हे पैसे आहेत. म्हणून या कर्जदारांची वसूली अतिशय कठोरपणे झाली पाहिजे.

सभापती महोदय, असे म्हटले जाते की, संचालकांना पकडले तरी ते दोन दिवसांनी सुटतात. याचा अर्थ आपण त्यांना पकडायचे नाही असा होत नाही. यापूर्वीच्या बँकेच्या संचालक मंडळावर एफ.आय.आर. दाखल होऊन सुध्दा त्यांच्यावर कठोर कारवाई झालेली नाही. माझी ही देखील मागणी आहे की, संचालक मंडळाला आपण सोडून चालणार नाही. ते दोन दिवसांत सुटू दे किंवा पाच दिवसात सुटू दे, त्यांच्यावर देखील कठोरपणे कारवाई झाली पाहिजे. यामधून लोकांना समजले पाहिजे की, जबाबदार असलेल्या संचालक मंडळावर सुध्दा कठोर कारवाई केली जाते. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी गंमतीत सांगितले की, या केळकरांच्या पतपेढया आहेत. या माझ्या पतपेढया नाहीत तर रायगड जिल्हयातील गोरगरीब माणसांच्या पतपेढया आहेत. गोरगरीब माणसाने या ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यामुळे या पतपेढयांच्या

14-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J 3

DGS/ D/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

बाबतीत माननीय सदस्य श्री. पाटील साहेबांची जरी बँक असली तरी ती आमचीच बँक आहे असे आम्ही समजतो. याचे कारण सामान्य माणसाला न्याय देण्याकरिता या बँका आणि पतपेढया निर्माण झाल्या आहेत. या पतपेढयांनी बँकांमध्ये डिपॉझीट ठेवलेली आहेत, त्यांना देखील 1 लाख रुपये मिळणार आहेत. त्या पतपेढीमध्ये हजारो गोरगरीब ठेवीदार आहेत. त्यामुळे प्रत्येक ठेवीदाराला ही मर्यादा मिळाली पाहिजे. एकाच पतपेढीमधून जर 1 लाख रुपये मिळाले तर ज्यांनी 2 हजार, 4 हजार, 5 हजार रुपये ठेवले आहेत त्याकरिता केंद्र शासनाबरोबर, रिझर्व्ह बँकेबरोबर लढून , भांडून आपण त्यांची मागणी पूर्ण केली पाहिजे. आमची मागणी 5 लाख रुपयापर्यंतची असली तरी या लहान ठेवीदारांना त्या निमित्ताने न्याय मिळाला पाहिजे. तसेच, या बँकेमध्ये हे व्यवहार होत असतांना या संचालकांबरोबर अधिकारी सुध्दा मूग गिळून बसले होते काय? ऑडिटर शांतपणे पहात होते काय? यापूर्वीच्या बँकेने कर्ज देत असतांना त्यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत, ज्यांचा त्यामध्ये सहभाग आहे, ज्यांनी संगनमताने हे कर्ज दिले आहे त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करण्याचे धोरण सरकारने स्वीकारले पाहिजे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. हा माझ्या जिल्हयामधील विषय आहे. यामध्ये हवाला घोटाळा झाला आहे, यामध्ये जरी सी.बी.आय. ने या लोकांना पकडले असले तरी रायगड जिल्हयातील जमिनीला फार मोठी किंमत आली आहे. जमिनीच्या भोवती हे सर्व घात-पात चालले आहेत, जमिनीच्या भोवती ही सर्व गुन्हेगारी सुरु आहे. म्हणून त्यांनी घेतलेल्या 200 ते 300 एकर जमिनी हे सरकार ताब्यात घेणार आहे काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

या जमिनी विकून ठेवीदारांना न्याय देणार काय? सामान्य ठेवीदारांचे वस्त्रहरण होत असताना शासन बघ्याची भूमिका घेणार असेल, शासन हात वर करणार असेल आणि शासन कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई करणार नसेल तर हे आम्हाला चालणार नाही.या जमिनी दुसऱ्यांच्या नावावर असल्या तरी देखील त्या जमिनीवर टांच आणून त्या जमिनी ताब्यात घेऊन, त्या जमिनी विकून सामान्य ठेवीदारांना न्याय द्यावा, अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करतो. माझी शेवटची मागणी शिक्षण संस्थांच्या बाबतीत आहे. या बँकामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सामान्य शिक्षण संस्थामधील माणसाचे पैसे अडकलेले आहेत. 75 वर्षोची ही जुनी बँक असल्यामुळे शिक्षण संस्थांनी मोठया विश्वासाने या बँकेमध्ये पैसे ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या ठेवीच्या हिताचे रक्षण झ ााले पाहिजे अशा प्रकारची मी मागणी करतो आणि पुन्हा एकदा पुनरुच्चार करु इच्छितो की, शासनाने याबाबतीत केवळ बघ्याची भूमिका न घेता ठोस कारवाई करुन ठेवीदारांना न्याय देण्याची भूमिका या चर्चेला उत्तर देतांना घ्यावी, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

( इसके बाद श्री जमा का भाषण )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा : ( महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ) : माननीय सभापति जी,माननीय सदस्य श्री जयंत पाटील जी, श्री अरुण गुजराथी जी तथा श्री संजय केळकर जी ने जो बातें यहां पर कहीं हैं, उन बातों को मैं यहां पर दोहराना नहीं चाहता. मैं यहां पर सिर्फ 2-3 बातों की ही जिक्र करना चाहता हूं. मैं कहना चाहता हूँ कि महाराष्ट्र को-ऑपरेटिव बँक एक्ट1960 है और बँकिंग रेग्युलेशन एक्ट 1959 केंद्र सरकार का है. उन एक्ट्स के अंतर्गत ही महाराष्ट्र में कोई भी सहकारी संस्था और अरबन कॉ-ऑपरेटिव बँक चलाने की परमीशन महाराष्ट्र राज्य और केंद्र सरकार से मिलती है. उन को रिवॅम्प करना चाहिए. यहां पर अभी हमारे माननीय सदस्य ने कहा कि हमारे राज्य का सहकार विभाग इस काम में पूरी तरह से असफल रहा है. मैं तो कहूंगा कि उनकी मिलीभगत से ही यह पूरा घपला हुआ है. इन बँकों को डुबाने का काम इन सब लोगों ने आपस में मिलकर किया है. इसलिए मेरा कहना है कि सन् 1995 के बाद से, जब से यह मिली-जुली सरकार का दौर आया है, तब से हमारी सरकार द्वारा इन बैंकों से संबंधित एक श्वेत पत्र या व्हाइट पेपर निकालना चाहिए. संबंधित जो भी बोर्ड ऑफ डायरेक्टर्स हैं, सहकारी विभाग के अधिकारी हैं, को-ऑपरेटिव कमिशनर हैं, प्रिंसिपल सेक्रेटरी हैं या ज्वाइंट रजिस्ट्रार हैं और जो इस घपले से संबंधित लोग हैं, उन सब के बारे में एक व्हाइट पेपर सरकार द्वारा निकाला जाना चाहिए. तथा घपले से संबंधित जो भी लोग अभी सर्विस में हैं या रिटायर हो गए हैं, उन सभी पर कार्रवाई होनी चाहिए.

दूसरी बात मुझे यह कहनी है कि महाराष्ट्र सरकार को इस बारे में एक स्पेशल कानून बनाना चाहिए. यदि अधिवेशन है तो कानून बनाया जा सकता है और यदि अधिवेशन नहीं है तो इससे संबंधित एक अध्यादेश निकाला जा सकता है, ताकि लोगों को न्याय मिल सके. अभी एक बँक 700 करोड़ रुपए का डूबा है, इसके बाद और भी बँक डूबेंगे. लोग वहां से पैसे निकालेंगे और गरीब ठेवीदारों के पैसे डूब जाएंगे. बँकिंग रेग्युलेशन एक्ट के मुताबिक डीआयजीसी के अंतर्गत सिर्फ एक लाख रुपए तक का ही इंश्योरेंस किया जाता है. मुझे पूछना है कि क्या भारत सरकार के एक्ट में यह एक कमी नहीं है या यह एक खामी नहीं है. सरकार जब बँक खोलने की परमीशन देती है ता क्या सरकार की यह जवाबदारी नहीं है कि वह ठेवीदारों के हितों की रक्षा

. . . L 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा ....

करे और उनका 100 प्रतिशत पैसा उनको वापस दिलाने की व्यवस्था कानून में की जाए ? मुझे पूछना है कि इस बारे में बँकों पर सरकार का क्या नियंत्रण है, सरकार इन बँकों को किस प्रकार से चेक करती हैं ? हर बँक पर रिजर्व बैंक की नार्म्स लागू होती हैं, तथा सहकारी विभाग की नार्म्स लागू होती हैं. हर महीने उनकी रिपोर्ट जाती है, उनकी बैलेंस सीट वहां जाती है. फिर भी अनेक बँक डूब गए हैं और अनेक बँक डूबने की कगार पर हैं. मुझे पूछना है कि क्या सिर्फ एक दिन में उनका एमपीए 100 प्रतिशत हो गया. यह बात सहकारिता विभाग के अधिकारियों की पकड़ में क्यों नही आयी. जब रिजर्व बँक के अधिकारियों को रिपोर्ट की कॉपी जाती है तो उनको यह पता क्यों नहीं चला कि यह बँक डूबने की स्थिति में आ रही हैं और इन बँकों में घपला हो रहा है. यदि उनकी मिलीभगत नहीं थी तो फिर उन्होंने इस बारे में समय पर एक्शन क्यों नहीं लिया ? मैं यहां पर एक उदाहरण देना चाहता हू ंकि नागपुर में महिला अरबन को-ऑपरेटिव बँक, समता को-ऑपरेटिव बँक और परमात्मा सेवक बँक की हालत खराब है. उसमें से महिला अरबन को-ऑपरेटिव बँक में सन् 2005 में एडमिनिस्ट्रेटर बैठाया गया और 5 साल एडमिनिस्ट्रेटर बैठे रहने के बाद सन् 2010 में उस बँक को डी लाइसेंस कर दिया गया. उसके बाद लिक्वीडेशन की प्रक्रिया जारी है. वहां पर 1 लाख रुपए से ज्यादा का इन्श्योरेन्स नहीं मिलेगा. लोगों के 1 लाख रुपए से ज्यादा के डिपॉजिट हैं. हमारे यहां पर समता बँक में नागपुर की 82 सहकारी सोसायटियों के 26 करोड़ रुपए हैं. उसमें छोटे-छोटे गरीब ठेवीदार हैं, दुकानदार हैं, उनको भी 1 लाख रुपए मिलेंगे. अगर एक सहकारी सोसायटी में 5 हजार या 10 हजार मेम्बर्स हैं तो 1 लाख रुपए के इन्श्योरेन्स में से वहां प्रत्येक के हिस्से कितना-कितना पैसा आएगा और बाकी पैसा कौन भरेगा ?

दूसरी बात यह है कि इनके ऊपर कार्रवाई होनी चाहिए. इसके लिए विशेष कानून बनना चाहिए और फास्ट ट्रॅक कोर्ट बनने चाहिए. हम संगठित गुनाह के लिए मकोका लगाते हैं. यह आर्थिक आतंकवाद है, लोग हजारों करोड़ रुपए डुबा रहे हैं. इस बारे में विशेष कानून बनाकर, इनको गिरफ्तार करके फास्ट ट्रॅक कोर्ट में इनकी सुनवाई होनी चाहिए, इन लोगों से डूबे हुए पैसे की वसूली होनी चाहिए.

. . . 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा . .

सभापति महोदय, 5 साल से हमारे बँक के कागजात पुलिस और सी.आई.डी. के पास हैं और जो लोग हजारों करोड़ रुपए खा गए, उनको ये फरार घोषित करते हैं, कहते हैं कि वे मिल नहीं रहे हैं. जिन लोगों ने बँक को डुबाया है, ऐसे लोगों की जानकारी, मोबाइल नंबर और उनके पते महाराष्ट्र सरकार का मैं दे सकता हूँ. वे इसी महाराष्ट्र में रह रहे हैं और घूम रहे हैं और पुलिस उन्हें फरार बता रही है. इन लोगों के ऊपर केस नहीं हुआ, चार्जशीट दाखिल नहीं हुई. वे गिरफ्तार होते हैं तो उसके बाद उनकी जमानत हो जाती है. उनकी कोई प्रॉपर्टी रिकवर नहीं हुई है. मेरा शासन से अनुरोध है कि भारत के संविधान में सब को बराबर अधिकार दिया है. अगर कोई बँक लिक्वीडेट होने की स्थिति में आ गई है, अगर वहां पर सहकार कानून की धारा 88 लगाई गई है या वहां पर लिक्वीडेशन हो रहा है तो बँक को बचाने के लिए भेदभाव नहीं होना चाहिए. हमारे विदर्भ में एक भी अरबन कॉपरेटिव बँक को बचाने के लिए शासन की ओर से कोई प्रयास नहीं हुआ है. दूसरे क्षेत्र के बँक बचाए जाते हैं, फिर हमारे साथ भेदभाव क्यां होता है ? इसलिए हमारी मांग है कि बँकों के 1 लाख से ऊपर के जो ठेवीदार हैं और खासतौर से जो को-ऑपरेटिव सोसायटी के मेम्बर हैं, उनका 100 प्रतिशत पैसा उनको वापस मिलना चाहिए. 4 जनवरी 2010 को महाराष्ट्र शासन ने चीफ सेक्रेटरी की अध्यक्षता में 3 बँकों के बारे में एक समिति बनाई है, उसमें 1 लाख से अधिक राशि के ठेवीदारों के बारे में क्या होगा, इन बँकों को पुनर्जीवित करने, मर्जर या एक्वीजीशन के बारे में क्या होगा, इसके बारे में शासन को ठोस निर्णय लेना चाहिए. ऐसा मेरा अनुरोध है. धन्यवाद.

----

. . . . भाषण पूर्ण. इसके बाद श्री. राजन तेली का भाषण.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सभागृहात पेण अर्बन बँकेबाबत अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी 2005 ते 2010 या कालावधीतील पेण अर्बन बँकेतील गैरव्यवहाराकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. या कालावधीत या बँकेला ऑडिट रिपोर्टमध्ये 'अ' दर्जा दिलेला आहे. सन 2005-06 मधील एनपीए 19.84 टक्के इतका होता व सिडी रेश्यो 99.71 टक्के इतका होता.

सन 2006-07 मध्ये एनपीए 15.6 टक्के व सिडी रेश्यो 99.61 टक्के होता. सन 2007-08 मध्ये 19 टक्के एनपीए होता व सिडी रेश्यो 104.26 टक्के होता. 2009-10 मध्ये सिडी रेश्यो 101.95 टक्के आहे. या बँकेची सिडी रेश्योची सर्वसाधारण आकडेवारी पाहिली तर 65 ते 70 टक्के सिडी रेश्यो न ठेवता तो जास्त ठेवला जात असल्यामुळे त्याचे नुतनीकरण करण्यात येत होते. त्याची शक्यता पडताळणी पाहणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. 2005-06 म्हणजे ज्यावेळेपासून या बँकेचा सिडी रेश्यो 97 टक्के होता त्यावेळी बँकिंग रेग्यूलेशन ॲक्टच्या कलम 36 अन्वये या बँकेला कर्ज देण्यावर व कर्जाचे नुतनीकरणावर निर्बंध घातले असते तर आज 750 कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्याचे दिसून आले नसते. त्याचप्रमाणे सामान्य ठेवीदारांनी आपल्या ठेवी वाढविल्या नसत्या. याला सहकार खाते व सहकार खात्याचे अधिकारी जबाबदार आहेत असे मला वाटते. म्हणून ऑडिटर, सहकार खात्याच्या अधिका-यांवर कारवाई केली पाहिजे असे मला नमूद करावेसे वाटते. पेण अर्बन बँकेबाबत सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे मांडले असल्यामुळे मी त्याची पुनरावृत्ती करणार नाही. परंतु काही गोष्टी मी मुद्दाम नमूद करु इच्छितो. सातेरी पत संस्था, बांदा अर्बन पत संस्था सिंधुदुर्ग जिल्हयात होत्या. आज या पत संस्थांची काय परिस्थिती आहे ? या बँकांना 'अ' व 'ब' वर्गाचा दर्जा कसा मिळतो ? 1991 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये महामँगो नावाची संस्था निर्माण झाली. 1994 साली या संस्थेला शासनाने पैसे दिले होते. परंतु 2002 साली ही संस्था एनपीएमध्ये असताना सुध्दा या संस्थेला पैसे देण्यात आले. या संस्थेविरुध्द सहकार कायद्यातील कलम 83 अन्वये कारवाई झाली. परंतु कलम 88 ची कारवाई मागील 10 वर्षांपासून प्रलंबित ठेवलेली आहे. अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.राजन तेली.....

वेळी बँकांचे पैसे बुडाले तर त्याला जबाबदार कोण असेल ? सहकार खात्यातील अधिकारी कारवाई करीत नाहीत. महामँगो यासारख्या संस्थेवर कलम 88 खालील कारवाई मागील 10 वर्षांपासून केली जात नाही. शासनाने कलम 88 ची कारवाई करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत मागून घेतली होती. दोन महिन्यात कारवाई केली जाईल असे म्हटले होते. परंतु 10 वर्षानंतरही 88 खाली सहकार खात्याचे अधिकारी कारवाई करु शकले नाहीत, त्यांचे लागेबांधे आहेत. म्हणून महामँगो असेल, सातेरी पतपेढी, कामधेनू पतपेढी, भूदरगड पतपेढी, संचयनी असेल यासारख्या पतपेढया बुडाल्या आहेत. यामध्ये जो अनियमितपणा आलेला आहे, त्याला सरकारी अधिकारी जबाबदार आहेत. मग सहकार खात्यातील जॉईन्ट रजिस्ट्रार, डीडीआर जबाबदार असतील. ज्या ज्या पतपेढी संस्थांमध्ये गैरव्यवहार झाले असतील त्यांच्यावर कारवाई केली तर पुढील काळात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म्हटले की, आम्ही बँक चालवितो. परंतु भूदरगड पतपेढी संस्थेमध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी ठेवीदार आमच्याकडे चोराच्या नजरेने पहात होते. त्यामुळे आम्हाला एकाच दिवशी 7 कोटी रुपये द्यावे लागले. ठेवीदारांच्या पैसे काढून घेण्यासाठी सातत्याने रांगा लागतात. अशाप्रकारे पतपेढया चुकीचे काम करीत असतात. त्याचा राजकीय पुढारी फायदा घेत असतात. राजकीय पुढारी याच गोष्टीवर नजर ठेवतात आणि बँका चांगल्या चाललेल्या असताना सुध्दा खोटेनाटे आरोप करतात. त्यामुळे या सगळया गोष्टीला आम्हाला सामोरे जावे लागते. सभागृहात अर्बन बँकेचा विषय उपस्थित झालेला आहे. त्याबाबत शासनाने संबंधित अधिका-यांवर कडक कारवाई करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. मला संधी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

-------

3....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KGS/ MMP/ KTG/

श्री.परशुराम उपकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पत संस्था बुडाल्या, बँका बुडाल्या याबाबतची अनेक वेळा चर्चा झालेली आहे. चर्चा संपल्यानंतर मंत्री महोदय उत्तर देतात. त्यानंतर या प्रकरणांवर पडदा पडतो. आमच्या कोकणातील भूदरगड पत संस्था बुडाली आहे. त्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. यासाठी शासनाने वसुली अधिका-यांची नेमणूक केली.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

श्री. परशुराम उपरकर..

या वसुली अधिका-यांच्या माध्यमातून नवीन धंदा चालू होतो. जे ठेवीदार आहेत त्यांची सर्टिफिकेट घेऊन त्यांना 70 टक्के, 50 टक्के पैसे दिले जातात. अशा प्रकारचा धंदा पतसंस्थाचे अधिकारी आणि संचालक मंडळ करते. मग बिचारा हवालदिल झालेला ठेवीदार जे काही पैसे मिळत आहेत ते घेवूया या भावनेने ते पैसे घेतो. असा प्रकार भुदरगड सहकारी बँकेच्या बाबतीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेथे देखील ठेवीदाराना 50 टक्के, 40 टक्के पैसे देण्याचा निर्णय होईल. म्हणून या बाबतीत निर्बंध आणण्याची गरज आहे. पतसंस्था आणि नॉन बँकिंग संस्थांवर शासनाचे नियंत्रण असते म्हणून गुंतवणूकदार अशा संस्थामध्ये गुंतवणूक करीत असतात. काल या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून संचयनी, कामधेनू, कल्पतरु, पगोडा फॉरेस्ट या संस्थांनी केलेल्या कोटयवधी रुपयाच्या आर्थिक घोटाळयासंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. संचयनीच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हे 2002 सालातील जुने प्रकरण असून ते न्यायप्रविष्ट आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झाल्यानंतर ठेवीदार पैसे मिळतील या आशेने आपल्याकडे पहात असतात. म्हणून ठेवीदारांचे पैसे परत कसे मिळतील यादृष्टीने शासनाने योग्य ती उपाययोजना करावी, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्हयातील पेण अर्बन बँकेत झालेल्या आर्थिक घोटाळ्यासंबंधी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी अधिक वेळ घेणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी पेण अर्बन बँकेचा जो विषय येथे उपस्थित केला त्यावर सखोल चर्चा झालेली असून त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. सहकार क्षेत्रामध्ये होणारा हा भष्टाचार आहे. अशा प्रकारे सहकारी बँका, पतसंस्था बुडण्याची अनेक उदाहरणे राज्यामध्ये आहेत. अनेक बुडित संस्थांच्या संदर्भात या सभागृहामध्ये चर्चा झालेल्या आहेत. या चर्चेच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. आपण या सभागृहामध्ये चर्चा करतो आणि तात्पुरत्या स्वरुपात उपाययोजना करतो. परंतु कॅन्सरप्रमाणे हा रोग वाढत चाललेला आहे. त्याचे वेळीच ऑपरेशन करण्याची गरज आहे. तेव्हा अशा घटनांच्या बाबतीत शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे. पेण अर्बन बँक ही 750 कोटी पेक्षा अधिक रकमेची बँक आहे. रायगड जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे बँका बुडण्याचे प्रकार वाढत आहेत. काही त्रुटी राहिल्यामुळे ही बँक बुडालेली आहे असे नाही तर "विथ् मालाफाईड इण्टेन्शन" या बँकेमध्ये कारभार झालेला आहे. बँक बुडविण्याच्या उद्देशाने, भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने सर्व व्यवहार करण्यात आलेले आहेत. या बँकेत गैरप्रकार किंवा अनियमितता झाली असे नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे 1 हजाराचे 1 लाख रु. करण्यात आले, 1 लाखाचे एक कोटी रु. करण्यात आले. याचा अर्थ ठेवीदार आणि गुंतवणूकदारांची घोर फसवणूक करण्यात आलेली आहे. तेव्हा ही फसवणूक करणारे जे कोणी असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची गरज आहे. सभापती महोदय, हे प्रकरण गेल्या अनेक वर्षापासून निदर्शनास आले असताना अंतर्गत लेखापरीक्षण आणि शासकीय लेखापरीक्षणामध्ये देखील या गोष्टी निदर्शनास आणल्या गेल्या नाहीत. याचा अर्थ जाणीवपूर्वक गैरप्रकार आणि भ्रष्टाचार करण्याला सहकार्य केलेले आहे. यामध्ये जे कोणी संबंधित असतील, ज्यांनी ऑडिट केले, ज्यांनी "अ" वर्ग दिला, भ्रष्टाचार लपवून ठेवला अशा अधिका-यांवर कारवाई करावी. या बँकेतील ठेवीदारांमध्ये शिक्षकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. आमच्या पेन्शनर्स शिक्षकांनी मोठ्या अपेक्षेने या बँकेत ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यांना त्यांच्या ठेवी परत

..3..



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

मिळणे आवश्यक आहे. माझ्याकडे या बँकेच्या संदर्भात अनेक ठेवीदारांच्या तक्रारी आहेत. लोकवर्गणीतून जमा केलेला पैसा जो शैक्षणिक विकासासाठी बँकेत ठेवलेला आहे तो पैसा मिळण्याच्या दृष्टीने आणि सर्वसामान्य ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य प्रकारची उपाययोजना करावी एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

----

.....नंतर श्री. भोगले....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी कोकणातील आहे आणि कोकणातीलच एक अर्बन बँक बुडताना पाहून मला फार दु:ख होत आहे. कोकणातील डबघाईला आलेली ही चौथी बँक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या बँकेबाबतची वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडली आहे.

सभापती महोदय, बँका बुडतात याचे महत्वाचे कारण म्हणजे बँका कोट्याधीशांना कर्जे देतात. संपूर्ण भारतात ज्या ज्या आर्थिक संस्था बुडाल्या, ज्यांनी कर्जे बुडविली त्यांची यादी पाहिली तर सामान्य माणसे घेतलेली कर्जे वेळेवर परत करतात, परंतु धनाढ्य लोक कर्जे परत करीत नाहीत. रिझर्व्ह बँकेला सांगतात की, आम्ही इतकेच व्याज देऊ. अमुक पध्दतीने कर्ज परत करु अशाप्रकारे ते बँकेला डिक्टेट करतात. तोच प्रकार या बँकेबाबत झालेला आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी या प्रकरणी कोणालाही माफ करु नये. आज संचालक मंडळापैकी 6 संचालक सीबीआयच्या कस्टडीत आहेत. संचालकांप्रमाणेच अंतर्गत हिशेब तपासनीस, शासकीय हिशेब तपासनीस यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे. मुख्य भाग म्हणजे या बँकेच्या संचालकांनी 200 एकर जमीन खरेदी केल्याची बातमी वृत्तपत्रात छापून आली आहे. या जमिनीवर शासनाने टाच आणून ती आपल्या ताब्यात घ्यावी. ही जमीन विकून करोडो रुपये मिळतील. त्यातून सर्व ठेवीदारांचे पैसे परत करता येतील आणि बँक पुन्हा चांगल्या पध्दतीने चालविता येईल. या संदर्भात सरकारने पाऊल उचलणे आवश्यक आहे. बँकेच्या 27 पैकी 8 संचालकांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी कर्जे घेतली आहेत. संचालक कर्ज का घेतात? वास्तविक पाहता, सहकारी बँकेच्या संचालकांना कर्ज देता कामा नये.

सभापती महोदय, मध्यंतरी चिपळूण अर्बन बँक डबघाईला आली होती. आमच्याच पक्षाचे लोक त्या बँकेचे नेतृत्व करीत होते. श्री.संजय रेडीज हे त्या बँकेचे एक संचालक होते. बँकेच्या सभासदांनी वार्षिक सभेत अशी मागणी केली की, बँक वाचवायची असेल तर श्री.संजय रेडीज यांना अध्यक्षपदी नेमावे. या मागणीला संचालक मंडळाने मान्यता दिली. परंतु श्री.संजय रेडीज यांनी अध्यक्ष होण्याबद्दल काही अटी घातल्या. मी कर्जाची वसुली केल्याशिवाय राहणार नाही. आवश्यकता असेल तर मालमत्तेवर टाच आणली जाईल, मालमत्ता जप्त केली जाईल. या संदर्भात मुभा दिली तरच मी अध्यक्ष होण्यास तयार आहे असे त्यांनी सांगितले. त्यांना पूर्णपणे मुभा देण्यात आली. आज ती बँक चांगल्या पध्दतीने कारभार करीत आहे. अशा पध्दतीने बँकिंग

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई............

क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या लोकांना संधी दिली पाहिजे. मी पेण अर्बन बँकेच्या निवडणुकीच्या काळात प्रचारासाठी गेलो होतो. श्री.प्रभाकर धारकर हे त्या काळात बँकेचे अध्यक्ष होते. मला लोकांनी सांगितले की, श्री.प्रभाकर धारकर चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत, त्यामुळे तुमचे उमेदवार निवडून येणार नाहीत. खरोखर तसेच घडले. आमचा एकही उमेदवार निवडून आला नाही. मी याठिकाणी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, या बँकेच्या डबघाईला जे जे जबाबदार असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. शासकीय अधिकारी ऑडिट करण्यासाठी जातात ते योग्य पध्दतीने ऑडिट करीत नसतील तर त्याची कारणे तपासावीत आणि त्या संदर्भात कडक धोरण आखण्यात यावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहात सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, संजय केळकर, एस.क्यू.ज़मा, राजन तेली, परशुराम उपरकर, रामनाथ मोते आणि हुसेन दलवाई यांनी पेण अर्बन बँकेच्या संदर्भात झालेल्या गैरव्यवहाराची आणि या बँकेच्या माध्यमातून ठेवीदार व कर्जदार आणि बँकेचे सभासद या सर्वांमध्ये जो असंतोष निर्माण झ ााला आहे ती वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला आणि या माध्यमातून हा विषय सभागृहासमोर आला आहे.

नंतर पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील........

मी प्रथम या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करतो कारण त्यांनी सहकारी बँकांच्या संदर्भात शासनाने काय भूमिका घ्यावी या अनुषंगाने आपल्या भाषणातून अत्यंत चांगल्या सूचना केलेल्या आहेत. तसेच हा महत्वाचा विषय असल्याने आणि वेळ कमी असल्याने शासन यासंबंधी कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे तसेच थकित रक्कम वसुलीसंबंधात काय कारवाई करणार आहे याचा फक्त आढावा घेण्याचाच प्रयत्न करणार आहे.

महोदय, आपल्या राज्यात 635 पेक्षा अधिक नागरी बँका काम करीत आहेत आणि ही संख्या देशातील बँकांपेक्षा जास्त आहे असे म्हटले तरी चालेल. या बँकांमधील सन 2009-10 मधील ठेवी पाहिल्या तर मोठ्या प्रमाणात आहेत. त्या म्हणजे 1 लाख 14 हजार कोटीपर्यंतच्या ठेवी या अर्बन बँकांमध्ये आहेत आणि एकंदर कर्जाचा हिशेब पाहिला तर तो देखील 72 हजार कोटीचा आहे. प्रशासकाची नेमणूक एकूण 110 बँकांवर करण्यात आली असून 11 बँकांवर कलम 88 नुसार चौकशी सुरु आहे. तसेच कलम 83 नुसार 9 बँकांची चौकशी सुरु आहे तर फौजदारी कारवाई 18 बँकांच्या संदर्भात करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर बँकांना सक्षम करण्यासाठी किंवा त्यांचे विलीनीकरण करण्यासंबंधीचे प्रस्ताव सुध्दा आरबीआयने दिले होते व अशा प्रकारे 32 बँकांचे विलीनीकरण यशस्वीरित्या आपण करु शकलो व त्यातील 3000 कोटीच्या ठेवी सुखरूप ठेवण्याचा प्रयत्न आपण आजपर्यंत केला आहे. यासंदर्भात ज्या भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केल्या त्याच भावना सहकार मंत्री म्हणून माझ्याही आहेत म्हणून अशा बँकांमध्ये आपण ग्रेड ठरविल्या आहेत. त्यानुसार काही बँकांचे ग्रेड-1 आणि ग्रेड-2 असे वर्गीकरण आपण केलेले आहे. ग्रेड-1 मध्ये 256 बँका असून ग्रेड-2 मध्ये 139 बँका आहेत. त्याचप्रमाणे ज्यांचे नेटवर्किंग मायनस झालेले आहे आणि ज्यांची सतत काळजी वाटते त्या जवळपास 33 बँका आहेत. कदाचित भविष्यात त्यांची स्थिती सुध्दा पेण बँकेसारखी होऊ शकते, अशा बँकांच्या संदर्भात सहकार आयुक्तांच्या माध्यमातून कठोर भूमिका व आर्थिक शिस्तीचे निर्बंध लावण्याची प्रक्रियाही शासनाने सुरु केलेली आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्र राज्यातील सहकार आणि त्या अनुषंगाने राज्यात झालेली प्रगती अतिशय चांगली आहे. यामध्ये खरे तर दोन बाजू आहेत. त्यात पहिली बाजू म्हणजे चांगले काम करणाऱ्या सहकारी संस्था आहेत पण त्यांच्याबद्दल कोणी फारसे बोलत नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...........

परंतु चुकीच्या पध्दतीने कारभार झाला तर मात्र पूर्ण सहकार खातेच बदनाम होते अशी स्थिती आल्यामुळे एक गैरविश्वासाचे वातावरण निर्माण झाले व त्याचा दुःष्परिणाम सर्व ठेवीदार, बँकिंग व्यवसाय तसेच सहकारात काम करणारे अनेक कार्यकर्ते व सदस्यांवर होतो. त्यामुळे सहकारी बँका सुरक्षित नाहीत अशी भावना निर्माण होऊन आपल्या ठेवी काढण्याची प्रक्रिया सुरु होते. आपला पैसा सुरक्षित राहिला पाहिजे म्हणून अशा ठेवी काढण्याचा प्रयत्न होतो कारण त्यांना भविष्यात आपल्याला कोणीही वाली नाही अशी भीती ठेवीदारांना वाटत असते. हे स्वाभाविकच आहे. म्हणून मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, सहकारामधील अशा प्रवृत्ती ठेचून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचललेली आहेत. असे केले तरच सहकाराबद्दल राज्यात गैरविश्वास निर्माण होणार नाही. शेवटी सहकार क्षेत्राशिवाय आपण प्रगती करु शकणार नाही, कारण राज्यात आजही अनेक चांगल्या संस्था व पदाधिकारी या क्षेत्रात काम करताना आपण पाहतो आहे म्हणून त्याच पध्दतीने पुढील काळातही वाटचाल करणे आवश्यक आहे.

महोदय, पेण अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेच्या बाबतीत काय घडले ती परिस्थिती प्रामुख्याने लोकांसमारे येणे अत्यंत आवश्यक आहे. कदाचित वर्तमानपत्राच्या माध्यमातून काही ऑडिट्स येत असतात परंतु ही गोष्ट खरी आहे की, या बँकेचे सन 2009-10 चे ऑडिट अद्याप झालेले नाही. ते काम चालू आहे. परंतु सन 2005-06 पासून सन 2008-09 पर्यंत ऑडिट झालेले आहे. मध्यंतरी आरबीआयने नवीन नॉर्म्स लागू केलेले आहेत. पूर्वी हे ऑडिट शासकीय ऑडिटर्स करीत होते परंतु नवीन नॉर्म्सप्रमाणे आता प्रायव्हेट ऑडिटर्सकडून असे ऑडिट बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री. एस.डी. जैतवार, नाईक अँड कंपनी, मुंकुंद साबळे अँड कंपनी आणि सुधीर ठाकरे अँड कंपनी अशा प्रायव्हेट ऑडिट फर्म्सना या आर्थिक वर्षांमध्ये ऑडिटचे काम दिले होते. मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, या सर्व ऑडिटर्सनी या बँकेला "अ" वर्ग देण्याचाच प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ...

यासंदर्भात आम्ही जेव्हा चौकशी केली तेव्हा आम्हाला पहिल्यांदा खाजगी ऑडिटरने चुकीचे काम केल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे या खाजगी ऑडिटरला ब्लॅक लिस्टेड करण्याची भूमिका शासनाची राहणार आहे. या ऑडिटर्सना भविष्यात कोणत्याही बँकेचे ऑडिट करु दिले जाणार नाही अशी शासनाची भूमिका राहणार आहे. या खाजगी ऑडिटर्सने बँकाना "अ" वर्ग दिला नसता तर असा प्रकार घडलाच नसता. ही घटना काही एका रात्रीतून घडलेली नाही. सन 2009-2010 चे ऑडिट झालेले नाही. किर्तने आणि पंडीत फर्मचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, ही एक नामांकित आणि चांगले ऑडिट करणारी फर्म आहे. या संस्थेने महाराष्ट्रामध्ये चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे. या फर्मची क्रेडीबिलीटी आणि रिस्पॉन्सीबिलीटी आम्ही जवळून पाहिलेली आहे. त्यामुळे याच कंपनीला ऑडिटींगचे काम देण्यात यावे असे मी आयुक्तांना सांगितले आहे. या कंपनीने आता ऑडिटकरण्याचे काम हाती घेतलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, जेव्हा या फर्मने पेण बँकेच्या संदर्भात ऑडिट केले तेव्हा कोणत्या खात्यातून पैसे आले आणि कोणत्या खात्यात पैसे गेले, कशा कशा एंट्रीज झालेल्या आहेत हे 15 दिवस तरी त्यांना समजू शकले नव्हते. या व्हाईट फ्राडच्या संदर्भात इकॉनॉमिक ऑफेन्सच्या संदर्भात भविष्यात बदल करावा लागणार आहे. बँकेत ठेवला जात असलेला पैसा हा जनतेचा असतो. ठेवीदारांच्या पैशाचा गैरव्यवहार करण्याचे धाडस भविष्यात घडता कामा नये यासाठी धोरणात्मक निर्णय करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. अशा बँकामध्ये काही तरी घडत असल्याची बाब आमच्या विभागाला दीड वर्षापूर्वी समजू लागली होती. सन 2008-09 मध्ये झालेले ऑडिटचे फेर ऑडिट करण्याची प्रक्रिया सुरु झाली व सन 2009-10 च्या लेखा परिक्षणाचे काम किर्तने आणि पंडीत फर्मला देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. यासंदर्भात पहिल्यांदा ऑडिट झाल्यानंतरच आपल्याला सर्व वस्तुस्थिती समजू शकेल. या बँकेत एकाच वर्षी अडीचशे कोटीची ठेव पावणे तीनशे कोटीवर गेल्याचे दिसून आलेले आहे. अशी काय जादू घडली की, एकाच वर्षात बँकेच्या ठेवी वाढल्या ? यामध्ये फार मोठी कॉन्परन्सी घडलेली आहे. म्हणून आम्ही यासंदर्भातही तपासणी करीत आहोत. या बँकेच्या ठेवी एक वर्षात ख-या अर्थाने वाढल्या की, वेगवेगळया माध्यमातून बँकेत ठेव दाखववायाची, दुस-या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ...

बाजूला लोन घ्यावयाचे आणि बिल डिस्काऊंटींग करण्याचा प्रयत्न करावयाचा अशा बाबी या ठिकाणी घडल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे या बँकांचे फेर ऑडिट झाल्यानंतर सर्व माहिती मिळेल व सर्व माहिती मिळाल्यानंतर यासंदर्भात योग्य तो निर्णय घेता येईल.

या बँकेत सन 2005-06 मध्ये 332 कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, सन 2006-07 मध्ये 658 कोटी रुपयांच्या ठेवी झाल्या. 350 कोटी पर्यंतच्या ठेवी रिझनेबल होत्या असे मानावयास काही हरकत नाही. परंतु नंतर या बँकेच्या ठेवीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. सन 2007-08 मध्ये 465 कोटी, 2008-09 मध्ये 503 कोटी आणि सन 2009-10 मध्ये 689 कोटीपर्यंत या बँकेची ठेव ऑन रेकॉर्ड गेलेली आहे. ऑडिट झाल्यानंतर सर्व गोष्टी बाहेर येतील. या बँकेचा एनपीए खूप मोठया प्रमाणात झालेला आहे. या बँकेच्या एकूण 18 शाखा आहेत. पेण शाखा, गिरगाव शाखा व विलेपार्लेची शाखा या तीन शाखेत मोठया प्रमाणात गडबडी झाल्याचे सकृत दर्शनी दिसून आलेले आहे. आमच्या अधिका-यांनी या बँकेचे इन्सपेक्शन करण्याचा प्रयत्न केला होता. पेणच्या बँकेत ठेवीदाराची संख्या 423 असून त्या ठिकाणी 117 कोटी रुपयांची ठेव रक्कम आहे. कर्जदारांची संख्या 3442 आहे. पेण बँकेची जी परिस्थिती आहे तशीच परिस्थिती गिरगाव आणि विलेपार्ले बँकेची आहे. पेण, गिरगाव आणि विलेपार्लेमध्ये या घटना घडलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 11:25

श्री.हर्षवर्धन पाटील........

या बँकांचा ठेवीवरील व्याज दर एक-दोन वर्षासाठी 11 टक्के होता. इतर बँकांच्या तुलनेत हा व्याज दर जास्त होता त्यामुळे साहजिकच ग्राहक त्या बँकेकडे आकर्षित होऊन त्यांनी आपल्या ठेवी त्या बँकेत ठेवल्या. या ठेवीदारांमध्ये सेवानिवृत्त झालेले कर्मचारी आहेत ज्यांनी आपल्या पेन्शनचे पैसे, प्रॉव्हीडंड फंडाचे पैसे त्या बँकेत ठेवले. आपण रिझर्व्ह बँकेचे नॉर्म्स स्वीकारले आहेत. सहकार विभागाने त्या बँकेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेला कळविले. त्यानंतर दिनांक 21 सप्टेंबर, 2010 रोजी रिझर्व्ह बँकेने शासनाला आदेश दिले की, या बँकेवर कलम 110 (अ) प्रमाणे कारवाई करावी. तसेच 12 मुद्यांचे एक पत्र सहकार आयुक्तांना दिले. रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे सहकार विभागाने तातडीने त्या बँकेवर प्रशासक नेमला. आता त्याठिकाणी प्रशासकाच्या माध्यमातून पुढील कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, दरम्यानच्या काळात या प्रकरणा बाबबत सी.बी.आय.कडे तक्रार द्यावी ज्याचा उल्लेख याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केला. एम.एस.टी.सी.च्या संदर्भात वर्तमानपत्रात एक बातमी आली होती. 109 कर्जदारांच्या संदर्भातील सर्व डिटेल्स माझ्याकडे आहेत. त्याची माहिती देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. 109 कर्जदारांना जवळपास 511 कोटी रुपयांचे कर्ज दिले. ज्याला सी.बी.आय. हवाला रॅकेट मानते. अतिशय पध्दतशीरपणे हा गैरव्यवहार करण्यात आलेला आहे. मी सहकार क्षेत्रात अनेक वर्षे काम करीत आहे. या सदनातील अनेक सन्माननीय सदस्य सहकार क्षेत्रात चांगले काम करीत आहेत. परंतु याठिकाणी ट्रेन ब्रेन वापरण्याचा प्रकार झाला. गर्व्हेमेन्ट ऑफ इंडियाच्या काही योजना होत्या. त्याचा फायदा घेता येईल काय असा विचार होऊन जवळपास 511 कोटी रुपयांचे कर्ज 109 जणांना देण्यात आले. आम्ही बँकेच्या अधिकाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले त्यावेळी एक अधिकारी गमतीने सांगत होता की, कोणाला कर्ज द्यावयाचे हे संचालक आम्हाला सांगत होते. आम्ही विचारले की, कोणाच्या नावे कर्ज द्यायचे तर त्यावर त्यांचे उत्तर असायचे की, एखाद्या नदीच्या नावावर कर्ज द्या. नंतर आम्ही त्यांना सांगितले की, नद्यांची नावे संपली आहेत, आता कोणाच्या नावावर कर्ज द्यायचे ? त्यावर संचालकांनी सांगितले की, आता देवांची नावे द्या. बँकेत अशाप्रकारे कारभार

..2..

श्री.हर्षवर्धन पाटील........

चालत असेल तर त्या बँकेचे काय होईल हे कोणी सांगावयास नको. मी याठिकाणी नमूद करु इच्छितो की, यामध्ये जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर सहकार कायद्याप्रमाणे कठोर कारवाई केली जाईल. आज दोन लाख ठेवीदारांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. हा पब्लिक क्राय आहे. अशाप्रकारचा घोटाळा केल्यानंतर कोणी ताठ मानेने जगत असेल तर त्याच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आम्ही अशाप्रकारची कारवाई करीत असताना कोणाचा दबाव आला किंवा फोन आला तर त्याचा आम्ही मुळीच विचार करणार नाही हे मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, कोकणात गरीब लोक आहेत. जे सेवा निवृत्त झाले आहेत, त्यांनी आपले सर्व पैसे त्या बँकेत ठेवलेले आहेत. कोणी आपली अर्धा-एक एकर जमीन विकली. त्यातून मिळालेले पाच-दहा लाख रुपये त्या बँकेत ठेवलेले आहेत. कोणी व्याजावर जगता यावे म्हणून त्या बँकेत पैसे ठेवलेले आहेत. काही पत संस्थानी बँकेत ठेवले आहेत. हे सर्व लोक आज अडचणीत आलेले आहेत. तेव्हा याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेण्याचे आम्ही ठरविले आहे. मी अगोदर सांगितल्या प्रमाणे प्रथम ऑडिटचे काम पूर्ण करावयाचे आहे. दिनांक 31 जानेवारी 2011 पर्यंत ऑडिटचे काम पूर्ण होईल. ऑडिट पूर्ण झाल्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा लागेल. आय.पी.सी.च्या कलम 120 (बी), चुकीची माहिती दिली म्हणून कलम 420, फ्रॉड केल्याबद्दल कलम 177 व कलम 403 बोगस रेकॉर्ड केल्याबद्दल तसेच 415, 416, अशी कलमे लावली जाणार आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्रीृ.अजितशिगम 11.30

श्री.हर्षवर्धन पाटील............

स्वत: करिता फंड वापरला म्हणून कलम 419 लावण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. चुकीचे निर्णय घेतले आणि संस्थेचे नुकसान केले म्हणून 427 कलमान्वये आपण कारवाई करु शकतो त्याचबरोबर चुकीचे रेकॉर्ड तयार केले म्हणून 468,477 या कलमाखाली कारवाई करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : माननीय मंत्र्यांचे उत्तर संपेपर्यत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील :सहकार कायद्यातील कलम 88 खालीसुध्दा कारवाई करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे या कलमाच्या कारवाई बरोबरच कलम 95 खाली शासनाला जो अधिकार प्राप्त झालेला आहे त्या अनुषंगाने संचालक मंडळाची जी मालमत्ता आहे ती सगळी मालमत्ता ॲटॅच करण्याची कारवाई करण्याचे देखील शासनाने ठरविले आहे.या संदर्भात प्रथम ऑडिट रिपोर्ट येणे आवश्यक आहे.या प्रकरणाशी संबंधित 109 फाईल सी.बी.आय.च्या ताब्यात आहेत. त्यासबंधी सी.बी.आय. ला सहकार विभागाच्या आयुक्ता मार्फत अशी विनंती केली होती की सी.बी.आय.चा निर्णय जेव्हा लागावयाचा असेल तेव्हा लागेल परंतु या प्रकरणाशी संबंधित असलेल्या 109 फाईल्सच्या झेरॉक्स प्रती जर आम्हाला दिल्या तर या 109 प्रकरणातील 511 कोटी रुपयांच्या गैरव्यवहार झालेला आहे त्यासंबंधीचा रेकॉर्ड आमच्याकडे आल्यानंतर आम्हाला कारवाई करता येईल. आज सकाळी आमच्या विभागाच्या अधिका-याकडून ब्रिफींग घेत असतांना मला अशी माहिती देण्यात आली होती की, सी.बी.आय. ऑफिसरने असे सांगितले आहे की 15 जानेवारीपर्यत रिपोर्टसह सगळे रेकॉर्ड त्यांच्याकडून देण्यात येणार आहे. सी.बी.आय.कडून जर हे सगळे रिपोर्ट आले तर 31 जानेवारीपर्यत ऑडिट रिपोर्ट फायनल होईल त्यानंतर पुढची कारवाई करणे योग्य राहील असे मला प्रामुख्याने आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय या चर्चेत भाग घेत असताना सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी काही धोरणात्मक बाबीचा उल्लेख केला आहे.त्यांचे असे म्हणणे होते की ,असे गैरप्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी काही कायदे करण्यात यावेत तसेच ऑडिट सिस्टीममध्ये काही बदल करण्यात यावेत. या चर्चेच्या निमित्ताने पतसंस्थेमध्ये होणा-या गैरव्यवहाराचा उल्लेख करण्यात आला होता. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पत संस्थेच्या संदर्भात नवीन कायदा आणला जाणार आहे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील............

कदाचित आजच्या मंत्रिमंडळामध्ये त्या कायद्याच्या संदर्भात निर्णय घेतला जाईल . या संदर्भात नवीन विधेयक तयार करण्यात आले असून सहकारी पत संस्थेच्या कायद्यामध्ये 29 सुधारणा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एक नवीन ॲथॉरिटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पत संस्था ख-या अर्थाने ठेवीदाराच्या ठेवीमुळे उभी राहत असल्यामुळे ठेवीदाराचा हक्क असला पाहिजे परंतु सगळया नागरी सहकारी बॅका, पतसंस्था ठेवीदाराच्या ठेवीमुळे उभ्या राहतात परंतु त्यांचा "से" राहत नाहीत आणि संचालक मंडळाचा मात्र "से" राहतो या संदर्भात नवीन कायद्यामध्ये बदल प्रस्तावित केलेला आहे.1960 च्या कायद्यात काही अमुलाग्र बदल करण्याची प्रक्रिया सहकार विभागाने सुरु केलेली आहे .

सभापती महोदय,,कोणत्याही सहकारी सोसायटीची नोंदणी केल्यानंतर तिला सहकारी कायदा लागू होत असतो.त्यामध्ये वर्गवारी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून त्याप्रमाणे बॅकेसाठी , गृहनिर्माण संस्थेसाठी , सेवा देणा-या संस्थेसाठी , प्रक्रिया उद्योग निर्माण करणा-या संस्थासाठी वेगळा कायदा करावा लागेल.अशा प्रकारे राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यामध्ये काही बदल निश्चितपणे करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर विश्वस्त म्हणून ज्यावेळी संस्था चालक या संस्थेमध्ये काम करीत असतात त्यावेळी त्या संस्था चालकांची जबाबदारी विश्वस्त म्हणूनही असली पाहिजे अशा प्रकारे त्या कायद्यात बदल करावा लागणार आहे कदाचित काही लोकांना हा निर्णय आवडणार नाही. परंतु एखाद्या पत संस्थेमध्यें एखाद्या संस्था चालकांनी जाणुनबूजून गैराव्यवहार केला असेल तर त्याला भविष्यामध्ये कोणत्याही सहकारी संस्थाचे संचालक होता येणार नाही अशा प्रकारची कडक तरतूद या कायद्यामध्ये करावी लागणार आहे.सहकारी बॅका आणि सहकारी पतपेढयामध्ये लोकांनी पैसा गुंतवलेला असतो व त्यासंदर्भात काही धोरणात्मक निर्णय शासनाला घ्यावा लागणार आहे तो निर्णय घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, विश्वासार्हता निर्माण करणे हे सहकारी चळवळीपुढे मोठे आव्हान निर्माण झालेले आहे. एका बाजूला सहकारी संस्थांना खाजगी संस्थाबरोबर स्पर्धा करावी लागत आहे दुस-या बाजूला केन्द्र सरकारकडून नवीन कायदे केले जात आहेत, हायकोर्टाकडून देखील काही

3...

श्री.हर्षवर्धन पाटील............

निर्णय दिले जात आहेत त्यामुळे खाजगी संस्थेबरोबर स्पर्धा करण्याची बाब आता निर्माण झालेली आहे. जिल्हा बॅक, अर्बन बॅक, सहकारी पत संस्था , प्रक्रिया करणा-या सहकारातील संस्था ,राज्य बॅंक इत्यादींना स्पर्धेत टिकावयाचे असेल तर त्यांच्यामध्ये अकाऊन्टीबिलीटी , रिस्पॉन्सिबिलीटी आणि विश्वासार्हता असणे आवश्यक आहे ज्या संस्थांकडे या तीन बाबी राहतील त्याच संस्था भविष्यात चालू शकतील या संदर्भात पब्लिक अवेअरनेस करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील..

लोकांना हे समजले पाहिजे, लोकांनी सुध्दा याची चौकशी केली पाहिजे की, मी माझे पैसे कोणत्या बँकेमध्ये ठेवावेत. कारण हा तुमचा वैयक्तिक प्रश्न आहे. याठिकाणी ठेवीदारांचे बुडालेले पैसे सरकारने द्यावेत अशी मागणी करण्यात आली. अमुक एका बँकेमध्ये आपण पैसे ठेवावेत असे आम्ही त्यांना सांगावयास गेलो नव्हतो, अमुक एका बँकेचे कर्ज घ्या असे आम्ही त्यांना सांगायला गेलो नव्हतो. तरीसुध्दा सरकार म्हणून आमची सुध्दा यामध्ये काहीतरी जबाबदारी आहे. अशाप्रकारच्या घडणाऱ्या घटनांना कशापध्दतीने आळा घालता येईल यासाठी आपण प्रयत्न करण्याची गरज आहे. यामध्ये ऑडिट सिस्टीमसुध्दा पारदर्शी करण्याची आवश्यकता आहे. बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभा कशाप्रकारे होतात हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्याठिकाणी एसआरपी आणि डीवायएसपी यांना बोलाविल्याशिवाय सभा पार पडत नाही. परंतु जर सभेचे इतिवृत्त वाचले तर ही सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली अशाप्रकारचे वाक्य त्यामध्ये अंतर्भूत केले जाते. त्यामुळे या सभा कशा होत आहेत हे आपणा सर्वांना माहीत आहे. मला वाटते या संदर्भात सुध्दा सर्वसाधारण सभेच्या बाबतीत नवीन धोरण ठरविण्याची गरज आहे. ऑडिट सिस्टीममध्ये बदल करण्याची गरज आहे. त्याचबरोबर आमचे सुध्दा अधिकारी ज्या ठिकाणी उपस्थित असतात त्याठिकाणी आमच्या खात्याचा सुध्दा जरब असण्याची आवश्यकता आहे. आज दुर्दैवाने आम्ही कारवाई करावयाचे ठरविले तर कुठून तरी फोन येतो आणि कारवाई स्थगित करण्याबाबत सांगितले जाते. म्हणून काही केसेसच्या संदर्भात आपल्याला ठरवून कडक कारवाई करण्याबाबत निर्णय घ्यावे लागतील. अशाप्रकारचे कडक निर्णय घेत असतांना आमच्या विभागाला आपणा सर्वांकडून सहकार्य मिळण्याची आवश्यकता आहे. कारवाई करीत असतांना हा लांबचा व तो जवळचा हे पहाता कामा नये. अशाप्रकारचे कडक निर्णय या माध्यमातून करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या बँकेच्या व्यवहारामध्ये इन्व्हेस्टमेंट आणि सिक्युरिटीच्या बाबतीत दोन महत्वाचे निर्णय करण्याची आवश्यकता आहे. आज सर्वच बँकामध्ये एक प्रथा सुरु झाली आहे, ती म्हणजे कुणीही येऊन सांगत असते की, आमची बँक फार चांगली चालली आहे, आमच्या ठेवी वाढल्या आहेत. सभापती महोदय, बँकेमध्ये ठेवी वाढल्या म्हणजे बँक चांगली चालली असा त्याचा अर्थ होत नाही. सहकार विभागाचा मंत्री म्हणून सांगतो की, बँकामध्ये ठेवी वाढल्या म्हणजे बँकेच्या अडचणी वाढल्या. याचे कारण असे की, त्यामधील लोन कम्पोनंट हा महत्वाचा भाग आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील....

एका बाजूला आपण ठेवीदारांना व्याज देतो आणि दुसऱ्या बाजूला मार्केटमध्ये कर्जदारांना कर्ज म्हणून त्या पैश्याचे वाटप करतो. कर्जदारांकडून मिळणारे व्याज आणि ठेवीदारांना द्यावयाचे व्याज यामधील मॅचिंग पाहिले तर त्यामध्ये घोटाळा होतो. यामध्ये इन्व्हेस्टमेंटच्या बाबतीत एक नवीन नियम निघाला आहे. मी अनेक बँकांचे बॅलन्स शीट पाहिले आहे. आपण इन्व्हेस्टमेंट किती प्रमाणात करतो, इन्व्हेस्टमेंटला मिळणारे व्याज, ठेवीदारांना द्यावयाचे व्याज याचा हिशेब केला तर ते कुठेही मिट आऊट होत नाही अशी परिस्थिती आहे. उत्पन्नाची बाजू आणि ठेवीदारांना द्यावयाच्या व्याजाच्या संदर्भातील बाजू यामध्ये सुध्दा खूप मोठी तफावत आपल्याला दिसते. याबाबत परवा माननीय गृहमंत्र्यांबरोबर माझी एक बैठक झाली. त्यावेळी मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती केली की, आयपीसीच्या 420 कलमान्वये सर्वसाधारण फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल केला जातो. त्या आयपीसीच्या कलमामध्ये एक वेगळे चॅप्टर अंतर्भूत करण्याचा माझा प्रयत्न आहे. अशाप्रकारची फसवणूक करणारे, अशाप्रकारचे गैर व्यवहार करणारे आहेत, त्यांच्यासाठी आयपीसी च्या 420 कलमामध्ये एक वेगळे कलम आपण अंतर्भूत करु शकतो. अशाप्रकारे परवा माननीय गृहमंत्र्यांबरोबर झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये माननीय गृहमंत्र्यांनी गृह विभागाला तशाप्रकारच्या सूचना दिल्या आहेत. हा कायदा संमत झाल्यानंतर त्याला माननीय राष्ट्रपतींची मान्यता घ्यावी लागणार आहे. ज्याप्रमाणे आपण सावकारीच्या संदर्भात कायदा केला आहे, त्याच धर्तीवर आयपीसीच्या कलम 420 मध्ये सुध्दा आमूलाग्र बदल करण्यासाठी कायदा करावा लागणार आहे. आज यामध्ये मोठया प्रमाणावर जनतेचा पैसा गुंतविला गेला आहे.

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

या सभागृहात ठेवीदारांच्या संदर्भात काही मुद्दे मांडले गेले आहेत, त्या सर्व मुद्दयांच्या बाबतीत एकदा ऑडिट रिपोर्ट फायनल होऊन तो 31 जानेवारीपर्यंत प्राप्त होऊ द्या. तो आल्यानंतर ठेवीदारांच्या संदर्भातील, आरबीआयच्या संदर्भातील आणि सीबीआयच्या संदर्भातील आपण उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या बाबतीत मी स्वत: पेण येथे येतो. त्यावेळी माननीय सदस्य श्री. संजय केळकर आपण स्वत: त्याठिकाणी उपस्थित रहावे.

(यानंतर श्रीमती थोरात)

अप्रकाशित / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

तुम्हाला अगोदर निमंत्रित केले जाईल. मला असे वाटते की, त्याठिकाणी फार लोकांनी गर्दी करण्याची आवश्यकता नाही. कमिशनर, अधिकारी आणि आम्ही सगळे त्या ठिकाणी येऊ. तेथील प्रमुख लोकांबरोबर बैठक घेऊ. कोणकोणत्या माध्यमातून कारवाई करता येईल याबाबतीत सकारात्मक निर्णय निश्चितपणाने घेतला जाईल हे मला याठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मी अधिक वेळ घेणार नाही. या चर्चेच्या माध्यमातून अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. वेळेअभावी सगळया मुद्यांचे स्पष्टीकरण करणे शक्य होणार नाही. त्याठिकाणी प्रशासक मंडळ नेमलेले आहे. या प्रशासक मंडळामध्ये काही बदल करणार काय अशा प्रकारची मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, कोणताही बदल प्रशासक मंडळात करण्यात येणार नाही. कारण शासनाने रिझर्व्ह बँकेला तसे कळविलेले आहे. या प्रशासक मंडळामध्ये ज्या लोकांची नेमणूक केलेली आहे त्या लोकांच्या माध्यमातून या बँकेच्या बाबतीतील पुढची कारवाई करावयाची आहे ती निश्चितपणे करता येईल. काही लोक मला मध्यंतरी भेटले. त्यांनी, प्रॉपर्टीज विकण्याचे थांबवावे अशा प्रकारची मागणी केलेली आहे. त्यासंदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात आली होती. सभापती महोदय, या बँकेच्या संदर्भातील ऑडिट होऊ द्यावे. या बँकेच्या संदर्भातील बरेचसे पेपर्स सी.बी.आय.कडे सुपूर्द करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सी.बी.आय., आर.बी.आय,सहकार विभाग आणि गृह विभाग यांच्या माध्यमातून जॉईंटली कारवाई करावी लागेल.

सभापती महोदय, मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, भविष्यामध्ये अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत या दृष्टिकोनातून निश्चितपणे सहकार विभाग कसोशीने प्रयत्न करील. तसेच सर्व ठेविदारांना मला या माध्यमातून आश्वासित करावयाचे आहे की, याप्रकरणामध्ये गुंतागुंत खूप झालेली आहे. सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांनी काही प्रॉपर्टीज आयडेन्टीफाय केलेल्या आहेत. प्रशासक नेमल्या नंतर 26 कोटी रुपये वसूल केलेले आहेत. आज आमच्याकडे 18 कोटी रुपये शिल्लक आहेत. या 18 कोटी रुपयातून 1 लाख रुपयापर्यंतच्या ठेवीदारांना एक हजार रुपये देण्याच्या संदर्भातील कार्यवाही केलेली आहे.मला असे वाटते की, निश्चितपणे वसुलीच्या माध्यमातून काही धोरण स्वीकारण्यात येईल. मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, भविष्यामध्ये अशा प्रकारच्या घटना घडू नयेत. घडलेल्या घटनांच्या संदर्भात निश्चितपणे कठोर कारवाई करण्याचा शासन प्रयत्न करील, एवढाच विश्वास मी या ठिकाणी देतो. या बद्दल आपल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

मनात कसल्याही प्रकारची शंका असता कामा नये. जर काही चुकीचे घडत असेल तर त्यासंदर्भात आपण केव्हाही या ठिकाणी सांगू शकता. पण भविष्यामध्ये काम करताना खऱ्या अर्थाने सहकारामधील विश्वास बाजूला जाऊ नये एवढी खबरदारी आपण सर्वाच्या माध्यमातून घ्यावी लागेल एवढा विश्वास व्यक्त करतो. धन्यवाद.

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन.

**मु.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, रामदास कदम,विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे चालू )

**उप सभापती** : आता नियम 260 अन्वयेच्या विजेच्या भारनियमाना बाबतच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, दि. 9 डिसेंबर,2010 रोजी, नियम 260 अन्वये विजेच्या संदर्भातील चर्चा सुरु होती. आता पेण अर्बन बँकेच्या संदर्भातील सुरु असलेली अल्पकालीन चर्चा 11.30 वाजता संपावयास पाहिजे होती त्याऐवजी ती जवळपास 11.42 वाजता संपली आहे. या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या संदर्भात सकाळी 11.30 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंतचा दीड तासाचा वेळ कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आला आहे.

नियम 260 अन्वयेच्या विजेच्या प्रस्तावावर दि.9 डिसेंबर, 2010 रोजी 95 मिनिट वेगवेगळे सन्माननीय सदस्य बोलले आहेत. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली 15 मिनिटे बोलले आहेत. भाजपा च्या वतीने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे हे दोघे मिळून जवळपास 40 मिनिटे बोलले आहेत. शिवसेनेच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे दोघे मिळून जवळ जवळ 40 मिनिटे बोललेले आहेत. या प्रस्तावावरील चर्चेची जवळपास 95 मिनिटे संपलेली आहेत. या चर्चेला उत्तर देण्यासाठी मला कमीतकमी 35 ते 40 मिनिटे लागणार आहेत. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे मी कमी करीन पण काल जैतापूरच्या संदर्भातील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील जनतेला राज्य सरकारची भूमिका अतिशय स्पष्टपणे सांगितलेली आहे.म्हणून माझी विरोधी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पावर....

पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, विरोधी पक्षातील बहुतेक मान्यवर नेते बोललेले असल्यामुळे बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्दे मांडावेत जेणेकरुन नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा वेळेत पूर्ण होईल या दृष्टिकोनातून माननीय सभापतीं महोदय आपण निर्णय द्यावा ही विनंती.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्या दिवशी असे संगितले होते की, हा विषय सन्माननीय सदस्यांना ज्या पध्दतीने मांडावयाचा आहे त्या पध्दतीने मांडावा. वेळेचे बंधन रहाणार नाही. या प्रस्तावामध्ये केवळ जैतापूरचा विषय नसून वीज बिलात झालेली वाढ, भार नियमन, कोळशातील भ्रष्टाचार, प्रॉडक्शनमधील भ्रष्टाचार हे सगळे विषय आहेत. त्यामुळे यानंतर बोलणाऱ्या सन्माननीय संदस्यांना वेळेचे बधंन घालण्यात आले तर या आधी जे सन्माननीय सदस्य बोलले आहेत त्यांना न्याय मिळाला आणि जे सन्माननीय सदस्य आता बोलतील त्यांच्यावर अन्याय होईल असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यामुळे विषयाच्या बाहेर कोणी बोलणार नाही एवढी आम्ही खात्री देतो पण या सर्व विषयावर बोलण्याची परवानगी आम्हाला मिळाली पाहिजे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, विदर्भाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाचे असे दोन प्रस्ताव चर्चेला येणार आहेत. नियम 260 अन्वयेच्या विजेच्या प्रस्तावावर बरेचसे सन्माननीय सदस्य बोलले असतील परंतु आणखी बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांची या प्रस्तावावर बोलण्याची इच्छा आहे. त्यामुळे बोलू इच्छिणाऱ्या किती सन्माननीय सदस्यांची नावे कमी करता येतील त्याप्रमाणे सभापती महोदय, आपण नावे कमी करावीत त्याचबरोबर वेळेचेही बंधन पाळावे. परंतु या विषयावरील चर्चा झाली पाहिजे. तसेच नियम 260 अन्वयेचा विदर्भातील कापसाच्या संदर्भातील जो प्रस्ताव आहे. त्यावर आजच या सदनामध्ये चर्चा होणार आहे.

यानंतर श्री. बरवड......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

आज दोन्ही चर्चा विस्तृतपणे होऊ शकतील काय ? सर्व सन्माननीय सदस्यांना त्यामध्ये बोलण्यासाठी संधी मिळेल काय ? नसेल तर उद्या आपल्याला विशेष बैठक घेता येईल काय हे पहावे. एकाच दिवशी दोन तीन तासातच सर्व चर्चा आटोपल्या पाहिजेत अशी भूमिका घेणे बरोबर होणार नाही. विदर्भातील जे प्रश्न आहेत त्या प्रश्नांना अधिक वेळ देण्याचा दृष्टीकोन असला पाहिजे.

**उप सभापती** : सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आताच सांगितल्याप्रमाणे वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रस्तावावर आतापर्यंत 95 मिनिटे चर्चा झालेली आहे. महत्वाचे नेते या ठिकाणी बोललेले आहेत. अर्थात सर्वच सन्माननीय सदस्य महत्वाचे आहेत, त्यांचेही विचार महत्वाचे आहेत.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या ठरावावरील चर्चेत सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य किती वेळ बोलले आहेत ?

श्री. अजित पवार : सत्ताधारी पक्षाचे सदस्य पंधरा मिनिटे बोलले आहेत.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महादेय, विरोधी पक्षाचे सदस्य 95 मिनिटे बोलले आणि सत्ताधारी पक्षाचे सदस्य 15 मिनिटे बोलले आहेत. त्यामुळे आता विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना थांबवून सत्ताधारी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. जर ही चर्चा वेळेत संपवावयाची असेल तर वेळेचे बंधन आहे आणि वेळेचे बंधन असेल तर दोन्ही बाजूच्या सदस्यांना सारखा न्याय मिळाला पाहिजे.

**उप सभापती** : मी सगळ्यांना सारखा न्याय देण्याचा प्रयत्न करतो. यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत बोलतील. त्यांनी चार-पाच मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, चर्चा होत असताना माननीय मुख्यमंत्र्यांचा वेळ धरुन सत्ताधारी पक्षाला वेळ दिलेला असतो. काल मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सगळ्या सन्माननीय सदस्यांना खाली बसविले होते आणि त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना जास्त वेळ दिला होता.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे :सभापती महोदय, बाकीच्या सदस्यांनी बोलूच नये काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, दुपारी 1.15 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे. सगळ्यांची तयारी असेल तर प्रश्नोत्तराचा तास आपण दुपारी 1.15 ऐवजी 2.00 वाजता सुरु करावा. माझे असे म्हणणे आहे की, कितीही वाजेपर्यंत चर्चा चालू ठेवा, फक्त मला उत्तर देण्यासाठी 35 ते 40 मिनिटे लागतील. एवढेच मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आमच्यावर नेहमीच असा अन्याय होतो आणि पाच मिनिटात, दहा मिनिटात भाषण पूर्ण करावे असे सांगितले जाते. सभापती महोदय, मी फक्त मुद्दे मांडणार आहे. मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. विजेच्या प्रस्तावावर जी चर्चा सुरु आहे त्या संदर्भात काही महत्वाच्या गोष्टी सदनासमोर आणणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण मला परवानगी द्यावी.

सभापती महोदय, राज्यामध्ये 12 हजार 777 मेगावॅट विजेची गरज असून एकूण तूट साडेचार ते पाच हजार मेगावॅटची आहे असे सांगितले जाते. विजेचे जेवढे प्रकल्प येऊ घातले आहेत त्या प्रकल्पांमुळे पर्यावरणावर किती परिणाम होणार आहे याचा आपण थोडासा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. जी-7 राष्ट्रांची जी समेट झाली तसेच ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात कोपनहेगन येथे जी परिषद झाली त्यामध्ये कार्बन क्रेडीट हा विषय निघाला. औष्णिक प्रकल्प असू द्या किंवा अणुऊर्जा प्रकल्प असू द्या, त्यापासून या वातावरणामध्ये किती कार्बन उत्सर्जन होणार आहे याचा देखील आपण विचार केला पाहिजे. कारण कोपनहेगन परिषदेमध्ये श्री. जयराम रमेश यांनी वॉक आऊट केले आणि त्यांनी सांगितले की, आम्हाला हे मान्य नाही. या हिंदुस्थानवर ग्लोबल वॉर्मिंगचा जो परिणाम होत आहे त्यामध्ये औष्णिक वीज आणि ती तयार करण्यासाठी लागणारा कोळसा याचा देखील आपण विचार करणे आवश्यक आहे. मी संपूर्ण महाराष्ट्राविषयी बोलत आहे. नजिकच्या भविष्य काळासाठी आपल्याला देखील काही कार्बन क्रेडीट राखून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्या विषयावर देखील विचार करणे आवश्यक आहे

सभापती महोदय, जैतापूरच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर जैतापूरच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, बीएनएचएस ने एक रिपोर्ट दिलेला आहे आणि नीरी (NEERI) ने सुध्दा एक रिपोर्ट दिलेला आहे. या दोन्ही रिपोर्टमध्ये कमालीचा विरोधाभास आहे. आपण सभागृहाला सांगितले पाहिजे. बीएनएचएसने जो रिपोर्ट दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी सरळ असे म्हटले आहे की, जैतापूरचा प्रकल्प हा कॉर्पोरेट क्राईम आहे आणि त्याच्या उलट हा प्रकल्प कसा यावयास पाहिजे याबाबत नीरी (NEERI)ने सांगितले आहे. या दोन्ही संस्था पर्यावरणाचे काम करीत आहेत, पर्यावरणासंबंधी रिपोर्ट देत आहेत. त्यांच्यामध्ये एवढा विरोधाभास का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्यांचे असे म्हणणे आहे की, 9900 मेगावॉटचा अणू ऊर्जा प्रकल्प माडबन येथे होत आहे तो अरेव्हा कंपनी करीत आहे. तेथील इको सिस्टिमची वाताहत होणार आहे असा बीएनएचएस चा रिपोर्ट आहे. या प्रकल्पामुळे 407 हेक्टरवरील मॅनग्रोव्हची झाडे विस्थापित होणार आहेत. ते खरोखर होणार आहेत काय, याबाबत शासनाने आपले मत मांडले पाहिजे. माझ्याजवळ 1200 पानांचा रिपोर्ट आहे. तेथील जैव संपत्ती नष्ट होणार आहे असे त्यात नमूद केले आहे. त्यामुळे यापूर्वी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या प्रकल्पासाठी 35 अटी घातल्या होत्या. त्या अचानकपणे कशा काढून टाकल्या गेल्या. या अहवालात असे म्हटले आहे की," Bio-diversity Report is prepared by the Bombay Natural History Society on the basis of 35 environmental conditions set by the Environment ministry."हा 28 नोव्हेंबर रोजीचा रिपोर्ट आहे. त्याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण दिले पाहिजे. उलट 'नीरी' (NEERI) या संस्थेचे म्हणणे असे आहे की, हा प्रकल्प प्लेटोवर आहे. तेथे कोणतीही वनस्पती नाही. कोणत्याही प्रकारचे वेजिटेशन नाही. परंतु बीएनएचएस ही संस्था असे म्हणते की, तेथे 134 प्रकारच्या वनस्पती आहेत. BNHS found 1000 plant species 134......परंतु 'नीरी' ला 500 सुध्दा प्लान्ट स्पिसीज मिळाल्या नाहीत. सामान्य माणूस या प्रकल्पाला विरोध करीत आहे. त्यांच्या मनात शंका आहेत त्या राज्य शासन दूर करणार नाही तर कोण करणार ? या प्रकल्पासाठी 30 हजार कोटींचा रिॲक्टर बसविला जाणार आहे. तो 20 पटीने मोठा आहे. या रिॲक्टरमधून 10 टक्के जादा विजेची निर्मिती होणार आहे. या राज्याला किंवा कोकणाला एवढया विजेची गरज आहे काय, या प्रश्नाबाबत शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, चेर्नोबिलमध्ये अशाप्रकारचा पॉवर प्लान्ट होता. त्यातून अनेक गोष्टी तयार झालेल्या आहेत. अनेक विसंगती तयार झाल्या आहेत. या अणू ऊर्जा प्रकल्पामुळे विजेचे दर कमी होणार आहेत काय ? विजेचा पर युनिट दर 9 रुपये असेल असे या अहवालात नमूद केले आहे. यामधील रेडिओ ॲक्टीव्ह वेस्ट व डिकमिशनींगची कॉस्ट विजेच्या दरामध्ये समाविष्ट होणार आहे असे नमूद केलेले आहे. त्याबाबत सभागृहात अधिक स्पष्टता होणे आवश्यक आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

रेडिओ ॲक्टीव्ह रेजमुळे अपघात झाला तर माडबन किंवा रत्नागिरीमध्ये कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे केलेले नाही. पुढील 5-10 वर्षामध्ये अपघात होणार नाही असे गृहित धरले तरी तेथे अपघातप्रवण इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहणे आवश्यक आहे. मी गेली 20 वर्षे कोकणातील इन्फ्रास्ट्रक्चर विषयीचा मुद्दा मांडत आहे. परंतु तेथे किती इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहिले आहे ते सर्वांना माहीत आहे. अशा परिस्थितीत तेथे अणू ऊर्जा प्रकल्प उभा राहिल्यावर त्याचे मानवी जीवनावर वा आयुष्यावर काय परिणाम होणार आहेत त्याचा विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे इन्श्यूरन्सचा हप्ता वाढला तर विजेच्या दरामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी अधिक बोलणार नाही. 'नीरी' या संस्थेने रेडिओ ॲक्टिव्ह रेजबाबत भीती व्यक्त केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...

"सायण्टिफिक कॉन्फरन्स ऑन टक्नो-इकॉनॉमी व्हायबिलिटी ॲण्ड एन्वहायर्मेन्ठ प्रोजेक्ट" या कॉन्फरन्समध्ये देखील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाचा विषय चर्चिला गेला. रेडियो ॲक्टीव्ह रेजमुळे भविष्यामध्ये धोका निर्माण होऊ शकतो याची जाणीव त्यांनी करुन दिलेली आहे.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भातील आणखी एक महत्वाचा प्रश्न जो मुंबईशी निगडित आहे तो मी या ठिकाणी मांडतो. मुंबईमध्ये सध्या टाटा आणि रिलायन्स यांच्यामध्ये विजेच्या बाबतीत स्पर्धा सुरु आहे. अधिवेशनाच्या सुरुवातीच्या काही दिवसापूर्वी विजेच्या प्रती युनिट दरामध्ये अचानक वाढ करण्यात आली. या वीज दरवाढीमुळे मुंबईतील सर्वसामान्य माणूस होरपळतोय. वीज दरवाढीवर शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. हा प्रश्न मी यापूर्वी देखील या सभागृहामध्ये उपस्थित केला होता. हे विजेचे दर दुपटीने नाही तर तिपटीने वाढलेले आहेत. सर्व सामान्य माणूस टाटा आणि रिलायन्सने केलेल्या वीज दरवाढीमध्ये भरडला जातोय. टाटाचे विजेचे दर कमी असल्यामुळे रिलायन्सचे वीज ग्राहक आता टाटाकडे जात आहेत. परंतु रिलायन्सचे जे ग्राहक आता टाटांकडे जात आहेत त्यांना भविष्यामध्ये टाटा दरवाढ न करता वीज देऊ शकेल काय ? म्हणून मुंबईतील सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या वीज वितरणाच्या संदर्भातील प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. महावितरण कंपनीचे तीन भाग करण्यात आलेले आहेत. नागपूरमधील सिव्हिल लाईन, गांधीबाग या भागाची वीज वितरणाची फ्रॅन्चायजी स्पॅन्को कंपनीला दिलेली आहे. याबाबतीत अनेक आक्षेप आलेले आहेत. महावितरणाच्या तुलनेत स्पॅन्कोकडे असलेले अभियंते आणि कर्मचारी वर्ग अतिशय तुटपुंजा आहे. वितरणप्रणाली स्पॅन्को कंपनीला दिल्यामुळे महावितरण कंपनीचे फार मोठे नुकसान झालेले आहे. या महावितरण कंपनीच्या तीन विभागातील 1470 आणि संभाजीनगर येथील 900 अभियंते अशा एकूण 5 हजार कर्मचा-यांवर बेकारीची टांगती तलवार आहे. स्पॅन्कोला पाच वर्षासाठी 180 कोटी रुपये पायाभूत सुविधासाठी देण्याचे कबूल केलेले आहे. यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पाच्या ॲटोमिक रिॲक्टरच्या संदर्भात विधिमंडळाच्या सदस्यांना प्रेझेण्टेशन देणे आवश्यक आहे. ते प्रेझेण्टेशन देण्याची व्यवस्था करावी अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KGS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 11:55

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहामध्ये अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. दिनांक 9 डिसेंबर 2010 रोजी या सभागृहामध्ये विजेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राला विजेची गरज आहे या मुद्यावर सर्वांचे एकमत आहे. महाराष्ट्रामध्ये वीज निर्मिती व्हायला पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत असेल असे मला वाटत नाही. कारण ग्रामीण भागामध्ये हा विजेचा प्रश्न फार मोठा आहे. शेतक-याला वीज न मिळाल्यामुळे पाणी असून देखील ते त्याच्या शेतामध्ये जाऊ शकत नाही, सिंचनाची व्यवस्था होऊ शकत नाही. त्यामुळे त्याला शेतीच्या माध्यमातून जो काही आर्थिक लाभ घ्यावयाचा आहे तो त्याला मिळू शकत नाही. संपूर्ण राज्यामध्ये विजेची मागणी फार मोठ्या प्रमाणावर आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, 2012 पर्यन्त राज्यातील भारनियमन समाप्त करण्यात येईल. कदाचित एखादे वर्ष त्यासाठी अधिक लागू शकते. विजेच्या बाबतीत राज्य शासनाने जी काही पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे ती अतिशय उपयुक्त अशी आहेत. राज्यामध्ये खाजगी क्षेत्रात वेगवेगळे वीज प्रकल्प येत आहेत.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

वेगवेगळया भागात या प्रकल्पांच्या माध्यमातून ज्या समस्या निर्माण होणार आहेत त्याबाबत या सदनामध्ये चर्चा होताना दिसून येते. ती चर्चा जरुर झाली पाहिजे. कारण शेवटी कोणताही उद्देश नजरेसमोर ठेवत असताना त्यामधून साईड इफेक्टचा विचार केला नाही, त्या पध्दतीने नियोजन केले नाही तर त्याचे दूरगामी परिणाम त्या त्या भागातील जनतेला सहन करावे लागतात. भविष्यात असे प्रसंग उद्‌भवू नयेत, तशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून या सदनामध्ये ही चर्चा होत आहे. बऱ्याच वेळेला शासनाच्या सर्वच नजरेस येते, अधिकाऱ्यांना सर्वच माहित असते अशातला भाग नाही. अनेकदा सदनामध्ये होणाऱ्या चर्चेतून काही महत्वाच्या मुद्यांबाबत शंका निर्माण होतात त्या शंकांचे निरसन करणे, त्यांची पडताळणी करणे ही निश्चितच राज्य सरकारची जबाबदारी आहे. या चर्चेच्या माध्यमातून त्या विषयावर राज्य सरकार निश्चितच विचार करेल अशाप्रकारची आम्हाला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशाचा विचार केला तर विजेचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला गेला. संपूर्ण देशातील वीज निर्मिती ही सरकारी कंपन्यांच्या माध्यमातूनच करायची आणि लोकांपर्यंत पोहोचवायची अशा प्रकारचा निर्णय केंद्र सरकारच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर काळात घेण्यात आला. त्यावेळेपासून संपूर्ण देशात वीज निर्मितीबाबत राष्ट्रीयीकरणाचे धोरण सुरु राहिले. त्यामधून तीन शहरे वगळण्यात आली. मुंबई, अहमदाबाद, कलकत्ता ही तीन शहरे वगळण्यात आली असली तरी संपूर्ण देशात विजेचे राष्ट्रीयीकरण झाले. प्रत्येक राज्यांची विजेची गरज भागविण्यासाठी त्या त्या राज्यांमध्ये वीज निर्मिती करायची, आवश्यकता भासल्यास बाहेरच्या राज्यातील प्रकल्पांमधून वीज घ्यायची आणि गरजेप्रमाणे ग्राहकांना, उद्योगधंद्यांना ती वाटप करायची अशी पूर्वी पध्दत होती. आता केंद्र शासनाने 2003 मध्ये नवीन कायदा तयार केला. त्याचे कारण असे की, प्रत्येक राज्यामध्ये वीज निर्मितीसाठी महामंडळे स्थापन केलेली आहेत. त्यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात विजेचे उत्पादन होत असताना ही महामंडळे तोट्यात जाऊ लागली, वीज निर्मितीच्या क्षमतेमध्ये घट येऊ लागली. त्यामुळे खाजगी क्षेत्रात वीज निर्मितीचे प्रकल्प उभारुन त्यांना वीज निर्मितीचे अधिकार दिले पाहिजेत, म्हणून 2003 मध्ये केंद्र शासनाने कायदा केला. त्यानंतर सर्व राज्यांमधील चित्र बदलले. प्रत्येक राज्यांनी आता काय करायचे? नवीन कायद्याला अनुसरुन वीज निर्मितीच्या क्षेत्रात निर्णय घ्यायचा होता. त्यानुसार राज्यामध्ये जे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ D/ KTG/ MMP/ 12:00

श्री.माणिकराव ठाकरे......

वीज मंडळ होते त्या मंडळाचे विभाजन करण्यात येऊन निर्मिती, वितरण व पारेषण यासाठी स्वतंत्र तीन कंपन्या स्थापन करण्यात आल्या. वीज निर्मिती क्षेत्रात खाजगी कंपन्यांना अधिकार देण्यात आले. खाजगी कंपन्यांना वीज निर्मिती करता येईल. खाजगी कंपन्यांना वीज निर्मिती प्रकल्प उभारुन ग्राहकांना उचित दरामध्ये विजेची विक्री करुन नफा मिळविता येईल असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मोठया प्रमाणात खाजगी कंपन्या या क्षेत्रात पुढे येऊ लागल्या. महाराष्ट्रामध्ये आपण पाहतो की, खाजगी कंपन्या प्रकल्प सुरु करण्यासाठी पुढे आल्या आहेत. खाजगी प्रकल्पांच्या माध्यमातून भविष्यकाळात काय परिस्थिती निर्माण होणार आहे? खाजगी प्रकल्पांना कुठपर्यंत थारा द्यायचा? सरकारी कंपन्यांची आपल्याकडे व्यवस्था असताना खाजगी कंपन्यांचा किती सहभाग घ्यायचा हा विचार शासन स्तरावर निश्चितपणे करावा लागणार आहे. या संदर्भात कायद्याने काही बंधने असली तरी चुकीच्या पध्दतीने कोणी प्रकल्प उभारणार असतील आणि त्या माध्यमातून भौगोलिक परिणाम होणार असतील, लोकांच्या विरोधामुळे पुढे जाता येत नसेल तर अशा प्रकल्पांना मज्जाव करण्यासाठी राज्य शासनाच्या हातामध्ये कायद्याची बाजू आहे. त्याचा उपयोग करणे गरजेचे आहे.

नंतर झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z-1

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 12:05

श्री. माणिकराव ठाकरे ..........

शासन राज्याला सन 2012 पर्यंत भारनियमन मुक्त करणार आहे परंतु मला सांगणे आवश्यक आहे की, त्यासंदर्भात आतापासूनच पावले उचलण्याची गरज आहे. याबरोबरच प्रायव्हेट सेक्टरचा विचार करता आपण त्यांच्याकडून किती वीज घेणार आहात याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. कारण जेव्हा विजेचे राष्ट्रीयकरण झालेले होते तेव्हा आपल्यालाच आपली वीज निर्माण करावी लागत होती व तेवढीच वीज आपण घेत होतो. परंतु प्रायव्हेट सेक्टरचे असे नसून एक धंदा म्हणून त्यांनी विजेच्या क्षेत्रात शिरकाव केला आहे. ते जी वीज निर्माण करतील त्यामध्ये आपल्याला किती वीज लागणार आहे हा सुध्दा प्रश्न आहे. म्हणून सुरुवातीला आपलेच धोरण होते की, बाहेरच्या राज्यातील तसेच केंद्रीय पातळीवरील एनटीपीसी सारख्या कंपन्या असतील त्यांच्यामध्ये आपली इक्विटी 15-20 टक्के ठेवत होतो व गरजेनुसार वीज मिळवून घेत होतो. परंतु प्रायव्हेट कंपन्यांचा शिरकाव राज्यात मोठ्या प्रमाणवर सुरु झाल्यामुळे आपल्या राज्यात जी वीज निर्माण करणार आहोत ती आपण बाजूला ठेवणार की काय अशीही शंका येते. या राज्यातील वीज मंडळ हे देशातील सर्वात चांगले मंडळ गणले जात होते. त्यासाठी आपल्याला राज्य व केंद्राकडून निधी उपलब्ध होत होता आणि तो निधी वापरुन प्रकल्प उभे करीत होतो. त्यात मग कोराडी, चंद्रपूर, खापरखेडा, भुसावळ, पारस सारखे प्रकल्प असतील, त्या प्रकल्पांमध्ये 1000 ते 1500 मेगा वॅट वीज निर्माण करीत आहोत. आता राज्यात नवीनच येऊ घातलेला जो जैतापूर प्रकल्प आहे त्यात 10000 मेगावॅट एवढी वीज आपण निर्माण करणार आहोत. परंतु ही वीज आपल्याला मिळणार की नाही, त्यातील किती वीज आपल्याला मिळू शकेल याचाही विचार होणे आवश्यक आहे.

महोदय, या निमित्ताने मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, विदर्भातच कोळशाचे उत्पादन होते व त्याचा वापर विजेच्या उत्पादनासाठी आपण करीत आहोत. पण अशा विजेसाठी जर देशाच्या बाहेरुन, परदेशातून कोळशाची आयात करु लागलो आणि विदर्भापर्यंत त्याची वाहतूक करायला लागलो यामध्ये कोणता व्यावहारिकपणा असू शकत नाही, असे मी समजतो. म्हणून विदर्भात जे प्रकल्प उभे राहत आहेत ते केवळ कोळशासाठीच नव्हे तर आपल्या पाण्यासाठी खास करुन उभे राहत आहेत व त्यालाच आमचा विरोध आहे. असे प्रकल्प पाण्यासाठी उभे राहत

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ........

असतील आणि बाहेरील देशातून त्यासाठी कोळसा आणून प्रकल्प उभे करण्याची भूमिका असेल तर अशा पाण्याचे नियोजन करणे तितकेच महत्वाचे आहे. हे नियोजन करीत असताना सर्व भागात लागणाऱ्या पाण्याचा विचार करुन किती प्रकल्प उभे राहिले पाहिजे आणि शेतकऱ्यांना किती पाणी दिले पाहिजे याचाही विचार प्रकर्षाने झाला पाहिजे. कारण खाजगी उद्योजकांनी तयार केलेली वीज बाहेरच्या राज्यात व परदेशात विकणार असाल, आमच्या पाण्याच्या भरवशावर कोणी जगात धंदा करीत असेल ते अन्यायकारक होईल, या अनुषंगानेही चर्चा होणे आवश्यक आहे. राज्यात उद्योग उभारले पाहिजेत, त्यासाठी वीज पाहिजे परंतु आपल्याकडे किती वीज आहे आणि सन 2012-13 पर्यंत किती वीज निर्माण करु शकू तसेच पुढील 10 वर्षात किती वीज लागणार आहे याचेही नियोजन करावे लागणार आहे. तसेच कोणत्या प्रकल्पाचे पाणी कुठे घ्यायचे अशा प्रकारे पाण्याचे वाटप सुरुवातीला 75 टक्के शेतीसाठी, 15 टक्के पिण्यासाठी आणि 10 टक्कमे उद्योगासाठी असे होते, त्यात कोणतीही अडचण नाही. परंतु शेतकऱ्याला पाणी कमी मिळत असेल आणि त्यातून प्रकल्पासाठी पाणी घेणार असाल आणि पुढील काळात, 25-30 वर्षानंतर पुन्हा शेतकऱ्यांना पाण्याची गरज लागली तर त्याचा त्या पाण्यावरील अधिकार शिल्लक राहणार की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. आज आपल्याकडे पाणी आहे आणि त्याचे महत्व आम्हाला व तुम्हालाही आहे, सर्वांनाच ते पटते आहे परंतु आता प्रकल्पांसाठी दिले आणि भविष्यात आपल्याला त्याची गरज पडली तर ते पाणी कोठून आणणार याचे समाधानकारक उत्तर शासनाकडे असेल असे वाटत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय, वीजचे उत्पादन आता खाजगी कंपन्याकडून केले जाणार आहे. ज्या शेतक-यांच्या जमिनी या उद्योगामध्ये जातील त्यांना आपण कोणत्या प्रकारे मोबदला देणार आहोत ? मोबदल्याच्या संदर्भात कायद्यामध्ये काहीही तरतूद नाही. ज्या शेतक-यांच्या जमिनी उद्योगांमध्ये जाणार आहेत त्यांना अधिक मोबदला कसा मिळवून दिला जाणार आहे याबाबतीत सुध्दा भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भातील मुद्दे अतिशय महत्वाचे असल्यामुळे यासंदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. विजेच्या संदर्भातील अधिक माहिती ज्या सदस्यांना आहे तसेच यामध्ये जे तज्ज्ञ आहेत त्यांची एखादी परिषद घेऊन माहिती घेतली जाण्याची आवश्यकता आहे. विदर्भामध्ये सोफिया प्रकल्प आणि इतर खाजगी प्रकल्प होऊ नये अशी येथील जनतेची मागणी आहे. विदर्भामध्ये आता वीज निर्मितीचे 85 प्रकल्प उभे राहणार आहेत. आपल्याकडे 16 हजार मे.वॅ.विजेची आवश्यकता आहे त्यामुळे सर्व विषयाची चर्चा परिषदेत झाली तर चांगल्या प्रकारचा निर्णय निघू शकेल. अनेक खाजगी मोठे प्रकल्प आपल्याकडे येत आहेत. खाजगी क्षेत्राचा दृष्टीकोन कसा असतो याची आपल्या सर्वांना माहिती आहे. मी विदर्भातील सदस्य या नात्याने सांगू इच्छितो की, ज्यावेळेला आपल्याकडील एमएसईबीच्या तीन कंपन्या झाल्या त्यावेळेस मी असे विचार व्यक्त केले होते की, विजेचे उत्पादन, वाहतूक आणि वितरणासाठी आपण ज्या तीन कंपन्या करीत आहात तसे न करता आपण विदर्भाची, पश्चिम महाराष्ट्राची, कोकणाची आणि खानदेशची वीज कंपनी करा असे सांगितले होते. जास्त कंपन्या तयार केल्या तर त्यांच्यामध्ये स्पर्धा लागून वीज स्वस्त दरामध्ये जनतेला मिळू शकेल असा माझा त्यामागचा हेतू होता.

सभापती महोदय, ना नफा, ना तोटा या तत्वार विदर्भात मोठया प्रमाणात वीज तयार होत असते. या ठिकाणी जी वीज तयार होत असते त्यासाठी आपल्याला एक पैसाही अधिकचा लागत नाही. आपण सिंचनासाठी वीज कमी दरामध्ये शेतक-यांना उपलब्ध करुन देत असतो. परंतु काही भागात सिंचनासाठी फार मोठया प्रमाणात विजेचा वापर होतो व काही भागात सिंचनासाठी कमी विजेचा वापर होतो आहे. त्यामुळे एका भागाचा दुस-या भागावर परिणाम न होता ज्या भागात

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

कमी वीज लागते त्या भागाला सुध्दा न्याय दिला गेला पाहिजे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी घोषणा केली आहे की, येत्या दोन वर्षात आपले राज्य भारनियमन मुक्त होणार आहे. मला असे वाटते की, या सर्व गोष्टीचा सारासार विचार करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण जे खाजगी पॉवर प्रोजेक्ट आणीत आहोत त्याचे दुरगामी परिणाम काय होणार आहे यासंदर्भात खुलासा होणे गरजेचे आहे. वेळ कमी असल्यामुळे व इतर सन्माननीय सदस्यांना विजेच्या संदर्भात विचार मांडावयाचे असल्यामुळे मी माझे विचार येथे संपवतो.

धन्यवाद..

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी मी केवळ जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीतच विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहात जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाबाबत राजकारणाच्या परिघा बाहेर मुलभूत गाभ्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. एकूणच देशाची आणि राज्याची आजची आणि भविष्यातील ऊर्जेची गरज लक्षात घ्यायला हवी आहे. आज पण वीज तुटीमुळे आपल्याला भारनियमानाच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. मग हया समस्येवर उपाय शोधायला नको का ? वीज असेल तर शेतीत आणि उद्योगात प्रगती होईल. बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यास मदत मिळेल. मग येऊ घातलेल्या वीज प्रकल्पांना केवळ विरोधासाठी विरोध कशासाठी करावयाचा ? अणुऊर्जा प्रकल्पाबाबत नक्कीच काही संभावित धोक्यांबद्दल भिती व्यक्त करण्यात येत आहे. प्रगत विज्ञानाने साध्य झालेले अणू ऊर्जा निर्मिती हे फलीत आहे. या मागे अनेक वर्षाचे वैज्ञानिक संशोधन आहे. प्रयोगशाळेत या बाबतीत विविध शक्यतांची चाचणी करण्यात येत असते. त्यातील दोष काढून ती सुरक्षित कशी होईल याची काळजी घेतली जात असते. माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंगानी सरकारची प्रतिष्ठा पणाला लावून एक आंतरराष्ट्रीय करार केलेला आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्यापूर्वीचा इतिहास काय होता ? आपण अणुस्फोट चाचणी केल्याने आंतरराष्ट्रीय विज्ञानापासून देशाला वंचित रहावे लागले होते. नवे शोध, नवे शास्त्रज्ञ यांच्या समवेत आपल्या शास्त्रज्ञांची वैचारिक देवाण घेवाण बंद झाली होती. मग ह्या आंतरराष्ट्रीय बहिष्कृतपासून देशाला बाहेर काढणे ही काळाची गरज होती आणि या कामी आजच्या आपल्या मुख्यमंत्र्यांचे योगदान महत्वाचे आहे.

सभापती महोदय, या चर्चेमधून असा एक सूर आळवला जात आहे की, सत्ताधारी कोकणचा संहार करण्याचीच सिध्दता करीत आहे. कोणत्याही मानवी कल्पनेबाबत असा विचार होणे अशक्य आहे. मग विचारले जाते की, कोकणच का ? प्रकल्पाची जागा निश्चित करण्यासाठी काही निकष असतात आणि त्यानुसार निर्णय घेतला जातो. एक गोष्ट स्पष्ट आहे की, प्रकल्पामुळे विस्थापितांचे प्रश्न, पर्यावरणाचा प्रश्न, सामाजिक असंतुलनाच्या समस्या समोर येणार आहेत. ह्या समस्यांवर मात करणे गरजेचे आहे. आधी प्रकल्प की आधी पुनर्वसन हा कळीचा मुद्दा आहे. ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना नवीन जमिनी मिळणार आहेत. परंतु त्या केव्हा मिळणार आहेत हा प्रश्न आहे. न्याय्य मोबदला त्यांच्या हाती पडेल किंवा नाही याबाबतीतही साशंकता आहे. आजवरचा अनुभव पाहता प्रकल्पग्रस्तांबाबतीत शासकीय यंत्रणेची उदासीनता, अनियमितता, आणि त्यामध्ये होणारा भ्रष्टाचार ह्या समस्या अणु ऊर्जेपेक्षाही महाभयंकर आहेत. हा विश्वास जनमानसात पुनर्स्थापित होण्यास प्राथमिकता द्यायला हवी.

सभापती महोदय, कोकणवासियांच्या निसर्गरम्य ठेव्यामध्ये आपण प्रकल्प आणत आहात. त्यामुळे त्यांचा नक्की फायदा कोणाला होणार आहे हे देखील अधोरेखीत झाले पाहिजे. कोकणातील नवी पिढी विज्ञानाने आपण समृध्द करणार आहोत का, की त्यांनी फक्त परंपरेने नारळ, सुपारी, आंबा बागांमध्ये गुंतून पडावे ? कोकणासाठी साधे माध्यमिक शिक्षण मंडळ न स्थापन होणे हे कशाचे द्योतक आहे ? या संदर्भातही अंतर्मुख होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पर्यावरण हा जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत यक्ष प्रश्न आहे. हजारो लीटर्स पाणी समुद्रातून आणून ते प्रकल्पासाठी वापरावयाचे आणि मग ते पाणी शुध्द करुन पुन्हा समुद्रात सोडायचे. हे एक ऐतिहासिक आव्हान आहे. यामध्ये गुंतलेल्या यंत्रणेच्या प्रामाणिक पध्दतीचा वापर महत्वपूर्ण आहे. ह्या बाबतीत एका अणुची जरी गफलत झाली तर दुष्परिणाम भयानक होतील. ही हमी सुध्दा या निमित्ताने मिळणे आवश्यक आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, वनस्पती जगताचे रक्षण हाही गंभीर विषय आहे. फळबागा संरक्षित झ ााल्या पाहिजेत. शेती भाताला धोका होऊ नये याकडेही लक्ष द्यायला पाहिजे. हे सर्व विषय एका नव्या समाज व्यस्थेच्या निर्मितीसाठी समोर ठेवायला हवेत. पूर्वग्रहदूषित नजरेने न पाहता वैज्ञानिक दृष्टीकोन केंद्रस्थानी ठेवून व्यापक राष्ट्रीय हिताच्या विचाराला अग्रस्थान मिळायला हवे. मला खात्री आहे की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री ह्या प्रकरणाच्या निमित्ताने एक नवे युग निर्माण करतील.

सभापती महोदय, मुंबईतील कोकण आणि कोकणातील मुंबई हे फार गमतीचे विषय आहेत. मला माहीत असलेले जैतापूर आरती प्रभूंच्या कवितेतील आहे. तो निसर्ग आपण समृध्द ठेवणार आहोत की नाही, तो समिंदर, तो वारा, तो प्रामाणिक कष्टकरी सुखावेल असा विश्वास द्यायला पाहिजे. या पध्दतीने प्रकल्पाची आखणी झाली तर भविष्यात फार मोठे कार्य आपल्या हातून घडेल याबद्दल मला विश्वास वाटतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला दुपारी 1.00 वाजेपर्यंत या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे. आपणास आज आणखी एका 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करावयाची आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी भाषण न करता फक्त मुद्दे मांडावेत.... मी सभागृहाची वेळ सारखी वाढवीत आहे. आपण मला सहकार्य केल्यास माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह मला ही चर्चा विहित वेळेत पूर्ण करता येईल.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, हमारा अनुरोध है कि आज का क्वॆश्चन ऑवर सस्पेंड करके इस चर्चा को चालू रखा जाए.

**उपसभापति** : यदि क्वॆश्चन ऑवर सस्पेंड करना है तो मुझे माननीय सभापति महोदय की परमीशन लेनी पड़ेगी, नहीं तो मैं सस्पेंड हो जाऊंगा.

यानंतर श्री.गायकवाड..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 12.20

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प येणार असून त्या संबंधीचे अनेक विषय या प्रस्तावात आलेले आहेत म्हणून त्या प्रकल्पासंबंधी मी विशेष करुन बोलणार आहे. 938 हेक्टर जमिनीवर हा प्रकल्प उभा राहणार आहे. त्यातील 692 हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी लागणार आहे आणि 246 हेक्टर जमीन वसाहतीसाठी लागणार आहे.देशामध्ये अशा प्रकारचेअणु प्रकल्प अनेक राज्यांमध्ये सुरु करण्यात आलेले आहेत. राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश इत्यादी राज्यांमध्ये 800 ते 2000 मेगॅवॅट वीज निर्मिती करणारे प्रकल्प आहेत परंतु दहा हजार मेगॅवॅट वीज निर्मिती करणारा हा देशातील पहिलाच प्रकल्प जैतापूर येथे सुरु करण्यात येणार आहे.1650 मेगॅवॅटची एक या प्रमाणे सहा भट्टया त्या ठिकाणी सुरु करण्यात येणार आहेत. विकास आणि विरोध अशा दोन्ही बाजू या प्रकल्पाच्या निमित्ताने मांडल्या जात आहेत.स्थानिक पातळीवर आणि राज्य पातळीवर या प्रकल्पाच्या अनुषंगाने निरनिराळे विषय उपस्थित केले जात आहेत. देशाला विकास हवा आहे किंवा नाही ? राज्यामध्ये जे भार नियमन केले जात आहे ते नाहीसे करावयाचे आहे किंवा नाही ? असा प्रश्न एका बाजूला विचारला जात असतांना दुस-या बाजूला असेही सांगितले जाते की, राज्यामध्ये 6 हजार मेगॅवॅट विजेची कमतरता आहे आणि 2010 पर्यत महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त करावयाचे आहे ते करण्यामध्ये कोकणाचे योगदान असले पाहिजे . या प्रकल्पाच्या निमित्ताने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. रत्नागिरी जिल्हयात 167 किलोमीटर्स लांबीची किनारपट्टी असून सिंधुदुर्ग जिल्हयात 130 किलोमीटर्सची लांबीची किनारपट्टी आहे. दोन्ही फळबागायतीचे जिल्हे म्हणून जाहीर करण्यात आलेले आहेत.सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला असून रत्नागिरी तालुका हा पर्यटन तालुका म्हणून जाहीर करण्यात आला आहे . 35 हजार मेगॅवॅट वीज निर्मितीचे प्रकल्प त्या ठिकाणी येऊ घातलेले आहेत.मला या निमित्ताने शासनाला असे विचारावयाचे आहे की 35 हजार अधिक 20 हजार अशा प्रकारे 55 हजार मेगॅवॅटचे प्रकल्प 200 किलोमीटर्सच्या परिसरात येणार आहेत. दापोलीचा 1800 मेगॅवॅटचा प्रकल्प, अंजर्लेचा 1600 मेगॅवॅटचा प्रकल्प आहे,धोपावेचा 3200 मेगॅवटचा प्रकल्प आहे हे सर्व नियोजित प्रकल्प आहेत. त्याचबरोर बाणकोट. वेसावी हे 1600 मेगॅवॅटचे प्रकल्प नियोजित असून ते कोळशावर चालणारे आहेत. बुधलगावचा प्रकल्प 1800 मेगॅवॅटचा आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ....

जयगडचा कोळश्यावर चालणारा प्रकल्प 1200 मेगॅवॅटचा आहे, रणथोरचा 32 मेगॅवॅटचा प्रकल्प चालू आहे आणि एक हजार मेगॅवॅटचा प्रकल्प तेथे आणला जाणार आहे. हे दोन्ही जिल्हे फळबागायतीचे आहेत आणि त्या जिल्हयांमध्ये कोळशावर ऊर्जा निर्मितीचे 17 प्रकल्प आणले जात आहेत. तेथे सध्या चार प्रकल्प सुरु आहेत आणि उरलेले नियोजित प्रकल्प आहेत. त्यामुळे कोकणातील माणसाच्या समोर असा प्रश्न निर्माण होतो की, 200 किलोमीटर्सच्या परिसरात एवढे मोठे प्रकल्प कशा करिता आणले जात आहेत. महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये हे प्रकल्प का सुरु केले जात नाहीत या संबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. एका बाजूला विकास करावयाचा असल्यामुळे दुस-या बाजूला या लोकांना विश्वासात घेऊन हे प्रकल्प आणण्या मागचा उद्देश काय आहे हे त्यांना सांगणे आवश्यक आहे.

तारापूर अणू ऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भात कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न घेऊन आम्ही सतत पाठपुरावा करीत आहोत. त्या प्रकल्पग्रस्तांचे रोजगाराचे काही प्रश्न आहेत त्याचप्रमाणे पुनर्वसनाच्या बाबतीत ज्यांना जी आश्वासने देण्यात आली होती ती पूर्ण केलेली नाहीत. तारापूर प्रकल्पग्रस्तांना कशा प्रकारे न्याय देण्यात येणार आहे याबाबतीत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. कोकणातील माणसांचा विश्वास उडत चालला आहे. ही कंपनी केन्द्र शासनाची असली व त्याबाबतीत राज्य शासनाकडून काही बोलले जात असले तरी कोकणातील माणसाचा आता विश्वास उडालेला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

कारण हा धरणग्रस्तांचा विषय असो किंवा वीज निर्मितीच्या प्रकल्पामुळे निर्माण झालेला विषय असो. या सर्व प्रश्नांमुळे हे प्रकल्पग्रस्त बेसहारा झाले आहेत, देशोधडीला लागले आहेत अशी अवस्था आहे. त्यामुळे या कोकणामधील लोकांना असे वाटते की, या प्रकल्पामुळे बाधित झाल्यानंतर पुन्हा एकदा मुंबईच्या मनिऑर्डरवर जगावे लागणार आहे काय? यामधून अनेक विषय आपल्यासमोर उपस्थित झाले आहेत. सभापती महोदय, केंद्र शासनाने गाडगीळ समिती नेमली. परंतु त्या समितीचा अहवाल सादर होण्यापूर्वी आपण जाहीर केले आहे. या संदर्भात श्री. गाडगीळ यांचे म्हणणे वेगळे आहे. ते या देशातील नव्हेतर जगातील तज्ज्ञ म्हणून आपण त्यांना नेमले. त्यांच्या समितीचा अहवाल काय आहे याचा तरी आपण विचार करा. त्या अहवालाच्या अनुषंगाने काय उपाय योजना करता येतील याचा विचार करा. एका बाजूला समिती नेमावयाची आणि दुसऱ्या बाजूला काम सुरु झाले असे दाखवायचे. त्यामुळे तेथील लोकांचा विश्वास उडाला आहे. आपण गाडगीळ समितीचा आणि पेंडसे समितीचा अहवाल बासनात गुंडाळून ठेवणार असाल तर मग आपण या समित्या कशासाठी नेमल्या आहेत?. श्री. गाडगीळ यांनी अहवालामध्ये व्यक्त केलेले त्यांचे म्हणणे पहिल्यांदा आपण लोकांसमोर आणले पाहिजे. त्यांच्याबरोबर आपण चर्चा करावी. त्यानंतर आपण विकासाच्या गप्पा माराव्यात.

सभापती महोदय, यासंदर्भात माझे पाच प्रश्न आहेत. या प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत आपण तेथील लोकांना विश्वासात घेतले पाहिजे, त्यांना आपण सांगितले पाहिजे. आज त्या लोकांचा विश्वास उडाला आहे. रेडिऑलॉजिकलचे दुष्परिणाम कशाप्रकारे होणार आहेत याबाबत चेर्नोबिलचे उदाहरण आपणासमोर आहे. चेर्नोबिलच्या माध्यमातून तेथील लोकांच्या आरोग्यावर निरनिराळे परिणाम झाले आहेत ते आपल्या समोर आले आहेत. त्यामुळे रेडिऑलॉजिकलचे परिणाम पुढील दहा वर्षासाठी नाही तर पुढील 5 हजार वर्षापर्यंत शरीरावर होत असतात. त्याकरिता आपण लोकांना विश्वासात घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे समुद्रातील तापमानासंबंधी आपण काय पहाणी अहवाल केला आहे त्यासंबंधी लोकांना सांगावे लागेल. तसेच, तेथील प्लँटेशनवर काय परिणाम होणार आहेत त्यासंबंधी सुध्दा आपल्याला खुलासा करावा लागेल.

सभापती महोदय, रोजगाराच्या संदर्भात आपल्याला अनेक अनुभव आहेत. त्याकरिता तेथील लोकांना आपण शेअर होल्डर करणार आहात काय? तुम्ही त्यांना फक्त दोन ते पाच लाख रुपये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. संजय केळकर....

देऊन त्यांच्या तोंडाला पाने पुसणार? कोकणातील माणसांना दिलेले हे पैसे केव्हाच संपून जाणार. आपण त्यांना कायमस्वरुपी शाश्वती देणार आहात काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रकल्पामुळे होणाऱ्या नफ्यामध्ये त्यांना भागीदार करुन घेणार काय? हेसुध्दा आपल्याला सांगावे लागेल. एका बाजूला आपण मोठे विचार प्रकट करीत असतांना या देशाचा विकास झाला पाहिजे, या राज्याचा विकास झाला पाहिजे असे सांगता. परंतु त्याचबरोबर कोकणामध्ये अनेक प्रकल्प आहेत त्यामध्ये आयटी पार्क प्रकल्प असेल, फूड पार्क असेल, मत्स्य व्यवसायासंबंधीचे प्रकल्प असतील, इंजिनिअरींग इंडस्ट्री असेल अशा कोणत्याही प्रकल्पांना आपण प्राधान्य देत नाही. आयटी पार्कच्या संदर्भात चार वर्षापासून आम्ही ओरडत आहोत. तेथील हजारो विद्यार्थी आज कॉलेजमध्ये शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत, परंतु त्यांच्याकरिता आपण आयटी पार्क सुरु करावयास तयार नाही. त्यामुळे आपण या प्रकल्पांना प्राधान्य देणार आहात की नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि म्हणून एका बाजूला विकास आणि दुसऱ्या बाजूला विरोध असतांना शासनाने याबाबत स्पष्ट भूमिका स्वीकारली पाहिजे. नाहीतर कोकणातील माणूस बेघर होईल आणि कोकणाच्या विकासाच्या गप्पा मारीत असतांना कोकण उद्ध्वस्त होईल की काय अशाप्रकारची शंका माझ्या मनामध्ये निर्माण झाली आहे. त्याबाबत खुलासा करण्यात यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये ऊर्जा विभागाच्या मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जैतापूर येथील अणु ऊर्जा प्रकल्पासंबंधी चर्चा सुरु आहे. अलिकडेच मी आणि काही आमदार मंडळींनी जैतापूर जवळील नाटे, माडबन या गावांना भेट देऊन पहाणी केली व तेथील ग्रामस्थांशी चर्चा केली आहे. त्या गावातील सर्व ग्रामस्थांचे एकच म्हणणे आहे की, हा प्रकल्प आम्हाला नको. असे त्यांनी वारंवार आम्हाला सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हे सांगत असतांना प्रत्येक ग्रामस्थाने या प्रकल्पाच्या बाबतीत वेगवेगळी कारणे सांगितली. या प्रकल्पामुळे कोणकोणत्या अडचणी निर्माण होणार आहेत याबाबत विस्तृत माहिती सांगण्याचा ते प्रयत्न करीत होते. परंतु त्याठिकाणी काही उत्साही कार्यकर्ते आणि आमचे कोकणातील मंत्री सांगतात की, तेथील सर्व प्रकल्पग्रस्त हा प्रकल्प करण्यास तयार आहेत, व त्या सर्व लोकांनी 50 हजारांचे चेक घेतले आहेत. ज्यांनी चेक घेतले त्यांनी जमिनी केव्हा खरेदी केल्या याची माहिती आपण सभागृहाला सांगितली पाहिजे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

हा प्रकल्प येणार म्हणून आपल्याच माणसांनी जमिनी खरेदी करायच्या नंतर त्याचे चेक घ्यायचे आणि आम्ही चेक घेण्यास तयार आहोत अशा प्रकारे सांगणारे हे उपरे कोण आले आहेत ? या उपऱ्यांची नावे जाहीर करण्याची आवश्यकता आहे. तरच या प्रकल्पाना स्थानिकांचा विरोध आहे की, हे उपरे या प्रकल्पाच्या बाजूने आहेत हे कळू शकेल.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने पश्चिम घाटासाठी माधव गाडगीळ यांची समिती नेमली होती. माधव गाडगीळ यांनी दिनांक 4 ते 11 ऑक्टोबर या दरम्यान कोकणपट्टीचा दौरा केला. या कोकणपट्टीच्या दौऱ्यानंतर जे निकष काढले त्या निकषामध्ये पर्यावरणाच्या बाबतीत तेथील सर्वसामान्य लोकांचा विरोध असून राजकीय दबावाने तो विरोध दाबला जात आहे अशा प्रकारचा निकष त्यांनी काढलेला आहे. अनेक ठिकाणी जनसुनावणीला 100 टक्के विरोध असताना मग मायनिंगचा प्रकल्प असो किंवा अन्य प्रकल्प असो त्या प्रकल्पांना हिरवा कंदिल दाखविला जातो अशा प्रकारचे मत या गाडगीळ समितीने व्यक्त केलेले आहे. कोकण खऱ्या अर्थाने वाचवावयाचे असेल तर कोकणचे सृष्टी सौंदर्य टिकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने नेमलेली ही गाडगीळ समिती आहे. ही समिती सहा महिन्यात आपला अहवाल देणार आहे. स्वत: गाडगीळ प्रकल्पग्रस्तांना भेटून आपले मत व्यक्त करणार आहेत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना आणि उप मुख्यमंत्र्यांना निवेदन करीन की, खरोखरच कोकणचा विकास करावयाचा असेल तर बंदरे विकसित करण्यात यावीत. रत्नागिरीवरुन कऱ्हाडला जाणारा रेल्वेमार्ग विकसित करण्यात यावा म्हणजे कोकणचा खऱ्या अर्थाने विकास होईल. कोकण विकसित झाला की त्याच रेल्वे मार्गाने कोळसा कऱ्हाडला नेण्यात यावा अणि हा प्रकल्प देखील कऱ्हाडला उभा करण्यात यावा. माननीय मुख्यमंत्री दिल्लीवरुन कऱ्हाडला आलेले आहेत. (अडथळा) या प्रकल्पाला कोळसा लागणार नाही हे मला माहीत आहे. बाकीचे औष्णिक प्रकल्प कोकण किनारपट्टीवर उभे करण्यात येणार आहे. कोकण किनारपट्टीवरील कोळशाचे प्रकल्प कऱ्हाडला उभे केले तर माननीय मुख्यमंत्री दिल्लीवरुन येऊन आपल्या क-हाडचा विकास करीत आहेत अशा प्रकारचे तेथील जनतेचे मत होईल. कारण माननीय मुख्यमंत्र्यांना सहा महिन्यात निवडणूक लढवावयाची आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रकल्प कऱ्हाडला नेले तर तेथील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

मतदार माननीय मुख्यमंत्र्यांना डोक्यावर घेतील. पण कोकणी माणसाला अशा प्रकारचे प्रकल्प नकोत हे ठाम मत आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी कोणी 10 लाख रुपये एकरी जमीन देईल अथवा कोणी 15 लाख रुपये एकरी जमीन देईल पण कोकणी माणूस इंच-इंच जमिनीसाठी कोर्टात लाखो रुपये खर्च करतो. कोकणी माणूस आपल्या पूर्वापार चालत आलेल्या जमिनीला कशा प्रकारे जपतो याची माहिती या सभागृहाला आहे. या प्रकल्पाला स्थानिक लोकांचा शंभर टक्के विरोध असल्यामुळे तो प्रकल्प अन्य ठिकाणी नेण्यात यावा अशा प्रकारची सर्व कोकणी माणसांची विनंती आहे तेव्हा शासनाने तशा प्रकारचा निर्णय घ्यावा. या प्रकल्पाच्या बाबतीत अनेक त्रुटी किंवा अनेक तांत्रिक बाबी समजून सांगितल्या जातील पण कोकणचे कोकणपण टिकविण्यासाठी अशा प्रकारे पर्यावरणाला घातक असलेले प्रकल्प कोकणात नेण्यात येऊ नयेत, अशा मताचा मी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. या प्रस्तावावर बोलत असताना मी कोकणातील प्रकल्पाच्या संदर्भात बोलणार आहे.

सभापती महोदय, कोकण समुद्राला लागून असल्यामुळे त्याचे नाव कोकण असे आहे. उद्योगासाठी जिथे पाण्याचा प्रश्न निर्माण होतो तेथे समुद्राचे पाणी मोठया प्रमाणात वापरता येईल असे प्रकल्प या ठिकाणी येणार आहेत. कोकणातील बागायतीचे आणि कोकणातील शेतीचे काय होणार? या बद्दल मी असे सांगू इच्छितो की, या प्रकल्पामुळे कोकणातील सगळी बागायत संपणार आहे असे समजण्याचे कारण नाही. कोकणामध्ये मोठया प्रमाणात अशी जमीन आहे की, जेथे काहीच होत नाही.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ......

त्या ठिकाणी शेतीही होत नाही. आता कोकणी माणसे नोकरीमध्ये गुंतलेली असल्यामुळे अनेक ठिकाणी शेती रिकाम्या पडलेल्या आहेत. अशा अवस्थेमध्ये जर मोठ्या प्रमाणात प्रकल्प आले तर उद्योगधंदे वाढतील. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, कोकणामध्ये येणाऱ्या प्रकल्पांना ज्यांचा विरोध आहे त्यांना तरी कॉन्ट्रॅक्ट्स मिळणार नाहीत एवढे बघावे. मी नेहमी पाहिलेले आहे की, इथे विरोध करावयाचा आणि मग मालकांना भेटून आम्हाला कॉन्ट्रॅक्ट मिळाले पाहिजे असा आग्रह करावयाचा हे आता बंद झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांना मी सांगू इच्छितो की, आपण कोठे तरी नैतिक भूमिका घ्यावी. एकदा भूमिका घेतल्यानंतर त्यावर ठाम राहिले पाहिजे. मग मी यामध्ये जाणार नाही अशी भूमिका घेतली पाहिजे. आम्ही सततच विरोध करीत राहू अशी भूमिका घेतली पाहिजे. आम्ही त्याचे स्वागत करु. तुम्ही सतत विरोध करीत राहा, आम्ही विकास करीत राहू अशी आमची भूमिका आहे. कारण विकास हा अत्यंत महत्वाचा आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर प्रकल्प येणार आणि जी मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती करणार त्याचे काय करणार असे विचारले जाते. महाराष्ट्रामध्ये आज किती विजेचा तुटवडा आहे असा हिशेब करुन चालणार नाही. महाराष्ट्र आज उद्योगधंद्यामध्ये मागे पडत आहे त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे लोक जमीन देत नाहीत. ज्या भागामध्ये कारखाने येतात त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वसुली केली जाते. कारखानदार घाबरुन जातात त्यामुळे ते येण्यास मागत नाहीत. त्या त्या ठिकाणचे पुढारी त्यांना मोठ्या प्रमाणात त्रास देतात हा एक भाग आहे आणि दुसरा भाग असा की, जमीन उपलब्ध करुन दिली जात नाही. मधल्या काळामध्ये आपण जे मागे पडलो त्यामध्ये वीज निर्मिती हा सगळ्यात मोठा भाग आहे. यासंदर्भात काल माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या भाषणाचे सगळ्यांनी मनन करावे.

सन्माननीय सदस्यांनी एक सूचना केली ती मला मान्य आहे. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण यासंदर्भात खरोखरच डेमॉन्स्ट्रेशन ठेवावे किंवा कॉन्फरंसेस घ्याव्यात. या प्रकल्पामुळे नेमके काय होणार आहे याबाबत सांगावे. कारण आज फ्रान्समध्ये 80 टक्के अणुऊर्जा निर्मिती होते. तेथील लोक घाबरत नाहीत. सगळ्यात कमी प्रदूषण अशा प्रकारच्या प्रकल्पातून होते हे सुध्दा आता सिध्द झालेले आहे. अशा अवस्थेमध्ये उगाच याला विरोध करणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. हुसेन दलवाई ....

बरोबर नाही. यामध्ये धोका नाही असे मी म्हणणार नाही. धोक्याच्या संदर्भात आपण अधिक सजग राहिले पाहिजे. त्यासंबंधी शेतकऱ्यांच्या ज्या मागण्या आहेत त्यांचे समाधान करण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न झाला पाहिजे. त्या ठिकाणी जी वीज निर्मिती होणार त्यापैकी महाराष्ट्राला त्याचा किती हिस्सा मिळणार याबद्दल मला असे वाटते की, आमचे काही मित्र सन्माननीय सदस्य असा आग्रह धरतील, काही आग्रह धरणार नाही पण वीज निर्मिती या ठिकाणी आणि सगळी वीज बाहेर देणार असे होता कामा नये. उपऱ्यांचा वगैरे जो व्यवहार होतो त्यासंबंधी आता आपण काही तरी करु या.

सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगेन की, आमच्याकडे वीज निर्मिती होते. आमच्याकडे कोयना धरण आहे. कोयनेच्या ठिकाणी आणखी पाचवा टप्पा, सहावा टप्पा येऊ शकतो. पण त्या ठिकाणी जंगल आहे म्हणून जर ते अडविले तर त्यासंदर्भामध्ये केंद्र शासनाशी बोलून त्या ठिकाणी त्याच पध्दतीने झाडे दुसऱ्या ठिकाणी लावून त्या ठिकाणी आणखी वीज निर्मिती होत असेल तर ती केली पाहिजे. पब्लीक सेक्टरमध्ये किती आणि प्रायव्हेट सेक्टरमध्ये किती यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी जो एक प्रश्न उपस्थित केलेला आहे तो अगदी बरोबर आहे. मी अशी सूचना करीन की, विरोध आणि विकास याबाबतीत विरोध आणि विकासवाद नावाचे एक डायलेक्टीक्स महाराष्ट्रामध्ये लिहिले गेले आहे. ज्या ठिकाणी विरोध आणि विकास असतो त्या ठिकाणी विकास होत असतो. विकासाच्या याबाबतीत महाराष्ट्र आता मागे पडलेला आहे. आपण परत म्हणाल की महाराष्ट्र मागे पडला. यामध्ये ही सगळी कारणे आहेत हे लक्षात घेऊन हे केले पाहिजे. परंतु एवढ्यापुरतेच ते मर्यादित असू नये. या ठिकाणी आय.टी.पार्कचा उल्लेख करण्यात आला. लोटे येथे नवीन नवीन कॉलेजेस यावयास लागली आहेत. कारण त्या ठिकाणी लोक पाहिजेत. पण तेथील अधिक लोकांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. उद्योगधंद्यामध्ये त्यांना प्राधान्य मिळाले पाहिजे याबाबतीत जो आग्रह आहे तो मान्य आहे. यासंदर्भात आपण विरोध करु नये. आपण नेमक्या सूचना कराव्यात. भारतीय जनता पक्षाने जी भूमिका घेतलेली आहे ती शिवसेनेने घ्यावी. याचे राजकारण करु नये. किमान विकासाचे राजकारण करणार नाही असे सगळ्यांनी ठरवावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण जगाचा विचार केला तर भारत देशाची विकासाच्या दिशेने अत्यंत गतीने वाटचाल करणाऱ्या देशात गणना केली जाते. येथील विकासाचा दर 8.9 टक्के आहे तो 11 टक्क्यावर घेऊन जायचे असेल तर त्यासाठी विजेची मोठया प्रमाणात आवश्यकता आहे. आज संपूर्ण देशातील विविध भागाला व महाराष्ट्राला लोडशेडिंगच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आवश्यक असलेली वीज कोणत्या मार्गाने निर्माण करावयाची अशी चर्चा केली जाते. आज पर्यावरणाबाबत अत्यंत सखोल चर्चा झाली आहे. अणु ऊर्जा प्रकल्पामुळे पर्यावरणावर आधात होणार आहे असेही सांगण्यात आले. परंतु मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या अणु ऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यावरणावर अगदी अल्प स्वरुपाचा परिणाम होणार आहे. संपूर्ण जगाचे अणू ऊर्जा प्रकल्पाचे चित्र पाहिले तर अमेरिकेत 104 अणू ऊर्जा प्रकल्प आहेत, ज्यामधून 1 लाख मेगावॅट विजेची निर्मिती होती. त्याठिकाणी 20 टक्के वीज अणु ऊर्जेच्या माध्यमातून तयार केली जाते. फ्रान्समध्ये 79 टक्के, जपानमध्ये 29 टक्के, रशियन फेडरेशनमध्ये 18 टक्के, कोरिया रिपब्लिकमध्ये 35 टक्के, इंग्लंडमध्ये 18 टक्के, कॅनडात 15 टक्के, जर्मनीत 29 टक्के, युक्रेनमध्ये 49 टक्के, चीनमध्ये 3 टक्के व भारतात 2.4 टक्के अणु ऊर्जेपासून विजेची निर्मिती होते. विजेबाबत स्वयंपूर्ण व्हावयाचे असेल तर अणुच्या माध्यमातून वीज निर्मिती होणे आवश्यक आहे असे संपूर्ण जगाने मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, जैतापूरच्या पॉवर प्रोजेक्टबद्दल सांगावयाचे झाले तर या प्रकल्पासाठी सुमारे 938 हेक्टर जमीन लागणार आहे. त्यापैकी खरीपाची जमीन केवळ 68 टक्के आहे, वरकस 262 हेक्टर व पोटखराब जमीन 6.02 टक्के इतकी आहे. म्हणजे पोटखराब अशाप्रकारची जमीन जास्त आहे. या जमिनीवर कोणतेही पीक घेऊ शकत नाही अशी ही जमीन आहे. या प्रकल्पामुळे एकाही घराला किंवा कुटुंबाला स्थलांतर व्हावे लागणार नाही, ही वस्तुस्थिती या सभागृहाला माहीत असली पाहिजे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.प्रकाश बिनसाळे....

सभापती महोदय, याठिकाणी पर्यावरणाबाबत अनेक गोष्टींचा उहापोस करण्यात आला. वेळ कमी असल्यामुळे मी विस्ताराने सांगणार नाही. परंतु एक गोष्ट मला निश्चितपणे सांगावी लागेल. निसर्गाच्या माध्यमातून 2400 मायक्रो सिव्हर्टस्‌चे वार्षिक एमिशन आहे. अणु ऊर्जा मंडळाने 1000 मायक्रो सिव्हर्टस् परमिसिबल आहे असे म्हटलेले आहे. या देशातील अणु ऊर्जा प्रकल्प आहेत त्यापैकी तारापूरच्या प्रकल्पाचे 17 टक्के मायक्रो सिव्हर्टस, रवतदरामध्ये 44 टक्के, कलकप्पममध्ये 15 टक्के, नरोरामध्ये 8.6 टक्के, काकरपारामध्ये 2.6 टक्के व कैघामध्ये 2.2 टक्के आहे. या एमिशन्स अगदी नगण्य स्वरुपाच्या आहेत. त्यापेक्षा सूर्याच्या किंवा वातावरणाच्या माध्यमातून अणुवर जो संसर्ग होतो तो जास्त असतो. यासाठी पाण्याचा वापर मोठया प्रमाणावर होईल असे म्हटलेले आहे. प्रकल्पातील पाणी पुन्हा समुद्रात सोडल्यामुळे मत्स्य जीवाचे काय होणार अशी शंका घेण्यात आली आहे. मला असे सांगितले पाहिजे की, 0.27 चौरस किलोमीटर पर्यंत सुध्दा त्या पाण्याचा समुद्रातील पाण्यावर परिणाम होणार नाही. याठिकाणी असे सांगण्यात आले की, कोकणावरच आघात का केला जातो ? अणु ऊर्जा प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते हे आपल्या सगळयांना माहीत आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

आपण संपूर्ण जगातील अणुऊर्जा प्रकल्प पाहिले तर ते समुद्रकिनारी असल्याचे आपणास दिसून येईल. अणुऊर्जा प्रकल्प हे समुद्रकिनारी केले जातात. कारण त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता मुबलक असते. अणुऊर्जा प्रकल्प करीत असताना जागेची उपलब्धता, तेथील लोकसंख्या म्हणजे डेन्सिटी ह्या गोष्टीही पाहिल्या जातात. सर्वात महत्वाचे म्हणजे जेथे असे प्रकल्प उभारले जातात तेथील भाग हा भूकंप प्रवण नाही हे पाहिले जाते. त्याच बरोबर पर्यावरणाचा विचार केला जातो. या प्रकल्पासाठी लागणारी यंत्रसामग्री येण्यासाठी दळणवळणाची चांगली सोय आहे का हेही पाहिले जाते आणि पुराचा देखील विचार केला जातो. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे 10 हजार लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कोकणाला समुद्र किनारा असल्यामुळे हा अणुऊर्जा प्रकल्प जैतापूर येथे आणला जात आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. राज्यात पडणा-या एकूण पावसाच्या 40 टक्के पाऊस एकटया कोकणामध्ये पडतो. असे असताना कोकणामध्ये केवळ 2 टक्के सिंचनाची व्यवस्था आहे. कोकणामध्ये अणुऊर्जा प्रकल्प आणीत असताना कोकणातील समुद्र आपणास दिसतो. मग पडणा-या पावसाचे जे पाणी समुद्राला जाऊन मिळते ते पाणी अडवून कोकणाचा विकास करण्याचा विचार का केला जात नाही ? कोकणाला समुद्र किनारा लाभलेला आहे म्हणून कोकण उद्‌ध्वस्त करण्याची सुपारी आपण घेतलेली आहे काय ?

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, जेव्हा सिंचनाच्या संदर्भातील विषयावर या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित होईल त्यावेळी त्यांनी हा मुद्दा मांडावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, मला सांगावयाचे आहे की, सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करुन जैतापूरची निवड अणुऊर्जा प्रकल्पासाठी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, अणुस्फोट झाल्यानंतर भारताला वाळीत टाकण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावर मात करण्यासाठी आपण अणू करार केलेला आहे. या संदर्भातील नवीन तंत्रज्ञान भारताला मिळणे सोपे झालेले आहे. या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून कोकणामध्ये 1 लाख कोटी रु.ची गुंतवणूक होणार आहे. स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

उपलब्ध होणार आहेत. विविध विकास कामे या निमित्ताने होणार आहेत. 938 हेक्टर जमिनीपैकी 50 टक्के जमीन ही सेक्युरिटी झोन म्हणून करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी वृक्ष लागवड आणि अन्य अनेक गोष्टी होणार आहेत. न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन यांच्याकडून 13 हजार कोटीचे, न्युक्लिअर थर्मल पॉवर कार्पोरेशन यांच्याकडून 10 हजार कोटीचे, इंडियन ऑईल कार्पोरेशन यांच्याकडून 10 हजार कोटीचे अशाप्रकारे विविध कंपन्याच्या माध्यमातून या अणुऊर्जा प्रकल्पासाठी 1 लाख कोटीचे भागभांडवल उभारण्याची तयारी सुरु झालेली आहे. सभापती महोदय, या प्रकल्पामुळे कोकणाचा निश्चितच विकास होईल याची मला खात्री आहे. या प्रकल्पामुळे कोकणामध्ये पायाभूत सुविधा निर्माण होतील. चांगले रस्ते होतील. कोकणातील रस्त्यांचे चौपदरीकरण झाले तर ते या प्रकल्पाच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरेल.

सभापती महोदय, कोकणाच्या विकासाला वेगळी दिशा आणि चालना देणारा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे कोकणातील जनतेचा विकास होणार आहे. माझ्या समोरच्या बाकावर बसलेल्या शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी एन्रॉन प्रकल्प समुद्रामध्ये बुडविण्याची भाषा केली होती. त्यानंतर त्या प्रकल्पाचे काय झाले ? तशा प्रकारची पुनरावृत्ती या प्रकल्पाच्या बाबतीत होणार नाही याची दक्षता त्यांनी घ्यावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी ज्या गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी केला त्याही गोष्टी लोकांसमोर आल्या पाहिजेत एवढे बोलून वेळेच्या अभावी मी माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, येणारे प्रस्ताव, येणारे प्रकल्प यावर अवलंबून न राहता भारनियमन आणि विजेच्या दरामध्ये वाढ आणि घोटाळे याबद्दलचा प्रस्ताव दिलेला आहे.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने कुठे काही कमी पडत असेल तर वीज मंडळ ग्राहकांवर भूर्दंड लादण्याचे काम करीत आहे. विजेचे बिल आल्यानंतर त्याची रक्कम पाहून ते बिल भरण्याकडे ग्राहकांचा कटाक्ष असतो. परंतु त्या बिलामध्ये लावलेल्या अतिरिक्त भाराचा आपण कधी विचार करीत नाही. म्हणून याठिकाणी विशेषत्वाने मी हा विषय मांडू इच्छिते. सभापती महोदय, भाववाढ झाली, नुकसान झाले की, ग्राहकांकडून रक्कम वसूल केली जाते. स्थिर आकाराच्या नावाखाली वीज बिलामध्ये 30 ते 100 रुपये दरमहा आकारणी केली जाते. पूर्वी जी कामे करण्यात आली त्या खर्चाची वसुली आमच्या बिलातून केली जाते. दरवर्षी ग्राहकांकडून कमीत कमी 1000 ते 1200 कोटी रुपये विविध प्रकारच्या आकारापोटी वसूल केले जातात. इंधन समायोजन आकार बिलामध्ये लावला जातो. कोणतेही प्रॉडक्ट तयार होते, त्यासाठी होणाऱ्या खर्चानुसार त्या प्रॉडक्टची किंमत निश्चित केली जाते. परंतु विजेच्या बिलामध्ये इंधन समायोजन आकाराची मोठया प्रमाणात वसुली केली जाते. सर्वसामान्य ग्राहकांवर हा भूर्दंड लादला जातो. अतिरिक्त पुरवठा आकार लावला जातो. वीज बिलामध्ये राज्य शासनाची डयुटी वसूल केली जाते. फेब्रुवारीपर्यंत 12 टक्के असणारी ड्युटी आता 15 टक्क्यावर गेली आहे. छोट्या ग्राहकांची ही एकप्रकारे लूटमार सुरु आहे. ज्या भागामध्ये शून्य भारनियमन आहे त्याठिकाणी भारनियमन लायबिलिटी आकारली जाते. तो एकप्रकारचा अधिभार वसूल केला जातो.

सभापती महोदय, एन्रॉन प्रकल्पातून निर्माण होणारी वीज मुंबई-पुणे शहरामध्ये वापरली जाते. त्यापोटी येणारा खर्च इतर आकार या नावाखाली आमच्याकडून वसूल केला जातो. 37 पैसे प्रती युनिट या दराने हा आकार आमच्यावर लादला जातो. अशाप्रकारे दरमहा 500 रुपयांचे विजेचे बिल असेल तर त्यापोटी सर्व प्रकारचे आकार आणि अधिभार यांच्या माध्यमातून 750 रुपये आमच्याकडून वसूल केले जातात. हाही एक भूर्दंड आम्हाला सहन करावा लागतो. आता मात्र 1 डिसेंबर, 2010 पासून पुन्हा 25 पैसे प्रती युनिट अतिरिक्त भूर्दंड सहन करावा लागत आहे. त्याचे परिणाम म्हणजे 50 टक्के दरवाढ मान्य केलेली आहे ती सुध्दा यासोबत आकारली जाणार आहे. वीज बिलापोटी सर्वसामान्य जीवन जगणारे घरगुती ग्राहक, शेतकरी यांना लुबाडण्याचे काम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...........

वीज मंडळाच्या माध्यमातून केले जाणार आहे. मंडळाला होणारे नुकसान कमी करता येऊ शकते. परंतु मंडळाची इच्छा दिसून येत नाही. याचे कारण असे की, ट्रान्समिशन लॉसेसबद्दल मी बोलणार नसले तरी ट्रान्सफॉर्मर लॉसेसचा कधी विचार केला आहे का? जवळजवळ 2.80 लाख ट्रान्सफॉर्मर आहेत. त्यापैकी 1.30 लाख ट्रान्सफॉर्मरवर मीटर बसविले आहेत. त्या माध्यमातून ऊर्जेचे अंकेक्षण केले जाते. 1.50 लाख ट्रान्सफॉर्मरवर मीटर नाहीत. त्यामुळे अंकेक्षण केले जात नाहीत. त्याठिकाणी मोठया प्रमाणावर लॉसेस होतात. खऱ्या अर्थाने लॉसेस किती आहेत याचे ऑडिट केले जात नाही. ट्रान्सफॉर्मर एकदा किंवा दोनदा फेल झाला असेल तर त्याठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर बसविला पाहिजे असा नियम आहे, परंतु तसे घडत नाही. तीन-तीन, चार-चार वेळेला ट्रान्सफॉर्मर उडतो, त्यामुळे मोठया प्रमाणात लॉस होत आहे. ट्रान्सफॉर्मर उडाला किंवा सिलिका जेलचा रंग बदलला तर ते बदलविण्याचे काम होत नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात लॉसेस वाढत आहेत. आज लॉसेसचे प्रमाण 38 टक्क्यावर गेले आहे. 90 हजार ट्रान्सफॉर्मरवर वीज पुरवठा मिळणाऱ्या ग्राहकांना हे नुकसान सहन करावे लागते. हे नुकसान सर्वसामान्य ग्राहकांकडून वसूल केले जाते, याबाबत विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, ऊर्जानगरमध्ये कोळसा आणला जातो. वीज निर्मितीसाठी दरमहा 12 लाख मे.टन कोळसा लागतो. डब्ल्यूसीएलच्या माध्यमातून 8 लाख मे.टन कोळसा खरेदी केला जातो. हा कोळसा खरेदी करीत असताना आतापर्यंत डी ग्रेडचा कोळसा खरेदी केला जाता होता. आता ए ग्रेडचा कोळसा खरेदी करण्याची इच्छा का निर्माण झाली? कोळशाचे व्हॅल्यूएशन कमी असेल तर त्यामध्ये रॉकेलचे प्रमाण जास्त असते. 2 लाख मे.टन कोळसा वॉशरीकडे दिला जातो. त्यातील 15 टक्के कोळसा वॉशरीवाले ठेवून घेतात. खऱ्याअर्थाने व्हॅल्यूएशन वाढण्यापेक्षा मोठया प्रमाणात तो कोळसा धुवून येत नाही. तोच कोळसा पुन्हा वापरला जातो.

नंतर 2जे.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ........

महोदय, तिसरी गोष्ट अशी आहे की, या वीज निर्मितीसाठी आपल्या राज्यात बाहेरचा कोळसा मोठ्या प्रमाणात मागविला जात आहे. हा कोळसा 1 लाख मे.टन इतका आला असून प्रत्यक्षात मात्र फक्त 10 हजार मे.टन इतकाच आपल्यापर्यंत आलेला आहे. परवाच माननीय मंत्री महोदय सभागृहात सांगत होते की, बाहेरील कोळशामुळे विजेच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. माझे असे म्हणणे आहे की, घाणेरडा कोळसा 70 टक्के असेल आणि 10 टक्के कोळसा चांगला असेल आणि वाईटाबरोबर चांगले जळले व त्यातून परिणाम चांगला होईल की वाईट हे सर्वांनाच माहीत आहे. अशा प्रकारे महाजनको कायम स्वरुपी आमच्यावर लादत आहे. आतापर्यंत गेल्या 25 वर्षात मातीचा कोळसा असेल किंवा दगडमिश्रीत कोळसा असेल त्याचाच वापर करुन आपण वीज निर्माण करीत होतो याचा विसर शासनाला पडला आहे काय ? केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेब जेव्हा राज्याचे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्यासोबत मीच उर्जानगरला गेले होते. त्या काळात विजेचे उत्पादन कधीही कमी झाल्याचे ऐकिवात नाही. परंतु आजच्या परिस्थितीत मात्र सन 2009 मध्ये जे 76 टक्के उत्पादन होते ते आता 69 टक्क्यावर आलेले आहे आणि हा प्रॉडक्शन लॉस आमच्यावरच बसविणार काय, याचाही विचार शासनाला करावा लागणार आहे. कारण वीज निर्मितीसाठी "ए" ग्रेडचा कोळसा घेण्याची गरज आज का पडली आहे, चांगला कोळसा या राज्यात आणून त्याच्या ट्रान्सपोर्टचा खर्च सुध्दा आमच्यावरच बसविला जात आहे. अशा प्रकारे केवळ वॉशरिजचा कोळसा आमच्यावर लादून, जो प्रत्यक्षात 15 टक्केच असेल तेवढा घेऊन त्यांचे पोट भरण्यासाठी महाजनको या प्रकल्पाला अडचणीत आणण्याचाच विचार करीत आहे, असे म्हटले तरी चालेल. महाजनकोने भेलकडून वस्तू विकत घ्याव्यात असे प्रामाणिकपणे सांगता, परंतु या ठिकाणी एमएसईबीच्या अधिकाऱ्यांनी एक समिती स्थापन केली असून त्या समितीच्या माध्यमातून भेलमार्फत अशा आवश्यक वस्तू व उपकरणे विकत घेतली जातात आणि त्यातील एखाद्या उपकरणात बिघाड झाली, अथवा मशिनरी बिघडली तर त्याला जबाबदार कोण याचाही खुलासा झाला पाहिजे. परळी येथील औष्णिक वीज केंद्रात अशाच प्रकारे भेलकडून या समितीमार्फत मशिनरी मागविली होती. ही मशिनरी आल्यानंतर प्रकल्प सुरु झाल्याबरोबर 250 मेगावॅटचा हा प्रकल्प उडाला होता, असा प्रकल्प कसा उडू शकतो याचेही

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .........

स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. त्याच मशिनी पुन्हा सुरु केल्या परंतु त्यातही डिफेक्ट येत असतात म्हणून भेल कंपनीकडून डायरेक्टली ऑर्डर करण्याची जुनी पध्दत होती ती आता बंद पडली आहे. परंतु माझी सूचना अशी आहे डायरेक्टली भेल कंपनीकडूनच महाजनकोने मशिनरी मागविणे हिताचे ठरेल. तसेच चांगल्या ग्रेडचा कोळसा या प्रकल्पांसाठी पुरवावा आणि लाभार्थ्यांची होणारी लुबाडणूक थांबवावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

---------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मला बोलायची संधी मिळणार नाही असे गृहित धरुन मी माननीय मंत्री महोदयांकडे एक चिठ्ठी पाठविली होती परंतु आपण मला संधी दिली त्याबद्दल प्रथम आपले आभार व्यक्त करते व माझे म्हणणे रेकॉर्डवर यावे म्हणून मी थोडक्यात माझे विचार मांडणार आहे.

महोदय, मुळा-प्रवरा संस्थेकडे असलेली वीज मंडळाची थकबाकी यासंदर्भात माननीय उर्जा मंत्र्यांकडून मला कृती अपेक्षित आहे. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी वीज निर्मिती प्रकल्प उभे राहिले त्यांच्यामध्ये आमचे माजी खासदार माननीय श्री. प्रकाश जाधव यांनी एक निवेदन मंत्री महोदयांकडे पाठविलेले आहे. त्यात त्यांनी कन्हान नदीच्या आसपास अनेक प्रकल्प उभे राहत असल्याचे सांगून या परिसरातील संपूर्ण पर्यावरण व शेतकऱ्यांचे जीवन यावर प्रतिकूल परिणाम होणार असल्याची कल्पना दिलेली आहे. म्हणून या कन्हान नदीच्या आसपासचे प्रकल्प आणि त्या अनुषंगाने आवश्यक असणारे पुनर्वसन यासंबंधी शासनाकडून ठोस भूमिका अपेक्षित आहे. तिसरी गोष्ट म्हणजे ज्यावर फारशी चर्चा होत नाही पण राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे की, भारनियमन मुक्त शहरे असा प्रकल्प पुणे, नागपूर आणि वेगवेगळ्या ठिकाणच्या उद्योजकांनी राबविला होता. त्यामुळे छोट्या ग्राहकांचे संरक्षण आणि वेगवेगळ्या उद्योगांनाही त्याचा फायदा होत होता. यापूर्वी माननीय श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. सुनील तटकरे आणि आता या विभागाचा कार्यभार आपल्याकडे असल्याने या प्रकल्पाला आणखी वेग यावा अशी माझी अपेक्षा आहे. चौथा प्रश्न म्हणजे नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांची कार्य पध्दती काय असणार आहे, याकडे मला प्रामुख्याने लक्ष वेधावयाचे आहे. कारण कुठेही प्रकल्प होणार असला तरी प्रत्यक्षात जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया सुरु होते तेव्हाच त्या भागातील नागरिकांना समजते. त्यामुळेच त्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटतात. असे प्रकल्प शासनाच्या कुठल्या चौकटीत बसतात याचाही उहापोह होणे आवश्यक आहे. तसेच यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अशा प्रकल्पांच्या अनुषंगाने एक परिषद घेण्यासंबंधीचा उल्लेख केला .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

खरे म्हणजे जिल्हयातील लोकांना कोणता प्रकल्प कधी येणार आहे याची काही सुध्दा माहिती नसते. जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यांना सुध्दा यासंदर्भात माहिती नसते. संबंधित वीज कंपनीशी आमदार किंवा खासदार भेटून आलेला असतो ते सोडले तर यासंदर्भात कोणालाही माहिती नसते. ज्यावेळेस नवीन प्रकल्प येतात त्यावेळी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन तसेच जनतेला विश्वासात घेऊन प्रकल्पाची आखणी झाली पाहिजे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

**उप सभापती** : या चर्चेची वेळ दुपारी 1.00 वाजेपर्यंत होती. या चर्चेसाठी अजून 15 मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे व त्यानंतर माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तर सुरु होईल.

-----

यानंतरचे हिंदी भाषण श्री.शर्मा यांच्याकडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ KGS/ MMP/ 13:00

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, इस सभागृह में जैतापूर न्युक्लियर पावर प्रोजक्ट के ऊपर चर्चा हो रही है. मेरी जानकारी के अनुसार भार नियमन के ऊपर अलग से प्रस्ताव है, इसलिए भार नियमन बारे में हम उस समय बात करेंगे.

सभापति महोदय, जैतापूर न्युक्लियर पावर प्रोजक्ट 9900 मेगावाट का प्रोजक्ट है. यह प्रोजक्ट न केवल महाराष्ट्र में, बल्कि पूरे विश्व का सब से बड़ा पावर प्रोजक्ट होने वाला है. यह हमारे लिए बड़े गौरव की बात है. यह पावर रेटिंग में दुनिया का सब से बड़ा पावर प्रोजक्ट है. हमारे जो पर्यावरण विशेषज्ञ हैं, हमारे जो सामाजिक कार्यकर्ता हैं, हमारे जो ट्रेड यूनियन कार्यकर्ता है, अगर उनको वहां के किसानों के बारे में, वहां के प्रकल्पग्रस्तों के बारे में, वहां की जमीन के मुआवजे के बारे में, नौकरी के बारे में उनकी शंकाओं को दूर करते हुए उनकी मांगों के बारे में शासन को ईमानदारी से विचार करना चाहिए. क्योंकि महाराष्ट्र में इससे पहले के प्रकल्पग्रस्तों को अच्छा अनुभव नहीं रहा है. यह एक प्रतिष्ठित प्रोजक्ट है, इसलिए इसके लिए एक विशेष पॅकेज बनाएं और जो भी उनकी मांगें हैं, उनके ऊपर महाराष्ट्र सरकार को उचित ध्यान देना चाहिए. इस प्रोजक्ट के प्रकल्पग्रस्तों को जमीन का उचित मुआवजा मिलना चाहिए. माननीय मुख्यमंत्री और उप मुख्यमंत्री की टीम बहुत अच्छा कार्य कर रही है और मुझे विश्वास है कि वे इस बारे में उचित निर्णय लेंगे.

सभापति महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने यहां पर कहा कि इसमें कार्बन एमिशन कम होना चाहिए. मैं उनको बताना चाहता हूँ कि जितने भी बिजली पैदा करने के स्त्रोत हैं, चाहे वह थर्मल पावर हो, चाहे वह हाइड्रॉलिक पावर हो, चाहे विंड मशीन से पैदा होने वाली पावर हो, न्यूक्लियर पावर से बिजली पैदा करने में सब से कम कार्बन एमिशन होगा. कोल और थर्मल पावर के साथ मेरा संबंध है. इसलिए मुझे थोड़ी जानकारी है कि न्युक्लियर पावर प्रोजक्ट में सब से कम कार्बन एमिशन होगा. पूरे विश्व हालात इस प्रकार के हैं कि थर्मल पावर प्रोजक्ट कम किए जा रहे हैं. सभी लोग चाहते हैं कि हमें ग्रीन इनर्जी मिलनी चाहिए. अगर सुरक्षा के हिसाब से देखा जाए तो फ्रांस के जो 6 रिएक्टर लगाने वाले हैं, वे पूरी तरह से सुरक्षित हैं. कोयले की खदानों में हम लोग जब काम करते हैं तो कई बार मजदूर मर जाते हैं अथवा हम जब हवाई यात्रा करते हैं तो एक्सीडेंट में लोगों की मृत्यु हो जाती है. इसका मतलब यह नहीं है कि हम कोयले की खदान में काम करना बंद कर दें अथवा हवाई सफर करना बंद कर दें.

. . . KK 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

दुर्घटना होने की आशंका की वजह से हम इस प्रोजक्ट को रोक नहीं सकते. यह एक बहुत प्रतिष्ठित प्रोजक्ट है और राजनीति की वजह से इसका विरोध नहीं होना चाहिए. इस प्रोजक्ट के बारे में संसद में जिस राजनैतिक दल के लोगों ने विरोध किया है, वे लोग इस सभागृह में विरोध कर सकते हैं. मेरा यह स्पष्ट रुप से मानना है कि महाराष्ट्र और देश के लिए यह एक प्रतिष्ठित प्रोजक्ट है, इसलिए वहां के प्रकल्पग्रस्तों की उचित मांगों को पूरा करते हुए और सभी लोगों को साथ में लेकर यह प्रोजक्ट बनाना चाहिए.

. . . . . . . .

भाषण पूर्ण, नंतर अजित शिगम.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या नियम 260 अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारत जगामध्ये आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात महासत्ता होत असताना आज आपण अणु ऊर्जेच्या निर्मितेमध्ये कमी पडत आहोत. एकूण दीड लाख मेगावॅट अणुऊर्जे पैकी आपण फक्त अडीच ते तीन टक्के अणुऊर्जा निर्मिती करु शकतो. 978 हेक्टर क्षेत्रावर जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प होत आहे. इतर देशांचा विचार केला तर फ्रान्स 78 टक्के , जपान 30 टक्के, स्वीत्झ र्लंड 37.7 टक्के, हंगेरी 37.4 टक्के, अमेरिका 19 टक्के, यु.के. 17 टक्के अणुऊर्जा निर्मिती करतात. तर भारत फक्त अडीच ते तीन टक्के अणुऊर्जा निर्मिती करतो.

सभापती महोदय, जगात अणुऊर्जेमुळे पर्यावरणाला कोणताही धोका झाल्याचे आढळून आले नाही. रशियातील चर्मोबीन येथे काही वर्षापूर्वी धोका झाल्याचे आढळून आले. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की, इतर ठिकाणी अणुऊर्जेचे प्रकल्प झाले नाहीत. समुद्राजवळ हा प्रकल्प घेण्याचे कारण म्हणजे या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. पाण्यापासून वाफ निर्मित करुन ते पाणी पुन्हा समुद्रात सोडले जाते. हे पाणी समुद्रात सोडल्यामुळे समुद्र जीवनाची कोणत्याही प्रकारची हानी झाल्याचे दिसून येत नाही. माशांवर कोणत्याही प्रकारचा आघात होत नाही. उलट काही ठिकाणी माशांचे वजन वाढल्याचे आढळून आले आहे. तेव्हा माझी कोकणातील मित्रांना विनंती आहे की, आपण याबाबत अभ्यास करुन खरे चित्र समोर आणावे.

सभापती महोदय, किरणोत्सर्गावर प्रक्रिया करुन किरणोत्सर्ग बाहेर सोडले जातात. आपल्याकडे ॲटॉमिक एनर्जी रेग्युलेटरी बोर्ड आहे. या बोर्डाने या प्रकल्पास परवानगी दिलेली आहे. तेव्हा यामध्ये कोणत्याही प्रकारचा धोका नाही. रिॲक्टरकडून कोणत्याही प्रकारची हानी होत नाही.

सभापती महोदय, ॲरियो कंपनी ब्लॅकलिस्ट असल्याची बातमी वर्तमानपत्रात आली हाती. ॲरियो कंपनीचा 60 हजार मेगावॅटचा रिॲक्टर प्रकल्प फ्रान्समध्ये सुरु आहे. आता फिन्लॅड, चीन

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

आणि भारताला ॲरियो कंपनी मार्फत रिॲक्टर मिळणार आहेत. कंपनी ब्लॅकलिस्ट झाली आहे म्हणून आरोप करता कामा नये. युती शासनाने सुध्दा एक वीज कंपनी ब्लॅकलिस्ट झाली होती तिला पुनर्जीवित केलेले होते. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सन 2012 मध्ये संपूर्ण महाराष्ट्र भारनियमन मुक्त करण्याचे ठरविले आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व अन्य सदस्यांनी उपस्थित केलेल्या नियम 260 अन्वये प्रस्तावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भात फार मोठ्या प्रमाणावर भारनियमन होत आहे.. (अडथळा).. आपण विदर्भात अधिवेशन घेतो पण विदर्भाच्या प्रश्नावर बोलत नाही. कोकणात जैतापूर प्रकल्प येत आहे. आमच्या विदर्भात अनेक प्रकल्प येत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात 38 प्रकल्प येत आहेत. असे असताना आम्ही काही बोलत नाही. संपूर्ण जगात चंद्रपूर जिल्ह्याचा प्रदूषणामध्ये पहिला क्रमांक लागतो... (अडथळा ) समोरच्या बाकावरील सदस्य मराठी मराठी करतात. मग मला मराठी बोलू का देत नाही ? (अडथळा )...

सभापती महोदय, विदर्भात अनेक प्रकल्प येत आहेत. आतापर्यंत विदर्भाने महाराष्ट्राला पोसले आहे. वीज, मायनिंग, कोळसा विदर्भात जास्त आहे. विदर्भात पाऊस पडतो परंतु सर्व पाणी जमिनीत मुरते. पश्चिम महाराष्ट्रात पावसाची सरासरी कमी आहे. कोकणात जास्त पाऊस पडतो परंतु ते सर्व पाणी समुद्राला मिळते.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जव्हेरी.....

विदर्भामध्ये कोळश्यावर आधारित अनेक ऊर्जा प्रकल्प सुरु करण्यात येत आहेत.राज्यात ज्या ठिकाणी विजेची निर्मिती होत नाही अशा मुंबई, पुणे, नाशिक या ठिकाणी भारनियमन केले जात नाही. राज्याला 12 हजार मेगॅवॅटस विजेची गरज आहे आणि विदर्भात 6 हजार मेगॅवॅटस विजेची निर्मिती होत असते परंतु त्यातील फक्त 1800 मेगॅवॅट वीज विदर्भाला हवी आहे परंतु तेवढी वीजसुध्दा दिली जात नसल्यामुळे विदर्भातील प्रत्येक जिल्हयात भारनियमन केले जात आहे.ग्रामीण भागात तर 12 ते 14 तास भारनियमन केले जाते. काल गडचिरोलीमध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली होती .गडचिरोली जिल्हयातील 55 गावांना युतीचे सरकार सत्तेवर होते तेव्हा पासून वीज दिली जात नाही. गडचिरोली जिल्हयातील 55 गावांना अगोदर वीज दिली जावयाची परंतु नंतर ती बंद करण्यात आली होती. 12 वर्षापासून त्या गावाला अजूनही वीज दिली जात नाही. वीज खंडीत होऊन अजूनही त्या गावाला वीज दिली जात नाही.हे माझे म्हणणे नसून गडचिरोली जिल्हयाचे पालक मंत्री श्री आर आर पाटील यांनी कालच्या बैठकीत तसे सांगितले होते. इतकी वर्षे वीज दिली जात नसतांना अजूनही आम्ही शांतच आहोत. कोकणात वा मुंबईत एक तास वीज बंद झाली तर मोठया प्रमाणावर आरडाओरड केली जाते परंतु चार सहा तास वीज मिळाली नाही तर ते काय करतील हे माहीत नाही. आमच्या विदर्भात अशी काही गावे आहेत की ज्या ठिकाणी बारा बारा वर्षापासून वीज खंडीत करण्यात आली असल्यामुळे तेथेभार नियमन सुरु आहे.तरीसुध्दा आम्ही त्याबाबतीत काहीही तक्रार करीत नाही.आमच्याकडे जे काही आहे ते घेऊन जावे असेच आम्ही सांगत असतो.

विदर्भामध्ये 78 टक्के वन आहे ,पाणी ,खनिज ,कोळसा आहे. मी फक्त एवढेच सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये सरकारी उद्योग येत आहे. सीटीपीएस हा प्रकल्प चंद्रपूर मध्ये असून 2340 मेगॅवॅट वीज निर्मितीची त्या प्रकल्पाची क्षमता आहे.परंतु कोळसा खराब असल्यामुळे मागील दोन तीन वर्षापासून बाराशे मेगॅवॅट वीज निर्मित होत असते. डब्ल्युसीएलचे असे म्हणणे आहे की आमच्याकडून खराब कोळसा दिला जात नाही शासनाकडून असे सांगितले जाते की, खराब कोळसा पुरविला जातो अशा स्थितीमध्ये हा कोळसा कोण खराब करते ? 40 हजार टन कोळसा येतो त्यातील 8 ते 210 हजार टन कोळसा खराब निघतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जव्हेरी ....

. माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित दादा पवार यांना मी सांगू इच्छितो की आपल्याकडून विदर्भाच्या काही अपेक्षा आहेत.विदर्भाला आपण दत्तक घेऊन टाकावे असे काही लोकांनी सांगितल्याची बातमी आज मी वर्तमानपत्रात वाचली आहे विदर्भातील भारनियमन रद्द केले पाहिजे त्याचबरोबर या ठिकाणच्या खनिजाचे आणि उद्योगाचे जे काही प्रश्न आहेत ते दूर केले पाहिजेत. विदर्भासाठी 1800 मेगॅवॅट वीज पाहिजे आहे तेव्हा एवढी वीज विदर्भाला देऊन भारनियमनातून मुक्त करावे अशी माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. त्याच बरोबर विदर्भामध्ये जे काही उद्योग येत आहेत त्यांना आम्हाला विरोध करावयाचा नाही या उद्योगामुळे जे प्रदूषण होते ते थांबविण्यात आले पाहिजे. हे प्रदूषण थांबविण्याच्या दृष्टीने कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रत्येक काराखान्याने अमुक केले पाहिजे, तमुक केले पाहिजे असे सांगण्यात आलेले आहे . प्रदूषण नियंत्रण करणारी मशिनरी लावण्यासाठी त्यांना कोटयावधी रुपये खर्च येत असतो म्हणून ते मशिनरी लावत नाहीत किंवा मशिनरी लावली तर त्याचा ते वापरही करीत नाही विदर्भात अनेक उद्योग आपण आणावेत परंतु प्रदूषणचा त्रास विदर्भातील लोकांना होता कामा नये अशी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे जे उद्योग येत आहेत त्यांनी काटेकोरपणाने प्रदूषण दूर करण्यासंबंधीचे नियम पाळावेत अशी विनंती करुना मी माझे भाषण संपवितो.जयहिंद जय विदर्भ.

------------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला मान राखून दोन-तीन सूचना याठिकाणी करणार आहे. या सभागृहामध्ये विजेच्या प्रश्नासंबंधी चर्चा सुरु झाल्यानंतर माझ्या लातूर जिल्हयातील औसा तालुक्यामधून मला फोन आले की, तेथील शेतकऱ्यांची तोडलेली वीज अजून जोडली नाही. आणि आज सुध्दा शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन तोडणे सुरु आहे. मंत्री महोदयांनी या सभागृहामध्ये घोषणा केली होती की, अतिवृष्टी झालेल्या जिल्हयातील शेतकऱ्यांची वीज तोडली जाणार नाही. असे जर असेल तर महाराष्ट्रामध्ये असा कोणताही जिल्हा शिल्लक राहणार नाही. त्यामुळे आपण त्यामध्ये माझा औसा तालुका देखील घेतला पाहिजे. आमच्या मराठवाडयातील सर्व आमदारांमध्ये एक असंतोष तयार झाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जशी अतिवृष्टी झाली आहे त्याप्रमाणे मराठवाडयामध्ये सुध्दा झालेली आहे. तर मग मराठवाडयातील शेतकऱ्यांना न्याय कां मिळत नाही? या घटनेवरुन त्याला दुजोरा मिळत आहे.

सभापती महोदय, आपल्या विभागामध्ये जे लाईनमन काम करीत आहेत त्यापैकी कुणीही पोलवर चढण्यास तयार नाहीत. आमची वायर तुटली व डीओ गेला तर ते सोबत माणसे आणतात आणि त्यांच्याकडून काम करुन घेतात, व त्यांची मजूरी आम्हाला देण्यास सांगत आहेत. प्रत्येक गोष्टीसाठी आम्हाला मजूरी द्यावी लागणार असेल तर आपण सर्व्हिस टॅक्स कशासाठी वसूल करीत आहात? सभापती महोदय, माझ्या हातामध्ये 27 हजाराचे विजेचे बिल आहे आणि ते भरले नाही म्हणून 28 हजार रुपयांचे व्याज लावण्यात आले आहे. माझ्या हातामध्ये लाईट बिल व वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी सुध्दा आहे. तेव्हा लाईटच्या बिलापेक्षा व्याजाची रक्कम जास्त कशी काय असू शकते याचा आपण विचार करण्याची गरज आहे. या शेतकऱ्यांची व्यथा अशी आहे की, त्यांची फक्त वर्षभरामध्ये तीन महिनेच मोटर चालते. तीन महिने मोटर चालल्यानंतर एवढे बिल कसे काय येऊ शकते? या जिल्हयात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत आहेत आणि हा कापूस पिकविणारा जिल्हा आहे. त्यामुळे आपल्या विभागाकडून अशाप्रकारच्या चुका होऊ नयेत असे मला वाटते.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, महाराष्ट्रामध्ये आमच्या मराठवाडयातील लोकांचे मीटर जास्त वेगाने फिरु लागले आहेत असा या लोकांचा गैरसमज आहे. याबाबत एका शेतकऱ्यांने अभ्यास केला आहे. त्याचे असे म्हणणे की, 7.5 एचपीचे मळणी यंत्र 3 तास चालले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

तर 54 युनिट दाखविते, परंतु प्रत्यक्षात ते 14 युनिट फिरले पाहिजे. मध्य प्रदेशामध्ये 16 युनिट, छत्तीसगडमध्ये 14 युनिट, गुजरातमध्ये 12 युनिट, पंजाबमध्ये 17 युनिट दाखविले जाते. तरमग आपले युनिट एवढे फास्ट कां आहेत? याची चौकशी झाली पाहिजे. एकूण 9 लाख मीटर तपासण्यात आले त्यापैकी 7 लाख मीटर फॉल्टी निघाले आहेत. त्याचप्रमाणे विजेच्या प्रत्येक बिलामध्ये कॅपॅसिटरचे 270 रुपये लावले आहेत. हा कॅपॅसिटर 250 ते 300 रुपयांना मिळतो. त्याचा उपयोग काय होतो हे मला माहीत नाही. त्यामध्ये वाळू भरलेली असते, ते चांगल्या दर्जाचे नसते. अशाप्रकारे 270 रुपयांचे कॅपॅसिटर बसवून वर्षामध्ये 1100 रुपयांचा दंड लावला जातो. अशा लहान लहान गोष्टींबाबत शासनाने लक्ष ध्यावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपल्याला सन 2012 पर्यंत 2 लाख 15 हजार 800 मेगावॅट विजेची गरज आहे. आणि आज आपल्याकडे फक्त 1 लाख 70 हजार 673 मेगावॅट एवढी वीज मिळते. सभापती महोदय, आज घरामध्ये वीज नसेल तर घरातील पंखा बंद पडल्यानंतर सुध्दा आपण राहू शकत नाही. जोपर्यंत कोकणामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप होऊ शकत नाही तोपर्यंत कोकणचा विकास होऊ शकत नाही यासाठी हा जैतापूरचा प्रकल्प कोकणामध्ये व्हावयास पाहिजे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी याठिकाणी असे सांगितले की, आपल्या राज्याला 2 लाख 15 हजार 800 मेगावॅट इतक्या विजेची गरज आहे. ही त्यांची माहिती चुकीची आहे. आज आपल्या राज्यामध्ये 9 ते 10 हजार मेगावॅट इतकी वीज तयार होत आहे.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, मी याठिकाणी संपूर्ण देशाकरिता असलेली विजेची गरज सांगितली आहे. भारत देशामध्ये महाराष्ट्र राज्य आहे हे आपल्याला माहीत आहे. सभापती महोदय, जैतापूरचा प्रकल्प पडीक जमिनीवर होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. अणु ऊर्जा प्रकल्पामुळे कोणतेही नुकसान होत नाही. याचे ज्वलंत उदाहरण सांगावयाचे झाल्यास 30 वर्षापूर्वी चेंबूर येथे ॲटॉमिक एनर्जी प्रकल्प सुरु करण्यात आला. त्यापासून आतापर्यंत लोकांवर कोणतेही दुष्परिणाम झालेले नाहीत. याबाबत शेतीवर प्रयोग करण्यात आले आहेत. विशेषत: भूईमूगाच्या शेतीमध्ये एकेक शेंगदाणा मोठा होत असल्याचे आढळले आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा शेतीवर परिणाम होईल काय याबाबत संशोधन केल्यानंतर अशाप्रकारचे दुष्परिणाम झाल्याचे आढळले नाही.

सभापती महोदय, फ्रान्स या देशामध्ये 90 टक्के अणु ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. ज्यावेळी कोकणामध्ये एन्रॉन प्रकल्प उभारण्यात आला त्यावेळी माननीय सदस्य श्री. रामदास कदम आपण बॉब मारुन तो प्रकल्प समुद्रामध्ये बुडविला. तोच प्रकल्प तुम्हाला पुन्हा बाहेर काढावा लागला. याचे कारण तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले होते की, या महाराष्ट्राला खरी गरज विजेची आहे. आज स्वत:च्या घरामध्ये गेल्यानंतर जर लाईट नसेल तर तुम्ही पंख्याशिवाय राहू शकत नाही. त्यामुळे एनर्जी तयार करण्यासाठी हा अणु ऊर्जा प्रकल्प आपल्याला उभारावयाचा आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत...

तेथील लोकांची दिशाभूल न करता या प्रकल्पामुळे शेतीवर परिणाम होणार नाही, माशांवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे तेथील लोकांना समजून सांगण्यात यावे. या प्रकल्पाचे पाणी समुद्राच्या आतमध्ये 26 कि.मी.वर नेऊन सोडण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे कुठल्याही प्रकारचे दुष्परिणाम होणार नाहीत. त्यामुळे या अणुऊर्जा प्रकल्पाची आपल्याला गरज आहे आणि तो झालाच पाहिजे अशा प्रकारची आमची मागणी आहे. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आणि उप मुख्यमंत्र्यांनी आशिया खंडात औद्योगिक क्रांती घडविणारा पहिला ऐतिहासिक प्रकल्प महाराष्ट्रात आणला. माननीय मुख्यमंत्री हे विज्ञान विषयाचे पदवीधर आहेत. केंद्र शासनात अणुऊर्जा खात्याचा जवळ जवळ सहा ते सात वर्षे त्यांनी कार्यभार सांभाळलेला आहे. त्यानंतर या राज्याचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री म्हणून राज्याभिषेक झाल्याबरोबर या दोन व्यक्तींनी केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांना साक्षी ठेवून या प्रकल्पाची ऐतिहासिक घोषणा केलेली आहे.

माननीय मुख्यमंत्री सहा ते सात वर्षापूर्वी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आले होते. (अडथळा) महाराष्ट्रात युती सरकार असताना श्री. प्रभू हे केंद्रीय ऊर्जा मंत्री होते. त्यावेळी या महाराष्ट्रात किती प्रकल्प आणले? केंद्र शासनामध्ये वजन असावे लागते, अभ्यासू माणूस असावा लागतो. दिशा असावी लागते. म्हणूनच हा एवढा मोठा प्रकल्प कोकणात आलेला आहे. हे कोकणवासियांचे भाग्य आहे. सत्ता केंद्रात म्हणून राज्यात हा प्रकल्प आलेला आहे. या प्रकल्पाचे संपूर्ण श्रेय माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांना आहे. मी मनापासून त्यांचे आभार मानतो. विरोधी पक्षाकडे काय कार्यक्रम आहे? केवळ बोंबाबोंब करण्याचा कार्यक्रम आहे. त्यामुळे या प्रकल्पाबद्दल विरोधी पक्षाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. मानसिकता बदलली नाही तर नॅनो सारखे दुसरे प्रकल्प गुजराथमध्ये जातील आणि हजारो कामगारांचे नुकसान होईल. काल माननीय मुख्यमंत्री भाषण करीत असताना असे म्हणाले की,"मी कोकणवासियांसाठी अणुऊर्जा मंडळाकडे जाऊन त्यांच्यावतीने प्रबोधन करीन, गाऱ्हाने घालीन. (अडथळा) कोकणी माणूस अतिशय गरीब आहे. पश्चिम महाराष्ट्रासारखी एकरामध्ये त्याच्याकडे जमीन नाही. उकडा भात, पेज खावून तो जगतो. त्यामुळे एवढा मोठा प्रकल्प जर कोकणात येत असेल तर तुम्ही त्याचे स्वागत करा. मी शेवटी विरोधी पक्षाला सांगू इच्छितो आणि कळकळीची विनंती करतो की, तुमची मानसिकता बदला आणि या प्रकल्पाला मान्यता द्या.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्ताच्या संदर्भात मी माननीय वीज मंत्रीमहोदयांना विनंती करु इच्छितो की, या राज्यामध्ये पाच ते सहा वेळा विजेचे दर वाढविण्यात आलेले आहेत. नुकतेच पर युनिट 22 पैसे दर वाढविण्यात आलेले आहेत. त्यामुळे 25 टक्के वाढ पर युनिटमध्ये झालेली आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, घरगुती वापराच्या विजेवर पर युनिट 22 पैसे इतके लावलेले दर राज्य शासनाने परत घ्यावेत. महागाईत होरपळलेल्या सामान्य माणसाला जगणे कठीण झालेले आहे.

सभापती महोदय, माझी दुसरी सूचना अशी आहे की, तिरोडा येथील आगामी प्रकल्पाच्या 25 कि.मी.च्या आजूबाजूला आरोग्य आणि प्रदुषणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. रस्त्यावर हा प्रकल्प असून या रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था झालेली आहे. तो रस्ता दुरुस्त करण्याचे मान्य केलेले आहे. या तिरोडा गावचे पुनर्वसन या प्रकल्पापासून 10 ते 15 कि. मी. वर करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या नंतर मला एक अत्यंत महत्वाची सूचना करावयाची आहे. विद्युत गळती मोठया प्रमाणात होते आणि त्याचा अधिभार सामान्य जनतेला सहन करावा लागतो. त्यामुळे विद्युत गळती थांबविण्याची आवश्यकता आहे. वेळेअभावी यासंबंधीची आकडेवारी मी देणार नाही. ही संपूर्ण आकडेवारी माननीय मंत्री महोदयांकडे उपलब्ध आहे. विद्युत गळतीच्या संबंधात निश्चित धोरण आखून विद्युत गळती थांबविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे खूप मोठे राजस्व बुडालेले आहे. विहीरगाव ग्रामपंचायतीकडून आदाणीने पर हेक्टरी 10 हजार रुपये कर आकारणी केलेली आहे. पण महसूल विभागाने आणि वन विभागाने आदाणीला पाठीशी घातले आहे आणि प्रती एकर फक्त 50 रुपये एवढे भाडे निर्धारित केले आहे. खाजगी जमीन मालकाला अदाणी जेवढे भाडे देते तेवढे भाडे राज्य शासनाने त्यांच्याकडून वसूल केले पाहिजे. गट क्रमांक 448 हा बांबूचा प्लॉट आहे. तो पूर्ण उद्ध्वस्त झालेला आहे. त्या ठिकाणी अवजड साहित्य ठेवण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ...

त्या ठिकाणी तिरोडा परिसरामध्ये फार मोठी अडचण निर्माण झालेली आहे. गोंदिया हे जिल्ह्याचे स्थान आहे आणि तिरोडा हे तालुक्याचे स्थान आहे. त्या ठिकाणी त्याचा फार मोठा परिणाम झ ाालेला आहे. प्रदूषण आणि आरोग्याविषयी शासनाने चिंता करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, साखरीटोला येथे एका उपकेंद्राचे उद्‌घाटन झाले. त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे परंतु अजूनही त्या उपकेंद्राची सुरुवात झालेली नाही. ते उपकेंद्र तातडीने करावे. अवकाळी पावसामुळे शेतकरी अत्यंत अडचणीमध्ये आलेले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील एका तालुक्यातील 400 शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन थकलेले आहेत. आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विजेचे कनेक्शन्स द्यावयाचे आहेत. यासंदर्भातील आकडे आपल्याकडे उपलब्ध आहेत. मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, या शेतकऱ्यांना वीज कनेक्शनची अत्यंत आवश्यकता आहे. धानाच्या पिकाव्यतिरिक्त इतर कॅश क्रॉप घेण्यासाठी हे वीज कनेक्शन तातडीने द्यावेत आणि त्या शेतकऱ्यांना आपण न्याय द्यावा अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

**उप सभापती** : यानंतर माननीय उपमुख्यमंत्री उत्तराचे भाषण सुरु करतील.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, प्रत्येक चर्चेच्या शेवटी सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांचे नाव असते. कोणतीही चर्चा असेल त्यामध्ये शेवटी सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर बोलतात.

**उप सभापती** : मी त्यांचा मान ठेवला की नाही हे सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांना विचारावे. या ठिकाणी त्यांचे नाव पक्षाने दिले नव्हते तरी सुध्दा त्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. आमच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विसंवाद नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते अशा प्रमुख नेत्यांनी दिलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्री उत्तर देत असताना हे दोन्ही सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या प्रस्तावावर माझेही नाव आहे आणि मी सभागृहात उपस्थित आहे.

**उप सभापती** : यासंदर्भात सन्माननीय सदस्यांमध्ये गैरसमज नसावा. आज माननीय गृहमंत्र्यांबरोबर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, श्री. एकनाथराव खडसे (पाटील) साहेब आणि श्री. दिवाकर रावते साहेब हे तिघेही गडचिरोलीला गेलेले आहेत. तसे त्यांनी कळविले आहे. ते या ठिकाणी उपस्थित नाहीत याचे कारण त्यांनी मला कळविले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे नाव या प्रस्तावावर आहे आणि ते उपस्थित आहेत. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये राज्यामध्ये विजेच्या संदर्भातील प्रश्न तसेच राज्यामध्ये विजेचे जे प्रकल्प होऊ घातलेले आहेत किंवा जे प्रकल्प कार्यान्वित आहेत आणि त्यासंदर्भातील जे प्रश्न आहेत त्या प्रश्नासंबंधी चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे तर 9 तारखेला या चर्चेची सुरुवात केली आणि आज 14 तारीख आहे. आज देखील बराच वेळ अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला आणि काही उपयुक्त सूचना केल्या. त्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी सुरुवातीला धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांनी या चर्चेला सुरुवात केली. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री राजन तेली, धनंजय मुंडे, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय केळकर, परशुराम उपरकर, हुसेन दलवाई, प्रकाश बिनसाळे, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. एस. क्यू. जमा, रमेश शेंडगे, जैनुद्दीन जव्हेरी, पाशा पटेल, विजय सावंत, सुभाष चव्हाण आणि केशवराव मानकर अशा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला होता आणि काही अतिशय चांगल्या प्रकारच्या सूचना त्यांनी केल्या. मी ऊर्जा खात्याचा मंत्री या नात्याने त्यांचे स्वागत करतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने जरुर जैतापूर सारख्या महत्वाच्या प्रकल्पाबद्दल प्रत्येकाने आणि विशेषत: कोकण परिसरात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी आपापली भूमिका मांडली. परंतु एक गोष्ट सभागृहाला मान्य करावी लागेल की, दाभोळचा प्रकल्प एन्रॉन च्या नावाने आणण्याचा प्रयत्न ज्यावेळी केला त्यावेळी त्या काळामध्ये जे सदस्य होते त्यांच्याकडून आरोप करीत असताना भ्रष्टाचाराच्या संदर्भात या ठिकाणी खूप मोठे आरोप झाले आणि त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्या वेळच्या काँग्रेस सरकारबद्दल वातावरण अतिशय खराब करण्याचा प्रयत्न त्यावेळच्या विरोधकांनी केला. नंतर काय झाले याबाबतचा सगळा इतिहास आपल्यासमोर आहे. परंतु आजच्या चर्चेमध्ये जैतापूरच्या संदर्भात एकानेही भ्रष्टाचाराचा आरोप केला नाही ही आज खरी जमेची बाजू आहे. त्याबद्दल मी विरोधकांना सुध्दा धन्यवाद देईन.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

या देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी खूप विचार करुन करार केला. आपल्याला आठवत असेल की, त्या काळामध्ये युपीए सरकारंच्या काळात अणु करार करीत असताना ते सरकार जाणार की राहणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु त्यावेळी स्वत: माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी अतिशय कठोर अशाप्रकारची भूमिका घेतली. या देशाला खऱ्या अर्थाने आपल्याला पुढे न्यायचे असेल तर खुली अर्थव्यवस्था या धोरणाचा स्वीकार करावा लागेल. त्यावेळी माननीय डॉ.मनमोहन सिंग हे देशाचे अर्थमंत्री होते. काही काळ मला खासदार म्हणून तेथे काम करण्याची संधी मिळाली होती. खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला असताना अनेक देश उद्ध्वस्त झाले. अमेरिका यासारखी महासत्ता अडचणीमध्ये आली. परंतु आपल्या देशाला कोणताही धक्का बसला नाही. अशा पध्दतीने त्यांनी त्या काळामध्ये भूमिका घेतली होती. आताही देशात मोठया प्रमाणात ऊर्जेची गरज आहे. याठिकाणी अणु ऊर्जेपासून प्रदूषण निर्माण होईल असे सांगण्यात आले. आज वेगवेगळया प्रकल्पातून विजेची निर्मिती होते, ते पाहिले तर अणु ऊर्जेशिवाय पर्याय नाही हे संपूर्ण जगाने मान्य केलेले आहे. म्हणूनच जैतापूरचा महत्वाचा प्रकल्प आपल्याकडे आलेला आहे. मी प्रथम या विषयाशी संबंधित असलेली माहिती देण्याचा प्रयत्न करीन आणि शेवटच्या टप्प्यात जैतापूर प्रकल्पाबाबत बोलीन. हा प्रकल्प होत असताना विदर्भातील व कोकणातील लोकप्रतिनिधींना किंवा जनतेला असे वाटू लागले की, राज्यातील राज्यकर्ते जाणीवपूर्वक आपल्या भागात प्रदूषण निर्माण करण्यासाठी नवीन प्रकल्प उभे करतात. मला यानिमित्ताने सर्वांना सांगावयाचे आहे की, अशा प्रकारची युपीए सरकारची भूमिका अजिबात नाही. जे कोणी खाजगी गुंतवणूक करतात, ते सांगतील त्याठिकाणी प्रकल्प उभे करण्यासाठी त्यांना मदत केली जाते. त्यांनी उद्या पश्चिम महाराष्ट्रात प्रकल्प नेण्याचे ठरविले तर तेथेही मदत करण्याची सरकारची भूमिका आहे.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि काही सन्माननीय सदस्य बोलले की, विदर्भातच हे प्रकल्प का घेतले जातात ? एकंदरित विजेची गरज वाढत असताना सुध्दा आपण खाजगी उद्योजकांवर अवलंबून राहिलो होतो. दिनांक 4.4.2005 रोजी सह्याद्री गेस्ट हाऊसवर 12,168 मेगावॅटसाठी एमओयू साईन झाले होते. त्यावेळी मी ऊर्जा मंत्री नव्हतो. त्यावेळी माननीय श्री.अनिल देशमुख किंवा माननीय श्री.बबनराव पाचपुते ऊर्जा मंत्री नव्हते. त्यावेळी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.अजित पवार......

श्री.दिलीपराव वळसे-पाटील हे ऊर्जा मंत्री होते व श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे प्रमुख होते. त्या काळात असे वाटले होते की, 12168 मेगावॅटचा एमओयू झाला असल्यामुळे राज्य 100 टक्के भारनियमनातून मुक्त होईल. एप्रिल, 2011 मध्ये या कराराला आता 6 वर्षे पूर्ण होतील. परंतु केवळ जिंदालचा प्रकल्प कोकणात आला, टाटाचा प्रकल्प आला. त्यातून फक्त 850 मेगावॅट इतकी विजनिर्मिती सुरु झाली आहे. म्हणजे 12,168 मेगावॅट चा करार झालेला असताना फक्त 850 मेगावॅट विजेची निर्मिती होऊ शकली. आज आपण 2010 मध्ये आहोत, परंतु काही दिवसांनी आपण 2011 या वर्षात पदार्पण करणार आहोत. म्हणून सर्वांना असे वाटते की, विजेची निर्मिती मोठया प्रमाणावर झाली पाहिजे. हे सर्व करीत असताना अनेक अडचणी येतात. आवश्यकतेपेक्षा जादा क्षमतेचे वीज प्रकल्प आपल्याला हाती घ्यावे लागतात. परंतु मागील अनुभव लक्षात घेता आपण 8 टक्के सुध्दा विजेची निर्मिती करु शकलो नाही. याठिकाणी हजारो मेगावॅट क्षमतेचे वीज प्रकल्प कशासाठी पाहिजेत असे विचारले गेले. परंतु सन्माननीय सदस्यांनी मागील अनुभव लक्षात घ्यावा. विदर्भातील वीज प्रकल्पाबाबत वर्तमानपत्रात अवास्तव बातम्या आल्या आहेत. येथे अधिवेशन सुरु असताना काही लोक वर्तमानपत्रांना व्यवस्थित माहिती देत असतात. माझे त्याही सहका-यांना विनंती आहे की, कोणत्याही खात्याची माहिती देत असताना त्या विभागाच्या सचिवांना किंवा त्या खात्याच्या मंत्र्यांना तरी विचारले तरी तुम्हाला सत्य माहिती मिळू शकेल. काही दिवसापूर्वी 85 ते 90 विजेचे प्रकल्प विदर्भात येत आहेत अशी बातमी छापून आली होती. त्यातून 55,000 मेगावॅट विजेचे प्रकल्प विदर्भात येणार आहेत असे सातत्याने बोलले जाते. या राज्याचा उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री म्हणून मी सांगतो की, एकूण मिळून विदर्भात 16,680 मेगावॅटचे वीज प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. एकंदरित राज्यात दरवर्षी 8 ते 10 टक्के विजेची मागणी वाढत आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

पुढे येणा-या काळात 1200 वरुन 1500 मे.वॅ. पर्यन्त विजेची मागणी वाढणार आहे. येत्या 5 वर्षामध्ये आपल्याला पाच ते साडेसात हजार मे.वॅ. वीज लागणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जैतापूर प्रकल्पाचा उल्लेख केला. परंतु या प्रकल्पापासून आपल्याला वीज मिळण्यासाठी 2016 साल उजाडणार आहे. ज्यावेळी एन्रॉन प्रकल्प आणला गेला त्यावेळी शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांनी आमच्यावर वाटेल तसे आरोप केले. शिवसेना-भाजप युतीच्या सरकारने आम्ही राज्याला भारनियमन मुक्त करणार असे सांगितले. त्यानंतर आपल्या राज्यात विजेची काय अवस्था आहे हे आपण पहातोय. सभापती महोदय, राज्यकर्ते कुणीही असोत. 15-20 वर्षामध्ये ज्यांच्याकडून चांगले काम होईल त्यांच्या पाठीशी जनता उभी राहील. पण त्या काळामध्ये सातत्याने वीज निर्मिती होत राहिली पाहिजे. या राज्यात येणा-या कोणत्याही प्रकल्पाला, कोणत्याही उद्योजकाला, कोणत्याही नागरिकाला, सर्वसामान्य गरीब माणसाला येथे वीज नाही अशी परिस्थिती या राज्यामध्ये निर्माण होता कामा नये. यासाठी आम्ही लॉंगटर्म नियोजन केलेले आहे. केवळ विदर्भामध्येच वीज प्रकल्प उभारलेले नाहीत. नाशिक येथे इंडिया बुल्सचा प्रोजेक्ट आहे. सोलापूर येथे एनटीपीसीचा प्रोजेक्ट आहे. केन्द्रीय ऊर्जामंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे आणि युपीएच्या प्रमुख श्रीमती सोनिया गांधी यांनी नुकतेच सोलापूर येथे होणा-या 1300 मे.वॅ. वीज प्रकल्पाचे भूमिपूजन केले. म्हणजे पश्चिम महाराष्ट्रामध्येही आम्ही वीज प्रकल्प आणीत आहोत. तो प्रकल्प सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्या मराठवाडा विभागातही देता आला असता. परंतु तो मुद्दाम सोलापूरच्या परिसरामध्ये आणला कारण सोलापूरला विजेची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. नाशिक परिसरात एकलहरे येथे 660 मे.वॅ. विजेचा प्रकल्प घेत आहोत.

आपल्या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि केन्द्रातील विद्यमान मंत्री महोदय श्री. विलासराव देशमुख यांच्या अखत्यारित भेल कंपनी आहे. श्री.सुनील तटकरे हे ऊर्जा विभागाचे मंत्री असताना त्यांनी सांगितले होते की, भेल कंपनी तर्फे 50 टक्के आणि राज्य सरकारची महाजनको कंपनी तर्फे 50 टक्के भागभांडवल उभारुन गॅस उपलब्ध झाला नाही तर कोळशावर आधारित लातूर येथे वीज प्रकल्प उभारण्याच्या बाबतीत स्वाक्षरी झालेली आहे. आम्ही केंद्रीय मंत्री श्री.मुरली देवरा यांना

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

देखील विनंती केलेली आहे. शिवाय केंद्रीय मंत्री श्री.विलासराव देशमुख हे सुध्दा प्रयत्न करीत आहेत. गॅसची लाईन ही मराठवाड्यातून आंध्रप्रदेशमध्ये गेलेली आहे. त्यामुळे गॅसवर आधारित वीज प्रकल्प करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सन्माननीय सदस्य असेही सांगू शकतात की, गॅस आणि कोळशावर आधारित वीज प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रामध्ये का आणले जात नाहीत ? सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये काळा पत्थर आहे. त्याने वीज निर्मिती कशी करणार ? कोयनासारखा प्रकल्प त्याठिकाणी केला. खानदेशामध्ये दोंडाईचा येथे शासनाची जमीन आहे.तेथील जमीन वीज प्रकल्पासाठी देण्यासाठी तेथील काही लोकप्रतिनिधी प्रयत्न करीत आहेत. धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथे 3300 मे.वॅ. क्षमतेचा नवीन वीज प्रकल्प आम्ही घेत आहोत. राज्याच्या अखत्यारितील जे प्रकल्प आहेत ते दुस-या ठिकाणी न जाता ज्या भागामध्ये प्रकल्प नाहीत त्या भागात प्रकल्प घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न यूपीए सरकार करीत आहे. सभापती महोदय, मला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, या प्रकल्पासाठी निधीचा प्रश्न नाही. 20 टक्के राज्य सरकार आणि 80 टक्के वित्तीय संस्थामार्फत निधी उभा केला जाणार आहे. या पध्दतीने विजेचा प्रश्न मार्गी लावण्याचे काम झालेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी चंद्रपूरमधील वीज प्रकल्पांचा उल्लेख करताना ओला कोळसा, चिकट कोळसा, दगडमिश्रित कोळसा यांचा संदर्भ दिला. चंद्रपूरमध्ये विजेचे सात प्रकल्प चालू आहेत. गेल्या वर्षी पाऊस कमी झाल्यामुळे इरई धरणामध्ये पाणी कमी होते. उन्हाळयामध्ये विजेचा एक प्रकल्प तात्पुरता चालू ठेवला तरी चंद्रपूर शहराला पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये म्हणून पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य देऊन तो वीज प्रकल्प बंद ठेवला ..

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 13:40

श्री.अजित पवार......

आणि काय करायचे तर तेथील फ्लॅपची ऊंची वाढविण्याचे काम केले. काही लाख रुपये खर्चून आम्ही ते काम केले. इरई धरणामध्ये 45 दिवसांचा पाणी साठा वाढला आणि आपल्या सर्व संचांना ते पाणी उपयोगी पडेल अशा पध्दतीचे काम आम्ही करुन घेतले आहे. म्हणजे ज्या ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता असेल तेथे अशा पध्दतीचा प्रयत्न करुन जलसंपदा विभागाचा जो काही अनुभव आहे त्याचा उपयोग राज्याच्या भल्याकरिता राज्य सरकारकडून केला जात आहे.

सभापती महोदय, सोफिया प्रकल्पाबद्दल बोलले गेले. अनेक प्रकारची आंदोलने झाली. कोणी कपडे काढतो, कोणी आणखी काय करतो. उद्या एखादा प्रकल्प करायचा म्हटले तर कपडे काढले म्हणून प्रकल्प थांबणार असे कृपा करुन कोणी समजू नये. विचारांची देवाणघेवाण करता येईल. चांगले विचार असतील तर त्यांचा स्वीकार करता येईल. स्थानिक लोकांच्या दृष्टीने प्रदूषण कमी होणार असेल, त्यांना कमी त्रास होणार असेल, मदत होणार असेल तर आम्हाला ती गोष्ट हवी आहे. सोफिया प्रकल्पाबाबत बोलले जाते की, खूप पाणी वापरले जाणार आहे. मला सभागृहाच्या एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे की, राज्यामध्ये 1200 टीएमसी पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी 72 टक्के पाणी आपण सिंचनासाठी देतो आणि उर्वरित 28 टक्के पाणी बिगर सिंचनासाठी म्हणजे पिण्याच्या पाण्याकरिता, उद्योगांकरिता, ऊर्जा प्रकल्पांकरिता अशा वेगवेगळया घटकांसाठी देतो. मी याबाबत संपूर्ण माहिती घेतली. 28 टक्के पाण्यापैकी फक्त 6 टक्के पाणी वापरायचे नाही आणि म्हणायचे की, सगळे पाणी इतर कामासाठी द्यावे तर ते कसे शक्य आहे? त्यामुळे कोणताही विचार केला तरी शेतकऱ्यांना पाणी मिळाले पाहिजे. त्यांना पाण्यापासून वंचित ठेवायचे नाही म्हणून दरवर्षी 8 हजार कोटी रुपयांचे बजेट राज्य सरकार सातत्याने राज्यातील सर्व विभागांना देण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातून हे प्रकल्प उभे करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा हे उद्योगमंत्री असताना त्यांच्याबरोबर ज्यावेळी चर्चा केली त्यावेळी सोफिया प्रकल्पाला तेथील बिगर सिंचनाकरिता जेवढे पाणी आरक्षण केले होते ते पाणी दिले आहे. अमरावती शहरातील खराब पाणी, जे कोणत्याच कारणासाठी वापरता येत नाही अशा पाण्यावर ट्रिटमेंट प्लँट बसवून ते पाणी सोफिया प्रकल्पासाठी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्या भागात एकूण तीन प्रकल्प येणार होते. त्यापैकी एकच प्रकल्प उभारण्याचा आपण निर्णय घेतला आहे. उर्वरित दोन प्रकल्प रद्द केले आहेत. कारण या एकाच

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार......

प्रकल्पातून त्या भागात जी काही विजेची गरज आहे ती भागणार आहे. अनेक प्रकल्प उभारल्यानंतर पाण्याबाबत अडचण होऊ शकते. त्या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीकरिता पाणी मिळाले पाहिजे ही तेथील स्थानिक शेतकऱ्यांची जी मागणी आहे ती मागणी पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने तो निर्णय घेतला आहे ही गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, विदर्भामध्ये 11 जिल्हयांमध्ये मार्च, 2010 पर्यंत जे पेड पेंडिंग अर्ज आहेत त्यांना मार्च, 2011 पर्यंत विजेचे कनेक्शन देण्याचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही परिस्थितीत विदर्भासह या राज्यामध्ये यंदाच्या वर्षी 2 लाख शेती पंपांना जवळपास 3 हजार कोटी रुपये खर्चून आम्ही विजेचे कनेक्शन देणार आहोत. एवढी विजेची मागणी वाढली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी विचारु इच्छितो की, 2 लाख नवीन कनेक्शन दिल्यानंतर मागणी वाढणार नाही का? मागच्या काळात ज्या चुका झाल्या त्या चुका दुरुस्त करायच्या आहेत. पुन्हा अशा चुका होऊच द्यायच्या नाहीत. जेणेकरुन आपल्याला सातत्याने विरोधी पक्षात बसावे लागेल अशी व्यवस्था आम्ही करणार आहोत. एकदा आम्ही प्रश्न सोडविल्यानंतर लोक म्हणतील की, हेच राज्यकर्ते चांगले आहेत. फार तर विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना दिल्लीत पाठवायचा विचार करावा आणि माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना विरोधी पक्षनेता करावे. त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आणि सत्ताधारी बाजूच्या माननीय सदस्यांनी देखील मुंबईतील वीज पुरवठयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. याबद्दल मी एवढेच सांगू इच्छितो की, टाटा, रिलायन्स, बेस्ट आणि महावितरण........

नंतर 2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ........

या चार कंपन्यामार्फत मुंबई आणि मुंबई उपनगराच्या परिसरात वीज पुरवठा केला जातो परंतु त्यांचे दर वेगवेगळे आहेत, या आपल्या मताशी मी सहमत आहे. परंतु आपणा सर्वांनाच माहीत असेल की दर ठरविण्याचे काम एमईआरसीकडे दिलेले आहे. तसेच या कंपन्यांना मिळणारी वीज ही देखील वेगवेगळ्या दरानेच मिळत असते. त्यात टाटाची वीज हैड्रो असल्यामुळे ती स्वस्त आहे. रिलायन्सला तशी वीज अजून तयार करता आली नाही म्हणून बाहेरुन वीज विकत घेऊन उपनगरातील नागरिंकांना वीज पुरवठा करीत आहे. या कंपन्यांचे विजेचे दर वेगवेगळे असले आणि ते एमईआरसी ठरवित असले तरी राज्य शासनाकडे जे अधिकार आहेत ते अजूनही तसेच ठेवलेले आहेत. जानेवारी 2011 मध्ये माननीय मुख्यमंत्री, मी स्वत: तसेच मुंबईतील विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य श्री. गोपाळ शेट्टी, विनोद तावडे आणि सत्ताधारी पक्षातील काही सदस्य, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सन्माननीय सदस्य श्री. बाळा नांदगांवकर यांच्याबरोबर एक बैठक घेण्यात येईल. या बैठकीसाठी टाटा कंपनीचे टॉपचे अधिकारी, रिलायन्स कंपनीचे टॉपचे अधिकारी, बेस्ट हा उपक्रम महापालिकेचा असल्यामुळे तेथे आपलेच आय.ए.एस. अधिकारी एम.डी. असतात त्यांनाही बोलाविण्यात येईल. त्याचबरोबर महावितरणचे अधिकारी यांना चर्चेसाठी बोलावून यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. काही सन्माननीय सदस्यांनी अशीही सूचना केली की, दिल्लीच्या धर्तीवर मुंबईत विजेचा पुरवठा करावा. पण मी प्रामुख्याने असे निदर्शनास आणून देणार आहे की, दिल्लीला सुरुवातीपासून अशी व्यवस्था केलेली असल्याने अडचणी येत नाहीत. मुंबईत तशी व्यवस्था आता करावयाची असेल तर त्यासाठी आपल्याला क्रॉस सबसिडी, म्हणजेच श्रीमंतांकडून जास्त पैसे घ्यायचे आणि गरिबांना, जे 0 ते 300 युनिटपर्यंत वीज वापरतात अशा ग्राहकांना मदत झाली पाहिजे अशी व्यवस्था करावी लागेल. या सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे व तसे प्रयत्न शासनाच्या पातळीवर चालू आहेत. म्हणून 2011 जानेवारी मध्ये या राज्याच्या नवीन मुख्यमंत्र्यांबरोबर ही बैठक घेण्यात येईल व वेळ पडली तर एमईआरसीच्या चेअरमनशी देखील वेगळे बोलावून चर्चा केली जाईल. तसेच यासंदर्भात एमईआरसी जरी स्वतंत्र निर्णय घेत असली तरी राज्यशासनाचे जे अधिकार राखून ठेवलेले आहेत त्यांचा वापर करण्याची भूमिका घ्यावी लागली तरी शासन घेणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे मला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ..........

विमानात भेटले असता ते सुरुवातीला सांगत होते की, दादा जरा मवाळ भूमिका घ्यावी, म्हणून मी जर मऊ बोलत आहे.

महोदय, सभागृहात मुळा-प्रवरा या सहकारी संस्थेकडे असलेल्या थकबाकीबद्दल विचारणा करण्यात आली. या संस्थेकडे 2 हजार कोटीची थकबाकी असून जनमानसात अशा प्रकारचा भ्रम आहे की, शेतकऱ्यांची 5 हजाराची थकबाकी असली तरी त्यांची कनेक्शन्स कट करण्यात येतात आणि मुळा-प्रवरा सारख्या साडेतीन तालुक्यासाठी असलेल्या संस्थेकडे मात्र शासन दुर्लक्ष कशासाठी करीत आहे ? विरोधी पक्षाची देखील अशी मानसिकता तयार झालेली आहे की, या संस्थेला शासन पाठीशी घालत आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, शासन या संस्थेला पाठीशी घालणार नाही तर ऊर्जा खात्याचा मंत्री या नात्याने माझी स्वत:ची भूमिका अशी आहे की, राज्यातील बाकी सगळ्या ठिकाणी जो न्याय असेल तोच न्याय या साडेतीन तालुक्यांनाही दिला पाहिजे, त्या संस्थेला वेगळे अस्तित्व कशाला, कदाचित एखादे चांगले काही केले असते तर वेगळे अस्तित्व समजू शकलो असतो परंतु बाकी वाढवित जायची आणि शासन मदत करीत नाही, शासन भेदभाव करते असे म्हणायचे, हे यापुढे चालणार नाही. म्हणून सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असलेल्या या महाराष्ट्रात, तसेच स्व. यशवंतराव चव्हाण यांनी मंगल कलश आणलेल्या महाराष्ट्रात असे होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी वेगळ्या कोकण राज्याची देखील सभागृहात मागणी केली. हे सगळे सोपे वाटत असेल तर तो बोलाचा भात आणि बोलाचीच कढी अशातला हा प्रकार होईल. बहुतांशी जनतेलाही असेच वाटते की, एकत्र राहूनच राज्याचे भले झाले पाहिजे. म्हणून मुळा-प्रवरा सारख्या संस्थेकडून थकित रक्कम वसूल करीत असताना त्यांचा परवाना रद्द करण्यासंसबंधीचा प्रस्ताव महावितरण कंपनीला दिलेला असून आजच त्यावरील हिअरिंग होणार आहे. त्यासंदर्भात विचार करुन ती संस्था आपल्या ताब्यात घ्यावी आणि तेथे जे इन्फ्रास्ट्रक्चर आहे ते 2000 कोटीतून वजा करुन बाकीच्या रकमेबाबत काय करायचे यासंबंधीचा निर्णय शासन किंवा मंत्रिमंडळाकडून घेतला जाईल.

यानतरश्री. जुन्नरे ....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

परंतु मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मुळा-प्रवरा या संस्थेत चुकीची कामे झाले असतील किंवा चुकीच्या गोष्टी घडल्या असतील तर त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका राज्य सरकारची व ऊर्जा विभागाची राहणार नाही. यासंदर्भात एमईआरसीने निर्णय दिल्यानंतर आपल्याला पुढील विषय हाताळता येईल.

सभापती महोदय, आपल्याकडे 29 लक्ष कृषी पंप धारक शेतकरी असून त्यातील 23 लक्ष कृषी पंप धारक शेतक-यांकडे 5,600 कोटी रुपयांची थकबाकी आहे. शासन शेतक-यांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करीत असते. अवकाळी पावसाने बाधित झालेल्या शेतक-यांचे वीज कनेक्शन्स डिसेंबर ते मार्च महिन्यापर्यंत तोडावयाचे नाही असा निर्णय झालेला असून अशांचे वीज कनेक्शन तोडले गेले असेल तर ते जोडले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या दरम्यानच्या काळात शेतक-यांनी एखादे पीक काढावे आणि त्यातून दोन पैसे मिळवावेत ही त्यामागची शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, वीज बील भरणा करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. जे शेतकरी अवकाळी पावसाने बाधित झालेले आहेत व असे असतांना त्यांचे वीज कनेक्शन्स तोडले गेले असतील तर अशा शेतक-यांची नावे आपण माझ्याकडे दिली तर अशा बाधित शेतक-यांची वीज कनेक्शन्स जोडून दिली जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. परंतु या निर्णयाचा फायदा जे शेतकरी बाधित नाहीत त्यांनी घेता कामा नये, त्यांनी वीज बील वेळेवर भरले पाहिजे. कारण विजेसाठी आपल्याला चांगला कोळसा खरेदी करावा लागतो, कधी कधी परदेशातून सुध्दा तो आयात करावा लागतो त्यामुळे या बाबींकडे सन्माननीय सदस्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महावितरणच्या लॉसेसच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, लॉसेस कमी करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, विजेच्या संदर्भात शासनाने तीन कंपन्या केल्या परंतु त्याचा काय फायदा झाला ? तीन कंपन्या केल्यामुळे आपल्याला चांगला फायदा झालेला आहे. सन 2005-06 मध्ये विजेच्या गळतीचे प्रमाण 31.72 टक्के

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

होते, सन 2006-07 मध्ये ते 29.5 टक्क्यावर आणले गेले व सन 2007-08 मध्ये ते 24 टक्क्यावर आणले गेले. सन 2008-09 लॉसेस 22 टक्क्यावर आणले गेले व सन 2009-10 मध्ये 20.5 टक्क्यापर्यंत आणले गेले, सन 2010-11 च्या जून महिन्यांपर्यंत ते 17 टक्क्यावर आणले गेले आहेत. गेल्या 5-6 वर्षात आम्ही वीजेचे लॉसेस कमी कमी करत आलेलो आहेत. हे लॉसेस अजून कमी होण्याची आवश्यकता आहे. चांगले काम करण्याची भूमिका महावितरण कंपनीची राहणार आहे. लॉसेस कमी करण्याबाबत काही कार्यक्रम आम्ही हातामध्ये घेतले आहेत. गावठाण फिडर सेप्रेशनमध्ये 3900 गावांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून लवकरच गावठाण फिडर सेप्रेशनचे काम पूर्ण केले जाईल. सिंगल फेजींगमध्ये वाडया-पाडयांसाठी योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. एमईआरसीची यासंदर्भात परवानगी घ्यावी लागते व त्यामुळे एमईआरसीने परवानगी दिल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

सभापती महोदय, औद्योगिक ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी एक्सप्रेस फिडर द्वारे अखंडित वीज पुरवठा करण्यात येईल. औद्योगिक ग्राहकांना सातही दिवस, 24 तास वीज पुरवठा देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. एमआयडीसीमध्ये आठवडयातून 16 तासाचे भारनियमन असते. परंतु टप्प्या टप्प्याने ते कमी केले जाईल. उद्योग धंद्याना चालना देऊन आमच्या सुशिक्षीत बेरोजगारांना उद्योग कसा देता येईल ही राज्य सरकारची भूमिका राहणार आहे. औद्योगिक वसाहतीमध्ये काही तासांचेच भारनियमन ठेवण्यात आलेले आहे. इन्फ्रास्ट्रक्चर्सची जी कामे केली आहेत त्यामध्ये 586 नवीन सबस्टेशन्स आम्हाला करावयाचे होते, परंतु त्यापैकी 418 नवीन सबस्टेशन्स करण्यात आलेले आहेत. सबस्टेशनचे जे टारगेट पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. ट्रान्स्फॉर्मर्सचे 400 चे उद्दिष्ट होते त्यापैकी आम्ही 241 चे उद्दिष्ट साध्य केलेले असून राहिलेले उद्दिष्ट लवकरच साध्य केले जाईल. 382 ट्रान्सफॉमर्स आम्हाला सुरु करावयाचे होते त्यापैकी आम्ही 316 सुरु केलेले आहेत. 58,629 नवीन ट्रान्स्फॉर्मर्सचे उद्दिष्ट होते परंतु त्यापैकी आम्ही 27,085 ट्रान्स्फॉर्मर्स दिलेले आहेत. या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी ट्रान्स्फॉर्मर्सच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. ट्रान्स्फॉर्मर्सचे खराब होण्याचे प्रमाण मागच्या तुलनेने ब-याच प्रमाणात कमी झालेले आहे हे या निमिताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.......

शेतकरी मोठ्या प्रमाणावर आकडे टाकून वीज चोरत होते म्हणून आम्ही त्यांना सांगितले की, आपणास ताबडतोब विजेचे कनेक्शन देण्यात येईल आणि हा आपला कार्यक्रम लोकप्रिय झाला. मला काही सन्माननीय सदस्यांनी पत्र लिहून कळविले आहे की, या योजनेस मुदतवाढ द्यावी. मी त्यांना सांगू इच्छितो की,आम्ही मुदत वाढीचा विचार करीत आहोत.

सभापती महोदय, आम्ही सिंगल फेजिंगचा कार्यक्रम घेतला. त्यामध्ये एकूण 1186 वाहिन्या टाकून 8055 गावांचे काम पूर्ण केले. त्यासाठी 235 कोटी रुपये खर्च केले. दुसऱ्या टप्प्यामध्ये 221 कोटी रुपयांच्या 768 वाहिन्या टाकणार असून त्यामध्ये 3877 गावे घेण्यात येतील. तिसऱ्या टप्प्याचा खर्च 205 कोटी रुपये असून त्यामध्ये 1536 गावे समाविष्ट आहेत. त्यामध्ये एकूण 1315 वाड्या वस्त्या आहेत. उर्वरित कामे फेब्रुवारी 2011 पर्यंत पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी त्यांच्या भाषणात कोकण पॅकेजचा उल्लेख केला. सन 2009-10, 2010-2011 मध्ये जेवढा नियतव्यय द्यावयास पाहिजे तेवढा देता आला नाही ही गोष्ट मी कबूल करतो. मी त्यांना सांगू इच्छितो की, आता ऊर्जा विभागाचा कार्यभार माझ्याकडे आहे. कोकणाला जेवढे जास्तीचे देता येईल तेवढे देण्याचा आमचा प्रयत्न राहील. कोकणातील जनता आपल्याला विसरतील एवढे आम्ही देण्याचा प्रयत्न करणार आहोत...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे कोकणातील आहेत आणि त्यांच्यावर हा अन्याय आहे. म्हणजे श्री.सुनील तटकरे यांनी केले नाही ते मी करुन दाखवितो असे माननीय उपमुख्यमंत्री यांना म्हणावयाचे आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माझ्याकडे जलसंपदा विभाग असताना मला जे जमले नाही ते करण्यासाठी श्री.सुनील तटकरे यांच्याकडे त्या विभागाचा कार्यभार दिलेला आहे आणि त्यांच्याकडे वित्त विभाग असताना त्यांनी जे केले नाही ते करण्याचा मी प्रयत्न करणार आहे...

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ज्यांनी कोकण पॅकेजची घोषणा करुन त्यावर मते घेऊन निवडून आले, त्यांनी पॅकेजची अंमलबजावणी केली नाही. त्यांच्यावर माननीय उपमुख्यमंत्री कोणती कारवाई करणार आहेत ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, शिल्लक निधी द्यायचे राहून द्या, आम्ही हा निधी न देता 1 लाख कोटी रुपयांचा जैतापूरचा प्रकल्प कोकणासाठी दिला. एक लाख कोटी राज्याचे बजेट तरी आहे काय ? आपले 37 हजार कोटी रुपयांचे बजेट असताना आपण 1 लाख कोटी रुपयांचा प्रकल्प घेत आहोत. असे असताना आपण आम्हाला डोक्यावर घेतले पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, निवडणुकीच्या तोंडावर पॅकेज देण्याची घोषणा करण्यात आली,परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. पॅकेजची घोषणा करुन फक्त मते मिळविली.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, जनतेने आम्हाला पाच वर्षाकरिता निवडून दिलेले आहे. या कालावधीच्या आत पॅकेजचे पैसे देण्यात येतील, शिवाय काही अधिकचे देण्याचा आमचा 100 टक्के प्रयत्न राहील, हा शब्द मी आजच्या चर्चेच्या माध्यमातून कोकणवासियांना देतो.

सभापती महोदय, मी पायाभूत आराखड्याच्या संदर्भातील माहिती दिली. तसेच नवीन सब स्टेशन्सची देखील माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस व सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी चंद्रपूर येथील ओल्या कोळशासंबंधी मुद्दे मांडले. खरे म्हणजे पावसाळ्यामध्ये वीज निर्मितीवर परिणाम झाला. हा परिणाम होऊ नये म्हणून मी स्वत: चंद्रपूरला गेलो होतो. तसेच खापरखेडा, कोराडी येथील वीज प्रकल्पांना भेटी दिल्या होत्या. माझ्यासोबत सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे देखील होते. तसेच सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख हे सुध्दा उपस्थित होते. मी त्याठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन काही गोष्टी समजून घेतल्या. ज्या गोष्टी अडचणीच्या आहेत त्या दुरुस्त करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, राज्यात जे काही वीज प्रकल्प झाले त्यास 39 वर्षे झालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी परळी वीज प्रकल्पाचा मुद्दा उपस्थित केला. आम्ही पहिल्या टप्प्यामध्ये परळीचा एक प्लान्ट, त्याच बरोबर भुसावळ व पारसचा एक प्लान्ट जे अतिशय

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:55

श्री.अजित पवार.......

जुने झाालेले आहेत. जे आज पूर्ण क्षमतेने चालत नाहीत. त्या प्लान्टमध्ये कोळसा जास्त टाकावा लागतो व त्याप्रमाणात वीज निर्मिती होत नाही. त्या प्रकल्पांचे आयुष्य संपलेले आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीला 50 वर्षे पूर्ण झाली आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी विचारले की, आपण किती वीज प्रकल्प करणार आहात ? पहिल्या राज्यकर्त्यांनी केलेले प्रकल्प हळूहळू आपणास बंद करुन तेथे नवीन प्रकल्प घ्यावे लागणार आहेत. काही प्रकल्पांचे नूतनीकरण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. चंद्रपूरच्या 1 आणि 2 प्रकल्पास 26-27 वर्षे झालेली आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ MMP/ प्रथम श्री.शिगम 14.00

श्री.अजित पवार ...

त्या संचाची क्षमता 160 मेगॅवॅट इतकी आहे ती 210 मेगॅवॅट करावयाची आहे. कोराडी येथील 6 नंबरच्या संचाची क्षमता 160 मेगॅवॅटची आहे ती 210मेगॅवॅट करावयाची आहे. त्याचबरोबर नाशिकच्या संचाची क्षमता 180 मेगॅवॅट असून ती क्षमता 210 करावयाची आहे.परळीच्या संच तीनच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे त्याला आता तीन वर्षे होऊन गेली आहेत त्याची क्षमता 180 मेगॅवॅट आहे ती 210 मेगॅवॅट करावयाची आहे.भुसावळच्या दोन नंबरच्या संचाची क्षमता 170 मेगॅवॅटची असून ती क्षमता 210 करावयाची आहे.या सगळया प्रकल्पातून एक हजार मेगॅवॅट वीज निर्मिती होत आहे. त्या ऐवजी 1260 मेगॅवॅटपर्यत वीज निर्मिती करावयाची आहे. त्याचबरोबर या प्रकल्पाचे वयोमानसुध्दा वाढले पाहिजे यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत. या प्रकल्पाचे नूतनीकरण करावयाचे म्हटले तर त्याला आठ महिने लागतात परंतु नवीन प्रकल्प उभा करण्यासाठी तीन ते चार वर्षे लागतात.त्याचबरोबर तेथील प्रकल्पग्रस्तांचे , त्यांच्या नोकरीचे अनेक महत्वाचे मुद्दे निर्माण होत असतात त्यामुळे या कामाकडे लक्ष द्यावयाचे असून त्याकरिता 2200 ते 2300 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत आणि 1260 मेगॅवॅट एवढी नवीन वीज निर्मिती करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पे बॅक पिरिअड दहा वर्षाचा आहे आणि प्रत्येक मेगॅवॅटसाठी दोन कोटी रुपये खर्च येत असतो आणि नवीन प्रकल्पातून वीज निर्मिती करीत असतांना प्रत्येक मेगॅवॅटसाठी 5 ते 6 कोटी रुपये खर्च येत असतो.परंतु हा सुध्दा एक काटकसरीचा मार्ग महाजनकोने स्वीकारलेला आहे. गेल्या काही वर्षाचा अनुभव लक्षात घेता ज्या काही गोष्टी करता येणे शक्य आहे त्या गोष्टी करण्याचा किंवा नवीन जे तंत्रज्ञान विकसित झालेले आहे त्याचा वापर करण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी असे सांगितले की, टॉवर उभा करीत असतांना शेतक-यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला जात नाही. त्यांनी सागितलेली ही गोष्ट मी मान्य करतो.गेली कित्येक वर्षे तशा प्रकारचा मोबदला दिला जात नव्हता परंतु ज्यावेळी ही बाब शासनाच्या निदर्शनास आली होती त्यावेळी 1.11.2010 रोजी असा निर्णय घेतला की, महापारेषण, महावितरण, महानिर्मिती या कंपन्याकरिता शासनाने उभे केलेले टॉवर्स असले किंवा खाजगी कंपन्याकरिता उभे केलेले टॉवर्स असले तरी त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे पैसे दिले जात नव्हते पंरतु आता रेडीरेकनर प्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ...

पैसे दिले जात असून कोरडवाहू जमीन असो, ओलिताखालील जमीन असो किंवा बिगर शेतीची जमीन असो तर त्याकरता पैसे देण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घेतला आहे.त्यामुळे काही प्रमाणात शेतक-यांना मदत करणारा हा निर्णय आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : टॉवर्सच्या जागेसंबंधी शेतक-यांना मदत करण्यासंबंधीचा निर्णय शासनाने गेल्या महिन्यात घेतलेला आहे. अशा प्रकरणामध्ये निगोशिएशनव्दारे प्रयत्न केला तर अधिक बरे होईल असे मला वाटते. बरेच वेळा प्रकल्प उभे राहतात त्यावेळी आजूबाजूची शेती वाढीव दराने खरेदी केलेली असते परंतु टॉवर्स बांधतांना तशी परिस्थिती राहत नाही.त्यामुळे अत्यंत अल्प किंमत शेतक-यांना द्यावी लागते म्हणूनच निगोशिएशन पध्दतीने जर प्रयत्न केला तर जमीन लवकर मिळेल आणि शेतक-यांना थोडा अधिक लाभ मिळेल तेव्हा या दृष्टीने शासनाने विचार करावा.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन . सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी वेस्टर्न कोल फिल्ड कंपनीच्या कोल माईनमध्ये सध्या ई आणि एफ ग्रेडचा कोळसा उपलब्ध असून डी ग्रेडचा कोळसा अत्यल्प उपलब्ध आहे. त्याच बरोबर कोळश्याची प्रत सुधारण्यात यावी असे सांगितलेले आहे. आता त्या प्रकल्पासाठी धुतलेला आणि आयात केलेला कोळसा वापरला जात आहे.अशा प्रकारचा कोळसा वापरल्यानंतर त्याचे रिझल्टस नक्कीच चांगले येतील असा अनुभव आम्हा सर्वांना आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांना मी सांगू इच्छितो की, परळी औष्णिक विद्युत केद्र संच क्रमांक सहाची क्षमता 250 मेगॅवेट होती तो संच काही काळा करिता नादुरुस्त होता परंतु त्याची मे. व्हेग यांच्याकडून दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे व तो संच पूर्ण क्षमतेने आज सुरु झालेला आहे. नवीन प्रकल्प उभा करीत असतांना मशिनरीच्या संदर्भात काही वेगळया प्रकाराची गोष्ट घडली असेल परंतु 85 टक्के् क्षमतेने तो प्रकल्प सुरु आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी इंधन अधिभार,वीज दर आणि कोळश्याच्या दरात झालेली वाढ लक्षात घ्यावी असे सांगितले आहे अधिभार लावण्यात येतो हे सर्वांनाच माहीत आहे. हा अधिभार दर महिन्याला कमीजास्त होत असतो.नागपूर शहरामध्ये डिसेंबर 2009 पासून शून्य भारनियमन अंमलात आणले आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ D/ KTG/ MMP/ 14.00

श्री.अजित पवार ...

एमईआरसीने सुध्दा शासनाला 6 रुपये 50 प्रती युनिटने जास्त वीज विकत घेण्याची परवानगी दिली आहे. त्याचबरोबर शून्य भार नियमनासाठी डिसेंबर 2009 ते एप्रिल 2010 पर्यत जास्तीचे पैसे एमईआरसीच्या आदेशाप्रमाणे वसूल करण्यात आले होते .परंतु एप्रिल नंतर ही खरेदी जास्त योग्य पध्दतीने केलेली असल्यामुळे शून्य भारनियमनाचे जास्तीचे पैसे परत करण्यात येत आहेत.

नंतर श्री.सरफरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

म्हणजे त्या ठिकाणी सुध्दा आम्ही ग्राहकांच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला आहे. त्यांनी ट्रान्सफॉर्मर्सचा मुद्दा मांडला होता. एनर्जी ऑडिटसाठी मीटर लावण्यात आले आहेत. गेल्या वर्षीपासून सर्व ट्रान्सफॉर्मर्सवर एनर्जी ऑडिटसाठी मीटर लावल्याशिवाय वीज पुरवठा सुरु करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी सुध्दा सर्व ट्रान्सफॉर्मर्सवर एनर्जी ऑडिट व्हावे म्हणून मीटर लावण्याचे काम प्रगतिपथावर आहे. अशाप्रकारे या राज्यातील विजेचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, कोकणाच्या बाबतीत अनेक माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला की, कोकणामध्ये आपण किती वीज निर्मिती करीत आहात असे त्यांनी विचारले. आता रत्नागिरीच्या जयगड येथे जेएसडब्लूचा प्रकल्प आहे, त्या ठिकाणी खाजगीकरणातून 1200 मेगावॅट इतकी विजेची निर्मिती आम्ही करीत आहोत. त्याचप्रमाणे अलिबाग येथे पाटनी एनर्जी, मेढेकर याठिकाणी 135 मेगावॅटचे दोन प्रकल्प आम्ही करीत आहोत. त्याचप्रमाणे फिनोलेक्स इन्फ्रास्ट्रक्चरचे 1000 मेगावॅटचे प्रकल्प आणि पायोनियर गॅस लिमिटेड या कंपनीचा माणगाव, जिल्हा रायगड येथे 200 मेगावॅटचा प्रकल्प करीत आहोत. अशाप्रकारे 2670 मेगावॅटचे प्रकल्प करीत आहोत. त्याचप्रमाणे गुहागर येथील धोपावे या ठिकाणी 603 मेगावॅटचा प्रकल्प करावयाचा आहे. सध्या दाभोळ येथे 1940 मेगावॅट इतकी वीज तयार होत आहे. तसेच, जेएसडब्लूमध्ये 300 मेगावॅट वीज निर्माण होत आहे आणि विस्तारीत प्रकल्पामधून 2000 मेगावॅट वीज निर्माण होत आहे. अशाप्रकारे सर्व मिळून 6650 मेगावॅट वीज या प्रकल्पामधून तयार होणार आहे. याशिवाय जैतापूरच्या प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज वेगळी आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना व माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांना असे सांगावयाचे आहे की, महाराष्ट्राचा रिजनल टाऊन प्लॅन नोटिफाय करण्यासंबंधी नगर विकास विभागाने एक आदेश काढला होता. दिनांक 2 जून 1995 रोजी ही अधिकृत अधिसूचना काढण्यात आली. त्यावेळी आपले कोकणातील माननीय श्री. मनोहर जोशी हे या राज्याचे मुख्यमंत्री होते. माननीय श्री.गोपीनाथराव मुंडे हे उप मुख्यमंत्री होते. त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी जैतापूरच्या परिसरामध्ये 2000 हेक्टर क्षेत्र आरक्षित करण्याचा निर्णय घेतला. रत्नागिरी-सिंधुदुर्ग प्रादेशिक योजना मंजूर झाल्यावर बंदरांचा विकास, नैसर्गिक वायूची उपलब्धता, वायू आणि आण्विक

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

शक्तिवर चालणाऱ्या वीज केंद्रामधून मिळणारी वाढीव ऊर्जा आणि कोकण रेल्वे मार्गाचे बांधकाम इत्यादी बाबी विचारात घेता औद्योगिक विकासासाठी निश्चित गती मिळेल याआधारे उद्योग विभागाने औद्योगिक विकासासाठी लागणाऱ्या प्रस्तावित क्षेत्राचा अंदाज त्याठिकाणी दिला. त्या काळात त्या सरकारने 7425 हेक्टर एवढे क्षेत्र आरक्षित करण्याचा निर्णय घेतला होता. हा आपला निर्णय असल्यामुळे या प्रकल्पाची सुरुवात आम्ही केली आहे असे आपण लोकांना कां सांगत नाही? तुमच्याच काळात जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात अधिसूचना काढण्यात आली आहे हे राज्यातील जनतेला कदाचित माहीत नसावे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांसाठी ज्या काही वेगवेगळया गोष्टी करण्यात आल्या आहेत त्यामध्ये 2 जून 1995 च्या अधिसूचनेव्दारे दोन जिल्हयातील 16 ठिकाणे नमूद करुन त्याठिकाणी आरक्षित क्षेत्रासाठी जागा विहित करण्यात आली. त्यामध्ये जैतापूर आणि सभोवतालच्या परिसरातील 5 हजार एकर एवढी जागा औद्योगिक क्षेत्रासाठी आरक्षित करण्यात आली. औद्योगिक क्षेत्र वाढवितांना नैसर्गिक वायूची उपलब्धता, वायू आणि आण्विक शक्तिवर चालणाऱ्या वीज केंद्रातून मिळणारी वाढीव ऊर्जा या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत. सभापती महोदय, ही कागदपत्रे मी झाकून ठेवू शकत नाही. म्हणजे युती सरकारच्या काळात रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयाच्या परिसरामध्ये संतुलित आणि योग्य औद्योगिक विकासासाठी वायू आणि अणुवरील वीज प्रकल्प विचारात घेऊन जैतापूर येथे 2 हजार हेक्टर एवढे क्षेत्र त्याठिकाणी आरक्षित करण्यात आले.

सभापती महोदय, तसे पाहिले तर आज ही इतिहासाची पुनरावृत्ती आहे. एन्रॉन प्रकल्पाच्या संदर्भात "वाटा कुणाला घाटा कुणाला" वगैरे म्हटले जात होते. त्यावेळी आम्ही सुध्दा सभासद होतो. त्या काळात राज्यात एवढे वातावरण तयार करण्यात आले होते की, आम्ही राज्यातील जनतेचे पार वाटोळे करुन टाकले आहे. त्या काळात राज्याचे प्रमुख या नात्याने माननीय श्री. शरद पवार साहेब सांगत होते. त्याप्रमाणे स्व. यशवंतराव चव्हाण, स्व. वसंतदादा पाटील तसेच स्व. वसंतरावराव नाईक, आदरणीय श्री. पवार साहेब..........

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

या सगळयांनी या राज्यामध्ये विजेच्या बाबतीत सतत स्वंयपूर्ण ठेवले. म्हणूनच आपण गोव्याला तसेच जवळच्या राज्यांना वीज देत होतो. नतरच्या काळात ती घडी बिघडली. भाजप, शिवसनेच्या सरकारपासून ती घडी बिघडली. त्यावेळच्या विरोधी पक्षाने सांगितले की, एन्रॉनमध्ये भ्रष्टाचार झाला आहे म्हणून आम्ही तो प्रकल्प अरबी समुद्रात बुडवू. पण त्यानंतर पुन्हा काय झाले? रिबेका मार्क कोणाला भेटल्या आणि काय केले कोणाला माहीत. सगळे अंडरस्टँडिग झाले की स्टँडिग झाले.(श्री रामदास कदम बोलण्यासाठी उभे असतात) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम बोलत होते त्यावेळी सत्ताधारी पक्षातील एकाही सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात अडथळा निर्माण केलेला नाही. त्यांनी जे भाषण केले ते आम्ही ऐकले आहे. त्याप्रमाणे माझे भाषण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी बोलावे, त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. परंतु माझे भाषण आधी ऐकून घ्यावे त्यानंतर त्यामध्ये काही चुकीचे असेल तर ते कामकाजातून काढण्याच्या संदर्भात माननीय सभापतींना सांगावे. सभापती महोदय, मी माझी भूमिका सभागृहासमोर ठेवीत आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी अडथळा आणू नये अशी माझी विनंती आहे.

श्री. रामदास कदम : आपले भाषण संपल्यानंतर मला बोलण्याची संधी द्यायला सांगा.

श्री. अजित पवार : तो माननीय सभापतींचा अधिकार आहे. त्याबद्दल मला सांगता येणार नाही.

सभापती महोदय, त्या काळात जी भाषणे झाली त्यापैकी सन्माननीय श्री. मनोहर जोशी, श्री. गोपिनाथ मुंडे, तसेच श्री. शरद पवार यांची भाषणे माझ्याकडे आहेत. त्यावेळी खूप काही चुकीचे चालले आहे अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्यात आले होते. त्याही काळात असेच सांगण्यात आले होते की, एन्रॉन आल्यानंतर आंबा पिकणार नाही, काजू पिकणार नाही, सुपारीच्या बाबा उद्ध्वस्त होतील. नारळाच्या बागा उद्ध्वस्त होतील. तेथील नैसर्गिक सौंदर्य अडचणीत येईल. त्या ठिकाणचे मासे मरतील. सगळे वाटोळेच होईल. बाकी काही होणारच नाही. सभापती महोदय, आज अनेक वर्षापासून दाभोळचा प्रकल्प सुरु आहे. आज त्या ठिकाणी 1960 मेगॅवॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे. आजही त्याठिकाणी ॲडिशनल 2000 मेगॅवॅट वीज निर्मिती करण्या इतपत जागा आहे. पण तेथील मासे मेलेले नाहीत. मासे खराब झालेले नाहीत. उलट मच्छिमार चांगल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

पध्दतीने मच्छिमारी करीत आहेत. आंब्याच्या बागा चांगल्या आहेत. काजूच्या बागा, सुपारीच्या बागा, नारळाच्या बागा चांगल्या आहेत. एखादा प्रकल्प येत असताना विकासाच्या बाबतीत आपली भूमिका ठेवली पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब आपल्या पक्षाचे गुजराथमध्ये सरकार आहे. पश्चिम बंगालच्या लोकांनी वेडेपणा केला आणि तेथील नॅनोचा प्रकल्प बंद केला. त्यामुळे गुजराथचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी गुजराथमध्ये या प्रकल्पासाठी जागा दिली आणि तो प्रकल्प गुजराथमध्ये आणला त्यामुळे आज तेथील तरुणांच्या हाताला काम मिळाले आहे. याचा विचार आपण कधी करणार आहोत काय? महाराष्ट्र राज्याला आज आपण कुठल्या पध्दतीने पुढे घेऊन जात आहोत. चुकीच्या पध्दतीने राज्याला पुढे न्यावयाचे आहे काय? मागचा अनुभव लक्षात घेतला पाहिजे. सभापती महोदय, तत्कालीन सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की, जेव्हा कोयना धरण झाले त्यावेळी कोयना धरणातील पाण्यातून वीज तयार केल्यानंतर जे पाणी नदीत सोडण्यात आले ते पाणी शेतकरी घेत नव्हते. का तर म्हणे या पाण्यातील जीव काढलेला आहे. हे पाणी दिले तर पीक येणार नाही, अशी त्या काळातील शेतकऱ्यांची मानसिकता झाली होती. आता तेथील शेतकरी मोठया प्रमाणात पीक घेत आहेत. पण सुरुवातीच्या काळात तेथील शेतकऱ्यांचा या धरणाला विरोध होता.

सभापती महोदय, मी सातारा जिल्हयाचा पालक मंत्री असताना सन्माननीय मंत्रिमहोदय, डॉ. पतंगराव कदम, श्री. जयंत पाटील, तसेच सातारा जिल्हयातील नवीन आमदार सन्माननीय श्री. प्रभाकर घाडगे येथे बसलेले आहेत. सभापती महोदय, त्या काळामध्ये आम्ही सातारा जिल्हयात पवन चक्क्या उभ्या केल्या. खरे तर पवन चक्क्यांचे धोरण सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम त्यांच्या युती सरकारच्या काळातच आले. राज्य सरकार शिवसेना-भाजपचे असताना त्यांनी साताऱ्यामध्ये पवन ऊर्जा निर्माण करण्याकरिता जागा दिली. त्यांना वेगवेगळया सवलती दिल्या. तो निर्णय चांगला होता. मी त्यावर टीका करीत नाही. जे चांगले केले त्याला मी चांगलेच म्हणणार. युती शासनाने चांगला निर्णय घेतला होता. वाऱ्या पासून वीज निर्मिती करण्याच्या साईट त्या ठिकाणी उपलब्ध होत्या त्यामुळे तेथे वीज निर्मिती करायला सुरुवात केली. त्यानंतर राज्यात आघाडी सरकार आले. त्यानंतर काही लोकांनी असे म्हणायला सुरुवात केली की, पवन चक्क्या आल्या आणि समुद्राचे कोकणातून वर येणारे वारे पश्चिम महाराष्ट्रात अडले गेले आणि पाऊस

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

थांबला. पवन चक्क्यांच्या पंख्यानी ढग थांबले असे म्हटले जात होते. त्यानंतर तेथील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये या करिता त्या ठिकाणी बंदोबस्त द्यावा लागला. काही वेगळे लोक चुकीच्या लोकांचे ऐकून आपली स्वत:ची मते बदलतात. असे लोक या पवन चक्क्या तोडायला निघाले होते. त्यानंतर पावसाचे जे नैसर्गिक संकट होते ते गेले. आता तेथे धो-धो पाऊस पडत आहे. त्यामुळे पवन चक्क्यांमुळे पाऊस पडत नाही, ही चुकीची कल्पना लोकांच्या मनातून निघून गेली.

सभापती महोदय, हीच गोष्ट दाभोळच्या बाबतीत घडली पाहिजे. दाभोळ प्रकल्पामुळे अमुक अशा प्रकारचे नुकसान झालेले आहे त्याच पध्दतीने जैतापूर येथील प्रकल्पामुळे नुकसान होईल, अशा प्रकारे दाभोळ प्रकल्पाचे उदाहरण आपण का देत नाही? उलट दाभोळ प्रकल्पामुळे तेथील सगळया परिसरातील स्थानिक लोकांना रोजगार मिळाला आहे. आपण सगळेजण कोकणातून येऊन मुंबईमध्ये प्रतिनिधित्व करता.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

मुंबईमध्ये कोकणवासीयांनी काय केले ? त्यांनी चाकरमानी म्हणून काम केले. कोकणवासीयांना असे का वाटत नाही की, मुंबईमध्ये जाऊन कोणाच्या तरी घरादारामध्ये काम करण्यापेक्षा आपल्या कोकणामध्येच मोठ्या प्रमाणावर उद्योगांची निर्मिती करु. असे आपल्याला का वाटत नाही ? आम्ही कोकणचा कायापालट करण्यासाठी फलोद्यानची योजना दिली. त्याकरिता कॅलिफोर्नियाचे उदाहरण दिले. त्यामुळे आज कोकणामध्ये आंबा दिसतो, काजू दिसतात, नारळ दिसतात, सुपारीच्या बागा दिसतात. तेथील कातळामध्ये ब्लास्ट करण्याची परवानगी नव्हती. मी फलोद्यान मंत्री असताना त्या ठिकाणी खड्डे घेण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने परवानगी दिली.

सभापती महोदय, बंदरांचा विकास झाला पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. तिसऱ्यांदा राज्यकर्ते झाल्यानंतर आम्ही कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना माहीत आहे. जाणीवपूर्वक काही बंदरांचा विकास काही लोकांनी केला. काही ठिकाणी अजून विकास केला पाहिजे. त्यामुळे कोकणचा कायापालट होणार आहे. त्या पध्दतीने देखील आम्ही चाललेलो आहोत. त्या ठिकाणी चौपदरी रस्ते झाले पाहिजेत. परवा तव्हेराचा अपघात झाला तो आपल्याला माहीत आहे. त्यामध्ये 10 ते 12 निष्पाप लोक मयत झाले. गोवा-मुंबई रस्त्यावर सातत्याने अपघात होतात. त्याकरिता त्या ठिकाणचे पूल रुंद झाले पाहिजेत. तत्कालीन वित्तमंत्री श्री. सुनील तटकरे यांनी नाबार्डकडून मोठ्या प्रमाणावर तरतूद केली. ती फाईल राहिलेली होती परंतु मी माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांना सांगितले की, कोकणवासीयांकरिता थोडासा जास्तीचा निधी नाबार्डमार्फत हे पूल बांधण्याकरिता द्यावा लागला तरी चालेल पण आपल्याला त्या ठिकाणी पैसे द्यावयाचे आहेत. राज्यकर्ते म्हणून आमची ही भूमिका आहे. अजूनही त्या ठिकाणी उत्तम प्रकारचे प्लांट आले पाहिजेत. कोकणातील जे काही निसर्गसौंदर्य आहे त्याच्यावर काही परिणाम होईल असे प्रकल्प आम्हीच आणू देणार नाही. आम्हीच त्याला परवानगी देणार नाही. या गोष्टी आपण लक्षात घ्याव्यात.

सभापती महोदय, आज संपूर्ण जगामध्ये सगळ्यात स्वच्छ आणि चांगली वीज ही न्युक्लिअरची वीज आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे आणि इतर सदस्यांनी बोलताना

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

याबाबत सांगितले. काही विद्वान मंडळी त्या ठिकाणी जाऊन वेगवेगळ्या पध्दतीने लोकांना चुकीचे सांगतात. ज्यांचा स्थानिकांशी काडीचाही संबंध नाही ते त्या ठिकाणी जातात आणि सांगतात की, या ठिकाणी असे झाले पाहिजे, तसे झाले पाहिजे. बाहेरच्या लोकांनी त्या ठिकाणी जाऊन लोकांची दिशाभूल करण्याचे काय कारण आहे ? आपण जी एक बाब सांगितली त्या मताशी मी सहमत आहे. मी आपल्याला सांगेन की, मधल्या काळामध्ये भारतीय जनता पक्षाने देखील सांगितले की, आमचा जैतापूरला पाठिंबा आहे. फक्त तेथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न नीट सोडवावेत. त्यांना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ देऊ नयेत. अशा प्रकारची भूमिका त्याबाबतीत घेण्यात आली. तशा प्रकारचे पत्र त्यांनी निश्चितपणे दिले होते. तशा प्रकारचे वृत्त वर्तमानपत्रामध्ये आले होते. भाजपचा जैतापूर प्रकल्पाला विरोध नाही अशी बातमी छापून आली होती. मात्र त्यांनी याबाबतीत सांगताना असे सांगितले होते की, नवीन नवीन वीज प्रकल्प राज्यात झालेच पाहिजेत. या प्रकल्पाला जमिनी बाजार भावाने घेतल्या पाहिजेत. पुनर्वसन कालबध्द मर्यादेत झाले पाहिजे व नंतरच प्रकल्प सुरु झाला पाहिजे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत आम्ही शंभर टक्के सहमत आहोत. आपण जे म्हणता त्यापेक्षाही जास्त देण्याची आमची तयारी आहे. हा 1 लाख कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. त्यामध्ये राज्य सरकार आपला एक रुपया सुध्दा घालणार नाही. त्या ठिकाणी संपूर्ण रक्कम केंद्र सरकार घालणार आहे. त्याकरिता या देशाचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी जर्मनीमध्ये जाऊन त्या ठिकाणी चर्चा केली. मधल्या काळामध्ये फ्रान्सचे राष्ट्रपती आले होते हे आपणा सगळ्यांना माहीत आहे. त्यामध्ये सरकार राहणार की जाणार अशी परिस्थिती होती. देशातील सरकारने न्युक्लिअर करार केल्यानंतर पुन्हा एन.डी.ए.ला सत्ता न देता पुन्हा यू.पी.ए.ला सत्तेवर आणण्याचे काम केले याचा अर्थ महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला न्युक्लिअरच्या संदर्भामध्ये आम्ही जे काम हातामध्ये घेतलेले आहे त्याबद्दलचा विश्वास आहे. म्हणूनच जनतेने डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यासाठी मदत केलेली आहे, ही गोष्ट आपण कधीही विसरु नका. आपण आता चुकीच्या रस्त्याने जाऊ नका. मागच्या काळामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने याला झोडा, त्याला मारा,

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. अजित पवार ....

बघून घेऊ, डोके फोडू अशा पध्दतीचे राजकारण केले. हे फोडू तोडूचे कसले राजकारण आपण करता ? फोडून तोडून लोकांचे काही भले होत नसते. हे फोडू तोडू म्हणत म्हणतच मनसे वाढावयास लागली याचा आपण विचार करा. लोकांचा विश्वास राहिला नाही. सरसेनापती श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर लोकांचा विश्वास होता परंतु नंतरच्या नेतृत्वावर विश्वास राहिला नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आज मनसेचे श्री. राज ठाकरे म्हणतात की, विकासाच्या बाबतीत आम्ही तुमच्या बरोबर राहू. विकासाच्या बाबतीत भारतीय जनता पक्ष सुध्दा त्याच पध्दतीने म्हणतो. इतर सन्माननीय सदस्यही तसे म्हणतात परंतु मध्यंतरी श्री. सुभाष देसाई यांनी काय सांगितले ? ते म्हणाले की, मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण सांगतात की, मी दिल्लीला असताना हा प्रकल्प राजापुरात आणला.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

जर विकास करावयाचा होता तर हा प्रकल्प कराडला न्यायचा होता. हा दिल्लीहून आलेला प्रकल्प आहे, दिल्लीचे हे पार्सल आम्ही परत पाठवू." एवढे हे सोपे आहे काय, भातुकलीचा खेळ वाटला काय, लोकशाहीमध्ये लोकांनीच निवडून दिलेलेच सरकार काम करीत असते. 1990 नंतर पहिल्यांदा या सरकारला 175 सदस्यांचा पाठिंबा मिळालेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाकडे पूर्ण बहुमत आहे. आमच्या आघाडीचे 145 आमदार आहेत. घडयाळ व पंजाच्या चिन्हावर हे सरकार आलेले आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना खूप अनुभव आहे. त्यांनी पंतप्रधान कार्यालयात काम केलेले आहे. काल खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण ऐकल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांना कळेनासे झाले, त्यामुळे त्यांनी मध्येच उठून सभात्याग केला. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथ खडसे यांना आमच्या मुख्यमंत्र्यांनी मांडलेले विचार पटलेले होते, परंतु त्यांनाही सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई यांच्या मागे जावे लागले.(अडथळा) सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, डॉ.अनिल काकोडकर यांच्यावर तरी तुमचा विश्वास आहे ना ? ते या महाराष्ट्रातीलच आहेत. अणु ऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अनिल काकोडकर यांनी मंगळवारी जैतापूर येथील प्रकल्पाचा कोकणातील शेती, पाणी, सागरी जैवसृष्टीवर कोणताही दुष्परिणाम होणार नाही असे ठणकावून सांगितले आहे. मला अणुच्या संदर्भातील अधिक माहिती नाही, परंतु त्यांनी अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. वैज्ञानिक, तांत्रिक व पर्यावरणविषयक निकष घासून पुसूनच प्रकल्पाच्या जागेची निवड केलेली असते. जैतापूरची जागा सर्व दृष्टीने अत्यंत उत्कृष्ट आहे. त्या प्रकल्पामुळे कोणतेही तोटे होणार नाहीत ही भूमिका डॉ.अनिल काकोडकर यांनी मांडलेली आहे.

सभापती महोदय, या प्रकल्पाला स्थानिक लोक विरोध करीत असतील, मी ते नाकारणार नाही. त्यांचा विरोध दूर करण्याकरिता काही सन्माननीय सदस्यांनी पुनर्वसनाचा मुद्दा मांडला आहे. त्याबाबत मी व राज्य सरकार देखील विचार करीत आहे. यापुढील काळात राज्यात मोठे प्रकल्प येत असताना बाजार भावाप्रमाणे जमिनीच्या किंमती देत असताना त्या प्रकल्पामध्ये मिळणा-या नफ्याचा काही भाग ज्यांची जमीन जाते त्यांना शेअर्सच्या माध्यमातून दिला पाहिजे, या भूमिकेबाबत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.अजित पवार....

सरकार विचार करीत आहे. ज्यावेळी केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी आम्हाला क्लीअरंस सर्टिफिकेट दिले त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि मी स्वत: सहयाद्री अतिथी गृहावर उपस्थित होतो. त्यावेळी त्यांनी जरुर काही अटी घातलेल्या आहेत. परंतु त्या अटी सुध्दा पूर्तता करण्याचा आमचा सगळयांचा प्रयत्न आहे. राज्याचे माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, मी स्वत: कोकणामध्ये जाईन, मी त्या भागातील लोकांशी चर्चा करीन. त्यांचे जे प्रश्न आहेत ते समजावून घेईन.

मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुद्दा मांडला होता, त्याचे समर्थन सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी केले आणि तो मुद्दा मलाही पटलेला आहे. दोन्ही सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्र बोलवून जैतापूर प्रकल्पासाठी कसकसे निर्णय घेतले गेले, ते निर्णय कसे योग्य पध्दतीचे आहेत ते सांगितले पाहिजे. कारण मला ते पटले आहे. या देशाच्या पंतप्रधानांना पटले आहे, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना पटलेले आहे. मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांना ते पटलेले आहे. ज्यावेळी माननीय श्री.जयराम रमेश यांनी क्लीअरंस सर्टिफिकेट दिले त्यावेळी मी माझी भूमिका स्पष्टपणे सांगितलेली होती. जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प यासंदर्भात न्यूक्लीअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी जे काही सांगितले आहे त्या सगळया गोष्टी यामध्ये दिलेल्या आहेत. यामध्ये सेसमिक झोन 1 व 2 मध्ये अणु ऊर्जा प्रकल्प असावेत, जैतापूरची जागा सेसमिक झोन 3 मध्ये आहे. सेसमिक झोन 3 मध्ये ही जागा असली तरी जपानमध्ये सेसमिक झ ोन-4 मध्ये अणु ऊर्जा प्रकल्प आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सावंत यांना सांगू इच्छितो की, आज आपण या प्रकल्पात राजकारण आणण्याचा प्रयत्न केला तर कधी ना कधी या राज्यातील किंवा देशातील कोळसा संपल्याचे चित्र दिसणार आहे. हे आपल्यालाही कळते, चंद्रपूर जिल्हयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सन्माननीय सदस्यांनाही माहीत आहे. पाण्यापासून हायड्रोलिक वीज तयार करीत असताना, वीज तयार करण्यासाठी पाणी वापरु नका, आमच्या शेतीला पाणी द्या असा प्रश्न त्यावेळच्या राज्यकर्त्यांसमोर कधी तरी येईल.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

कारण त्यावेळी पाण्याची कमतरता झालेली असेल. सोलर वीज तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. न्युक्लिअर ही अशा प्रकारची पॉवर आहे की जिचा उपयोग फ्रान्स, अमेरिका, जपान, चीन या सारख्या प्रगत राष्ट्रांनी केलेला आहे. या सर्व राष्ट्रामध्ये अणु पासून वीज निर्मिती केली जाते.

सभापती महोदय, मला सभागृहाच्या हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या अणुऊर्जा प्रकल्पासाठी देशाच्या वेगवेगळया ठिकाणी जागा पाहाण्यात आल्या. परंतु तज्ज्ञ समितीने जैतापूर येथील जागा अणुऊर्जा प्रकल्पासाठी निवडली. हा प्रकल्प येत असताना त्या भागाचा आरोग्य, शाळा, गृह याबाबतीत विकास करण्यासाठी न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन मोठ्या प्रमाणावर खर्च करणार आहे. प्रत्येक गावासाठी 2 कोटी रु.ची तजवीज करण्यात येणार आहे आणि त्यानंतर दरवर्षी 25 लाख रुपये देण्यात येणार आहेत. त्या भागातील लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

सभापती महोदय, 1969 सालापासून आतापर्यन्त भारतामध्ये 18 अणुभट्टया झालेल्या आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अपघात झालेला नाही. सुरक्षिततेचे सर्व उपाय त्या ठिकाणी योजिले गेले आहेत. रशियामध्ये कुठे काही झाले असेल तर तेवढेच घेऊन बसणे योग्य होणार नाही. कारण आपल्याला विकास करावयाचा आहे. जेव्हा 11 सप्टेंबरला वर्ल्डट्रेड सेंटरवर हल्ला झाला त्यावेळी त्या इमारतीमध्ये संपूर्ण विमानच घुसवून ती इमारत उद्ध्वस्त करण्यात आली. हा अणुऊर्जा प्रकल्प करीत असताना त्या ठिकाणी कोणते विमान जरी पडले तरी कोकणाला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नाही अशा प्रकारची व्यवस्था आपण करीत आहोत. तेव्हा सुरक्षितेच्या दृष्टीने सर्व गोष्टींचा विचार केला गेला आहे. राज्यामध्ये तारापूर येथे अणुभट्टया आहेत. तसेच राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजराथ या राज्यामध्ये देखील अणुभट्टया आहेत. कर्नाटक आणि गुजराथ राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. तसेच त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नितीन गडकरी हे आहेत. तेव्हा या दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना तेथील अणुभट्टयापासून काय धोका निर्माण होतो हे भारतीय जनता पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विचारता येईल. भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांना माहीत आहे की या अणुऊर्जा प्रकल्पापासून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

कोणताही धोका नाही. परंतु त्यांच्या सवंगड्यामुळे त्यांची अडचण होत आहे. तेव्हा त्यांना कसे पटवायचे हे त्यानीच पहावे.

सभापती महोदय, तीन प्रकारच्या अणुभट्टया असतात. प्रेशराईज हेवी वॉटर रिॲक्टर, लाईट वॉटर रिॲक्टर यामध्ये दोन उप प्रकार आहेत बॉयलिंग वॉटर रिॲक्टर व प्रेशराईज्ड वॉटर रिॲक्टर आणि तिसरा फास्ट ब्रीडर रिॲक्टर अशा प्रकारच्या अणुभट्टया असतात. सभापती महोदय, आपण आताच काही 10 हजार मे.वॅ. वीज निर्माण करीत नाही. आता दोन करार झालेले आहेत. पहिल्यांदा दोन युनिटमधून 1600 मे.वॅ. आणि नंतर 4 युनिट मधून आपण वीज निर्मिती करणार आहोत. प्रकल्पासाठी जागेची निवड करीत असताना जागेची उपलब्धता, तेथील लोकांची घनता, कुलिंग वॉटर इत्यादीची उपलब्धता पाहिलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की या प्रकल्पाचे 5 से.ग्रे. इतके गरम पाणी समुद्रामध्ये सोडण्यात येणार आहे. सभापती महोदय, या संदर्भात माझ्या असे वाचनात आलेले आहे की, तशा प्रकारचे पाणी समुद्रामध्ये सोडल्यानंतर मासे सुदृढ झालेले आहेत. तो विषय बाजूला ठेवूया. मला एवढेच सांगायचे आहे की, या पाण्यामुळे मासे मरत नाहीत ही गोष्ट खरी आहे. सभापती महोदय, हा प्रकल्प कोकणामध्येच का आणला ? तर त्याबाबतीत मला राज्यातील जनतेला सांगावयाचे आहे की, हा प्रकल्प दुसरीकडे आणला असता तर पाणी लागले असते. या प्रकल्पासाठी 100 टीएमसी पाणी लागते. 1 टीएमसी पाण्यामुळे 10 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येते. मग 100 टीएमसी म्हणजे 10 लाख हेक्टरला जेवढे पाणी लागेल तेवढे पाणी या प्रकल्पासाठी लागेल. तेव्हा समुद्राचे 100 टीएमसी पाणी घेण्यात येणार आहे. या प्रकल्पातील पाणी कोणत्याही प्रकारचा अपाय न होता समुद्रामध्ये आत नेऊन सोडण्यात येणार आहे. तारापूर येथील अणुभट्टयांचा अनुभव आपल्याला आहे. या प्रकल्पासाठी यंत्रसामग्री ही समुद्रमार्गे आणली जाणार आहे. हे करीत असताना स्थानिकांना काम देण्याचा केन्द्र शासनाचा प्रयत्न राहाणार आहे. पुराच्या दृष्टीकोनातून जमिनीची समतल पातळी, भूकंप प्रवणता इत्यादी गोष्टी लक्षात घेतलेल्या आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.......

त्यामध्ये कोणताही धोका अजिबात राहणार नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अमेरिकेमध्ये एकूण वीज निर्मितीपैकी 20 टक्के वीज न्यूक्लिअरपासून तयार केली जाते. आपल्याकडे फक्त 2.4 टक्के म्हणजे 2.5 टक्के देखील तयार होत नाही. भावी पिढीकरिता जे काही काम करावयाचे आहे त्याबाबत या सगळ्या गोष्टीमध्ये लक्ष घालावे लागेल. केवळ स्थानिकांचा विरोध आहे म्हणून काही आमदारांनी जायचे आणि तेथील लोकांना सांगायचे की, आमचाही या प्रकल्पाला विरोध आहे. अशी टोकाची भूमिका घेऊन एन्रॉन प्रकल्पाबाबत जी भूमिका घेतली होती त्या इतिहासाची पुनरावृत्ती ज्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे त्यांनी करु नये. अन्यथा हल्ली लोक विकासाला मतदान करतात हे आपण पाहिले आहे. बिहारमध्ये श्री.सुशीलकुमार मोदी उपमुख्यमंत्री झाले. श्री.नितीशकुमार यांचे सरकार सत्तेवर आले. मागील सरकारपेक्षा जास्त विकास झाला म्हणून लोकांनी श्री.नितीशकुमार यांच्या सरकारला निवडून दिले. आता जर विकासाला कोणी विरोध केला तर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्यापेक्षा मनसेची सदस्य संख्या वाढेल. पुन्हा विकासाला विरोध करण्यापूर्वी ही बाब लक्षात घ्यावी.

सभापती महोदय, सामुदायिक जबाबदारी आणि सुधारणा या आम्ही त्याठिकाणी करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक ग्रामपंचायत आणि जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने त्वरित प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, प्राथमिक शाळा जैतापूर येथे सुरु करणार आहोत. जवळपासच्या शाळेत क्लासरुम, प्रयोगशाळा, संगणकाची व्यवस्था, आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारणे अशा अनेक गोष्टी करण्याचा आमचा सगळ्यांचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, जैतापूर प्रकल्पातील सांडपाण्याच्या व्यवस्थापनाबाबत न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनच्या माध्यमातून आम्ही योग्यप्रकारे नियोजन केले आहे. कचऱ्याबाबत देखील व्यवस्थित नियोजन केले आहे. हवेच्या प्रदूषणाबाबत काळजी घेत आहोत. हरित पट्टा निर्मितीच्या संदर्भात विचार करुन पुढे जाण्याचे ठरविले आहे. मी पुन्हा एकदा आजच्या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, काहीही झाले तरी डिसेंबर, 2012 पर्यंत या राज्याला भारनियमनातून मुक्त करण्याचे काम आम्ही करणारच करणार आहोत. परंतु पुढे राज्याला कदापि विजेची कमतरता भासू नये म्हणून अणुऊर्जेपासून वीज निर्मिती करण्याचे सगळ्या जगाने, प्रगत राष्ट्रांनी मान्य केले ते धोरण मान्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

SGB/ D/ MMP/ 14:30

श्री.अजित पवार.......

करण्याचे आम्ही ठरविले आहे. अशा प्रकारचा अणुऊर्जा प्रकल्प फक्त जैतापूर येथे होणार नाही, अशा प्रकारचे एकूण 7000 मे.वॅटचे प्रकल्प देश पातळीवर ठिकठिकाणी न्यायचे आहेत. त्यामुळे या सगळ्या गोष्टीचा विचार जे विरोध करीत आहेत त्यांनी केला पाहिजे. यामध्ये जर कुठे तथ्य आढळले असते तर आम्ही या सगळ्या गोष्टी थांबविल्या असत्या. राज्यातील जनतेने आम्हा सगळ्यांना तिसऱ्यांदा लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून निवडून दिले आहे, त्या जनतेचे भले करण्याकरिता आम्ही विचार करणार आहोत. कदाचित कोकण असेल, विदर्भ असेल, मराठवाडा असेल, खानदेश असेल, पश्चिम महाराष्ट्र असेल, कोणत्याही विभागाला दुजेपणाची वागणूक आमच्याकडून दिली जाणार नाही, हा शब्द या चर्चेचा समारोप करीत असताना मी राज्यातील जनतेला देतो आणि काही झाले तरी राज्याच्या भल्याकरिता आम्ही हा प्रकल्प करणारच आणि हे करीत असताना स्थानिकांचे जे जे मुद्दे असतील, गैरसमज असतील, शंकाकुशंका असतील त्या चर्चेतून सोडविण्याकरिता तज्ज्ञ लोकांना सोबत घेऊन निश्चितपणे आमचे तुमच्या सगळ्यांबरोबर सहकार्य राहील ही खात्री देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : महोदय, मी आपला अत्यंत आभारी आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी पूर्णपणे राजकीय भाषण केले असे मी म्हणणार नाही. पण एक गोष्ट मला आपल्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, प्रथमत: जैतापूर येथील अणू उर्जा प्रकल्पाच्या बाबतीत मी कोणत्याही प्रकारचे राजकारण आणणार नाही. उलट आमचे नेते माननीय श्री. उद्‌ध्वजी ठाकरे साहेबांची भूमिका आहे त्याप्रमाणे मी देखील त्या शेतकऱ्यांच्या सोबतच आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांना माझी विनंती आहे की, आपण दोघेही स्थानिक लोकांमध्ये जाऊन या प्रकल्पाच्या संदर्भात सविस्तर चर्चा करावी, त्या लोकांना कन्व्हिन्स करावे, त्यांनी मान्य केले तर आमची काहीच हरकत नाही. कारण आमचा या प्रकल्पाला विरोध नाही. पण या निमित्ताने काही गोष्टींची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत, अशी मी अपेक्षा करतो. ज्या पध्दतीने माननीय पंतप्रधानांनी लक्ष घालून जैतापूर येथे अणू उर्जा प्रकल्प होण्याबाबत प्रयत्न केले व त्यानुसार आपण हा प्रकल्प कोकणात आणत आहात त्याचप्रमाणे कोकणसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचा आग्रह आपण देखील तीन वेळा माननीय पंतप्रधानांकडे धरला तरीही त्याकडे माननीय पंतप्रधानांनी लक्ष दिले नाही, याचाही खुलासा झाला पाहिजे. दुसरे म्हणजे एनरॉनच्या संदर्भात सुध्दा आपण त्यावेळेस सांगितले होते की स्थानिकांना या प्रकल्पामुळे न्याय मिळेल पण प्रत्यक्षात तेथे जाऊन बघावे तेव्हा लक्षात येईल की, किती लोक त्या ठिकाणी कामाला आहेत ? तारापूरला देखील तीच परिस्थिती आहे. आपण प्रकल्प आणत असताना आश्वासने देतात, लोकांची फसवणूक करुन प्रकल्प आणतात, नंतर मात्र त्याच लोकांकडे लक्ष देत नाहीत, त्यांना न्याय देत नाही.

महोदय, मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व गेल्या 20 वर्षांपासून करीत आहे त्या भागातील एमआयडीसी आपण केमिकल झोन म्हणून घोषित केली. ही घोषणा करीत असताना सांगण्यात आले होते की, या भागातील मच्छिमारांना कोणताही त्रास होणार नाही किंवा पर्यावरणाची सुध्दा हानी होणार नाही. या अनुषंगाने मी किमान 100 वेळा विधानसभेत प्रश्न विचारले होते परंतु तत्कालीन मंत्री महोदय श्री. गणेश नाईक यांनी सांगितले होते की, जर अशा कारणामुळे या भागातील मासे मेली तर तेच मासे अधिकाऱ्यांना खायला घालीन. परंतु आजपर्यंत तसे काहीच घडले नाही, या झोनचा परिणाम मात्र मच्छिमारीवर झाला. अशा प्रकारे कोणताही प्रकल्प घेत

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .........

असताना शासनाकडे सत्ता असते, पोलीस असतात आणि अशा पोलिसांच्या बळावर, दंडुक्यांच्या जोरावर शासन प्रकल्प घेत असते, तसे प्रकल्प आपण आणू शकता, कारण आपल्याकडे सत्ता आहे. सभागृहात बोलत असताना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काही लोक कपडे उतरवून सभागृहात येण्याची भाषा करतात असाही मुद्दा उपस्थित केला. परंतु मी सभागृहाला तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनाही सांगू इच्छितो की, आम्ही कधीही कपडे काढण्याची भाषा केली नाही. कारण कोकणच्या विकासाच्या दृष्टीने अजूनही आम्ही पारतंत्र्यातच आहोत, अजूनही आमचा माणूस लंगोटीतच आहे. अशा प्रकारे ज्याच्या अंगावर कपडाच नाही तो कपडे कोठून उतरविणार याचा विसर माननीय उप मुख्यमंत्र्यांना पडलेला दिसतो. मी हे केवळ राजकारण म्हणून सांगत नाही तर ज्या ज्या घोषणा शासनाने वेळोवेळी केल्या, कोकणसाठी पॅकेज दिले परंतु त्या पॅकेजमधील एक दमडी सुध्दा आम्हाला अद्याप मिळाली नाही. सिंचनाच्या बाबतीत सुध्दा मी आपल्याला 10 वेळा येऊन भेटलो की, कोयना प्रकल्पाचे 67 टीएमसी पाणी आम्हाला सिंचनासाठी द्यावे, परंतु तेही या शासनाने केले नाही. अशा प्रकारे कोकणावर सतत अन्याय होत आहे. आमच्या भागातील विकासासाठी एक लाख कोटी रुपये आपण या प्रकल्पाच्या माध्यमातून खर्च करीत असला तरी आम्हाला त्याची अडचण नाही, कारण आमचा प्रकल्पाला विरोध नाही परंतु तत्पूर्वी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या भागातील शेतकऱ्यांसोबत बसून चर्चा करावी अशी माझी हात जोडून विनंती आहे. केवळ पोलिसांच्या लाठ्या चालवून प्रकल्प आणू नये तसेच महिला व भगिनींना दंडुक्याच्या जोरावर घराच्या बाहेर काढू नका, एवढे बोलून कोकणच्या विकासाबाबत आपण जे बोलला त्याबद्दल मी शासनाचा धिक्कार करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

**उप सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 15 मिनिटांनी पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 2.39 पासून 3.15 पर्यंत स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी मा.उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.**

**राज्यातील केंद्रीय अनुदानावर सुरु असलेल्या**
**आश्रम शाळांची झालेली दयनीय अवस्था**

**(१) * १०२४२ श्रीमती अलका देसाई , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.किसनचंद तनवाणी , श्री.दिवाकर रावते , डॉ.दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००२ पासून केंद्र शासन अनुदानित निवासी व अनिवासी आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ठिकठिकाणी चालविण्यात येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळांना केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळत असूनही या आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विविध सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत, त्यांना जेवणही निकृष्ट दर्जाचे दिले जात असल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळासंदर्भातील अहवाल पाठविण्याची जबाबदारी संबंधित विभागाची असताना विभाग शाळा संदर्भातील तक्रारीची दखल घेत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा तसेच चांगल्या प्रतीचे जेवण देऊन या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) स्वयंसेवी संस्थांच्या केंद्र शासन अनुदान प्राप्त काही शाळा चांगल्या प्रतीचे जेवण व इतर सोयीसुविधा पूरवित नाहीत असे आढळून आले आहे. त्यापैकी एक शाळा केंद्र शासनाने बंद करावी, अशी शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे. उर्वरित शाळांबाबत तपासणी सुरु आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रश्न विचारु इच्छिते. केंद्रशासनाच्या मदतीने आदिवासी भागात किती शाळा चालविल्या जातात ? या शाळेमध्ये गेल्या चार महिन्यात जी पाच मुले अन्नावाचून मेली त्याचे कारण काय आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, केंद्रशासनाकडून ४० शाळा चालविल्या जातात परंतु आता केवळ २५ शाळाच चालविल्या जात आहेत. या शाळेत ५ मुले अन्नावाचून मृत्यू पावली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : १०२४२...

श्री.बबनराव पाचपुते....

आहेत असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे .या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या शाळा केंद्र शासनामार्फत चालविल्या जात असल्यामुळे त्याची माहिती आमच्याकडे येत नाही. या शाळांना परवानगी देणे आणि त्यांना पैसे देणे ही बाब केंद्रशासन डायरेक्ट पहात असते त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात डायरेक्ट संबंध आदिवासी विभागाचा येत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी केंद्रसरकारला कटघ-यात उभे केलेले आहे. आदिवासी आश्रमशाळेतील मुले आजारी पडल्यानंतर त्यांना औषध-पाणी मिळत नाही, त्यांना जेवणाची सुध्दा चांगली सोय उपलब्ध करुन दिली जात नाही त्यामुळे यासंदर्भात आदिवासी विभागाकडून कोणत्या योजना आखल्या जाणार आहेत?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक अर्ज दिला तर त्याची निश्चितपणे माहिती दिली जाईल. परंतु सर्वत्राची माहिती देणे आमच्या विभागाला शक्य नाही.

श्रीमती अलका देसाई : पालघर येथील शाळेच्या बाबतीत चौकशी केली जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण यासंदर्भात पत्र पाठविले तर त्याचे जरुर उत्तर दिले जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, या सर्व योजना केंद्रसरकारच्या असून या शाळांसाठी केंद्रशासनाचा पैसा येत असतो. केंद्रसरकारचा जरी पैसा असला तरी तो पैसा शेवटच्या आदिवासींच्या मुलांपर्यंत गेला पाहिजे तसेच त्या पैशाचा विनियोग योग्य पध्दतीने झाला पाहिजे असे आदिवासी विकास मंत्र्यांना वाटत नाही का ? जेवणाची क्वॉलीटी, गणवेष व इतर ज्या सुखसोयी विद्यार्थ्यांना दिल्या जातात त्यासंदर्भात एखादी मॉनिटरींग कमिटी स्थापन करुन त्यावर नियंत्रण ठेवले जाणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासाठी एक कमिटी असून कलेक्टर सुरुवातीला पाहणी करतात व त्यानंतर आदिवासी सचिव, ग्रामविकास सचिव व आरोग्य विभागाचे सचिव हे सर्व यासंदर्भात पाहणी करतात व  प्रस्ताव पुन्हा तपासतात. प्रस्ताव योग्य असेल तर शिफारस केली जाते नाहीतर शाळेची मान्यता रद्द केली जाते. अशा प्रकारे आदिवासींच्या १५ शाळा रद्द झ ालेल्या आहेत.

-------

...३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोट (जि.अकोला) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२) * १०३०१ डॉ.निलम गोऱ्हे , श्री.गोपीकिसन बाजोरिया , श्री.किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या संततधार पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबतची मागणी दिनांक २३ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने त्यांना नुकसान भरपाई देण्याकरिता झालेल्या नुकसानीची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्या करिता**: (१) नाही.

अकोट तालुक्यात माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या पावसामुळे कोणत्याही पिकांचे नुकसान झालेले नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आम्ही जो प्रश्न विचारला आहे त्यावरुन शासन किती संवेदनाहीन झालेले आहे हे दिसून येते. अकोट तालुक्यातील जनतेने, शिवसेनेने तसेच भारतीय जनता पक्षाच्या वतीने शासनाला निवेदन दिलेले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, संततधार पावसाने अकोट तालुक्यातील शेतातून पाण्याचे वाट वाहिले, पिके सडली, नुकसान झाले तसेच अनेक शेतात तलावसदृश्य स्थिती निर्माण झाली होती तसेच किटकांचाही प्रार्दुभाव झाला होता. आता अवकाळी पाऊस देखील पडलेला आहे. अकोल्या जिल्हयात जो पाऊस पडला व त्यामध्ये ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्याबद्दल शासन पुनर्विचार करणार आहे काय ? अजूनही सर्व्हे सुरु आहे अशी आम्हाला माहिती दिली जात होती परंतु आता सर्व्हे सुरु होऊन १५ दिवस उलटून गेलेले आहेत. त्यामुळे अकोट तालुका आणि अकोला जिल्हयाच्या नुकसान भरपाईची काय स्थिती आहे ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10301....

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा प्रश्न अकोट तालुक्यासंबंधी असल्यामुळे त्या तालुक्या पुरतीच माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ऑगस्ट 2010 मध्ये झालेल्या पावसामुळे शेतीचे नुकसान झाले असा प्रश्न आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि शासनाकडे निवेदन प्राप्त झाली आहेत. या संदर्भात तलाठ्यांना पाहणी करण्यास सांगितले होते. त्यांनी त्या संबंधातील अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे दिला. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, ऑगस्ट महिन्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी तसा रिपोर्ट शासनाला पाठविला आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असे सांगितले. रब्बी हंगामामध्ये जो पाऊस झाला. हरभरा पिकाची जवळपास 21 हजार 608 हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यापैकी 16 हजार 374.69 हेक्टर क्षेत्राचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकासाच्या नावाखाली जमिनी भूमाफीयांकडून ताब्यात घेण्यात येत असल्याबाबत**

**(3) * 9301 श्री.किरण पावसकर , श्री.रामदास कदम , डॉ.दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.संजय दत्त , श्री.हुसेन दलवाई , श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यात झपाट्याने होत असलेल्या औद्योगिकीकरणामुळे "रियल इस्टेट एजन्सी" या गोंडस नावाखाली शासनाच्या जमिनी घेण्यात येत असल्याचे अनेक प्रकार उघडकीस येत आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, 7/12 च्या उताऱ्यावर वन विभागाची जमीन विकण्याचे प्रकरण तसेच तिवरे गावातील 12 एकर 7 गुंठे जमीन बनावट दस्ताऐवज बनवून हडपण्याचा प्रकार उघड झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उद्योग व भूमाफियांच्या स्पर्धेत सामान्य शेतकरी चिरडला जात आहे तसेच भूमाफीयांच्या या व्यवहारावर सरकारला नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे, याबाबत शासनाने काय चौकशी केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) व (3) मौजे तिवरे ता.कर्जत येथील स.नं.9/3 या मिळकतीमध्ये बोगस आकाराफोड पत्रकानुसार फेरफार क्र.1439,1440,1441 नुसार स.नं.9/3 अ,ब,क,ड व ई ही मिळकत तयार करण्यात आले होते. सदर मिळकत बेकादेशीर असल्याने झालेले 7/12 रद्द करण्यात आलेले आहेत. सदर मिळकतींची विक्री झालेली नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, रायगड जिल्ह्याचे औद्योगिकरण झपाटयाने वाढत आहे. रायगड जिल्ह्यात येत असलेले प्रकल्प, दिघी बंदर, बाणगंगा प्रकल्प, मुंबई-गोवा महामार्गाचे कामे, रेवस-रेड्डी सागरी मार्गाचे काम, रिलायन्स,टाटा यांचे प्रकल्प येत आहेत. या प्रकल्पांमध्ये

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9301.......

श्री.किरण पावसकर.....

रिअल इस्टेट नावांचे सर्व राजकीय पक्षाकडून कार्यालय सुरु करुन शेतकऱ्यांना लुबाडण्याचे काम सुरु आहे त्याच्या विषयी हा प्रश्न आहे. कर्जत तालुक्यातील बामत गावातील जमिनीचे मालक असल्याचे दाखवून वन विभागाची जमीन विकण्यात आली. तिवरे गावातील 7 एकर जमिनीचे बनावट दस्तऐवज बनवून जमीन हडप करण्यात आली. मागील अधिवेशनात देखील मी हा प्रश्न उपस्थित केला होता. मुंबई-पुणे महामार्गावर आय.आर.बी.कंपनीने अशाचप्रकारे वन विभागाची जमीन खरेदी केली. सदर मिळकत बेकायदेशीर असल्याने झालेले 7/12 रद्द करण्यात आले. म्हणजे 7/12 बनले हे शासन मान्य करीत आहे. खरेदी-विक्रीचा व्यववहार झाला हे देखील शासन मान्य करीत आहे. अशाप्रकारे बनावट कागदपत्रे तयार करुन वन विभागाची जमीन विकण्याचे प्रकार सुरु आहेत. तेव्हा या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारे बनावट जमिनीची खरेदी-विक्री होत आहे. त्यामध्ये आपण कायद्यामध्ये सुधारणा करुन अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी रिअल इस्टेट एजन्सी असा प्रश्न उपस्थित केला. परंतु शासनाकडे अशाप्रकारची कोणतीही तक्रार किंवा चौकशी झाल्याचे निदर्शनास आढळून आले नाही. मौजे तिवरे ता.कर्जत येथील सव्हे नं.9/3 या मिळकतीमध्ये बोगस आकारफोड पत्रकानुसार 9/3 अ,ब,क,ड व ई फेरफार क्रमांक 1439,1440,1441 नुसार करण्यात आला होता. हे फेरफार संगनमताने व बनावट असल्याचे अभिलेख्यावरुन उघडकीस आले. सध्या तेथील तहसीलदार व तत्कालीन नायब तहसीलदार श्री.आर.टी.कुंटे, प्रभारी मंडल अधिकारी श्री. दरेकर व तलाठी,पोसरी श्री. घरत तसेच आठ खाजगी इसम तसेच भूमीलेख कार्यालयातील चार कर्मचारी यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक 54/2010 दाखल करण्यात आला आहे. त्यांना अटक होऊन पोलीस कोठडीसुध्दा झालेली आहे. सर्वश्री कुंटे, दरेकर व घरत या महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना सेवेतून तात्काळ निलंबित केलेले आहे. त्याचप्रमाणे भूमीलेख कार्यालयातील कर्मचारी श्री.माने व श्री.नवलागे यांना निलंबित केलेले आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 15.25

ता.प्र.क्र. 9301 श्री.सोळंके...

त्याचबरोबर श्री. पाटील व श्री सावंत यांना मध्यंतरी बेल मिळाला होता त्यामुळे त्यांना अटक झालेली नव्हती त्या अधिका-यांची विभागीय चौकशी करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

श्री.विजय सावंत : रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यात लाटीम नावाची कंपनी आहे तिने बेनामी मालमत्ता घेतली असून त्याबाबतीत मी तक्रार केली होती.त्या कंपनीने शेतकरी नसतांना जमीन घेतली असून सिलींगच्या कायद्याचे उल्लंघन केलेले आहे त्या बाबतीत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी त्यासबंधीची तक्रार दिल्यास त्याची जरुर चौकशी केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील :सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यामध्ये मी दुरुस्ती करु इच्छितो. त्या ठिकाणी वन जमीन नाही. रायगड जिल्हयामध्ये गुरांना चरण्याची जमीन आहे त्या ठिकाणच्या जमिनीवर गावक-यांच्या वतीने पंचांची नावे असल्यामुळे पंचाना मॅनेज करुन ही जमीन विकत घेतली जात आहे त्यावर निर्बंध घालण्यात येणार आहे काय हा ्प्रकार तिवरे गावात घडल्यानंतर मी स्वत: तेथे गेलो होतो. हा प्रश्न तेथील तहसील कार्यालयापुरताच मर्यादित नसून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यत पोहोचतो श्री.कुंटे नावाचे एक नायब तहसीलदार आहेत परंतु या प्रकरणाला अंतिम मान्यता जिल्हाधिकारी कार्यालयातून मिळत असल्यामुळे त्या अधिका-याविरुध्द कारवाई करुन त्यांना निलंबित करण्यात येणार आह काय . रायगड जिल्हयातील जमिनीचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. गावठाणासाठी किंवा गुरांना चरण्यासाठी राखीव असलेली जमीन विकण्याचे प्रकार घडत आहेत गेल्या पाच वर्षात गुरांना चरण्यासाठी राखीव असलेली जमीन विकली गेली असल्यामुळे त्याची उच्च पातळीवरुन चौकशी करण्याचे आदेश शासन देणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी आता असे सांगितले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिका-यांनी त्यास मंजुरी दिलेली आहे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील काही अधिकारी यामध्ये दोषी आहेत तेंव्हा निश्चितपणे याबाबत चौकशी केली जाईल त्याचबरोबर रायगड जिल्हयात गेल्या पाच वर्षात गुराच्या चरणासाठी राखीव असलेली जमीन दुस-या कोणाला दिली असेल तर त्याची चौकशी करण्याचे चे आदेश दिले जातील.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**आष्टी (जि.बीड) येथील समाजकल्याण संचालनालयामार्फत चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या शासकीय वसतिगृहातील अनागोंदी कारभार**

**(४) * ९२४३ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथील समाजकल्याण संचालनालयामार्फत चालविण्यात येणाऱ्या मुलींच्या शासकीय वसतीगृहात अनागोंदी निर्माण झाली असून, वसतिगृहाचा कारभार अधीक्षकांशिवायच चालविण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतिगृहात सोयी-सुविधांचा अभाव, कर्मचारी वर्गांचा तुटवडा, आरोग्याच्या दृष्टीने अस्वच्छता अशा अनेक तक्रारी संचालनालयाकडे प्राप्त होवूनही त्यावर अद्याप कोणतीही उचित कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) होय. गृहपाल सेवानिवृत्त झाल्यामुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(२) व (३) वसतिगृहाच्या इमारतीचे अंतर्गत रंगरंगोटीचे काम सुरु असल्याने तेथे अस्वच्छता असल्याचे विशेष समाज कल्याण अधिकारी, बीड यांनी केलेल्या पाहणीत आढळून आले आहे. तसेच वसतिगृहातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : गृहपाल केव्हा सेवानिवृत्त झाले आणि या पदासहित रिक्त असलेली पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ?

श्री शिवाजीराव मोघे : गृहपाल पदावरील व्यक्ती 30.6.2010 रोजी सेवानिवृत्त झाली आहे त्याचबरोबर कनिष्ठ लिपिकाचे पदसुध्दा काही दिवस रिक्त होते. या दोन्ही पदाचा चार्ज कनिष्ठ लिपिकाकडे देण्यात आलेला आहे. रिक्त पदाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, शिक्षक किंवा आरोग्य विभागातील काही पदे सोडून बाकीची पदे भरण्यावर शासनाने बंदी घातली आहे. अशा प्रकारे राज्यामध्ये एकूण 65 पदे रिक्त आहेत, मार्च महिन्यापूर्वी ही पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि एप्रिल मध्ये ही पदे भरण्यात येतील.

. . . 3G 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9243...

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा माननीय मंत्री महोदय से स्पेसिफिक प्रश्न है कि महाराष्ट्र शासन ने कर्मचारियों की भर्ती पर जो रोक लगाई है, उसे आप कब हटाएंगे ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि आपको अगर अपने विभाग में अनुकंपा के आधार पर कोई पद भरना है तो क्या आप उस पद को भरने की कार्यवाही कर सकते हैं ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9243...

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, धोरणात्मक निर्णय सांगितला आहे की, हेल्थ डिपार्टमेंटच्या कर्मचाऱ्यांच्या भरतीवर बंदी आहे. ही भरती 31 मार्चपर्यंत असल्यामुळे त्यानंतर बंदी उठविली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या वसतिगृहांमध्ये असलेल्या अनागोंदी कारभाराचा उल्लेख करण्यात आला. या राज्यामध्ये समाज कल्याण विभागाचे एकूण 271 वसतिगृहे आहेत आणि मुलींची 125 वसतिगृहे आहेत. दिनांक 5,6 व 7 डिसेंबर रोजीच्या दै. लोकमतच्या अंकामध्ये याबाबत वृत्त छापून आले. त्यामध्ये असे म्हटले आहे की, त्या वसतिगृहामध्ये पहारेकरी नाहीत, गृहपाल नाहीत, घरांचे दरवाजे नीट लागत नाहीत, विजेची व्यवस्था नाही. अशाप्रकारच्या असलेल्या दुरवस्थेचे वर्णन करण्यात आले आहे. याठिकाणी गृहपाल नेमण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु इतर प्रश्न हे दैनंदिन कामकाजाशी संबंधित आहेत. या 125 वसतिगृहांमधील अनागोंदी कारभाराची चौकशी करुन समाज कल्याण विभागांतर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये महिलांच्या दक्षता समित्या नेमणार काय? त्यामुळे या सर्व गोष्टींसाठी पाठपुरावा आणि देखरेख करता येईल, जेणेकरुन या वसतिगृहांमध्ये सुधारणा होऊ शकतील, तशी व्यवस्था आपण निर्माण करणार काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, राज्यामध्ये सामाजिक न्याय विभागाची एकूण 271 वसतिगृहे आहेत. त्यामध्ये एकूण 65 पदे भरावयाची आहेत त्यांची प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच, गृहपाल या पदाची स्थिती आपणास सांगितली आहे. याठिकाणी मुलांची 112 पदे भरली आहेत आणि मुलींची 94 पदे भरली आहेत. तसेच, गृहपालांच्या 284 पदांना वित्त विभागाने मान्यता दिली असून मार्च महिन्यानंतर अधीक्षकांची पदे सुध्दा भरण्यात येतील.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी दोन-तीन दिवसापूर्वी विशेष उल्लेख उपस्थित केला होता. त्यावेळी मी सांगितल्याप्रमाणे या मुलींच्या वसतिगृहामध्ये केवळ अधीक्षकांची नव्हे तर सर्वच रिक्त पदे भरण्यासाठी आपण काय कारवाई करणार आहात?

श्री.शिवाजीराव मोघे : ही रिक्त पदे भरण्यात येतील असे उत्तर दिले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील कर्ली नदीपात्रात बेकायदेशीर व मोठ्या प्रमाणात सुरु असलेले वाळू उत्खनन**

**(५) * १०२६९ श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील कर्ली नदीपात्रात बेकायदेशीर वाळू उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरु असून वाळूची तस्करी करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदा वाळू उपसा व त्याची तस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच सध्या वाढत असलेला बेकायदा वाळू उपसा रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कुडाळ तालुक्यातील कर्ली खाडी किनाऱ्यालगत मौजे कवठी व चेंदवन नाईकवाडी येथे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये तहसिलदार, कुडाळ, मंडळ अधिकारी, वालावल व तलाठी यांच्यासमवेत अचानक पाहणी केली असता मौजे चेंदवन येथे अनधिकृतपणे ६ ब्रास वाळूचे उत्खनन केल्यामुळे संबंधितांकडून रुपये १३,२००/- इतकी दंडाची रक्कम दि.८.८.२०१० रोजी वसूल केली आहे. तसेच अनधिकृतपणे ३.५ ब्रास वाळूचे उत्खनन केल्यामुळे संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन निवती ता.वेंगुर्ला येथे गु.र.नं.१३/२०१०, दि.२९.८.२०१० रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच मौजे कवठी येथे १ ब्रास वाळूचा अवैध उत्खनन केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन निवती, ता.वेंगुर्ला येथे गु.र.नं.१२/२०१०, दि.२९.८.२०१० रोजी दाखल केला आहे.

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी तालुका स्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक १०२६९...

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १०२६९...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मंत्री महोदय "छापल्याप्रमाणे" म्हणत आहेत म्हणजे काय? हा वाळूचा विषय असल्यामुळे छापण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे त्यांनी नेमके काय छापले आहे याची मला माहिती मिळाली तर बरे होईल.

श्री. प्रकाश सोळंके : छापल्याप्रमाणे उत्तर असा त्याचा अर्थ आहे व ती पध्दत आहे.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदय, माननीय सदस्यांना अभिप्रेत असलेला अर्थ त्यांनी सांगितला आहे तो तुम्हाला लागू आहे काय? नसेल तर तुम्ही उत्तर छापल्याप्रमाणे म्हणा. "प्रयत्ने वाळूचे कण रगडीता मालही गळे"...

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कर्ली नदीचे मोठे पात्र आहे. त्याठिकाणी वालावल, कवठी, चेंदवन, धामापूर अशी गावे त्या पात्राच्या शेजारी आहेत. चेंदवन गावामध्ये अवैध वाळू पकडल्यामुळे दंड वसूल करण्यात आला. कवठी येथे ३.५ ब्रास इतकी वाळू पकडण्यात आली आहे. त्याकरिता आपण दंड वसूल केला काय? इतर गावांमध्ये वाळू पकडल्यानंतर दंडात्मक रक्कम वसूल केली काय? तसेच, दुसऱ्या उत्तरामध्ये वेंगुर्ला येथे सर्व गुन्हयांबाबत कारवाई सुरु आहे असे म्हटले आहे, ती केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दिनांक ८.८.२०१० रोजी चेंदवन येथील रविंद्र नाईक यांच्याविरुध्द ६ ब्रास अनधिकृत वाळू उत्खननाबाबत १३२०० रुपये दंड वसूल केला आहे. त्याचप्रमाणे दि.२९.८.२०१० रोजी कवठी येथील संतोष पांडुरंग राऊत आणि इतर सहा जण यांच्यावर होडीव्दारे १ ब्रास वाळू उत्खननाबाबत कारवाई केली आहे आणि त्यांच्याकडील होडया व साहित्य जप्त करुन पोलीस स्टेशन निवती, तालुका वेंगुर्ला येथे गुन्हा रजिस्टर नं.१२/२१० अन्वये फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 10269 .... श्री. प्रकाश सोळंके...

त्याच दिवशी चेंदवन येथे श्री. राजेंद्र गोपाळ नाईक आणि इतर दोघे यांनी पाच होड्यांव्दारे 3.50 ब्रास वाळू उत्खनन केल्याबद्दल गुन्हा रजिस्टर क्रमांक 13/2010, दिनांक 29.8.2010 अन्वये फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, याच नदीच्या किनाऱ्यावरील सरमळ गावातील ग्रामस्थ हायकोर्टामध्ये गेले होते, हे खरे आहे काय ? हायकोर्टाचा काय निर्णय झाला ?

**उप सभापती** : हा प्रश्न वेगळा आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे.

**उप सभापती** : हा वेगळा प्रश्न आहे. आता कदाचित माननीय मंत्री महोदयांकडे उत्तर नसेल तर याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याबद्दलची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, अजूनपर्यंत आपल्या जिल्ह्यामध्ये वाळूचे लिलाव झालेले नाहीत. ते लिलाव प्रत्यक्ष केव्हा होणार आहेत ? तिलारी खाडीच्या ठिकाणी एक प्रश्न निर्माण झाला आहे. त्या ठिकाणी गोव्यातील लोक बेकायदेशीर वाळू काढत आहेत. त्या ठिकाणी नेमकी आपली हद्द आहे की, गोव्याची हद्द आहे ? त्या ठिकाणी पोलीस अंगावर येण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. दोन दिवसापासून तसे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबतीत शासनाची काय भूमिका असणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मध्यंतरी हायकोर्टाचा स्टे असल्यामुळे संपूर्ण राज्यातील वाळूच्या लिलावाची प्रक्रिया थांबली होती. परंतु आता कालच आम्ही त्यासंदर्भात बैठक घेऊन राज्यातील जे संपूर्ण वाळू पट्टे आहेत त्यांच्या लिलावाची प्रक्रिया 15 जानेवारीपर्यंत संपूर्णतः पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी वाळूच्या लिलावाची प्रक्रिया चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा उपस्थित केला की, गोव्यातील काही लोक अनधिकृतपणे होड्या घेऊन वाळूची तस्करी करतात. तसे काही प्रकार निश्चितपणे आढळून आले आहेत. त्याबाबतीत सुध्दा योग्य ती कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

ता. प्र. क्र. 10269 ....

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, याच अनुषंगाने एक प्रश्न असा आहे की, डुबी मारुन रेती काढणाऱ्या वाळू उत्पादकांची संख्या मोठी आहे. त्यांचे पट्टे गेल्या सहा महिन्यांपासून बंद आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील दासगाव मधील श्री. दीपक तुकाराम जाधव याने दुर्दैवाने आत्महत्या केली. कारण सहा महिने त्याचे सर्व कामकाज बंद होते आणि अतिवृष्टीमुळे त्याचे घर उद्ध्वस्त झाले. ज्यावेळी रायगड जिल्हा, ठाणे जिल्हा येथील जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली तेव्हा असे सांगण्यात आले की, त्यांनी केव्हाच शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत. त्यामुळे तातडीने हे लिलाव सुरु करणे आवश्यक आहे. डुबी मारुन रेती काढणारे लाखो लोक आहेत. त्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात शासन काय करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. डुबी मारुन वाळू काढण्याचा व्यवसाय जे लोक करतात त्यांच्यासाठी सुध्दा रेती लिलावाची जी प्रकरणे होती ती बंद झाली होती. परंतु आम्ही कालच बैठक घेतलेली आहे आणि निश्चितपणे 10 दिवसांमध्ये जे डुबी मारुन वाळू काढतात त्यांच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मे. नॅशनल स्टोन क्वॉरी ठाणे या कंपनीविरुध्द दिलेल्या चौकशीच्या आश्वासनाबाबत**

**(६) * ९१९४ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता : तारांकित प्रश्न क्रमांक ६९०४ ला दिनांक १९ जुलै, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीने मौजे माजीवडे (जि.ठाणे) येथील केंद्र शासनाच्या अंगिकृत असलेल्या सर्व्हे नं. १९४/१ जागेवर भाडेपट्टीची कोणतीही नोंद नसतांनाही अनधिकृतपणे वापरल्याबाबतच्या प्रकरणाची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन शासनाने दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चर्चेच्यावेळी सर्व्हे नं. १९४/१ वरील जागेवर होत असलेल्या बांधकामास स्थगिती देऊन केंद्र शासनाचे संबंधित अधिकारी, मध्यप्रदेश सरकारचे संबंधित अधिकारी व कंपनीचे अधिकारी यांची एकत्रितरित्या बैठक घेण्याचे आश्वासन शासनाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अनधिकृत बांधकामाबाबत विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यासाठी संबंधित राज्यांच्या अधिकाऱ्यांची किती वेळा बैठक आयोजित करण्यात आली होती,

(४) तसेच, विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशीचे व बैठकीत झालेल्या चर्चेचे निष्कर्ष काय आहेत,

(५) तसेच, त्या अनुषंगाने मे.नॅशनल स्टोन क्वॉरी या कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, परंतु प्रश्नाधीन जागेवर होत असलेल्या बांधकामाच्या अनुषंगाने विधानमंडळात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चेच्या वेळी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी त्यामध्ये आपल्या राज्याचे अधिकारी दोषी असतील तर चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, तर तत्कालीन मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी विभागीय आयुक्तांमार्फत यांची चौकशी करण्यात येईल. ज्या अधिकाऱ्याने हे काम केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. या प्रकरणी निर्णय होईपर्यंत खरेदी विक्रीस स्थगिती दिलेली आहे. सदरचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल अशी आश्वासने दिली होती.

(३),(४),(५) व (६) प्रश्नाधिन विषयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही. परंतु याबाबत उपविभागीय अधिकारी, ठाणे, दि.प्रॉव्हीडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी, मे.नॅशनल स्टोन क्वॉरी यांचे प्रतिनिधी, सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका व सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१, ठाणे यांची संयुक्त बैठक तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांचेकडे दिनांक ११/०८/२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये प्रश्नाधीन मिळकतीचे व्यवस्थापन मध्य प्रदेश सरकारतर्फे प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी पहात असून याबाबत मध्यप्रदेश सरकार व गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये पत्रव्यवहार झाला आहे. या मिळकतीबाबतचा

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. 9194 .... **श्री. प्रकाश सोळंके, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता....**

विकास आराखडा मंजूर करण्यापूर्वी ठाणे महानगरपालिकेने त्यांचे संबंधित अधिकारी मध्यप्रदेश शासनाकडे पाठवून या पत्र व्यवहाराची खातरजमा करुन या विकास आराखड्यास मंजूरी दिली आहे. तसेच मध्यप्रदेश सरकारने प्रश्नाधीन मिळकत भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार दि.प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनीस असल्याचे दिनांक १२/०६/२००२ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविले होते. त्यामुळे प्रश्नाधीन मिळकती मध्ये असणाऱ्या बांधकामास स्थगिती देण्यासंदर्भात राज्य शासनास कोणताही Locus - Standie नसल्याने सदर बांधकामास शासनाने दिलेली स्थगिती कायदेशीरदृष्ट्या योग्य नसल्यामुळे ती उठविण्यात यावी व त्यानुषंगाने जिल्हाधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी अशा सूचना तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी सदर बैठकीत दिल्या होत्या. त्यानुसार तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त शासनाच्या दिनांक ३१/०८/२००९ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक त्या कार्यवाहीकरिता संबंधितांकडे पाठविण्यात आले आहे.

सभापती महोदय, छापलेल्या उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये, 'होय, हे खरे आहे' असे छापले आहे त्याएवेजी 'होय, हे अंशत: खरे आहे' असे वाचावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या उत्तरामध्ये आणखी एक दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. आम्ही प्रश्न विचारताना नॅशनल स्टोन क्वॉरीबद्दल विचारलेला आहे आणि या ठिकाणी छापील उत्तर देताना मे. कॉसमॉस स्टोन क्वारी ठाणे, या कंपनीविरुध्द दिलेल्या चौकशीच्या आश्वासनाबाबत असे छापले आहे. आम्ही नॅशनल स्टोन क्वॉरीबद्दल विचारले आहे आणि शासनाने कॉसमॉस स्टोन क्वारी असे लिहिले आहे. ही प्रिंटींग मिस्टेक आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ही प्रिंटींग मिस्टेक नाही. प्रश्न विचारताना तारांकित प्रश्न क्रमांक 6904 ला दिनांक 19 जुलै, 2010 रोजी दिलेलया उत्तराच्या संदर्भात असा संदर्भ दिलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9194... श्री.प्रकाश सोळंके....

6094 हा प्रश्न कॉसमॉस क्वॉरीसंबंधीचा असून नॅशनल क्वॉरीसंबंधी नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न या सभागृहात तिस-यांदा आलेला आहे. ही जागा ग्वाल्हेर संस्थानिकांची होती. त्या संस्थानाचे विलिनीकरण झाल्यानंतर ती जागा भारत सरकारची झाली. त्यानंतर भारत सरकारने केवळ देखरेखीसाठी प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनीला जागा दिली. खरे तर या कंपनीने भारत सरकारची परवानगी घेणे आवश्यक होते. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी प्रधान सचिव, महसूल यांना पत्र लिहिले. विभागीय आयुक्तांनी चौकशी करावी व भारत सरकारकडे पत्र व्यवहार करावा असे मागील प्रश्नाला लेखी उत्तर देण्यात आले होते. या वेळच्या उत्तरामध्ये मात्र थोडी विसंगती दिसून येते. मध्य प्रदेश सरकार व गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये पत्र व्यवहार झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, त्यावेळी विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल असे सभागृहात आश्वासन देण्यात आले होते त्याप्रमाणे शासनाने चौकशी का केली नाही ? मध्य प्रदेश सरकारने दिनांक 13.6.2002 चे पत्र बोगस असल्याचे म्हटले आहे अशी आमची माहिती आहे. आपल्या राज्याचे मुख्य सचिव व मध्य प्रदेश सरकारच्या मुख्य सचिवांकडून या पत्राची सत्यता तपासून घेतली जाईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, खरे म्हणजे या सभागृहात 2-3 वेळा हा प्रश्न आला होता. पूर्वीच्या तारांकित प्रश्न क्रमांक 50316 ला तत्कालीन महसूल मंत्र्यांनी उत्तर देताना कबूल केले होते की, शासनाच्या वतीने सर्व संबंधितांची बैठक घेऊन कागदपत्रांची तपासणी करुन याबाबत निर्णय घेतला जाईल. त्यानुसार तत्कालीन महसूल मंत्र्यांनी दिनांक 11.8.2009 रोजी सर्व संबंधितांची ठाणे जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली आणि सगळी बाजू समजावून घेतली होती. मागील प्रश्नाच्या अनुषंगाने जी स्थगिती दिली होती ती त्यांनी उठविली आणि पुढील कार्यवाही करण्यासंबंधी जिल्हाधिका-यांना आदेश दिले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या बैठकीला कोणकोण हजर होते, प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनीचे व भारत सरकारचे प्रतिनिधी यांना त्या बैठकीला बोलविले होते का ?

2....

ता.प्र.क्र.9194......

श्री.प्रकाश सोळंके : जिल्हाधिकारी, ठाणे, प्रॉव्हिडंट इन्व्हेस्टमेंट कंपनी, जिल्हा ठाणे, भारत सरकारचे प्रतिनिधी तसेच नॅशनल स्टोन क्वॉरी यांचे प्रतिनिधी, सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे महानगरपालिका व सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-1, ठाणे हे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : या बैठकीत जिल्हाधिका-यांना आदेश दिले होते. परंतु जिल्हाधिका-यांनी शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे आणि अजूनपर्यंत जिल्हाधिका-यांना शासनाकडून मार्गदर्शन मिळालेले नाही. त्यांना मार्गदर्शन मिळाले असेल तर होय म्हणावे, मिळाले नसेल तर नाही म्हणावे.

श्री.प्रकाश सोळंके : तत्कालीन महसूल मंत्र्यांनी संबंधितांची बैठक घेतली होती. त्यातून सर्व कायदेशीर बाजू पुढे आल्या. त्यामुळे या प्रकरणाला जी स्थगिती दिली होती ती मंत्री महोदयांनी उठविली आणि जिल्हाधिका-यांना पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**चासोळे बु (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथे भूकंप मोजमापक यंत्र बसविणेबाबत**

**(७) * ९२९० श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.केशवराव मानकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चासोळे बु. (ता.मुरबाड, जि.ठाणे) परिसरातून वाहणाऱ्या काळु नदीलगतच्या डोंगरावर भूकंपसदृश धक्क्यापासून लांब-रुंद भेगा पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना चासोळे परिसरात भूकंप मोजमापक यंत्र बसविण्याबाबत लेखी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीनुसार यंत्र बसविणेबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिलेले आहे. मात्र दिनांक २०.९.२०१० रोजी वा त्यासुमारास ठाणे जिल्ह्यात कोणत्याही भूकंपाची नोंद झालेली नाही.

भूकंपाचे मोजमाप भारतीय हवामान खात्यामार्फत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मुरबाड तालुक्याचा हा प्रश्न आहे. काळू, शाई असे निरनिराळे प्रकल्प तेथे सुरु आहेत. त्यामुळे तेथील लोकांच्या मनामध्ये त्या प्रकल्पांसंबंधी शंका आहेत. त्या प्रकल्पामधून त्या लोकांना पाणी मिळणार नाही हा वेगळा प्रश्न आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

ता.प्र.क्र.9290.... श्री. संजय केळकर...

मुरबाड शहरापासून 6 कि.मी. अंतरावर कोलटण पाडा येथे 5 वर्षापूर्वी शासनाने भूकंप मापन यंत्र बसविले होते आणि त्याची रेंज 10 कि.मी. होती. या यंत्राद्वारे किती वर्षापासून भूकंपाची नोंद घेण्यात येत होती ? सध्या हे यंत्र बंद पडल्यामुळे अशा प्रकारची नोंद घेतली जात नाही हे खरे आहे काय ? चासोळ या गावातील कुरशेतवाडी या ठिकाणी भूकंपसदृश हालचालीमुळे काही ठिकाणी भेगा पडल्या होत्या आणि त्याचे पंचनामे देखील केले होते, हे खरे आहे काय ? त्या ठिकाणी लोकांमध्ये एक प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्या ठिकाणी धरण प्रस्तावित आहे. याबाबतीत शासनाचे म्हणणे काय आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : भारतीय हवामान खात्यातर्फे भूकंपाच्या नोंदी ठेवण्यात येतात. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये मौजे चासोळ येथे कोणत्याही प्रकारचा भूकंप झाल्याची नोंद नाही. ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्याच्या परिसरामध्ये ज्या काही भूकंपाच्या नोंदी झालेल्या आहेत त्याबाबतीत तेथील स्थानिक रहिवाशांकडे विचारणा करण्यात आली असता आमच्या डोंगरावर कोणत्याही प्रकारच्या भेगा पडलेल्या नाहीत असे तेथील गावचे सरपंच आणि गावक-यांनी पंचनाम्याद्वारे लिहून दिलेले आहे. त्याठिकाणी भूकंप झाल्याची कोणतीही नोंद शासनाकडे नाही.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील आदिवासी विकास कार्यालयाने सुरु केलेल्या**
**शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटींबाबत**

**(८) * ९४१३ श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.मोहन जोशी , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.राजन तेली , श्री.उल्हास पवार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास कार्यालयाने सुरु केलेल्या सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटींमुळे विद्यार्थी वंचित राहत असल्याच्या मोठ्या तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या दूर करण्याबाबत शासनस्तरावर काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. कपिल पाटील : आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची अतिशय चांगली योजना राबविली जात आहे. ही शिष्यवृत्ती देण्याच्याबाबतीत 2 जाचक अटी घातलेल्या आहेत. पहिली अट म्हणजे या डोंगरद-यातील मुलाना त्यांचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडायचे आहे. अशा दुर्गम ठिकाणी राष्ट्रीयकृत बँक असू शकत नाही. दुसरी अट म्हणजे त्या आदिवासी मुलांनी जात पडताळणी दाखला द्यावयाचा आहे. लंगोटीमधील मुले जात पडताळणी दाखला कोठून देणार. या अटीमुळे मुलांपर्यन्त शिष्यवृत्ती पोहोचत नाही. तेव्हा शाळेच्या मुख्याध्यापकाने दिलेले सर्टिफिकेट ग्राह्य मानले पाहिजे. कारण त्या शाळेमध्ये त्या पाडयावरचेच विद्यार्थी येत असतात. तसेच त्याठिकाणी ज्या पतसंस्थेची शाखा उपलब्ध असेल त्या शाखेत खाते उघडण्याची त्यांना परवानगी दिली पाहिजे. तेव्हा या प्रमाणे या अटी शिथिल करुन त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येईल काय ? तसेच त्यांच्या आश्रमशाळेच्या वेळेमध्ये बदल करण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले. त्याबाबतीत व्यवस्था केली जाईल. मुख्याध्यापकाचा दाखला ग्राह्य मानला जाईल. तसेच ग्रामपंचायतीचा दाखला देखील ग्राह्य मानला जाईल. त्या मुलांसाठी जातपडताळणी दाखल्याची आवश्यकता असणार नाही. आश्रमशाळेची वेळ बदलण्याच्या संदर्भात माझी सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करण्याची तयारी

..3..



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. आश्रमशाळेची वेळ बदल्यामध्ये ब-याच अडचणी आहेत. शिक्षक वेळेवर हजर रहात नाहीत. काही दिवसांनी बायोमॅट्रीक अटेंडन्स लावल्यानंतर वेळ बदलण्याचा विचार करता येईल.

श्री. कपिल पाटील : शिक्षक वेळेवर येत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : आम्ही काही सुधारणा करीत आहोत. काही दिवस जाऊ द्या. आश्रमशाळेत शिक्षक आले पाहिजेत, मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे वेळमध्ये बदल करण्यासाठी वेळ लागणार आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9413....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे ही शिष्यवृत्ती दोन ते तीन टप्प्यामध्ये दिली जाते. ही शिष्यवृत्तीची रक्कम एकाच टप्प्यात देता येणार नाही का? जातीच्या दाखल्यासंबंधी पंचायत समितीने दाखला दिला तरी तो ग्राह्य धरुन वेळेवर शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याची व्यवस्था करण्यात येईल काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते बरोबर आहे. शिष्यवृत्ती ही हजेरीवर दिली जाते. हजेरी महत्वाची असते. गळतीचे प्रमाण वाढत होते. ते प्रमाण कमी व्हावे म्हणून ही शिष्यवृत्ती सुरु करण्यात आली. यासाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तीन टप्प्यात ही रक्कम दिली जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे दिपावलीपर्यंतची पूर्ण हजेरी ग्राह्य धरुन पूर्ण रक्कम देण्याची व्यवस्था करु. यासाठी बँकेच्या खात्याची अट होती ती अट शिथील करुन यापूर्वी खाते उघडले असेल तर ठीक आहे, अन्यथा खाते उघडले नसल्यास रोख रक्कम देण्याची व्यवस्था केली जाईल. जातीच्या दाखल्याबाबत निर्णय घेतलेला आहे. त्या शाळेचे हेडमास्तर किंवा ग्रामपंचायतीने दाखला दिला तरी तो मान्य करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सन्माननीय सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबतचा हा विषय आहे. माननीय मंत्रीमहोदयांना मी धन्यवाद देतो, त्यांनी जातीच्या दाखल्याची पडताळणी करण्याची अट शिथील केली आहे. ग्रामपंचायत किंवा हेडमास्तर यांनी दाखला लिहून दिला तरी तो मान्य करण्याचे कबूल केले आहे. सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे शिष्यवृत्तीसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली नसून पुरवणी मागण्यांद्वारे फक्त 180 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 1 ते 4 थी, 5 वी ते 7 वी आणि 8 वी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळया प्रमाणात शिष्यवृत्तीची रक्कम मिळणार आहे. 1 ते 4 थी, 5 वी ते 7 वी आणि 8 वी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती आहे? जी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे त्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य कोणते निकष ठरविले आहेत? ही शिष्यवृत्तीची रक्कम किती दिवसात दिली जाईल?

..2..

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा शिक्षण क्षेत्राविषयी फार चांगला अनुभव आहे. शिष्यवृत्ती सुरु करण्याचे कारण हेच होते की, गळतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत होते. या प्रश्नाचा अभ्यास केल्यानंतर लक्षात आले की, मुलांना शाळेत पाठविण्याऐवजी जनावरे सांभाळण्यासाठी, लहान मुलांना सांभाळण्यासाठी किंवा सरपण आणण्यासाठी घरी ठेवून घेतले जाते. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम पालकांच्या हाती पडत होती. या मुलांकडून छोटी छोटी कामे करुन घेण्यापेक्षा मुलांच्या कामाचा मोबदला म्हणून पैसे दिले तर ती मुले शाळेत येतील हा उद्देश आहे. याचा चांगला परिणाम झालेला आहे. 1 ते 4 थी पर्यंत गळतीचे प्रमाण 59 टक्के होते ते आता 3 ते 4 टक्क्यावर आलेले आहे. या योजनेचा फायदा झ

ाला आहे. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांची संख्या किती असा प्रश्न विचारला आहे. एकूण विद्यार्थ्यांची संख्या 13, 41, 739 असून त्यापैकी 1 ते 4 थी मध्ये 7,05, 266 असून 5 वी ते 7 वी मध्ये 3,67, 861 तर 8 वी ते 10 मध्ये 2,68,612 इतके विद्यार्थी आहेत. इतर अटी ज्या आहेत त्यामध्ये एकूण हजेरीपैकी किती दिवसांची हजेरी लागली पाहिजे तद्वत जातीच्या दाखल्याबाबत निर्णय घेतला आहे. ज्यावेळी शाळेत नाव घातले जाते त्यावेळी दाखल्यावर जात लिहिली जाते. त्यामुळे वेगळे काही करण्यापेक्षा तो दाखला मान्य केला आहे. सन्माननीय सदस्यांनी 200 कोटी ऐवजी 180 कोटी रुपये तरतूद केली असल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. या योजनेसाठी 180 कोटी रुपयांची तरतूद असून मुलींसाठी वेगळी 20 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे एकूण 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सुवर्णजयंती महोत्सवी वर्षात पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेतील जातीच्या दाखल्याची अट शिथील केल्याबद्दल मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो. शालेय शिक्षण विभागाने मुलींच्या शिष्यवृत्तीमध्ये 100 रुपयांवरुन 150 रुपये इतकी वाढ केली आहे. आदिवासी विकास विभागाने याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ केली आहे काय? नसल्यास शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्यात येईल काय? या मुलांच्या शाळेचे वेळापत्रक बदलणे आवश्यक आहे. सकाळपासून रात्री 8.30 वाजेपर्यंत ही लहान मुले शाळेत उपस्थित राहू शकत नाहीत. त्यांच्या शाळेचे वेळापत्रक सर्वसामान्य शाळेप्रमाणे असले पाहिजे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही शिष्यवृत्ती सुवर्ण जयंती महोत्सवाच्या निमित्ताने मुद्दाम सुरु केली आहे...........

नंतर 3एम.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9413......... श्री. बबनराव पाचपुते ....

मुलांनी शाळेत यावे आणि आदिवासींच्या मुलांनी शिक्षण घ्यावे हाच त्यामागचा उद्देश आहे. त्याचे परिणामही चांगले समोर आले आहेत. अशा प्रकारे या योजनेच्या माध्यमातून 12 लाख 41 हजार 760 मुलांचा फायदा होतो ही वस्तुस्थिती आहे. त्याशिवाय शालेय शिक्षणाची योजना बंद न करता ती सुध्दा चालू ठेवून त्यातूनही या मुलांना मदत केली तरी आमची हरकत नाही. तसेच शिष्यवृत्ती वाढीच्या संदर्भात मंत्रिमंडळासमोर आम्ही गेलो आहोत. यामध्ये पहिली ते चवथी पर्यंतच्या मुलांना 1000 रुपये, पाचवी ते सातवीच्या मुलांना 1500 रुपये आणि आठवी ते दहावीपर्यंतच्या मुलांना 2000 रुपये शिष्यवृत्ती आपण देत आहोत. मुलींसाठी जी शिष्यवृत्ती आपण देत होतो ती आता नव्याने देण्याची गरज नसून यामध्येच ती समाविष्ट केलेली आहे.

---------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चिंचणी (ता.कडेगांव, जि. सांगली) येथील तलावासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्यांना त्याचा मोबदला मिळण्याबाबत**

**(9) *9086 श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चिंचणी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील तलाव 20 वर्षापूर्वी बांधला असून गेल्या 5 वर्षापूर्वी पुन्हा त्याची उंची वाढविण्यासाठी तेथील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी संपादीत केल्या, शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनी सध्या पाण्याखाली असून त्या शेतकऱ्यांच्या सातबारावर असल्याने त्यांना जमिनीही नाहीत व मोबदलाही नाही असा प्रकार घडल्याचे माहे सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन तेथील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग, विटा यांचेकडे कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह विभाग क्र.1 या संपादक मंडळाचा चिंचणी (अंबक) 1.5 मि.वाढीव सुधारीत बुडीत क्षेत्रासाठी संपादन एसआर नं.19/97 ने सुरु होता. त्याचा अंतिम निवाडा दिनांक 10/6/2002 रोजी प्रसिद्ध झालेला असून एकूण संपादनाखालील क्षेत्र-11 हेक्टर 02 आर असून निवाड्याप्रमाणे एकूण निवाडा रक्कम रु.38,58,074/- इतक्या रकमेचा असून त्यामध्ये आस्थापना खर्चाची रक्कम रु.1,12,371/- एवढी आहे. तर नुकसान भरपाई रक्कम रु.37,45,703/- होत असून यापैकी रक्कम रु. 35,63,552/- हे सन 2004 मध्ये वाटप करण्यात आलेले आहे. तर उर्वरित खातेदारांना नुकसान भरपाई रक्कम घेऊन जाण्याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. मात्र खातेदारांनी नुकसान भरपाई रक्कम नेली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9086...........

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील हा प्रश्न असून मौ. चिंचणी या ठिकाणी 30 वर्षापूर्वी पाणी अडवा, पाणी जिरवा या योजनेच्या माध्यमातून हा पाझर तलाव घेण्यात आला होता. दरम्यानच्या काळात कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून ताकारी योजनेतील 200 क्युसेस पाणी या तलावात सोडण्याची कल्पना पुढे आली व त्यासाठी जमीन संपादित करण्यात आली. परंतु या संपादित जमिनीचा मोबदला दिला गेला नाही. त्याचबरोबर दुसऱ्याच एका जमिनीतून गरज नसताना नवीन कॅनॉल काढण्यात आला. या जमिनीचा मोबदला अद्यापही दिला गेला नाही. या भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती अशी आहे की, 7/12 वर त्यांची जमीन दाखविली पण ती कॅनॉलखाली गेलेली आहे. माझा या निमित्ताने प्रश्न असा आहे की, या कॅनॉलमधून सध्या पाणी सोडले जात नाही, कारण तो कॅनॉल अर्धवट ठेवण्यात आलेला आहे. तसेच त्याला 31 दरवाजे काढण्यात आले. अशा प्रकारे वापर नसताना आणि गरज नसताना हा कॅनॉल का काढण्यात आला ? संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापही दिला गेला नाही व या कॅनॉलसंबंधीच्या विविध तक्रारींची दखल न घेण्याची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, संपादन मंडळ कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह क्र.1, सांगली यांनी दि. 27.3.1999 अन्वये जी अधिसूचना प्रसिध्द केली होती. त्यामध्ये 11 हेक्टर 2 आर जमिनीचा निवाडा रु. 38.58 लाखाचा जाहीर करण्यात आला होता. त्यापैकी 34 लाख एवढ्या रकमेचा मोबदला शेतकऱ्यांना वाटप करण्यात आला असून 1.82 लाख इतका मोबदला घेऊन जाण्याबद्दल शेतकऱ्यांना जानेवारी, 2004 मध्ये नोटिसेस पाठविण्यात आल्या आहेत. परंतु ती रक्कम घेऊन जाण्यासाठी शेतकरी अद्यापही आलेले नाहीत म्हणून पुन्हा 28.11.2010 रोजी नोटिसेस पाठविण्यात आल्या व ज्यांचा मोबदला शिल्लक आहे त्यांना तो घेऊन जाण्याचे कळविले आहे.

---------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषद पशुसंवर्धन समितीमार्फत प्रस्तावांना मंजूरी देऊनही शेळी गट गायब झाल्याबाबत

**(10) *9800 श्री.परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्हा परिषद, पशुसंवर्धन समिती मार्फत 289 प्रस्तावांना मंजूरी देऊन त्यातील 3 लाभार्थीकडील शेळीगट गायब झाल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, 2010 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर शेळीगट देवगड तालुक्यातील मणचे, हिंदळे, दहिबाव या ठिकाणाच्या तपासणीत आढळले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, अशा प्रकारे अन्य तालुक्यातील शेळीगट बोगस वाटप झाल्याचाही संशय नागरिकांत निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग पशुसंवर्धन समितीमार्फत 50 शेळी गट प्रस्तावांना सन 2009-10 या आर्थिक वर्षात मंजूरी देऊन देवगड तालुक्यातील मणचे, हिंदळे, दहिबाव येथील 3 लाभार्थ्यांकडील शेळी गट जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर 2010 त्रैमासिक तपासणी काळात भात शेतीमुळे राखणी करीता देण्यात आल्या होत्या.

(3) नाही.

त्रैमासिक तपासणी अहवालानुसार इतर लाभार्थ्यांकडील शेळीगट आढळून आले आहेत.

(4) याबाबत पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती देवगड, जि.सिंधुदूर्ग यांनी चौकशी केली असून भात कापणी नंतर लाभार्थीकडील शेळीगट घरी आणणार आहेत.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9800...

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोद, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून शेळी गटाचे वाटप करण्यात आले होते. त्यातील काही शेळी गट वाटण्यामध्ये तक्रारी झाल्या होत्या. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "या शेळया राखण्यासाठी देण्यात आल्या होत्या." लाभार्थ्यांना शेळया राखण्यासाठीच दिल्या जात असतात. लाभार्थ्याने या शेळया दुसरीकडे राखण्यासाठी द्यावयाच्या नसतात. परंतु या ठिकाणी शेळया राखण्यासाठी देण्यात आल्या होत्या असे उत्तरात म्हटलेले आहे. त्यामुळे या शेळया नंतर दाखविण्यात आल्या हे खरे आहे काय ? यातील 3 शेळया वाघाने मारल्याचे दाखवण्यात आलेले आहे परंतु या तीन शेळया वाघाने मारल्याचा पंचनामा वनविभागाकडे नाही हे खरे आहे काय ? या योजनेतून जी काही कपाटे वाटण्यात आली होती त्या योजनेमध्ये सुध्दा अशाच प्रकारचा घोळ झाला होता हे खरे आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जिल्हापरिषद, सिंधुदुर्गच्या सेस फंडातून या ठिकाणच्या गावांमध्ये शेळीवाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. 50-50 गट या पध्दतीने शेळीचे वाटप झाले होते. या ठिकाणच्या लाभार्थ्यांना एक शेळी व एक बोकड या प्रमाणे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले होते. या भागात भाताची शेती केली जात असल्यामुळे या ठिकाणच्या पध्दतीनुसार लाभार्थ्यांनी आपल्या शेळया दुसरीकडे चारावयास दिल्या होत्या. या पध्दतीने या ठिकाणच्या 2 लाभार्थ्यांच्या शेळया राखण्यासाठी देण्यात आल्या होत्या. यासंदर्भातील चौकशी विस्तार अधिका-यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन दोनदा केली होती. शासनातर्फे शेळयांचे वाटप होतांना शेळयांच्या कानाला टॅपींग केले जात असते त्यामुळे यासंदर्भातील पडताळणी देखील करण्यात आली होती. या लाभार्थ्यांनी आपल्या शेळया दुसरीकडे राखण्यासाठी दिल्या होत्या हे पाहणीत स्पष्ट झाले आहे. सदरच्या शेळया लाभार्थ्यांनी दिनांक 6.12.2010 आणि 11.12.2010 मध्ये पुन्हा आपल्या घरी परत आणल्या होत्या. एक महिला लाभार्थीची प्रकृती बरोबर नसल्यामुळे त्यांनी आपल्या शेळया दुसरीकडे राखण्यासाठी ठेवलेल्या आहेत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, शेळयांचे गटवाटप होते त्यामध्ये ब-याच वेळेला लाभार्थ्यांना त्यांच्या गटाच्या शेळया मिळतच नाहीत. ज्यांना शेळया वाटपाचा ठेका मिळालेला असतो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9800...

श्री. रमेश शेंडगे....

तो ठेकेदार आणि अधिकारी मधल्या मध्येच शेळया गायब करीत असतात. मला शासनाला विचारावयाचे आहे की, महाराष्ट्र शासनाचे शेळी-मेंढी विकास महामंडळ असल्यामुळे आपल्याला ज्या काही शेळया-मेंढया द्यावयाच्या असतात त्या शेळया-मेंढया शेळी मेंढी विकास महामंडळा मार्फत दिल्या जाऊ शकतात. त्यामुळे असे जर झाले तर यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ शकणार नाही. त्यामुळे या शेळया मेंढयाचे वाटप शेळी-मेंढी विकास महामंडळाकडून केले जाईल काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ही जिल्हा परिषदेची योजना असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून सदर योजना राबवली गेली होती त्यामुळे ही योजना त्यांच्याच मार्फत राबविणे योग्य होणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी प्रश्न विचारला होता की, या ठिकाणच्या 3 शेळया वाघाने नेलेल्या आहेत अशी तक्रार करण्यात आली होती परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी वाघाने शेळया मारलेल्या नाहीत.

-----------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अहेरी (जि.गडचिरोली) तालुका पंचायत समिती अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार**

**(११) * ९८८८ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि.गडचिरोली) तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांमध्ये अभियंता, जिल्हा परिषद यांनी मोठ्याप्रमाणात केलेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीची नागरिकांनी सभापती, जिल्हा परिषद बांधकाम विभाग व आरोग्य विभाग यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियंता, जिल्हा परिषद यांनी केलेल्या गैरव्यवहार प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ,श्री.जयंत पाटील यांच्या करिता** : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देतांना असे घडलेलेच नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. हे भ्रष्टाचाराचे प्रकरण आहे. यासंदर्भात आम्ही निवेदन दिलेले असून या निवेदनाची प्रत आमच्याकडे आहे तसेच निवेदन मिळाल्याची सही देखील आहे. असे असतांना विभागाकाडून असे उत्तर आलेले आहे की, "निवेदनच मिळालेले नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही". त्यामुळे हे नेमके काय प्रकरण आहे ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9888.....

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्या पत्राचा उल्लेख करीत आहेत ते पत्र आमच्याकडे प्राप्त झालेले नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील पत्राची प्रत माझ्याकडे द्यावी. आम्ही त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करु.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विशेषत: मराठवाडा, विदर्भ व कोकण विभागातील काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीने शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे त्या ठिकाणी ओला दुष्काळ जाहीर करुन नुकसान भरपाई देणेबाबत**

**(12) * 9559 श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण , श्री.विनायकराव मेटे , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , श्री.हुसेन दलवाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.संजय दत्त , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.धनंजय मुंडे , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.राजन तेली , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.कपिल पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मराठवाडा विभागातील विशेषत: पोत्रा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) व बीड जिल्ह्यात तसेच विदर्भातील विशेषत: चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे कित्येक तलाव फुटून आणि विदर्भातील 68 तालुक्यांपैकी 61 तालुक्यांमध्ये त्याचप्रमाणे कोकणामध्येही कापूस सोयाबीन, मूग व तांदूळ इत्यादी पिके तसेच कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यात शेती व बागायती सन 2010 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नष्ट झाल्याने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करुन त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी तसेच विदर्भ जन आंदोलनाच्या नेत्यांनी राज्य शासनाकडे मागणी केली आहे व यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस व ज्वारीची पिके नष्ट झाली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, दुबार पेरणी करण्यासाठी पुन्हा बियाणे देणे, शेती पिकांच्या व बागायतीच्या नुकसानीची भरपाई देणे, कित्येक शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्जे घेतलेली असल्याने कर्जाच्या परतफेडीतून त्यांना सुट देणे, तसेच नुकसान भरपाई देण्याचे निकष बदलण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1), (2) व (3) होय, मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9559.....

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, मराठवाडा विभागातील बीड जिल्हा तसेच विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे तलाव फुटले. त्यामुळे विदर्भातील 68 तालुक्यांपैकी 61 तालुक्यांमध्ये शेतीचे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे कोकणात कापूस, सोयाबीन, मूग, तांदूळ इत्यादी पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले आहे. तेव्हा या नुकसानीबाबत शासन कोणती मदत करणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा अतिशय व्यापक प्रश्न आहे. कारण कोकण, मराठवाडा आणि विदर्भ याठिकाणी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या संदर्भात मदत करण्याची घोषणा सभागृहात झालेली आहे. कृषी आयुक्तांना पंचनामे करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यांच्याकडून पंचनाम्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. आजच माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या उप समितीची बैठक होणार आहे.या बैठकीमध्ये झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय होणार आहे. त्याप्रमाणे शेतक-यांना मदत दिली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे, परंतु त्यानंतर जमिनीत ओलावा जास्त असल्यामुळे नंतर पीक घेता येणार नाही, त्याबाबतची नुकसान भरपाई शासन देणार काय असा प्रश्न विचारला होता. तेव्हा शासन त्याबाबत पंचनामे करणार आहे काय ? कोकणातील जमिनीमध्ये जास्त ओलावा असल्यामुळे वाल, कलिंगड, हरभरा इत्यादी पिके आता घेता येणार नाहीत. याबाबत पंचनामे करण्याचे आदेश देणार आहात काय ? मी काल अलिबाग येथील तहसील कार्यालयात गेलो होतो. त्यांनी मला सांगितले की, आमच्याकडे पंचनामे करण्याबाबतचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. तेव्हा आम्ही पंचनामे करणार नाही. तेव्हा शासन फेर पंचनामे करण्याचे आदेश देईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात अवकाळी पाऊस झाला. या पावसामध्ये उभ्या पिकाचे नुकसान झाले. यामध्ये भात शेती, कापूस, हरभरा, फळबागा इत्यांदीचे नुकसान झाले. या संदर्भात पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे पंचनाम्याचा

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9559.....

श्री.प्रकाश सोळंके.....

अहवाल प्राप्त झालेला आहे. नुकसानीचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, ओल्या जमिनीचे पंचनामे करण्याचे आदेश देता येत नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पाऊस झाल्यामुळे शेतीचे नुकसान झाले. त्याचे पंचनामे करण्यात आले. परंतु आजही कोकणात डिसेंबर महिन्यात पाऊस पडत आहे. तेथील शेतकरी पंचनामे करण्याची मागणी करीत आहे. तेव्हा त्याठिकाणी पुन्हा फेर पंचनामे करण्याचे आदेश देण्यात येतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे जे शेतीचे नुकसान झाले त्या संदर्भात पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पंचनामे झाले असून त्याबाबतचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. शासन नुकसानी संदर्भात आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आमच्याकडे डिसेंबर महिन्यात पाऊस झाला. त्यामुळे नुकसान झालेले आहे. या संदर्भातील माहिती घेऊन त्याप्रमाणे आदेश देण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल देखील हाच प्रश्न विचारला होता आणि आता देखील तोच प्रश्न विचारत आहे. काही जिल्ह्यांमध्ये विशिष्ट पिकांचे पंचनामे करावेत असे आदेश आहेत. सरसकट पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश काही जिल्ह्यांमध्ये दिलेले नाहीत. उदाहरण सांगावयाचे झाले तर अकोला जिल्ह्याचे देता येईल. अकोला जिल्ह्यातील हरभरा आणि अन्य एका पिकाचे पंचनामे करण्याचे आदेश दिलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात कापूस, ज्वारी व सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणावर येते.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9559...श्री.पांडुरंग फुंडकर..

या तीन पिकांचे नुकसान झालेले आहे तेव्हा या पिकांचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश जो पर्यत शासन देणार नाही तो पर्यत जिल्हाधिकारी पंचनामे करणार नाहीत म्हणून शासन सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : उभ्या पिकांचे पंचनामे करण्याच्या बाबतीत सरसकट आदेश देण्यात आलेले आहेत त्या आदेशाची प्रत माझ्याकडे आहे. ती प्रत मी आपल्याकडे देण्यास तयार आहे.त्यामध्ये कोणतेही पीक वगळण्यात आलेले नाही.

श्री.हुसेन दलवाई : माननीय मंत्र्यांनी " उभ्या पिकांचे पंचनामे " असा शब्द वापरलेला आहे.अवकाळी पावसामुळे कोकणातील सर्व पिके आडवी झालेली आहेत. कडधान्याचे नुकसान झालेले आहे फळबागाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे.माननीय मंत्र्याना याबाबत काय म्हणावयाचे आहे. पंचनामे करण्यासंबंधी अजूनही आदेश गेलेले नाहीत तेव्हा हे आदेश देण्यात येणार आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : कोकणामध्ये आणि विदर्भामध्ये धानाचे पीक मोठया प्रमाणावर घेतले जाते. त्याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यानी घोषणा केलेली आहे की त्या पिकाची जरी कापणी झालेली असेल व ते नुकसान झालेले पीक शेतामध्ये किंवा घरी आणलेले असेल तर त्याचेही पंचनामे करण्यात येतील त्याप्रमाणे पंचनामे झालेले आहे.

श्री.रमेश शेंडगे : .अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे अनेक शेळया मेंढया मृत्युमुखी पडलेल्या आहेत.द-याखो-यामध्ये मेंढपाळ शेळया मेंढया घेऊन जातात परंतु त्याच्या मृत झालेल्या शेळया मेंढयाचे पंचनामे केले जात नाही हा प्रश्न माझ्या शिवाय इतर कोणताही सन्माननीय सदस्य विचारत नाही.अमरावती जिल्हयात 14 हजार आणि औरंगाबाद जिल्हयात 11 हजार शेळया मृत्युमुखी पडल्या आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत एका तरी शेळीचा पंचनामा केला असल्याचा अहवाल शासनाकडे आला असल्यास तो मला दाखविण्यात यावा. ज्या मेंढपाळाच्या शेळया मेंढया मृत्युमुखी पडलेल्या आहेत त्यांचे पंचनामे करण्यात यावेत असे अधिका-यांना आदेश देण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके :शेळया मेंढया किंवा जनावरांच्या बाबतीत पंचनामे केले जात नाहीत त्याबाबतीत शासनाने स्टॅडीग ऑर्डर्स दिलेल्या आहेत. ज्यावेळी अतिवृष्टी किंवा अवकाळी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9559... श्री. प्रकाश सोळंके...

पावसामुळे जनावरे मृत्युमुखी पडतील त्यावेळी स्टॅन्डीग ऑर्डसच्या माध्यमातून नुकसान भरपाई दिली जाते.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अडेर, अनारी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) परिसरात**
**एका अज्ञात रोगाने गुरे मृत्युमुखी पडत असल्याबाबत**

**(१३) * १०३६६ श्री.राजन तेली , प्रा.सुरेश नवले , श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अडेर, अनारी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) परिसरात एका अज्ञात रोगाने गुरांचा मृत्यू होत असल्याने, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, तसेच उपरोक्त ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना असूनही पशुवैद्यकीय अधिकारी दवाखान्यात येत नसल्याने, या घटनेत अधिक भर पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अज्ञात रोगाने मोठ्या संख्येने जनावरांचा मृत्यू होत असताना बेफिकीर वागणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत, सदरहू रोगाला आळा घालण्यासाठी तसेच अज्ञात रोगाने मृत्यू पावलेल्या जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर,मधुकरराव चव्हाण यांच्याकारिता**: (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : अडेर, अनारी ता चिपळूण, जिल्हा रत्नागिरी परिसरात अज्ञात रोगाने जनावरे मृत्युमुखी पडलेली नाहीत असे उत्तर देण्यात आलेले आहे पंरतु त्या परिसरात मोठया प्रमाणावर साथ आली होती. कोकणातील 75 टक्के पशुवैद्यक दवाखान्यामध्ये स्टाफ नाही त्या ठिकाणी फक्त इमारती उभ्या आहेत . या ठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे आहे तेव्हा नेमकी वस्तुस्थिती काय आहे आणि कोकणातील पशुवैद्यक दवाखान्यात स्टाफ देण्यात येणार आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : दिनांक 29.9.2010 रोजी रत्नागिरी टाईम्स या वृत्तपत्रात अशी बातमी आली होती की, अडेर आणि अनारी यृा गावामध्ये विचित्र रोगाने जनावरे आजारी झालेली आहेत त्यानुसार सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन आणि जिल्हा पशुसंवर्धन वैद्यकीय अधिका-यांनी तेथे जाऊन भेट देऊन चौकशी केली होती. त्या चौकशीत त्यांना कोणताही साथीचा रोग आढळून आला नाही. त्याचबरोबर अनारी गावच्या सरपंचाचा लेखी दाखला घेतला असून त्यांनी त्यात असे म्हटलेले आहे की, या गावामध्ये जनावरांना साथीच्या रोगाची लागण झालेली नाही.

श्री.हुसेन दलवाई : अनेकदा प्रश्न उदभवत नाही असे उत्तर दिले जाते. एकदा असे उत्तर दिले म्हणजे तो प्रश्न मिटतो काय ?

(नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10366...

श्री. हुसेन दलवाई...

सभापती महोदय, मी सुध्दा चिपळूणचा आहे. याठिकाणी गावाचा उल्लेख "अडेर" असा केला आहे. प्रत्यक्षात तो "अडरे" असा आहे. अडरे, अनारी हा दसपटीचा भाग आहे. प्रश्न असा आहे की, अडरे या गावामध्ये व्हेटर्निटी दवाखाना आहे. परंतु त्याठिकाणी कोणतीही व्यवस्था नाही. त्याठिकाणी किती जनावरांचे पोस्टमार्टेम करण्यात आले, व त्यामध्ये काय आढळून आले?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, त्याठिकाणी जनावरे मेलेली नाहीत, जनावरे आजारी सुध्दा नाहीत तर मग पोस्टमार्टेम करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**उप सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज आपण तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकूण 13 प्रश्न चर्चेला घेतल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरले आहेत. आज राज्याच्या ऊस उत्पादन करणाऱ्या प्रत्येक जिल्हयामध्ये ऊसाला दर मिळण्यासाठी शेतकरी आंदोलन करीत आहेत. नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असल्यामुळे आमच्या महत्वाच्या या विषयावर सभागृहात चर्चा होत नाही म्हणून त्यांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. हे सभागृह बधीर झाले आहे की काय? या सभागृहाला शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत जाणीव होत नाही की काय? अशाप्रकारे शेतकरी विचार करु लागले आहेत. माझी सरकारला विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या ऊसाला 2200 रुपये प्रति टन भाव मिळाला पाहिजे. गेल्या वर्षी 2100 रुपये भाव मिळाला होता. असे असतांना काही कारखाने 1400 रुपये भाव देऊन त्यांचा ऊस गुंडाळण्याकडे त्यांचे लक्ष लागले आहे.

**उप सभापती** : या विषयावर काल सभागृहामध्ये चर्चा झाली आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, फक्त आंदोलनकर्त्यांवर झालेल्या लाठीचार्जबाबत चर्चा झाली आहे....

**उप सभापती** : शासनाने या विषयावर हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे अशी मी शासनाला विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला 10 लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे, ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. हे एक सावकारी प्रकरण आहे. याबाबत माजी मुख्यमंत्र्यांवर ताशेरे ओढण्यात आले आहेत. गेल्या चार वर्षापूर्वी हे प्रकरण मी सभागृहामध्ये उपस्थित केले होते. त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एका आमदारांवर गुन्हे दाखल करु नये अशाप्रकारे पोलीस स्टेशनला फोन केला आणि जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन मुंबईला आपल्या बंगल्यावर बोलावून त्याठिकाणी बैठक घेऊन निर्देश दिले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एसपी ना एक पत्र दिले. ते पत्र मी सन 2006 मध्ये या सभागृहामध्ये वाचून दाखविले होते. पोलीस स्टेशनमध्ये फोन केल्याची नोंद असलेली पोलीस स्टेशनच्या डायरीची नक्कल या सभागृहात मी दाखविली होती. त्या डायरीमध्ये इन्स्पेक्टरने स्पष्टपणे लिहून ठेवले होते की, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून फोन आल्यामुळे सावकार असलेल्या आमदारांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये. त्यांच्याविरुध्द केसेस दाखल करु नये, त्याचप्रकारे बुलढाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्या पत्राव्दारे एस.पी. यांना कळविले की, अशा एक प्रकरणासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर बैठक झाली असून सावकार असलेल्या आमदाराबाबत ज्या ज्या काही तक्रारी असतील त्या बाजूला ठेऊन त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये. तरीसुध्दा राज्य सरकारने याची दखल घेतली नाही. आणि मग ते प्रकरण हायकोर्टामध्ये गेले. त्यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारला 25 हजार रुपये दंड ठोठावला.त्या विरोधात राज्य सरकार सुप्रिम कोर्टामध्ये गेले. त्यावेळी सुप्रिम कोर्टाने 10 लाख रुपयांचा दंड राज्य सरकारवर ठोठावला. यावरुन या सरकारची नामुष्की झाली असल्यामुळे हे सत्य प्रकरण काय आहे हे एकदा या सभागृहासमोर आले पाहिजे. माझी विनंती आहे की, शासनातर्फे या प्रकरणासंबंधी निवेदन झाले पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेसमोर सावकाराला या सरकारने कसे पाठीशी घातले आहे, सावकाराला कसे संरक्षण दिले आहे हे एकदा या राज्यातील शेतकऱ्यांसमोर आले पाहिजे. म्हणून मी विनंती करतो की,आपण याबाबत सरकारला निर्देश द्यावे की आज संध्याकाळपर्यंत सुप्रिम कोर्टाने राज्य सरकारला दंड ठोठावल्यासंबंधीचे निवेदन करण्यात आले पाहिजे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्याची संपूर्ण माहिती गोळा करुन शासनातर्फे निवेदन करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्य सरकारला 10 लाख रुपयांचा दंड झालेला आहे आणि टी.व्ही. चॅनेल्सवर बातमी येत आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, याबाबत संपूर्ण माहिती घ्यावी लागेल. आजच निर्णय झाला असे माननीय विरोधी पक्ष नेते म्हणत आहेत. याबाबत माहिती घेऊन हे अधिवेशन संपण्याच्या आधी याची माहिती सभागृहाला देण्यात येईल.

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी ऊस उत्पादकांच्या संदर्भात आपले लक्ष वेधल्यावर आपण त्याबाबत निदेश दिले की, या प्रश्नावर शासनाने निवेदन करावे, त्याबद्दल मी आपली आभारी आहे. परंतु त्यात प्रश्न असा आहे की, पुणे जिल्ह्यातील जे ऊस उत्पादक शेतकरी आंदोलन करीत आहेत त्यामध्ये अनेक कारखान्यांची तयारी आहे आणि ते 2000 रुपये ते 2200 रुपये पर्यंत पैसे देण्यास तयार आहेत. परंतु दोन साखर कारखान्यांवर दबाव आणल्यामुळे ते देत नसल्यामुळे बाकीच्यांची मुस्कटदाबी चाललेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, निदेश देत असताना पुणे जिल्ह्यातील ज्या साखर कारखान्यांची परिस्थिती उत्तम आहे आणि ज्यांना शेतकऱ्यांना तेवढी उचल देणे शक्य आहे त्यांनी योग्य तो भाव द्यावा, कोणत्याही दबावाला बळी पडू नये. याबाबतचे स्पष्टीकरण सरकारकडून आले पाहिजे. मला उल्लेख करावा लागतो की, आजही बारामती येथे काठेवाडीला शेकडो शेतकरी श्री. शरदराव पवार यांच्या घरासमोर बसलेले आहेत. त्या ठिकाणी धरपकड चाललेली आहे. अनेक लोकांनी जामीन घेण्यास नकार दिलेला आहे. हा प्रश्न जरी एका जिल्ह्याचा नसला तरी पुणे जिल्ह्यात मुस्कटदाबी होता कामा नये याबाबत आपण निर्देश द्यावते.

**उप सभापती** : यासंदर्भात मी निवेदन करण्यास सांगितले आहे त्याप्रमाणे निवेदन करावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आदिवासींना न्याय मिळण्यासाठी जंगल निवासी कायदा सन 2006 मध्ये अंमलात येऊन चार वर्षे होऊनही नवापूर व नंदूरबार जिल्ह्यातील आदिवासींना वन कायद्याप्रमाणे त्या ठिकाणी त्यांना जमिनीचा ताबा मिळालेला नाही. त्यांच्या नावावर जमिनी चढलेल्या नाहीत. म्हणून याच्या विरोधात त्या ठिकाणी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने आज धरणे आंदोलन चालू आहे. तहसील कार्यालयात जेवण करुन सर्व आदिवासी त्या ठिकाणी राहात आहेत. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, हे धरणे उठवून त्यांना ताबडतोब त्याबाबतीमध्ये कार्यवाही करुन त्यांची जमीन त्यांच्याकडे देण्याबाबत आणि त्या जमिनीच्या 7/12 वर त्यांची नावे चढविण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी असे निदेश आपण द्यावेत तसेच जे धरणे धरण्यात आले आहे ते तातडीने उठेल असे सांगावे. कारण जिल्हाधिकारी त्या ठिकाणी कोणतेही आश्वासन देण्यास तयार नाहीत. त्या ठिकाणी बेमुदत धरणे धरत आहेत. जवळजवळ 3 हजार आदिवासी लोकांनी त्या ठिकाणी घेराव घातलेला आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या बाबतीत योग्य माहिती शासनाकडून सभागृहाला सादर करण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादितचे सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003, 2003-2004 व 2004-2005 चे अनुक्रमे एकोणचाळीसावा, चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. सतेज उफ बंटी डी. पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा सन 2006-2007 चा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2007-2008 या वर्षाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा महालेखापाल लेप-II, नागपूरव्दारा आर्थिक वर्ष 2008-2009 करिताचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा चौथा, पाचवा, सहावा व सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : रोजगार हमी योजना समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

ॲड.उषाताई दराडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा पहिला, दुसरा व तिसरा अहवाल (सन 2010-2011) सादर करतो.

**उप सभापती** : पंचायती राज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010-11 या वर्षाच्या अंदाजपत्रकात अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह विभाग व आदिवासी विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबींसंबंधीचा अंदाज समितीचा दुसरा, तिसरा व चौथा अहवाल तसेच राज्यातील मनोरुग्णालयासंबंधीचा पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : अंदाज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

----------

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

**पृ.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे

श्री.हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ; औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जिल्हा बुलढाणा आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरणासंदर्भातील विशेष हक्क समितीचा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

महोदय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जिल्हा बुलडाणा तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव जिल्हा बुलढाणा यांच्यावतीने दिनांक 1 मे, 2007 रोजी आयोजित, शेगांव, जिल्हा बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नवीन इमारतीच्या भुमिपूजनाच्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवर श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांचे नाव न टाकल्यामुळे तसेच त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण न दिल्यामुळे उद्‌भवलेल्या सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विशेष हक्क भंगाच्या व अवमानाचा प्रश्न उपस्थित करणारी सूचना विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक 23 जुलै, 2007 रोजी दिली.

हे प्रकरण माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 251 अन्वये स्वेच्छाधिकाराने दिनांक 4 फेब्रुवारी, 2008 रोजी तपासणीसाठी आणि त्यावर अहवाल सादर करण्यासाठी विशेष हक्क समितीकडे सोपविले.

समितीने श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांची तसेच संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जिल्हा बुलढाणा आणि तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव, जिल्हा बुलढाणा यांची साक्ष नोंदविली.

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.हेमंत टकले....

संसदीय लोकशाही कार्यप्रणालीमध्ये विरोधी पक्ष नेते हे पद अत्यंत महत्वाचे असून या पदाला एक विशिष्ट दर्जा व मान असतो. या पदाला कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा असल्याने राजशिष्टाचाराचे नियम लागू होतात. या बाबींचा समितीने सांगोपांग विचार केला. सूचनाधीन दिनांक 1 मे, 2007 रोजीच्या शासकीय कार्यक्रमात प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांनी श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर न छापून त्यायोगे त्यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यापासून वंचित ठेवल्याचे स्पष्ट झाले. प्रस्तुत प्रकरणातील विषय मा.विधानपरिषद विरोधी पक्ष नेत्यांच्या तसेच सभागृहाच्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या निकषात बसणारा नाही. प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिका-यांकडून शासकीय परिपत्रकातील सूचनांची पायमल्ली झ ाालेली असल्याने त्यायोगे औचित्य भंगाचा मुद्दा निश्चितपणे उपस्थित होतो. त्यामुळे समितीने प्रस्तुत प्रकरण अत्यंत गांभीर्याने घेतले.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

श्री. ज.द.भुतांगे, संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची कोणतीही भूमिका नसल्यामुळे व त्यायोगे त्यांनी कोणताही प्रमाद केल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही. सबब, श्री. ज.द.भुतांगे, संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येवू नये. तथापि, भविष्यात अशा घटनेची पुरावृत्ती टाळण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना लेखी सूचना देऊन दक्षता घेण्याचे कळवावे, अशी समितीने अहवालात शिफारस केली आहे.

तसेच श्री.एम.डी.कुचर, प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जि. बुलढाणा व श्री. मिलिंद वानखेडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव, जिल्हा बुलढाणा यांनी शासकीय परिपत्रकांमधील वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी न करता कर्तव्यात कुचराई केल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार शासनातर्फे तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी समितीने अहवालात शिफारस केली आहे. धन्यवाद !

**उपसभापती** : विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

1) श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी श्री. श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

2) श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

या दोनही प्रकरणावरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम 187(1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त मुदत वाढवून देण्यात यावी."

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहाच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना अशा प्रकारची वागणूक अधिका-यांकडून दिली जात असेल तर मग आमच्या सारख्या आमदारांची काय स्थिती असेल. याबाबतीत शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, अशा घटनांच्या बाबतीत आपण देखील वेळोवेळी निदेश दिलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते हे सिनिअर आहेत. त्यांनी लोकसभा आणि विधानसभेमध्येही काम केलेले आहे. त्यांना योग्य प्रकारची वागणूक मिळत नसेल तर ती बाब गंभीर आहे. तेव्हा असे प्रकार होणार नाहीत याबाबतीत शासनाकडून ठोस आश्वासन मिळाले पाहिजे. येथे येणारे कोणी कायमचे आमदार नसतात, ही जी प्रवृत्ती अधिका-यामध्ये वाढत आहे ती बरोबर नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या म्हणण्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. लोकप्रतिनिधींशी उद्दामपणे वागणा-या अधिका-यांच्या बाबतीत जेव्हा विशेषाधिकार भंगाचे प्रकरण सभागृहापुढे येते त्यावेळी मुदतवाढ घेणे योग्य नाही. रोगावर पटकन इलाज झाला तर रोग वाढत नाही. त्यामुळे अधिका-यांना समज देण्याची कारवाई वेळच्या वेळी आणि तातडीने व्हायला पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. या सभागृहातील सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि

..3..





**उपसभापती**...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदस्य हे तितकेच सन्माननीय आहेत. तेव्हा सगळी प्रकरणे योग्य त्या कारवाईसहीत निकाली काढली जावीत अशी माझी सूचना आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी "केंद्रीय बोर्डाशी संलग्नता घेणाऱ्या संस्थांना नवीन शाळा सुरु करण्यासाठी शासनाकडून परवानगी दिली जात नसून अशा संस्थांना शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जाणे, परंतु ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या शाळांचे प्रस्ताव केंद्रीय बोर्डाने फेटाळले असूनही या शाळा आजही राज्यात सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, भगवान साळुंखे यांनी "शासनाच्या आरक्षण धोरणानुसार सरळ सेवा भरतीसाठी इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी 19 टक्के आरक्षण असून देखील ठाणे जिल्हयात या प्रवर्गासाठी 10 टक्के आरक्षण कमी केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्हयातील थळ (ता.अलिबाग) येथील आरसीएफ कंपनीच्या सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईनमुळे थळच्या मच्छिमारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने सदर पाईपलाईन बदलून अन्यत्र टाकण्याबाबत मच्छिमारांची असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "अँटी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग यांनी दिनांक 11.12.2010 रोजी म्हाडा, महानगरपालिका, सहकार विभागातील 27 अधिकारी व कम्रचारी यांच्याविरुध्द एफआयआर दाखल केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

**उप सभापती**........

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "विदर्भाचा विकास करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मिहान प्रकल्पामुळे पीडित झालेल्या शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मौजे डोंगरगाव, ता.झरी झामणी, जि.यवतमाळ येथील पूर्ण गावाचा इजारा कृष्णाजी ठाकरे यांच्या नावे असलेल्या सर्व्हे नं.50, 53, 54, 55, 56, 57 व 68 मधील जमीन पडीक असल्याचे भासवून गावठाण, गोठान, चराई, स्मशानभूमी, गोदरी वनजंगल, टाकी, पोळा, होळी उत्सव अशा विविध उद्देशांकरिता राखीव ठेवल्याने ठाकरे कुटुंबियांवर सामूहिक आत्महत्या करण्याची आलेली पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "नक्षल ग्रामीण भागातील डोंगराळ भाग, नक्षलवादी कारवाया, वन जमिनींचे संपादनात येणाऱ्या अडचणीमुळे अद्याप 300 गावांना एकही बारमाही रस्ता नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील रेडी पोर्ट बीओटी तत्वावर 95 वर्षाच्या लीजवर देण्याचा करार जॉन अरनेस कंपनीला देऊनही बंदरावर कोणतेही नवीन बांधकाम व वाहतुकदारांना सुविधा न देताही त्यांच्याकडून कर वसूल केला जात असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.विनोद तावडे यांनी "गोंदिया जिल्हयातील 17 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांपैकी 6 प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

..3..

**उप सभापती**........

यांच्यात समन्वय नसल्याने पूर्णपणे बंद असल्यामुळे या योजनेत समाविष्ट असलेल्या 87 गावे व 64 वाड्यातील लोकांना शुध्द पाणी मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर 3व्ही.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .......

यानंतर सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "ठाणे शहराची भौगोलिक वाढ झपाट्याने होत असल्याने गावठाण तसेच शहरालगतचा भाग महापालिकेमध्ये समाविष्ट होत असल्याने हद्दीलगतच्या भागात राहणाऱ्या लोकांना महानगरपालिका व महसूल विभागाकडे दुहेरी स्वरुपात कर भरावा लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचा पहिला हप्ता 2 हजार रुपये मिळावा याकरिता सोमेश्वर साखर कारखान्यावर शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या वेळी पोलिसांनी लाठीमार केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे वि.प.स. यांनी "सातारा जिल्ह्यातील बांगमराठवाडी प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी मेढ, उमरकांचन, घोटील, जाधववाडी, मराठवाडी 1 व 2 या गावांच्या पुनर्विकासासाठी धरणग्रस्तांनी पाटण तहसील कार्यालयासमोर दि. 13.12.2010 पासून आमरण उपोषण सुरु केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील माणगांव-डोंगरगांव येथे भारत निर्माण योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या विहिरींवर आतापर्यंत सुमारे 3 लाख 30 हजार रुपये खर्च होऊन ठेकेदारास जास्त रक्कम अदा करण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपण आता नियम 93 अन्वयेची निवेदने चर्चेसाठी घेत आहोत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, नियम 93 नुसार निवेदनांच्या प्रती अद्यापही आम्हाला मिळालेल्या नाहीत, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मात्र त्या मिळाल्या आहेत.

**उप सभापती** : अशा परिस्थितीत मी काय करु हे कृपया आपणच मला सूचित करावे.

श्री. रामदास कदम : महोदय, माझी अशी सूचना आहे की, नियम 93 च्या निवेदनांवर सभागृहात उद्या चर्चा ठेवावी.

**उप सभापती** : ठीक आहे, माझी काहीच हरकत नाही.

श्री. गोपीकिशन बाजोरिया : महोदय, मागील दहा दिवसांपासून सभागृहात नियम 93 च्या निवेदनांवर चर्चा झालेलीच नाही. आज ती निवेदने मिळाली आहेत परंतु त्यावरील चर्चा उद्या ठेवण्याचे सभागृहात ठरविले जात आहे. माझी विनंती अशी आहे की, ही निवेदने आजच चर्चेला ठेवावीत. कारण माझे एक महत्वाचे निवेदन यामध्ये आहे.

**उप सभापती** : सभागृहानेच मला सांगितले की, ही चर्चा उद्या ठेवावी. तसेच आपली इच्छा असेल तर आपल्यापुरता अपवाद करुन मी आपण विचारलेल्या नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन आले आहे त्यावर चर्चा करण्याची परवानगी देऊ शकतो.

श्री. अनिल देशमुख : महोदय, नियम 93 च्या निवेदनांवर आजच चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : मी सभागृहाला विचारुनच हा निर्णय घेतलेला आहे.

आता पुढील क्रमांकावर असलेला लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती पटलावर ठेवण्याबाबतचा विषय आपण चर्चेसाठी घेत आहोत.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "रेशन दुकानातून बाहेर विक्रीसाठी नेत असलेला माल जप्त करण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री राम पंडागळे व इतर वि.प.स. यांनी दिनांक 7 एप्रिल, 2010 रोजी उपस्थित केलेल्या महाराष्ट्र विधानपरिषद नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

-----

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: ठाणे जिल्हयातील कळवा खाडीवरील शासकीय जमिनीवर होत असलेले अतिक्रमण

**मु.शी.**: ठाणे जिल्हयातील कळवा खाडीवरील शासकीय जमिनीवर होत असलेले अतिक्रमण याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ठाणे शहरातील कळवा खाडीच्या किना-यालगत शासकीय जमिनीवर असलेलया जाकीनगर, फुलेनगर, सायबानगर, जयहिंदनगर या अनाधिकृत झोपडपट्टया तसेच खाडी किनारी खारफुटीच्या जागेवर भराव टाकून वसलेल्या परप्रांतियांच्या झोपडपट्टया तसेच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व एस.टी. वर्कशॉपच्या मागील जागेवर वाढणारी परप्रांतिय वसाहत पाहता कळवा परिसर हा ठाण्यातील धारावी म्हणावा इतका झोपडपट्टयानी वेढलेला आहे. सदरचा परिसर हा परप्रांतिय गुंडानी अधीगृहीत केला असून त्या परिसरात राहणा-या बांगला देशीय/परप्रांतिय गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना रेशनकार्ड देणे व त्यांची नावे मतदार यादीत आणण्याचे काम खुलेआमपणाने चालू आहे. शासकीय पातळीवर याबाबतीत उदसीनता असल्याने या परिसरत एम.आर.टी.पी. अंतर्गत गुन्हे ही दाखल करण्यात आलेले नाहीत. ठाणे शहराची सुव्यवस्था जपण्यासाठी कळवा खाडी परिसरात एम.आर.टी.पी. अंतर्गत त्वरित गुन्हे दाखल करावेत. या महत्वाच्या प्रश्नाबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी म्हणून सदरबाब विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडत आहे.

----------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देवानार (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या खिचडीत अळया आढळून येणे

**मु.शी.**: देवानार (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या खिचडीत अळया आढळून येणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती. अलका देसाई यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, देवनार(मुंबई) येथील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेलया खिचडीत अळया असल्याचे दि. 7.12.2010 रोजी वा त्या दरम्यान शिक्षण समितीच्या अध्यक्षा यांनी दिलेल्या भेटीत आढळून आले आहे. या शाळेत 1 ली ते 8 वीत सुमारे 1250 मुले शिक्षण घेत आहेत. या गरीब मुलांना पोषण आहार मिळावा म्हणून सुगंधी दुधाबरोबर खिचडी देत आहेत. परंतु अनेकदा विद्यार्थ्यांना कधी दुधातून विषबाधा झाली तर कधी खिचडीत अळया आढळल्या तर कधी निकृष्ट दर्जाची खिचडी देण्यात येत असते. या शाळेला पूजा मंडळातर्फे खिचडी पुरविली जात असल्याचे आढळून आले आहे. आळयायुक्त, खडेयुक्त तसेच निकृष्ट दर्जाची खिचडी पुरविली जाण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने पालकांत निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, अशा या गंभीर व महत्वाच्या विषयावर चर्चा होणे अतिशय आवश्यक असल्याने मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती.

---------------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बीड जिल्हयातील गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात पाण्याची सोय नसणे

**मु.शी.**: बीड जिल्हयातील गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात पाण्याची सोय नसणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, बीड जिल्हयातील गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांना तसेच रुग्णांसोबत राहणा-या सोबतींना हॉटेलमधून पाणी आणावे लागणे, हॉटेल मालकांनी काही तरी माल, चहा घेतल्याशिवाय पाणी देण्यात नकार देणे, पर्यायाने रुग्णाचे आणि रुग्णांबरोबर असणा-या नातेवाईकांचे पाण्याविना होत असलेले हाल, याबाबत गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील ग्रामीण आरोग्य केंद्रात काम करणा-या स्त्री परिचारिकांना अल्प मानधन देणे

**मु.शी.**: राज्यातील ग्रामीण आरोग्य केंद्रात काम करणा-या स्त्री परिचारिकांना अल्प मानधन देणे याबाबत श्री. हुसेन दलवाई, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. हुसेन दलवाई ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्याच्या ग्रामीण आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या 10535 अंशकालीन स्त्री पारिचारिका आहेत व त्यातील बहुतेक पारिचारिका 20 ते 25 वर्षे काम करत असून त्यांना महिना रु. 900 म्हणजे दिवसाला फक्त रु. 30 एवढे मानधन दिल जाते. म्हणजेच किमान वेतन कायदयानुसार मिळावयाचे वेतनही त्यांना मिळत नाही. याचाच अर्थ शासन स्वत : किमान वेतन कायदयाचा भंग करीत आहे. रोजगार हमी योजनेवरील कामगारांनाही त्यांच्या पेक्षा जास्त वेतन मिळते. या पारिचारिकांना आठ तासाची व प्रसंगी जास्त कालावधीची रोजची डयूटी असतानाही त्यांना सर्वच शासकीय सवलतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. या अंशकालीन पारिचारिकांवर होणारा अन्याय दूर व्हावा, या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या या प्रश्नांबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गोंदिया जिल्हयातील पदमपूर येथे कवी भवभूतींचे स्मारक उभारण्याबाबत

**मु.शी.**: गोंदिया जिल्हयातील पदमपूर येथे कवी भवभूतींचे स्मारक उभारयाबाबत श्री. केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, संपुर्ण देशभरात ख्याती असलेल्या आणि महाकवी कालीदासाच्या बरोबरीचे दुसरे संस्कृत कवी असलेल्या "भवभूती" यांचे विदर्भातील गोदिंया जिल्हयातील पदमपूर (ता. आमगांव) हे जन्मस्थळ असणे, त्यामुळे राष्ट्रकूट राजवंशाच्या राजधानीचे शहर म्हणून प्रसिध्द असलेल्या प्राचीन हिंदू व जैन देवीदेवतांच्या खंडित दगडांच्या मूर्तीवरुन कवी भवभूतींच्या वास्तव्याची जाणीव होणे परंतु ज्या प्रमाणे महाकवी कालीदासाचे स्मारक त्यांची कर्मभूमी असलेल्या रामटेक ( जि.नागपूर) येथे उभारण्यात आले आहे, त्या प्रमाणे गोंदिया जिल्हयातील पदमपूर येथे कवी भवभूतीचे स्मारक उभारण्याची मागणी विदर्भातील जनतेकडून करण्यात येत आहे, तसेच अकरा वर्षापूर्वी तत्कालीन अर्थमंत्र्याकडून कवी भवभूतीचे स्मारक विकसीत करण्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची विधानमंडळात घोषणा करण्यात आली होती. परंतु विदर्भातील महाकवींच्या साहित्याची जपणूक करुन त्यांचा सांस्कृतीक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचण्यासाठी शासन अपयशी ठरणे, त्यामुळे भवभूती महाकवींच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी भवभूती स्मारक उभारल्यास परिसरातील साहित्यिक चळवळीला चालना मिळेल आणि येणाऱ्या पिढीच्या मनात साहित्याविषयी गोडी निर्माण होईल, या दृष्टीने अर्थसंकल्पात तरतूद करुन पदमपूर या ठिकाणी तात्काळ कवी भवभूतींचे स्मारक उभारण्यात यावे अशी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

---------

यानंतर श्री. अजित...

**पृ. शी.** : महामँगोमध्ये झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचारामुळे या संस्थेचा कारभार बंद पडणे

**मु. शी.** : महामँगोमध्ये झालेल्या गैरव्यवहार व भ्रष्टाचारामुळे या संस्थेचा कारभार बंद पडणे याबाबत श्री.राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा बागायतदारांना बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी सन 1991 मध्ये महामँगो संस्था स्थापन करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून संस्थेत झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार यामुळे या संस्थेचा कारभार बंद पडला आहे. सदर भ्रष्टाचाराची आणि गैरव्यवहाराची चौकशी करुन महामँगो संस्था पुन्हा लवकरात लवकर सुरु करुन या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. या महामँगो संस्थेसाठी सिंधुदुर्ग जिल्हा बँकेकडून एकूण 755.86 लाख रुपये कर्ज घेण्यात आले. परंतु यामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचे आढळून आले आहे. तेव्हा या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर चर्चा होणे आवश्यक असल्याने मी ही बाब विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वांद्रे व्हीलेज, सांताक्रुझ येथी सिटी सर्व्हे क्रमांक 13 मिलिटरीसाठी राखीव असताना तेथे सुरु असलेले बांधकाम

**मु. शी.** : मुंबईतील वांद्रे व्हीलेज, सांताक्रुझ येथी सिटी सर्व्हे क्रमांक 13 मिलिटरीसाठी राखीव असताना तेथे सुरु असलेले बांधकाम याबाबत श्री.रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्थाद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मुंबईतील वांद्रे व्हीलेज, गोळीबार रोड, सांताक्रुझ (पूर्व) येथील सिटी सर्व्हे क्रमांक 13 (पार्ट) हा भूखंड मिलिटरीसाठी राखीव असताना तसेच या भूखंडावर कोणताही प्रकल्प राबविण्यास एस.आर.ए.व विकासकाला केंद्राने कोणतेही बांधकाम करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले नसताना या भूखंडावर वेगाने इमारतींचे बांधकाम करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2010 च्या पहिल्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या व्यतिरिक्त 86 एकर भूखंडावर असलेल्या झोपड्यांना दिनांक 30.9.2008 पर्यंत उप जिल्हाधिकारी, वांद्रे यांनी गलिच्छ वस्ती घोषित केली नसताना दिनांक 28.8.2007 रोजी एस.आर.ए.च्या कार्यकारी अभियंता यांनी विकासकाला इमारती बांधण्यास सी.सी. दिली. अशाप्रकारे कायदे व नियम धाब्यावर बसवून 147 एकर भूखंडावर सदरहू प्रकल्प राबविला जात असून या 147 एकर जमिनीपैकी 61 एकर जमीन ही वायुसेनाकरिता राखीव असताना व या 61 एकर भूखंडावर प्रकल्प राबविण्यास कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र दिले नसताना येथे इमारत पुनर्बांधणीचे काम सुरु असणे, या प्रकल्पाबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक 15.10.2010 रोजीच्या सुमारास माननीय मुख्यमंत्री, मुख्य सचिव, कार्यकारी अधिकारी, नगरविकास सचिव यांना निवेदन देण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. परिणामी या प्रकरणात कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाल्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.रामदास कदम....

नागरिकांमध्ये संशय निर्माण झालेला आहे. तसेच त्यांच्यामध्ये असंतोष व संतापाची भावना निर्माण इ ाली आहे. तेव्हा या प्रकरणाबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

सभापती महोदय, या प्रकरणा संदर्भात मी स्वत: पत्र दिलेले आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. केंद्र सरकारच्या जागेवर इमारतींचे बांधकाम जोरात सुरु आहे. तेव्हा याची शासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी मी या विशेष उल्लेखद्वारे विनंती करीत आहे.

**उपसभापती** : या संदर्भात शासनाकडून उद्या सायंकाळपर्यंत निवेदन करण्यात यावे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु.शी.** :वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार. याबाबत डॉ.दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातर्फे यंत्रसामुग्री खरेदीसाठी गेल्या वर्षी म्हणजे 2009-10 मध्ये मागणी करण्यात आली होती. आपण आम्हाला निर्देश देता की, आम्हाला मूळ मागणीवर बोलता येणार नाही. पुरवणी मागणीच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने 87 कोटी 69 लाख 21 हजार इतक्या रकमेची यंत्रसामुग्री खरेदीसाठी मागणी मंजूर करुन घेतली.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/ MMP/ KTG/ प्रथमश्री.शिगम 16.55

डॉ.दीपक सावंत ..

सभापती महोदय, सदर रकमेमधून राज्यातील मुंबई, नागपूर, औरंगाबाद, नांदेड, यवतमाळ, पुणे, धुळे,सोलापूर, सांगली, लातूर ,अकोला येथील विविध वैद्यकीय महाविद्यालयासाठी व रुग्णालयासाठी यंत्रसामुग्रीची खरेदी करण्यात आली आहे परंतु ही यंत्रसामुग्री दुर्देवाने कागदावरच खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते आपण जर त्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन भेट दिली तर त्या ठिकाणी ही यंत्रसामुग्री दिसणार नाही . त्यामुळे रुग्णांना सीटी स्कॅन, एमआरआय, एक्स रे ,ईसीजी इत्यादी पासून वंचित रहावे लागते. रुग्णांवर योग्य औषधोपचार व शस्त्रक्रिया होत नाही आणि 87 कोटी रुपयांची यंत्रसामुग्री कागदावरच खरेदी करण्यात आलेली आहे त्याची चौकशी करण्यात यावी अशी माझी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनाला विनंती आहे..

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. पुणे शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढल्याने महानगर पालिकेवर पडत असलेला आर्थिक बोजा

मु.शी.:पुणे शहरात इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढल्याने महानगर पालिकेवर पडत असलेला आर्थिक बोजा याबाबत श्री.मोहन जोशी.वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री मोहन जोशी (नामनियुक्त): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"येरवडा (पुणे) येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस मोठया संख्येने वाढत असल्यामुळे त्यांचा दर्जा टिकवणे शिक्षण मंडळाला अतिशय अवघड जात असल्याचे नुकतेच आढळून आले आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढल्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा वाढत आहे. पुढील वर्षी शिक्षण मंडळाच्या इंग्रजी माध्यमातील इयत्ता सातवीतील मुले मोठया संख्येने उत्तीर्ण होणार असून महानगरपालिकेकडे मात्र विद्यार्थ्यासाठी आठवीची एकही तुकडी नाही यामुळे या विद्यार्थ्याचे शैक्षणिक भवितव्य अंधारमय झाले आहे. यामुळे या विषयी शासनाने ठोस उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा या गंभीर विषयावर तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे ".

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. पुणे शहरातील पी.एम.टी.च्या बसेसचे वाढत असलेले अपघात

मु.शी.:पुणे शहरातील पी.एम.टी.च्या बसेसचे वाढत असलेल्या अपघाता बाबत श्री. मोहन जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कालची एक विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

" पुणेकरांचा प्रवास सुखकर आणि सोयीचा व्हावा म्हणून कार्यरत असलेली पी.एम.टी.ची सेवा पुणेकरांची जीवनरेखा बनण्याऐवजी ती मृत्यूरेखा ठरली आहे. गेल्या 34 दिवसामध्ये पी.एम.टी.ने जवळपास आठ ते दहा पुणेकरांचे बळी घेतले आहेत. पी.एम.टी.ला गेल्या दोन वर्षापासून पूर्णवेळ अध्यक्ष नाही ,व्यवस्थापकीय संचालक नसल्यामुळे त्यांची नेमणूक करावी तसेच गेल्या तीन वर्षापासून तीन तज्ज्ञ संचालकांची नेमणूक करण्यात आली नसल्यामुळे त्यांची त्वरित नेमणूक करण्यात यावी. सध्या 1200 पी.एम.टी.च्या बसेस असून प्रवाशांची संख्या मात्र 1 2 लाख आहे.पी.एम.टी.च्या वाढत असलेल्या अपघातास कारणीभूत असलेल्या व्यक्तीविरुध्द कठोर कारवाई करावी अशी पुणेकरांकडून वारंवार मागणी केली जात असून पी.एम.टी.वर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे पुणेकरांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून या गंभीर प्रकरणात लक्ष घालण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वन विकास महामंडळातील रोजंदारी कर्मचा-यांना कायम करणे

मु.शी वन विकास महामंडळातील रोजंदारी कर्मचा-यांना कायम करण्या बाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या): सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

", राज्यातील सामाजिक वन विकास महामंडळातील 18 हजार 959 पात्र म्हणजे पाच वर्षे सलग आणि तुटक पध्दतीने 240 दिवस भरलेल्या मजुरांचे दिनांक 30.6.2004 पर्यतचे प्रस्ताव वन मंत्रालयात प्रलंबित आहेत. 1996 साली शासनाने असा निर्णय घेतला होता की, ज्या मजुरांचे सलग पाच वर्षे आणि 240 दिवस भरलेले आहेत त्या रोजंदारीवरील वन मजुरांना कायम करण्यात यावे असे असूनही आतापर्यत अनेक मुख्यमंत्री आणि वन मंत्री बदलून गेलेले आहेत परंतु वन कामगारांना कायम करण्यात न आल्यामुळे ते आत्महत्या करण्याच्या विचारात आहेत. दर अधिवेशनात वन कामगार या ठिकाणी येऊन धरणे धरतात, उपोषणे करतात, मोर्चे काढतात,त्यातील अनेक जण निवृत्त होण्याची वेळ आलेली आहे.18 हजार वन कामगारांना कायम करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्याच्या स्तरावर वित्त विभागाने सहानुभूतिपूर्वक विचार करावा याकडे मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून लक्ष वेधत आहे."

---

**उप सभापती** : आता सभागृहासमोर तीन विधेयके चर्चेसाठी आहेत. त्यातील 41 क्रमांकाच्या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अशी विनंती केली होती की, आज ते सभागृहामध्ये दुपारी 4.00 वाजेपर्यत येणार आहेत आणि त्यांनी केलेली विनंती माननीय सभापतींनी मान्य केली होती. ते अजूनही सभागृहात आलेले नाहीत.त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीमध्ये 41 क्रमांकाचे विधेयक आता न घेता उरलेली दोन विधेयके आपण आता चर्चेसाठी घेऊ.

नंतर श्री.सरफरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई करमणूक शुल्क (दुसरी सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. LXXXI OF 2010**

**( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923.)**

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 81 मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 81 मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे. हे विधेयक जल क्रीडा विषयक आहे असे या विधेयकाच्या उद्देश व कारणे यावरुन समजते. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये असे म्हटले आहे की,"जल क्रीडा उपक्रमामध्ये प्रवेश मिळण्याकरिता द्यावयाच्या सर्व रकमांवर जेव्हा प्रवेशाचा दर एक रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा 5 टक्के दराने अधिभार आकारण्याचा आणि इतर सर्व बाबतीत हया अधिभाराचा दर 10 टक्के आकारण्याची तरतूद आहे." हा दर आपण 10 टक्क्यावरुन 15 टक्के केला आहे.

सभापती महोदय, आज अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे वॉटर स्पोर्टस केंद्र तयार झाले आहेत. या केंद्रामध्ये अशाप्रकारे वॉटर स्पोर्टस खेळविले जातात. त्यासाठी लागणारे पाणी हे वॉटर स्पोर्टस तयार करणाऱ्या कंपन्या कोठून आणतात, त्याचा स्त्रोत काय आहे? यावर राज्य सरकारने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. त्या पाण्यामध्ये आठवडाभर हजारो लोक स्पोर्टसचा आनंद घेत असतात त्यामुळे त्या पाण्याचे रिसर्क्युलेशन, प्युरिफिकेशन होते काय? ते होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु ते केले जात नाही. अनेक पंच तारांकित हॉटेल्समध्ये स्वीमिंग पूल असतात. अशा स्वीमिंग पूलमध्ये मे महिन्याच्या सुट्टीमध्ये लहान मुलांचे सराव शिबिर भरवून त्यांना स्वीमिंग शिकविले जाते. अनेक वेळा या वॉटर स्पोर्टमध्ये लाईफ गार्ड नेमलेला नसतो. त्यामुळे सूरज वॉटर पार्क असो किंवा अन्य कोणतेही वॉटर पार्क असो, अशा वॉटर स्पोर्टस केंद्र चालविणाऱ्या कंपन्यांना असे गार्ड नेमण्याबाबत सूचना देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, मुंबईच्या जुहू भागात सन अँड सँड हॉटेल आहे. त्यांच्याकडे स्वीमिंग शिकविण्याची शिबिरे सुरु होती. त्यावेळी मी योगायोगाने त्याठिकाणी गेलो होतो. त्याठिकाणी लहान मुलांना शिकण्यासाठी आठ दिवसांचे शिबिर ठेवण्यात आले होते, परंतु त्यासाठी इन्स्ट्रक्टर नेमण्यात आला नव्हता. ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारे जल क्रीडा केंद्र किंवा स्वीमिंग पूल असेल त्याठिकाणी लाईफ गार्ड उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे वॉटर स्पोर्टसवाले अव्वाच्या सव्वा फी आकारीत असल्यामुळे अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच, ते या स्वीमिंग पूलसाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन कशाप्रकारे करतात याचे उत्तर मिळावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, क्रीडा मैदानासाठी मुंबई व आसपासच्या परिसरामधील जागा घेण्यात आल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने सीसीआय या क्लबला सरकारने जागा दिलेली आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमला सरकारने जागा दिलेली आहे. त्या क्लबचे सभासद होण्याचा आपल्याला अधिकार नाही. अशाप्रकारचा मुद्दा यापूर्वी मी या सभागृहामध्ये अनेक वेळा मांडला आहे.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी हा मुद्दा मांडला होता.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी तो रिपिट केला. आपल्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांना, सचिवांना त्या क्लबमध्ये परवानगी आहे. ते त्या क्लबचे सभासद होऊ शकतात परंतु आपल्याला त्या क्लबचे सभासद होण्याची परवानगी नाही. या विधेयकाच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, या स्टेडियमसाठी करण्यात आलेल्या ॲग्रिमेंटची प्रत या सभागृहाला सादर करण्यात यावी. त्यांना कोणत्या अटी घालण्यात आल्या होत्या हे आम्हाला समजले पाहिजे. जमीन शासनाची घेणार आणि कायदे हे बनविणार आणि आपण त्यांच्यापुढे "हो, हो" असे म्हणणार. ही पध्दत बदलली गेली पाहिजे. 10 वर्षाकरिता 25 लाख रुपये फी भरुन सभासद म्हणून राहू शकतो. सभापती महोदय, या सीसीआय चे चेअरमन माझे मित्र असून ते एका उद्योगामध्ये माझे पार्टनर आहेत. ते सुध्दा हतबल झाले आहेत. सन्माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख हे माझ्याकडे दहा वेळा आले व म्हणाले की, त्या चेअरमनशी तुमचे चांगले व्यावसायिक संबंध आहेत. तुम्ही त्यांना विनंती करा. परंतु त्याठिकाणी आपल्याला परवानगी नाही. मंत्रिमहोदय, त्यासाठी आपल्याला खास कायदा बनवावा लागेल. कायद्यामध्ये बदल करावा लागेल. जर तुम्ही आमदारांना परवानगी देणार नसाल तर आय.ए.एस. अधिकाऱ्यांचे सभासदत्व सुध्दा रद्द करुन टाका.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

त्या ठिकाणी आयएएस अधिकाऱ्यांना परवागनी आहे पण आमदारांना परवानगी नाही. या ठिकाणी माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी होय म्हणतात, विचार करु असे सांगतात पण नंतर हे आयएएस अधिकारी मंत्रिमहोदयांवर काय प्रभाव टाकतात हे मला माहीत नाही. माझ्या 12 वर्षाच्या कारकिर्दीत हे आठवे किंवा दहावे महसूल मंत्री पुढे आलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी एकदा मराठवाड्याचा हिसका काय आहे तो दाखवून द्यावा अशी मी त्यांना विनंती करतो. यामध्ये बदल झाला पाहिजे अशी मागणी या बिलाच्या निमित्ताने करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या बिलावर बोलत असताना मी सांगू इच्छितो की, आपण आता जो कर आणि सरचार्ज आकारतो तो मूळ रकमेच्या 10 टक्के करमणूक कर आणि मूळ रकमेच्या 10 टक्के सरचार्ज आकारतो त्यामध्ये बदल करण्याचे शासनाने ठरविले आहे. हा जो टॅक्स आहे त्या टॅक्सच्या रकमेवर सरचार्ज असला पाहिजे अशी सुधारणा यामध्ये करीत आहोत. माझी विनंती आहे की, आता आपण जो टॅक्स किंवा सरचार्ज आकारतो तो महानगरपालिकेमध्ये असणारे जे स्पोर्ट्स क्लब आहेत किंवा ज्या ठिकाणी जलक्रीडा चालतात त्यांना एकच रक्कम आहे. त्यांना एकच परसेंटेज आहे. नगरपालिका असेल किंवा ग्रामीण भागामध्ये टुरिझमला किंवा या क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आपण त्यांना बऱ्याच बाबतीत सवलती द्यावयास लागलो आहोत. माझी अशी विनंती राहील की, हा जो कर आपण आकारत आहात तो कदाचित पंचायत समिती, जिल्हा परिषद एरियामध्ये असेल तर त्यांना हा कर आकारु नका. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्या ठिकाणी हा कर रद्द करावा. त्याप्रमाणे नगरपालिकेमध्ये करावे. कारण एस्सेल वर्ल्डचा जो काही टॅक्स असेल किंवा त्यांचे जे काही उत्पन्न असेल तेवढे उत्पन्न आमच्या ग्रामीण भागातील कोणत्याही स्पोर्ट्स क्लबचे किंवा जलतरण तलाव किंवा ज्या ठिकाणी बोटी वगैरे चालतात किंवा आमच्या ग्रामीण भागामध्ये जे पर्यटन जिल्हे जाहीर झालेले आहेत त्यातील कोणत्याही ठिकाणी येणार नाही. म्हणून माझी अशी विनंती राहील की, हा जो कर आहे तो आपण ग्रामीण भागामध्ये रद्द करावा आणि टप्प्याटप्प्यामध्ये महानगरपालिकांमध्ये वाढवावा. अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

RDB/ KGS/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या बिलावर बोलावयाचे झाले तर जल क्रीडा विषयक उपक्रम हा शब्द अगदी संदिग्ध वाटतो. याचे कारण असे की, जे जे वॉटर स्पोर्ट्स किंवा याबाबतची खासकरुन जी केंद्रे तयार झालेली आहेत तेवढ्यापुरताच हा शब्द मर्यादित आहे काय ? जे पोहण्याचे तलाव आहेत किंवा काही समुद्र किनाऱ्यावर आपण पाहतो की, वेगवेगळे लोक होडीत बसले तर वेगळा टॅक्स, त्या ठिकाणी छोटी मुले खेळत असतील त्यांना वेगळा टॅक्स असे वेगवेगळ्या पध्दतीचे टॅक्स लोक देतात. ते सांगतात की, शासनाचा टॅक्स आहे. अशा वेळी कोणाचा काय टॅक्स आहे हे आलेल्या पर्यटकांना सुध्दा कळत नाही. माझी अशी सूचना आहे की, जर आपण हा कर घेत असाल तर हा कर ज्या ठिकाणी लागू आहे त्या केंदांवर आपला बोर्ड असला पाहिजे. त्या ठिकाणी आपल्याला हा एकच अधिभार भरावा लागणार आहे.

माझी दुसरी सूचना अशी आहे की, ज्यावेळी शासन कर घेते त्यावेळी शासनाने लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने देखील काही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल्ससंबंधी मुद्दा उपस्थित केला. परंतु अनेक ठिकाणी किती उंचीवर केवढ्या माणसांनी जावयाचे, छोट्या मुलांनी मोठ्या तलावात जाऊ नये किंवा अनेक ठिकाणी गाण्यावर नृत्य चालू असतात त्या ठिकाणी ज्या प्रकारच्या घटना घडत आहेत त्या पाहता त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फार चांगली परिस्थिती आहे असे नाही. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितले की, ग्रामीण भागामध्ये हा कर लावू नका. पण ग्रामीण भागामध्ये सुध्दा या वॉटर स्पोर्ट्समध्ये जल सुरक्षितता हा महत्वाचा भाग आहे. सुरक्षितता, विजेचे कनेक्शन आणि तेथील स्वच्छता याच्या नियंत्रणाबद्दल एक कोड ऑफ कंडक्ट किंवा आचारसंहिता देखील या जलक्रीडा विषयक केंद्रांना आपण लागू केली पाहिजे आणि ती जनतेला माहिती झाली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मुंबई करमणूक शुल्क (दुसरी सुधारणा) विधेयक के बारे में बोलते हुए माननीय सदस्य श्री. शेडगे जी ने कहा है कि ग्रामीण क्षेत्र में यह शुल्क कम होना चाहिए. मैं उनकी बात से सहमत हूँ, इसलिए इस शुल्क के बारे में रि-स्ट्रक्चरिंग होनी चाहिए.

सभापति महोदय, मेरा दूसरा मुद्दा यह है कि आप यह सुधारणा बॉम्बे एंटरटेनमेंट टॅक्स एक्ट, 1923 में कर रहे हैं. माननीय सदस्य श्री. रावते जी का "बॉम्बे"शब्द की बजाय "मुंबई" शब्द करने का आग्रह रहा है. इसलिए आप "बॉम्बे" शब्द को "मुंबई" करने की कार्यवाही शुरु कर दीजिए.

सभापति महोदय, मेरा तीसरा मुद्दा यह है कि माननीय सदस्य श्री. जयंत पाटील ने सी.सी.आई. की मेंबरशिप के बारे में प्रश्न उपस्थित किया है. मेरी भी यही राय है कि माननीय सदस्यों को सी.सी.आई. की मेंबरशिप मिलनी चाहिए. यह सन् 1923 का अंग्रेजों के जमाने का एक्ट है. इस एक्ट को रिवाइज करके आपको एक कॉम्प्रेहेन्सिव एन्टरटेनमेंट एक्ट लाना चाहिए, इतना ही मुझे कहना है.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी आपले विचार मांडले, काही महत्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत, त्या सर्वांचे मी स्वागत करतो आणि अभिनंदनही करतो.

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम 1923 मधील कलम 3(1) (ब) मधील तरतुदीनुसार जल क्रीडा उपक्रम म्हणजे वॉटर स्पोर्टस् ॲक्टिव्हिटी यासाठी 10 टक्के करमणूक शुल्क आहे. सध्या या शुल्कावर 10 टक्के अधिभार लावला जातो. दुहेरी कराधान पध्दत होती ती कमी करुन प्रवेशासाठी भरण्यात येणा-या रकमेवर 10 टक्क्याऐवजी 15 टक्के कर आणि कराच्या रकमेवर 10 टक्के अधिभार म्हणजे 15 + 1.5 = 16.5 टक्के कर करण्यासाठी हे दुरुस्ती विधेयक आणलेले आहे. मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे की, दुहेरी करासंबंधी अनेक याचिका कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. करावर अधिभार लावताना कराच्या रकमेवर अधिभार असतो. त्यामुळे मूळ प्रवेशाच्या रकमेवर अधिभार असू नये यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर बोलताना अनेक विषयांना स्पर्श केला. जे रेग्यूलर स्वीमिंग पूल असतील मग ते फाईव्ह स्टार हॉटेलमधील असतील किंवा नगरपालिकेचे असतील, हे स्वीमिंग पूल जल क्रीडा प्रकारामध्ये येत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर कोणताही कर आकारला जात नाही. ज्याठिकाणी वॉटर स्पोर्टस् ॲक्टिव्हिटीज चालतात त्याठिकाणी हा कर लावला जातो. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सुरक्षिततेबाबत व पाण्याच्या स्वच्छतेबाबतचा मुद्दा मांडला आहे. त्यांच्या सूचनेचा आदर करुन तशा सूचना त्या त्या विभागाला देण्याचे काम केले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी असे म्हटले की, सीसीआय किंवा वानखेडे येथील क्लबला शासकीय जमीन देण्यात आलेली आहे. तरी सुध्दा विधिमंडळाच्या सदस्यांना त्या क्लबचे सभासदत्व मिळत नाही. त्याठिकाणी अनेक आयएएस व आयपीएस अधिकारी सदस्य असताना जाणीवपूर्वक विधिमंडळाच्या किंवा राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना टाळले जाते. अशी खंत त्यांनी व्यक्त केलेली आहे. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यामुळे गरज पडल्यास याबाबतच्या कायद्यामध्ये बदल केला जाईल. त्यांना लॅण्ड ग्रॅण्ड देतो त्यामध्येच सुधारणा करुन काही सदस्यांना प्राधान्याने सभासदस्त्व देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यासंबंधी या सभागृहात 7-8 वेळा चर्चा झालेली आहे. त्यामुळे ठराविक महिन्यात याबाबतच्या कायद्यात बदल केला जाईल असे सभागृहाला मंत्री महोदयांनी आश्वासित करावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यासंदर्भात 1 वर्षामध्ये कायदा आणण्याचा प्रयत्न केला जाईल. (अडथळा) एकाच क्लबमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांना सभासदत्व मिळणे शक्य होणार नाही. त्यामुळे टप्प्याटप्प्याने काही सन्माननीय सदस्यांना सदस्यत्वाचे आरक्षण देण्यासंबंधी निश्चित विचार केला जाईल.

डॉ.दीपक सावंत : सदस्यांच्या टेन्यूअरमध्ये सभासदत्व देण्यात यावे.

श्री.प्रकाश सोळंके : ठीक आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

**उप सभापती** : या क्लबमध्ये शंभर टक्के आमदार जातीलच असे नाही आणि समजा गेले तर मुंबईबाहेरचे आमदार आठवड्यातून दोन दिवस मुंबईमध्ये मिटींगसाठी येतात. तेव्हा सर्व सदस्यांसाठी सदस्यत्व मागून नियमामध्ये तशी तरतूद करावी अशी मी राज्यमंत्री महोदयांना सूचना देत आहे.

श्री. प्रकाश सोळंके : उप सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा आणि सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी काही मुद्दे मांडले. महापालिका क्षेत्रामध्ये आणि मुंबई, पुणे यासारख्या मेट्रोपोलिटन सिटीमध्ये एकाच दराने कर आकारला जातो. ग्रामीण भाग आणि नगरपालिका क्षेत्रामध्येही त्याच पध्दतीने कर आकारला जातो. कर आकारण्यामध्ये कॅटेगरिज करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा अशा प्रकारच्या कॅटेगरिज करुन भविष्यात हे विधेयक आणण्याची ग्वाही मी देतो. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIV OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY AGRICULTURAL PESTS AND DISEASES ACT, 1947)
AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्यमंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प.वि.क्रमांक 14, मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत अधिनियम 1947 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये अधिसूचित क्षेत्रामध्ये शेतातील उपद्रवी कीड आणि रोग या 1947च्या कायद्याची अमलबजावणी करताना ग्रामपंचायती सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्तीचे अधिकार घेण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी सादर केलेले आहे. 1993 साली 73वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यानुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्तीचे अधिकार देण्यात आले आहेत. तेव्हा हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे वि.प. वि. क्रमांक 14 - मुंबईचा शेतांतील पिकांवरील कीड व रोग याबाबत (सुधारणा) विधेयक, 2010 विधानसभेची सहमती घेवून दोन्ही सभागृहाच्या 300 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही)

..3..



MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 17:20

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी हे विधेयक कशासाठी आणले आहे हे सविस्तरपणे सांगितलेले नाही. जे सांगावयास पाहिजे होते ते सांगितलेले नाही. खरे म्हणजे अधिवेशनाचा पहिला आठवडा आम्ही ज्या शेतकऱ्यांसाठी गाजविला त्यांच्या संदर्भातील हे विधेयक आहे.

सभापती महोदय, मला विधेयकातील पृष्ठ क्रमांक 2 वरील अ.क्र.2 कडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. मुंबईचा शेतातील पिकांवरील कीड अधिनियम, 1947 असा मुख्य अधिनियम करण्यात आला आहे. याच्या दीर्घ शीर्षकामध्ये अशा कीड ऐवजी अधिसूचित कीड असा मजकूर दाखल करण्यात येईल. अधिसूचित कीड म्हणजे काय हे मंत्रीमहोदयांनी सांगितले पाहिजे. व्याख्येमध्ये बदल होत आहे. व्याख्येत बदल केल्यामुळे सरकारला काय अभिप्रेत आहे? कीड ही कीडच असते. अधिसूचित करणे म्हणजे काय करणार? सरकार सांगेल तीच कीड असा अर्थ आम्ही अभिप्रेत करतो. सभापती महोदय, मी इंग्रजी प्रत यासाठी मागविली की, या सदनामध्ये एक महत्वाची मोठी चर्चा झाली होती. राज्याचे जे जे कायदे आहेत त्यांच्या नावाची सुरुवात "बॉम्बे" या नावाने होते. त्या बॉम्बे या शब्दाऐवजी मुंबई असा बदल करण्याचा प्रस्ताव या सदनामध्ये मांडून त्यावेळी तो मंजूर झालेला होता. त्यासंबंधी अधिसूचना काढल्यानंतर या सदनामध्ये आम्ही मागणी करायची की नाही? हा प्रश्न आहे. या सदनामध्ये एखादा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी सरकार करणार नसेल तर या सरकारबद्दल काय करावे हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून मी इंग्रजी प्रत मागविली. "A Bill further to amend the Bombay Agricultural Pests and Diseases Act, 1947." या सरकारने बदलायचेच नाही असे ठरविले आहे का? हे विधेयक मांडण्याचा या सरकारला नैतिक अधिकार आहे का? हा मूळ प्रश्न आहे. मीच ती चर्चा उपस्थित केली होती. प्रत्येक कायद्यात बदल करण्याचे सरकारने मान्य केले होते. विधी व न्याय विभागाचे जे सचिव आहेत त्याच्याबद्दल काय बोलावे हेच मला कळत नाही. त्या व्यक्तिमत्वाबद्दल अरे तुरे ची भाषा वापरावी लागत आहे. दररोज आम्हाला अपमान सहन करावा लागत आहे. मुंबई शहराचा आणि राजधानीचा ते अवमान का करीत आहेत? या सदनाचे ते ऐकणार नसतील तर त्यांच्यावर कारवाई करणार की नाही? त्यांचा का दुराग्रह आहे? त्यांची मुले इंग्रजी शाळेत जात असतील, आम्हाला त्याच्याशी काही घेणे देणे नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दोन महत्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. हे राज्य मराठीचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 17:20

श्री.दिवाकर रावते.........

आहे. मराठीमधूनच बोलणार आणि विदर्भाचे पॅकेज बघणार असे त्यांनी सांगितले. याचा अर्थ खूप मोठा आहे. विदर्भाला माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले. त्यावेळी माननीय पंतप्रधानांचा या राज्य सरकारवर विश्वास नव्हता.

नंतर 4इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

म्हणून त्यांनी सांगितले की, या पॅकेजवर माननीय पंतप्रधान कार्यालयातून नियंत्रण ठेवले जाणार आहे. The package will be monitored by the P.M. Office. अशी त्यावेळेस हेडलाईन आली होती. या पॅकेजवर आता सध्याचे माननीय मुख्यमंत्रीच स्वत:च पंतप्रधान कार्यालयातून मॉनिटरिंग करीत होते. त्यामुळे त्यांना या पॅकेजमधून कोणी कोणी किती व काय काय पळविले यासंबंधीची संपूर्ण माहिती आहे, म्हणून त्यांनी सुरुवातीलाच ही घोषणा केली होती की, विदर्भ पॅकेजची माहिती दर महिन्याला घेण्यात येईल. त्यावेळेस माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे देखील त्यांच्यासोबत होते. कदाचित त्यांनीच ही माहिती माननीय मुख्यमंत्र्यांना दिली असावी, असे मला वाटते. विधि व न्याय विभागाचे मंत्री कोण आहेत हे मला माहीत नाही. परंतु मला त्यांनी सांगावे की आपल्या विभागाच्या सचिवांवर आता कोणती कारवाई करावी ? कारण याच मुद्यावरुन सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली, विधेयक पुन्हा दुरुस्त करुन सादर करण्याचेही निदेश झाले. तरी देखील आपल्या विधेयकाच्या मसुद्यात बदल होत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अशाच प्रकारच्या मुद्यावर सभागृहात अनेक वेळा चर्चा केली आहे, तसेच त्यांनी अशा प्रकारचा उल्लेख यापुढील विधेयकांमध्ये आला तर ती विधेयके पास होऊ देणार नाही अशा प्रकारचे विचार सुध्दा व्यक्त केलेले आहेत. त्यानंतर अशा प्रकारे विधेयकात "बॉम्बे" असा शब्द असणार नाही, "मुंबई" असाच शब्दप्रयोग केला जाईल, असे आश्वासन सुध्दा सभागृहात दिले गेले. तरी देखील आपल्या विभागाच्या यंत्रणेला समजत नाही. म्हणून या विधेयकाचा मसुदा, त्यातील शब्द प्रयोगात सुधारणा करुन ते पुन्हा सभागृहात चर्चेसाठी आणावे, त्याला आम्ही ताबडतोब मान्यता देऊ, पास करु. परंतु हे विधेयक आज प्रलंबित ठेवावे, अशी सूचना करतो आणि सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याला दुजोरा देतो.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे कोणत्या विधेयकाच्या संदर्भात बोलत आहेत हे मला माहीत नाही परंतु बॉम्बे ऐवजी मुंबई असा प्रश्न उपस्थित झाल्याचे कळते. परवाच असा विषय माझ्या वाचनात आला होता की अशी आपली मागणी बऱ्याच वर्षापासूनची आहे, यासंदर्भात अनेक वेळा चर्चाही झालेली आहे,

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ............

त्या अनुषंगानेच हा विषय आहे. परंतु आपले राज्य निर्माण होण्यापूर्वी "बॉम्बे ॲक्ट" असाच शब्दप्रयोग होत होता आणि पुढेही तोच प्रचलित राहिला. यामध्ये बदल करण्याच्या दृष्टीने केंद्रशासनाची मान्यता घ्यावी लागते. त्यानुसार विधि व न्याय विभागाने केंद्रशासनाकडे तसे पत्र पाठविलेले आहे. तसेच अनेक वेळा पाठपुरावा सुध्दा केला आहे. जोपर्यंत केंद्रशासनाकडून यासंसबंधीचा अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत ........

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारची ठोकाठोकी करणारी उत्तरे देणे योग्य नाही. बॉम्बे हाय कोर्टाचे नाव "मुंबई हाय कोर्ट" करण्यासंबंधीचे ते लेखी पत्र असून त्याची प्रत सुध्दा माझ्याकडे आहे. परंतु आजचा विषय हा वेगळा असून या अनुषंगाने सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. तसेच विधेयक क्र. 41-मुंबई महानगरपालिकेसंबंधीचे विधेयक आहे, त्यात बदल झालेला आहे. प्रश्न असा आहे की, या सभागृहात अनेक वेळा चर्चा होऊन देखील अशाच प्रकारे इंग्रजीतून विधेयकाचा उल्लेख होत आहे. तरी देखील माननीय राज्य मंत्री महोदय असे सांगत असतील तर ते अडचणीचे आहे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. रावते जी के सभागृह में आने से पहले पिछले विधेयक पर बोलते हुए मैंने कहा था कि "बॉम्बे" शब्द को "मुंबई" किया जाए. माननीय मंत्री महोदय ने यहां पर कहा कि यह माननीय सदस्यों की मांग है. यह माननीय सदस्यों की मांग नहीं है, बल्कि इस सभागृह ने यह निर्णय लिया है कि विधेयक में "बॉम्बे" शब्द की बजाय "मुंबई" शब्द लिखा जाएगा. यह स्टेट एक्ट है, इसलिए इसमें सेन्ट्रल गवर्नमेंट की अनुमति की जरुरत नहीं है. यह सेन्ट्रल गवर्नमेंट का एक्ट नहीं है. राज्य सरकार के सभी कानूनों में "बॉम्बे" शब्द की बजाय "मुंबई" शब्द लिखा जाना चाहिए.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "बॉम्बे" शब्द असलेले विधेयक राखून घरण्यात यावे. "मुंबई" शब्दाच्या संदर्भात या सदनात चर्चा झाली होती, ही चर्चा मी स्वत: उपस्थित केली होती. महाराष्ट्रातील जे जे कायदे असतील व त्यामध्ये "बॉम्बे" शब्द असेल तर त्या शब्दाऐवजी "मुंबई" शब्द टाकण्यात येईल असे या सभागृहात सांगण्यात आले होते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे बोलत आहेत ते इंग्रजी बिलाच्या कॉपीच्या संदर्भात बोलत आहेत की, मराठी बिलाच्या कॉपीच्या संदर्भात बोलत आहेत याची त्यांनी कृपया माहिती द्यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, इंग्रजीमधून जे विधेयक आलेले आहे त्यामध्ये सुध्दा "मुंबई" असाच उल्लेख असावयास पाहिजे. हा विषय मी आजच उपस्थित केलेला आहे असे नसून मी या अगोदरही हा विषय उपस्थित केला होता.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची मी चूक काढत नाही. आपण कृपया गैरसमज करुन घेऊ नका. आपण कोणत्या पानातील मजूकराच्या संदर्भात बोलत आहात तेवढे सांगितले तर बरेहोईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी ऐकले तर आपल्याला सर्व काही समजून येईल. या विषयाच्या संदर्भात मी या सदनात चर्चा केली होती त्याचे प्रोसिडींग माझ्याकडे आहे. राज्य सरकार नाव बदलू शकेल अशा नावांची मी यादीच दिली होती व त्यावर बरीच चर्चा झाली होती. मूळ नाव कसे बदलले, कायद्याची नावे कशी बदलली गेली याची सर्व माहिती या ठिकाणी देण्यात आली होती. त्यावेळेस माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, आमच्या अखत्यारीत जे काही असेल ते आम्ही बदलून टाकू. बॉम्बे हाय कोर्टचा विषय अजून तसाच पडून आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदरणीय मंत्रीमहोदयांना या ठिकाणी कशाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे याची माहिती नाही असे त्यांच्या वक्तव्यावरुन दिसून येते. या सदनात काय चालले आहे त्याची माहिती नसतांना आपण उठून उत्तर देता की, "दिल्लीमधून यासंदर्भात ॲक्ट झाला पाहिजे व तो ॲक्ट झालेला नाही. त्यामुळे मी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

हरकतीच्या मुद्याद्वारे एवढीच विनंती करतो की, माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात कोणता विषय सुरु आहे याची माहिती घ्यावी व नंतरच बोलावे. या विधेयकामध्ये "मुंबईच्या" ऐवजी "बॉम्बे" शब्द वापरल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचा अवमान होतो आहे. माननीय मंत्रीमहोदय, सदनाचा वेळ घालवून सदनाचा अवमान करीत आहेत. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी सदनात कोणता विषय सुरु आहे याची प्रथम माहिती घ्यावी व नंतरच उठून बोलावे एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, आपण व्यासपीठावर बसलेला आहात. आदरणीय रावते साहेब सुध्दा या सर्वोच्च सभागृहात उपस्थित आहेत. मी सभागृहात ज्यावेळेस आलो त्यावेळेस माझ्याकडून त्यांनी माहिती घेण्याचा प्रयत्न केला की, लॉ अँड ज्यूडीशिअरी विभाग कोणाकडे आहे ? त्यावेळेस सभागृहातील कोणी तरी सदस्य असे म्हणाले की, "लॉ अँड ज्यूडीशिअरी विभागाचे राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव आहेत." त्यावेळेस सन्माननीय सदस्य रावते साहेब माझ्याकडे बघून म्हणाले की, "भास्करराव तुम्ही या विभागाचे राज्यमंत्री आहात काय"? त्यावेळेस मी त्यांना "होय" असे म्हणालो. सभागृहात मी ज्या ज्या वेळेस येतो त्या त्या वेळेस सभागृहात काय चालले आहे याची मला पूर्ण माहिती असते. ज्यावेळेस मा. रावते साहेबांनी मुंबई की, बॉम्बे असा शब्द उच्चारला त्याच वेळेला सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील उठले आणि त्यांनी मा. रावते साहेबांच्या मुद्याला समर्थन दिले. त्यावेळेस मी उठून उभा राहिलो आणि म्हणालो की, "आदरणीय रावते साहेब आपण आता नक्की कोणत्या विषयावर बोलत आहात, आपण इंग्रजी बिलाच्या संदर्भात बोलत आहात की, मराठी बिलाच्या संदर्भात बोलत आहात ते मला माहीत नाही. मी सुध्दा 18 ते 20 वर्षापासून सभागृहात काम करीत आहे. सभागृहात काय चालले आहे याकडे माझे पूर्णपणे लक्ष असते. माणूस चुकू शकतो याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.......

याचा अर्थ असा नाही की, मी फक्त मंत्री म्हणून सभागृहात बसलो आहे. सभागृहातील कामकाजाकडे माझे पूर्णपणे लक्ष आहे... त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, मी बोलतो आहे ते बरोबर आहे. हा विषय हाय कोर्टातील नावाच्या संदर्भातील आहे. तेव्हा मी त्यांना लगेच त्याबाबत दुजोरा दिला. मी याठिकाणी कोणताही प्रेस्टीज इश्यू केलेला नाही. तेव्हा माननीय मंत्री मुंबईचा अपमान करीत आहेत अशाप्रकारचे वक्तव्य करण्यापूर्वी माझ्या सहकारी सदस्यांनी किमान मी काय बोललो एवढे तरी समजून घ्यावे... त्यानंतर मी आदरणीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विचारले की, आपण नक्की कोणत्या शब्दाबाबत हरकत घेत आहात, हे मला कळण्यासाठी मी त्यांच्याकडे विचारणा केली होती. मी त्यांना चॅलेंज केलेले नाही. मला याठिकाणी मुंबईचे "बॉम्बे" करुन मुंबईचा अपमान करायचा नव्हता एवढेच मला सभागृहाला विनम्रपणे सांगायचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण हे विधेयक चर्चेसाठी घेऊ नये. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे ठामपणे सांगितले पाहिजे की, आमच्या अखत्यारीत जे कायदे आहेत त्यांची नावे आम्ही बदलू. या सभागृहात "बॉम्बे"चे "मुंबई" करण्या संदर्भात चर्चा झाली आहे. सरकार अजून तसे करीत नसेल तर आम्ही काय करायचे ? विधेयक क्रमांक 41 च्या मराठी आणि इंग्रजी प्रतींमध्ये "मुंबई" असा उल्लेख आहे. तेव्हा सरकारला हे विधेयक मागे घ्यावे लागेल. प्रत्येक वेळी सरकारच्या आग्रहाखातर "बॉम्बे" असा उल्लेख असलेले विधेयक आपण मंजूर करायचे काय ? हे विधेयक पुढील अधिवेशनात घ्यावे. या संदर्भातील सुधारणा सरकारने करावयाची आहे. कायद्याचे नाव बदलण्यासाठी त्याबाबत याठिकाणी प्रस्ताव आणावा लागेल... हे सरकार कुणाचे ऐकत नाही...या सदनात प्रस्ताव आणण्यात येईल असे सरकारने सांगितले होते. त्यावर 7-8 अधिवेशने होऊन गेली. तेव्हा आम्ही अमुक एका कायद्याचे मुंबई केले आहे अशाप्रकारचा प्रस्ताव आणून तो मंजूर करुन घ्यावा लागेल. मग पुढचे कायदे बदलतील....आपण हे विधेयक थांबवावे अशी माझी विनंती आहे. "बॉम्बे" चे "मुंबई" असा बदल करण्यात येत नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.दिवाकर रावते........

तोपर्यंत हे विधेयक येथे चर्चेसाठी घेऊ नये... मी मागे देखील सचिवांना सांगितले होते की, बॉम्बे उल्लेख असलेले कोणतेही विधेयक याठिकाणी मांडू देऊ नका. Don't introduce the Bill. सचिव देखील आमचे ऐकत नाहीत. हा विषय सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांच्या अखत्यारीतील नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे या विषयातील अभ्यासाबाबत कोणाचेही दुमत नाही. त्यांना यापूर्वी देखील कोणी चॅलेंज केलेले नाही. हा विषय त्यांच्या चॅलेंजसंबंधीचा नाही. मी त्यांच्याकडून घाईगर्दीने विषय जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. शेवटी सरकारची बाजू मांडणे माझे काम आहे. तेव्हा मराठी विधेयकामध्ये "बॉम्बे" शब्द कोठे आहे हे शोधण्याचा मी प्रयत्न करीत होतो. मला तो शब्द कुठे सापडला नाही म्हणून मी त्या शब्दाबद्दल माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विचारले. त्यानंतर मी ताबडतोब इंग्रजी प्रत मागितली. त्यामध्ये "बॉम्बे" असा उल्लेख आहे. त्यांचा मुद्दा बरोबर आहे. विधेयकाच्या मराठी आणि इंग्रजी प्रतमध्ये "मुंबई" असा उल्लेख असला पाहिजे. तेव्हा या संदर्भात आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य असेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मराठी किंवा इंग्रजी विधेयकाच्या प्रतीमध्ये "बॉम्बे" असा उल्लेख असलेले विधेयक चर्चेसाठी येताच कामा नये. या विषया संदर्भात मी सचिवांना 5-6 वेळा भेटलो आहे. हा नवीन विषय नाही. या सदनात चर्चा झालेली आहे. याबाबत निर्णय द्यावयास पाहिजे अन्यथा हे कधीच होणार नाही. विधी व न्याय विभागाच्या सचिवांना सांगूनही त्यांच्यावर काही परिणाम होत नाही.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय येथे अनेकवेळा मांडलेला आहे. आम्ही त्यांच्याशी सहमत आहोत. ज्यावेळी बॉम्बे स्टेट होते त्यावेळी काही कायदे मंजूर झाले होते. याठिकाणी "बॉम्बे"चे "मुंबई" करण्यास ते सांगत आहेत. परंतु मुंबई स्टेट ऐवजी महाराष्ट्र स्टेट अशी सुधारणा केली तर ती ॲप्रोप्रिएट होईल.

यानंतर श्री.गायकवाड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात मागे अशी सूचना करण्यात आली होती की, बॉम्बे या शब्दा ऐवजी महाराष्ट्र हा शब्द वापरुन कायद्यात बदल करण्यात यावा. त्यामुळे बॉम्बे शब्द असलेले कोणतेही विधेयक या सभागृहात मांडले जाणार नाही, अशाच प्रकारे आपल्याकडून निदेश दिला गेला पाहिजे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली विनंती मान्य करुन ही विधेयके आज न घेता ती उद्या घेण्यात यावीत.

**उप सभापती** : मी आपल्या म्हणण्याशी सहमत व्हावयाचे म्हटले तरी उद्या या विधेयकात मुंबई हा शब्दाचा समावेश होईल काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये या विधेयकावर आमच्याकडून चर्चा होऊनही ही विधेयके मंजूर होणार नाहीत. याचे कारण असे आहे की, या सभागृहात पाच सहा वेळा चर्चा केल्यानंतर आणि त्या बाबत सांगितल्यानंतर देखील हा बदल करण्यात आला नाही. त्यामुळे शासनाला तशा प्रकारचे विधेयक आणावे लागेल. बॉम्बे ॲक्ट ऐवजी महाराष्ट्र ॲक्ट अशी सुधारणा करुन ते विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर करुन घ्यावे लागेल. त्या नंतरच त्या कायद्याचे नाव बदलू शकेल. निरनिराळया कायद्याची जी पुस्तके छापावयास गेलेली आहेत, त्यावर महाराष्ट्र ॲक्ट असा बदल होईल. ही प्रक्रिया सोपी नाही. आम्ही सांगितलेली बाब जर शासन ऐकतच नसेल तर कोठे तरी चाप हा लावावाच लागेल.

**उप सभापती** : शुध्दीपत्रक काढण्यास सांगितले तर ....

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, "बॉम्बे" शब्द की जगह पर "मुंबई" शब्द करना जरुरी है. बॉम्बे के नाम पर पहले जितने कानून बनाए गए हैं, उनके लिए अगर हम एक लाइन का प्रस्ताव पास कर दें कि राज्य सरकार के जितने भी कानून हैं, उनमें "बॉम्बे" शब्द की जगह पर "मुंबई" शब्द लिखा जाए अथवा "बॉम्बे" शब्द की जगह पर "महाराष्ट्र" शब्द लिखा जाए, इस प्रकार का एक लाइन का प्रस्ताव पास करके हम सारे कानूनों में यह बदलाव कर सकते हैं.

श्री. दिवाकर रावते : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. सय्यद जमा ने जो कहा है, उस पर सभागृह में चर्चा हुई है और माननीय मुख्यमंत्री महोदय ने यह बात रिकॉर्ड पर मंजूर की है कि ऐसा प्रस्ताव लाएंगे, लेकिन सरकार की ओर से ऐसा नहीं हो रहा है.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय या ठिकाणी जी चर्चा सुरु आहे, त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु या विधेयकात उद्याच हा बदल होणार नाही, त्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे पुढच्या अधिवेशनापर्यत ज्या ज्या ठिकाणी हा शब्द आहे, त्या शब्दामध्ये बदल करण्याची संधी शासनाला देण्यात यावी.

**उप सभापती** : मी यातून आणखी एक मार्ग काढतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या वादात पडू नये.

**उप सभापती** : मी वादात पडत नाही. माझी सूचना मी आपल्याला सांगतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक जरी मंजूर झाले नाही तरी अध्यादेश काढून सरकारला कारभार करता येऊ शकतो.

**उप सभापती** : आताच असे सांगण्यात आलेले आहे की, हा बदल करण्यासाठी थोडासा वेळ लागणार आहे. तेव्हा या विधेयकात ज्या ज्या ठिकाणी बॉम्बे लिहिलेले आहे, त्या ऐवजी मुंबई असे वाचावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अशा प्रकारे करु नका. आपण जर अशा प्रकारे काही सुचवले तर तो सदनाचा अवमान आहे. महाराष्ट्र हा शब्द वापरुन योग्य प्रकारचा कायदा मंजूर करणे हा सदनाचा अधिकार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की, या पुढे जी काही विधेयके येतील त्यामध्ये बॉम्बे या शब्दा ऐवजी मुंबई वा महाराष्ट्र असा शब्द वापरुन सादर केली गेली पाहिजेत. संबंधित मंत्र्यांनी असे सांगितले आहे की, त्या दृष्टीकोनातून लवकरात लवकर बदल करण्यात येईल. आता जे विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे, त्यामध्ये उद्या लगेच बदल करणे शक्य होणार नाही. उद्या जर असा बदल करता आला असता तर आपण ही विधेयके उद्यापर्यत पुढे ढकलली असती. पंरतु तसे करता येणार नसल्यामुळे ही विधेयके पुढे न ढकलता त्यावरील चर्चा सुरु करावी असे मला वाटते.

..3...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दोन विधेयके सभागृहासमोर आहेत हे विधेयक मागे घेतल्यामुळे सरकारचे काही अडणार आहे, अशातला भाग नाही. त्याबाबतीत अध्यादेशही काढता येऊ शकतो. त्याप्रमाणे अध्यादेश काढण्यात आला असून न्यायालयाच्या आदेशानुसार त्यासाठी आणखी मुदत आहे. हे विधेयक या ठिकाणी मंजूर का करावे लागत आहे ? तर वारंवार अध्यादेश काढून सरकार चालविता येणार नाही अशा प्रकारे न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. आपण केलेल्या कायद्याचा आणि मुंबई या शब्दाचा आपण सर्वांनी सन्मान करावयाचे ठरविले आहे ना ? मग हे विधेयक जर आता मंजूर झाले नाही तर त्यामुळे काहीही फरक पडणार नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आपल्या त्या कायद्याला फार मोठा सन्मान प्राप्त होईल. दुसऱ्या विधेयकामध्ये इंग्रजीमध्ये "मुंबई" असेच म्हटले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला असेल तो मला मान्य आहे. परंतु सभागृहापुढे अधिक माहिती आलेली आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो. याठिकाणी 1947 च्या अधिनियमात "तत्कालीन बॉम्बे" म्हणजे "मुंबई" **किंवा** "महाराष्ट्र" असे नाव देण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागातर्फे हाताळला जात होता. म्हणजे मुंबई ऐवजी महाराष्ट्र असे नामकरण करण्याचे काम चालले होते. परंतु राज्य शासनाने मराठी हा एक नवीन भाषा विभाग निर्माण केला असल्यामुळे बॉम्बेचे मुंबई करावे. त्यामुळे ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारचे जे जे शब्द असतील ते बदलण्याचे प्रस्ताव किंवा मागणी करण्यात आली होती ते सर्व प्रस्ताव या नवीन निर्माण केलेल्या मराठी भाषा विभागाकडे दाखल झाले असल्यामुळे या गोष्टीला काही कालावधी लागणार आहे. आणि म्हणून त्यासंबंधी हे विधेयक राखून ठेवावयाचे की नाही याबाबत निर्णय घेतांना विचार करावा लागेल.

**उप सभापती** : याठिकाणी असलेली दोन्ही विधेयके आज चर्चेकरिता घ्यावयाची की, उद्या चर्चेकरिता घ्यावयाची की, पुढील अधिवेशनामध्ये घ्यावयाची यासंबंधीचा निर्णय सन्माननीय सभापती घेतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 41 मध्ये इंग्रजीमध्ये "मुंबई" असे म्हटले आहे. त्यामुळे हे विधेयक चर्चेस घेण्यास काहीच अडचण नाही.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उप सभापती** : माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, विधेयक क्रमांक 41 आपण नंतर घेऊ. कारण या विधेयकावर माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना बोलावयाचे आहे. आता आपण नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु करु.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या विधेयकावर माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ऑन लेग आहेत. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी भाषण केले आहे. त्यामुळे हे विधेयक मंजूर करण्यास हरकत नाही. या विधेयकावर चर्चा करीत असतांना विधानसभेमध्ये माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी सरकारवर खूप ताशेरे ओढले आहेत. हे फेरीवाल्यांसंबंधीचे विधेयक सरकार जाणूनबुजून आणीत नाही असे ते म्हणाले आहेत. म्हणून हे विधेयक मंजूर करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

डॉ. दीपक सावंत : विधानसभेमध्ये कोण काय बोलले हे या सभागृहामध्ये कशासाठी सांगता?

श्री. भास्कर जाधव : मी कुणावरही आरोप केलेला नाही. त्याठिकाणी काय सांगण्यात आले त्याबाबत इथे माहिती देणे हे माझे काम आहे. गेली तीन अधिवेशने हे विधेयक राखून ठेवण्यात आले आहे. या बाबत सुप्रिम कोर्टाने सुध्दा निर्णय दिलेला आहे. त्या संदर्भातील संपूर्ण उपविधी नगरपालिका व महानगरपालिकांना पाठविण्यात आली आहे. फक्त माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचा महत्वाचा मुद्दा आहे तो याठिकाणी मान्य करण्यात आलेला नाही. म्हणून यामध्ये थोडीशी अडचण आलेली आहे. एकंदरीत त्यांनी देखील या विधेयकाचे समर्थन केले आहे. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे जाऊन आले आहे. या विधेयकाची संपूर्ण चाळणी होऊन आलेले अत्यंत चांगले असे हे विधेयक आहे. त्यामुळे सभागृहाने या विधेयकाला पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावर मी ऑन लेग असतांना मंत्री महोदयांनी असे भाषण कां केले? याठिकाणी माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

झाले असल्यामुळे हे विधेयक मंजूर करा असे मंत्री महोदय म्हणाले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, या विधेयकावरील चर्चा संपलेली नाही. या विधेयकावर मी अजून ऑन लेग आहे. त्यामुळे कृपा करुन आपण या सभागृहाची दिशाभूल करु नका. आपण ती करीत आहात ही अतिशय गंभीर बाब आहे. सरकारला स्वत:चा असा काहीतरी गरिमा असतो. माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी एखादी गोष्ट मनावर घेऊन जाहीर करतात त्यावेळी त्या गोष्टीला काहीतरी सन्मान असतो. या महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांचा शब्द जर चुकीचा असेल तर या सरकारच्या कोणत्याही शब्दावर कशासाठी विश्वास ठेवावयाचा असा प्रश्न निर्माण होतो.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझी एक उपसूचना होती आणि ती आहे. सध्याचे माननीय राज्यमंत्री हे त्यावेळी मंत्री नव्हते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदय आले आणि त्या अधिवेशनामध्ये त्यांनी मला बाहेर बोलवून घेतले. त्यावेळी श्री. हर्षवर्धन पाटील उपस्थित होते. माननीय मुख्यमंत्री मला म्हणाले की, रावतेजी, आपले काय म्हणणे आहे, आज हे बिल मंजूर करा. मी सांगितले की, माझी ही उपसूचना आहे. ती कशाच्या संदर्भात आहे ? त्यांनी सचिवांना बोलवून घेतले. सचिवांना बोलवून घेतल्यानंतर त्यांनी विचारले की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची उपसूचना काय आहे ? महानगरपालिकेचा अधिकार तुम्ही घेऊ नका एवढीच माझी उपसूचना होती. त्यांनी सचिवांना विचारले. सचिव त्या ठिकाणी बसले होते. श्री. हर्षवर्धन पाटील उपस्थित होते. माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार उपस्थित होते की नाही हे मला माहीत नाही पण आणखी दोन सन्माननीय सदस्य उपस्थित होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना विचारल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, यामध्ये ॲक्विझिशन ऑफ लँड आहे. मी सांगितले की, फेरीवाल्यांना जो झोन द्यावयाचा आहे तो अधिकार महानगरपालिकेचा असल्यामुळे ॲक्विझिशन ऑफ लँडचा प्रश्न कोठे येतो ? मुख्यमंत्र्यांनी त्यांना उलटा प्रश्न विचारल्यानंतर सचिवांनी सागितले की ठीक आहे, ती उपसूचना मान्य करण्यामध्ये काही हरकत नाही. त्यांनी सांगितले की हे मान्य करा. त्याच्यानंतर अधिवेशन संपण्यासाठी फक्त पंधरा मिनिटे बाकी होती. म्हणून ते असे म्हणाले की, आता या सभागृहामध्ये हे मंजूर झाले तर पुढे काय होईल ? मी सांगितले की, ही उपसूचना या ठिकाणी मंजूर झाल्यानंतर विधानसभा सभागृहामध्ये जाऊन पास झाली की हे विधेयक मंजूर होईल. मग ते म्हणाले की, ठीक आहे, पुढच्या अधिवेशनामध्ये आपण ही उपसूचना मंजूर करु. यामध्ये मी एक शब्दही इकडचा तिकडचा बोलत नाही. सचिव महोदयांनी त्या वेळेला हे सगळे मंजूर झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हे मान्य केले. यामध्ये सुदैव म्हणावे की दुर्दैव हा माझा विषय नाही पण या अधिवेशनाला मी येईपर्यंत माननीय मुख्यमंत्री महोदय बदलले आणि एका चव्हाण साहेबांच्या बदली दुसरे चव्हाणसाहेब आले. माननीय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मुख्यमंत्र्यांच्याही मी ही बाब निदर्शनास आणून दिली तसेच सन्माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांच्याही निदर्शनास ही बाब आणली. अशी कोणतीही चर्चा झाली नव्हती, माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले नव्हते असे त्यांनी सांगावे. मी चर्चा चालू करतो.. पण असा हट्ट का ? सचिव महोदय असे आहेत की, मुख्यमंत्री बदलल्यानंतर त्यांनी ताबडतोब त्यांना सांगितले की हे असे आहे, तसे आहे. ॲक्विझिशन ऑफ लँड इन एनी म्युनिसिपल कॉर्पोरेशन फॉर द हॉकर झोन हा महानगरपालिकेचा विषय आहे, नगरपालिकेचा विषय आहे. त्या बाजूला बसलेले सगळे सदस्य हे मान्य करतील. ही चांगली उपसूचना माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वीकारली होती. मी आताही सांगतो. मी खूप मोठी चर्चा करु इच्छित नाही. जी उपसूचना आहे ती शासनाने स्वीकारावी. हे बिल दोन मिनिटात मंजूर करु. आपण असे एकांगी जावयाचे हे बरोबर नाही. केवळ सचिव म्हणतो म्हणून त्याप्रमाणे राज्य चालणार आहे काय ? कोर्ट सांगते म्हणून हे सरकार चालणार आहे काय ? घरातील सदस्यांना काही किंमत नाही काय ? आमच्या अनुभवाला काही किंमत नाही काय ? आम्ही अनुभवातून जनतेचे जे प्रश्न मांडतो त्याला काही किंमत आहे की नाही ? हे सचिव संसार चालविणार काय ? हे काय चालले आहे ? सभापती महोदय, हे बरोबर नाही. सचिवांच्या हट्टाप्रमाणे हे मंत्री वागतात. मंत्र्यांनी राज्य करावयाचे असते, सचिवांनी नाही. जर एकदा मंत्र्यांना पटले की हे जनतेच्या हिताचे आहे तर त्यांनी सचिवांना सांगितले पाहिजे की, हे असेच असले पाहिजे. ही बाब अत्यंत दुर्देवी आहे की, सदनामध्ये सचिवांच्या हट्टाकरिता मंत्री ओणवे होत आहेत. ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे ? सचिवांचा हट्ट आहे. नगरविकास मंत्रालयाचे एक एक विधेयक मी काढून कसे चालले आहे ते मी दाखवीन. प्रत्येक वेळेला मी उभा राहतो आणि बोलतो. तुमच्याकडे पाशवी बहुमत आहे म्हणून त्याच्या जोरावर हे मंजूर कराल. पण सरकारने कोठे तरी सचिवांकडे अक्कल गहाण टाकली आहे हे दृश्य नको आहे. हे सहन होत नाही. विरोधी पक्षाचे जे काम आहे ते आम्ही करतो. जनतेच्या हिताची एखादी गोष्ट विरोधी पक्षाने सांगितली तर सरकारने ती स्वीकारली पाहिजे. पण सचिवांचा हट्ट पूर्ण करण्यासाठी जर आमचे मंत्री ओणवे होणार असतील तर आदर्शच घडणार आहेत आणि तुम्हालाही लाटेबरोबर खेचून घेऊन जाणार आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, या ठिकाणी त्यांनी जे सांगितले, जी दिशाभूल केली त्यामुळे मला बोलावे लागले. मी हे काही माझ्या मनातील सांगत नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव यांना मी अतिशय नम्र विनंती करतो. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये म्हणजे आताची कामकाज सल्लागार समितीची बैठक नाही किंवा परवाची सुध्दा बैठक नाही आणि त्याच्या अगोदरची सुध्दा नाही तर अधिवेशन भरण्यापूर्वी जी बैठक झाली होती त्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मी आग्रह धरला की, विधेयक क्रमांक 41 ला उपसूचना मंजूर करण्यासाठी मान्यता होती आणि ते बिल पहिल्या दिवशी आणावे. हे बिल पहिल्या दिवशी आणावे असा आग्रह मी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये धरला. कामकाज करुन घेण्याची जबाबदारी सरकारची असते. हे विधेयक पहिल्या दिवशी आणले. त्यानंतर मी माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव यांच्या लक्षात आणून दिले तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिले त्यानंतर त्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याशी आपण चर्चा करु. सचिवांना बोलवून सांगू. मुख्यमंत्र्यांनी मान्य केले होते. हे बिल पहिल्या दिवशी आणा असा आग्रह मी धरला होता.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हे विधेयक आणण्याचा मी आग्रह धरला होता. तरी सुध्दा हे विधेयक शेवटच्या दिवसापर्यंत का ठेवले होते, कशासाठी असे करण्यात आले ? हे अत्यंत दुर्दैवी आहे. केवळ हट्टाला पेटून आमचे म्हणणे मानायचे नाही हे बरोबर नाही.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, विशेषत: दलित घटकाचा, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा या विधेयकात दुरुस्ती करीत असताना शासनाने विचार करावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे अत्यंत संतापजनक व व्यथित भावनेतून केलेले वक्तव्य मी ऐकले आहे. त्यामुळे मला सुध्दा येथे बोलणे अवघड झाले आहे. परंतु मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनम्रपणे व वस्तुनिष्ठ माहिती देऊ इच्छितो की, परवाच्या दिवशी यासंदर्भात कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय मांडल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय माझ्याकडून समजावून घेतला, या विभागाच्या सचिवांकडून समजावून घेतला, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांकडून व त्या विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांकडून समजावून घेतला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे असे म्हणणे आहे की, हॉकर्स झोन ठरविण्याचे सर्व अधिकार शासन स्वत:कडे घेत आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. जेथे महानगरपालिका असेल तेथे महापौरांच्या अध्यक्षतेखाली व नगरपालिका असेल तेथे नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली हे झोन ठरत आहेत. दुसरी गोष्ट अशी की, यासंबंधी एक तांत्रिक समिती आहे. हे सर्व झाल्यानंतर शासकीय जमिनीवर किंवा एखाद्या शासकीय कार्यालयासमोर, एखाद्या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अडचण होईल अशाप्रकारचा कोठे निर्णय तर झाला नाही ना, एवढेच शेवटच्या टप्प्यात पाहण्याची शासनाची जबाबदारी आहे. याच्यापेक्षा जास्त शासनाचा हस्तक्षेप नाही. एखाद्या महानगरपालिकेला नजरेला समोर ठेवून हे केले जात आहे अशी कोणाची भावना राज्यकर्त्यांबद्दल निर्माण झाली आहे की काय असा विचार माझ्या मनात आला. हा विचार करीत असताना आणखी एक विचार मनात आला की, शिवसेना पक्षाकडे मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका अशाप्रकारच्या 2-3 महानगरपालिका आहेत. परंतु उर्वरित 18 किंवा 19 महानगरपालिका सत्तारुढ

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ MMP/

श्री.दिवाकर रावते....

पक्षाकडे आहेत. हा नियम सर्व महानगरपालिकांना सारखाच लागू होणार आहे. याबाबत कोठे काही चूक करीत नाही अशी भावना झाली असल्यामुळे व या बिलाची अत्यंतिक गरज असल्यामुळे हे विधेयक सभागृहासमोर आणणे महत्वाचे होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचा प्रश्न गेल्या अधिवेशनामध्ये सुध्दा होता. तो विषय मी तत्कालीन मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्याचे काम केले आहे. त्यावेळी त्यांनी जी बैठक घेतली त्या बैठकीला या विभागाचे सचिव असतील, परंतु मी त्या बैठकीला उपस्थित नव्हतो. सन्माननीय सदस्यांच्या भावना मी त्या त्यावेळी योग्य पातळीवर पोहोचविण्याचे काम मी केलेले आहे. या सगळयाचा सांगोपांग विचार केलेला आहे, हे कोणालाही नजरेसमोर न ठेवता, कोणावरही अन्याय करण्यासाठी हे विधेयक आणले जात नाही अशी ठाम खात्री शासनाची झाल्यामुळे हे विधेयक आज पुन्हा याठिकाणी आणण्याची वेळ आली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी हे विधेयक वाचले तर त्यामध्ये मागासवर्गीयांचा उल्लेख आहे, महिलांचा, अपंगांचा उल्लेख केलेला आहे हे दिसून येईल. या घटकांना त्यांच्या प्रमाणामध्ये समाविष्ट केलेले आहे.

श्री.उल्हास पवार : गटई कामगार व हॉकर्स यांचे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले होते. सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला निदेश दिलेले आहेत. म्हणून याबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा. कारण समाजातील गरीब, दीनदुबळया समाजासाठी हे विधेयक असल्यामुळे ते मंजूर होणे आवश्यक आहे असे मलाही वाटते.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : उप सभापती महोदय, या विधेयकावर बरीच चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी काल असे सांगितले होते की या विधेयकावर 5 ते 10 मिनिटे चर्चा केली जाणार आहे. तेव्हा थोड्या वेळात या विधेयकावरील चर्चा आटोपून घ्यावी. तसेच नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरही थोडक्यात चर्चा करावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : अशा प्रकारे काजकाजाचा क्रम बदलणे योग्य नाही.

**उप सभापती** : सभागृहाच्या संमतीनेच आपण कामकाज करीत असतो आणि कधी कधी क्रम देखील बदलला जातो. मी आता फक्त विचारणा केली. कामकाजाचा क्रम बदलला नाही.

श्री. दिवाकर रावते : उप सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये आज विधेयके घेण्याचे ठरविलेले आहे. सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात येईल आणि चर्चा मात्र विधेयकावरच होईल असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरले नाही असे जर येथे कोणी सांगितले तर मी आजपासून या सभागृहामध्ये बसणार नाही.

**उप सभापती** : याबाबतीत आपण माननीय सभापतींना विचारु. तोपर्यन्त मी 20 मिनिटासाठी सभागृहाची बैठक स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 6.02 ते 6.20 पर्यन्त स्थगित झाली.)

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XLI OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE BOMBAY POLICE ACT, 1951 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965)

(चर्चा पुढे सुरु...

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या विधेयकावर ऑन लेग आहेत. त्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, हे सभागृह कायदेमंडळ आहे असे आपण मानतो. या कायदेमंडळात कायदे पारित करणे, कायदे पारित करताना ते चर्चेने पारित व्हावेत अशी सर्वसाधारणपणे आपली भूमिका असते. विशेषकरुन या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे इतर विषयांबाबत जेवढा रस दाखवितात किंबहुना त्यापेक्षा नवीन कायदा चर्चेला येत असताना त्याबाबत अधिक रस दाखवितात. कायद्याचा सखोल अभ्यास करतात. चांगल्या प्रकारची वास्तववादी माहिती सभागृहापुढे मांडतात. त्याचा सरकारला फायदा होतो. म्हणून आपल्यामार्फत मी त्यांना विनंती करतो की, वि.स.वि.क्रमांक -41 वर त्यांनी चर्चा करावी, मुद्दे मांडावेत आणि सरकारला हे विधेयक संमत करण्यासाठी सहकार्य करावे.

श्री.दिवाकर रावते : धन्यवाद. सभापती महोदय, बिल मंजूर करायचे याच्या चर्चेत मी जात नाही. उपसूचना येतील त्यावेळी त्या उपसूचनांबाबत काय करायचे हे त्यावेळी पाहू. सर्वोच्च न्यायालयाचे काही निर्णय आहेत ते याठिकाणी मी वाचून दाखविणार आहे. सभापती महोदय,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1949 यामध्ये सुधारणा करण्याकरिता हे विधेयक सभागृहापुढे चर्चेला आलेले आहे. सन 1888 चा मुंबई अधिनियम क्रमांक 3 याच्या कलम 3 ची सुधारणा यासंबंधी कलम 2 मधील "यूयू" मध्ये फेरीवाला याची व्याख्या नमूद केलेली आहे.

नंतर 4एन.1...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

ती म्हणजे "ज्या ठिकाणी परवानगी देण्यात आली आहे, अशा ठिकाणी कोणतीही माल वस्तू किंवा कोणतीही व्यापारी वस्तू" असा शब्दप्रयोग दिलेला आहे. हा एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने फुटपाथवर काय विकावे व काय विकू नये यासंबंधीचा निर्णय दिलेला आहे, त्या निर्णयाचा अवमान यामध्ये केलेला आहे. ज्यावेळी सर्वोच्च न्यायालय अशा प्रकारे निर्देश देते की अमुक वस्तू फेरीवाला म्हणून विकता येणार नाही तसेच फेरीवाल्यांनी कुठला माल तयार करु नये यासंबंधीचेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत, ते मी पुढे वाचणार आहे. खरे म्हणजे मूळ मुद्दा असा आहे की, मुंबईच्या फेरीवाल्याबाबत सांगायचे तर परप्रांतियांचे लोंढे यावे, कोणीही यावे आणि कोठेही बसावे व काहीही करावे यामुळेच हा वाद निर्माण झाला आणि फेरीवाला झोन निर्माण करण्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली. सेनापती बापट मार्गावरुन आपण माहीमला येतो त्या रस्त्यात झोपड्या होत्या, आता त्या अस्तित्वात नाहीत. पण मला आठवते की, ही गोष्ट सन 1970-72 ची असावी, तेव्हा माझा मुंबई महानगरपालिकेशी संबंध सुध्दा नव्हता त्यावेळेस त्या झोपड्या पाडायला सुरुवात केली होती. तेव्हा शिवसेनेचे नगरसेवक म्हणून श्री. गंभीर हे निवडून आले होते. या झोपड्या पाडायला घेतल्यानंतर कोणीतरी व्होला तेरेसा नावाची महिला होती, ती न्यायालयात गेली व या कारवाईवर न्यायालयाकडून स्टे आणला होता. तो स्टे आजही उठलेला नाही. मला हे समजत नाही की, केवळ बारदाणाच्या सहाय्याने बनविलेल्या झोपड्या पाडायला घेतल्यानंतर देखील न्यायालय स्टे का देते ? परंतु त्या झोपड-पट्टीमध्ये दिवसा-ढवळ्या सुध्दा वेश्या-व्यवसाय चालत होता. त्यानंतर शासनानेच सन 1995 पूर्वीच्या झोपड्या पाडणार नाही अशी भूमिका घेतली आणि त्या झोपड्या फुटपाथवरुन गेल्या. रेल्वेच्या ट्रॅकमध्ये कुर्ल्याला ज्या झोपड्या होत्या त्याबाबत मात्र रेल्वेने आदेश काढले की, झोपड्या ताबडतोब उठवाव्यात. परंतु शासनाने मात्र नंतर सन 2000 पूर्वीच्या झ ोपड्यांचे पुनर्वसन करण्यासंबंधीचा निर्णय घेतला व अशा झोपडपट्टीवासीयांना जागा दिली हीच शासनाच्या धोरणातील विसंगती सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. कारण अशा प्रकारे निर्णय घेणे म्हणजे "एक ना धड, भाराभार चिंध्या" असाच प्रकार म्हणता येईल. त्याचप्रमाणे मुंबई महापालिकेच्या अधिकारावर अतिक्रमण करण्यासाठी एमएमआरडीए आणून बसविली व त्यांना जादा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..............

अधिकार दिले आणि महापालिकेचे अधिकार संकुचित करण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला आहे. सन 2000 पूर्वीच्या झोपड्या नियमित करुन त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत सरकारने आपल्या जाहीरनाम्यात सुध्दा उल्लेख केलेला आहे. परंतु त्यासाठी न्यायालयाने त्याला मान्यता दिली नाही. तरी देखील शासन सन 2000 पूर्वीच्या झोपड्या उठविण्यास तयार नाही, अशा प्रकारे विसंगत भूमिका फेरीवाल्यांच्या बाबतीतही निर्माण झाली आहे. मग सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, केंद्राने संपूर्ण देशासाठी एकत्रितपणे फेरीवाला धोरण ठरवावे व त्या अंतर्गत केंद्राच्या समवर्ती सूचीप्रमाणे प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यात तसे धोरण राबवावे, अशा प्रकारे हा प्रस्ताव येथे शासनाने आणलेला आहे. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय सुध्दा मुंबईच्या फेरीवाल्यांच्या संदर्भात निर्णय घेऊ शकले नाही.

सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात वेगवेगळे चार निर्णय दिलेले आहेत. यावरुन ते सुध्दा गोंधळलेले आहे. अशा प्रकारे गोंधळ निर्माण करणारा फेरीवाला हा विषय आहे. सर्वात जास्त फेरीवाल्यांची संख्या ही एकट्या मुंबई शहरात आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

हा विषय मुंबईचा आहेच. जर सर्वोच्च न्यायालयाने निश्चित स्वरुपात काय असावे आणि काय असू नये असे सांगितले असेल तर हा कायदा करीत असतांना मग "त्या कोणत्याही" असा जो शब्द वापरलेला आहे तो असता कामा नये. मुंबई महानगरपालिकेची फेरीवाल्यांच्या संदर्भात एक सूची असून त्या सूची नुसार तो शब्द असावयास पाहिजे होता. फेरीवाल्यांनी काय विकावे यासंदर्भात तुम्ही सूची बनवली आहे काय याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात देण्याची गरज आहे. मुंबई महानगरपालिकेच्या फेरीवाल्यांच्या सूची प्रमाणे माहिती असावयास पाहिजे होती. यामध्ये आपण "काहीही असो" असा जो शब्द वापरला त्यामुळे आता फेरीवाले काहीही विकावयास लागतील. डोक्यावर बोचके घेऊन, खांद्यावर बोचके घेऊन,गळयात घालून विकतो तो फेरीवाला. आपण असे लिहिले आहे की, "फेरीने विक्री करीत असेल, किंवा विक्री करण्यासाठी मांडत असेल, किंवा लाभ मिळवण्यासाठी किंवा लोकांना सेवा पुरवण्यासाठी व त्यांच्या सुविधेसाठी कौशल्य वापरत असेल अशी एखादी व्यक्ती" अशा प्रकारचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. म्हणजे मला हुक्की आली अरे, मी हे चांगल्या प्रकारे तयार करु शकतो आणि विकू शकतो तर तो सुध्दा अशा मालाची विक्री करु शकतो. आपण पुढे असे म्हटले आहे की, "फेरीने विक्री करणा-याचा त्या प्रमाणे अर्थ लावण्यात येईल". "फेरीने विक्री करणे" हा शब्द तुम्ही इन्व्हर्टेड मध्ये टाकलेला आहे. पृष्ठ क्रमांक 15 वर जे आहे त्याच्याशी हे संदर्भीत आहे. मुळ कायद्यातील 113 (अ) मध्ये म्हटले आहे की, " आयुक्ताने दिलेल्या लायसन्सखाली..." आपण या ठिकाणी लायसन्स शब्द का वापरला ? लायसन्सच्या ऐवजी तुम्ही परवाना शब्द वापरावयास पाहिजे होता परंतु तो शब्द आपण वापरलेला नाही. या राज्याची भाषा मराठी आहे हे तुमच्या अधिका-यांच्या डोक्यात जात नसेल तर लावा त्यांना ......हा सभागृहाचा अपमान आहे. तुम्ही अधिका-यांना का घाबरता ? सरकार व मंत्री हे अधिका-यांचे नोकर आहेत काय ?

मला येथे बोलतांना भान ठेवावे लागते कारण येथे एक साहित्यिक बसलेले आहेत. सरस्वतीचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी लागत असते. हा विषय मी पुढे नेत नाही. आमचे नवीन मुख्यमंत्री दिल्ली हाय प्रोफाईल आहेत. मराठी माणूस असावा अशी त्यांची अस्मिता नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यामुळे ते राहतील, बोलतील, वाकतील आणि करतीलही. त्याचे पूर्ण जीवन दिल्लीत गेल्यामुळे "अवघे विश्वची माझे घर" असे ज्ञानेश्वरांप्रमाणे ते चालणार आहेत. प्रांतवाद, अमुक, तमुक याबाबत ते काहीही बोलणार नाही, त्यांना कोणीही परके नाही. त्यांचा दृष्टीकोन वेगळा आहे आणि आमचा भूमीपत्राच्या संदर्भातील दृष्टीकोन वेगळा आहे. या सदनात बसलेला एकही सदस्य असा नसेल की, ज्याला भूमीपुत्र महत्वाचा वाटत नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJITSS/ KGS/ MMP/ ———पूर्वी श्री.जुन्नरे...——— ———

18:35

श्री.दिवाकर रावते........

...... हे सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती ठरविणार आहेत. त्या स्वायत्त बॉडी आहेत हे मानायला सरकार तयार नाही. या विधेयकाच्या कलम 113 (क) मध्ये उल्लेख आहे की, "राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन महानगरपालिकेला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे बृहन्मुंबईतील कोणतेही क्षेत्र "फेरीवाला" क्षेत्र म्हणून घोषित करता येईल." याठिकाणी सांगण्यात आले की, हे सर्व महानगरपालिका ठरविणार असे सांगण्यात आले. परंतु तसे नाही. हे सरकार महानगरपालिकेच्या उरावर बसले आहे. कारण विधेयकात असा उल्लेख आहे की, "राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन.... " या वाक्याचा मराठीत शुध्द अर्थ आपणास समजला असेल. कायदा वाचायचे थोडेफार ज्ञान आम्हाला आहे. वकिलांना जास्त असते. वकिलांना आयुष्यभर खोटे बोलावे लागते. ते खोटे बोलले नाही तर त्यांचे पोट भरणार नाही.... मी या वक्तव्यावर ठाम आहे. तो खोटारडा नसतो..

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी असे वक्तव्य केले की, वकिलांना खोटे बोलल्याशिवाय पोट भरता येत नाही. वकील हा स्वत:चे खरे किंवा खोटे ओपीनियन देण्यासाठी नसतो. पक्षकाराची जशी केस असेल त्याप्रमाणे ती कोर्टासमोर मांडणे हा त्याचा व्यवसाय आहे. तेव्हा वकिलांनी खोटे बोलल्या शिवाय त्यांचे पोट भरत नाही असे जे वक्तव्य केलेले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी माझ्या मताशी सहमती दर्शविली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. वकील व्यक्तीगत खोटा नसतो. मी असे म्हणालो की, त्याला खोटे बोलावे लागते. चोराचे वकीलपत्र घेऊन तो त्याच्या बाजूने उभा राहतो आणि त्याने चोरी केली नाही असे सांगतो. वकील हा सन्मानाचा भाग आहे. आम्ही याठिकाणी जे कायदे करतो ते वकिली चालण्यासाठी करीत आहोत. माझी अशी उपसूचना आहे की, "राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन"हे शब्द काढून टाकावेत. कारण तो महानगरपालिकेचा अधिकार आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री रमेश शेंडगे ):** सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी जी विनंती केलेली आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, संबंधित वक्तव्य तपासून कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी ते मान्य केलेले आहे. आपण कशाला ते कामकाजातून काढता. अन्यथा मी ते वाक्य पुन्हा रिपीट करतो. मी असे म्हणालो की, अशिलाची बाजू मांडताना त्याला खोटे बोलावे लागते. त्याची खोटे बोलण्याची इच्छा नसते ही बाब सत्य आहे. कारण अशिलाकडून फी घेतल्याशिवाय त्याचे पोट भरत नाही. वकील काही नोटा छापत नाही. कसाबचा वकील खोटे बोलतो आहे ना ? हा व्यवसायाचा प्रश्न आहे. खोटे बोलण्याची त्याची इच्छा नाही. वकील जेव्हा अशिलाची बाजू मांडतो त्यावेळी तो स्वत:चा नसतो तर अशिलाचा माणूस असतो.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी पुन्हा शब्दाची हेराफेरी करुन वकील खोटे बोलतो असेच सन्माननीय सदस्य सांगत आहेत. वकिलाला माहीत असो किंवा नसो असेही बोलता येणार नाही. कारण वकील हा कोणत्याही घटनेचा साक्षीदार नसतो. कोणत्याही डॉक्युमेंटचा साक्षीदार नसतो. जे अशिलाकडून सांगितले जाते ते तो बोलत असतो. तेव्हा अशील जे सांगतो ते खरे किंवा खोटे आहे हे वकिलाला माहीत असण्याचे कारण नाही ,याची कृपया नोंद घ्यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, "राज्य शासनाची पूर्व मान्यता" घेऊन हे वाक्य काढून टाकावे अशी माझी सूचना आहे. ..कारण मंत्रीमहोदयांकडे त्यांच्या भागातील कार्यकर्ते आलेत आहे आणि त्यांनी सांगितले की, हा झोन इथे नको, "ये इधर नही होना चाहिए.." असे सांगितले तर मंत्रीमहोदय त्याप्रमाणे कारवाई करतील...

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, बाहेर एक मोर्चा आलेला आहे त्या मोर्चाला भेटण्यासाठी मी पाच मिनिटांकरिता सभागृहाच्या बाहेर जाऊन येते, आपण मला परवानगी द्यावी.

यानंतर श्री.गायकवाड...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते :सर्वापेक्षा मंत्री महत्वाचे आहेत.ज्याला भेटावयाला यावयाचे आहे तो महत्वाचा नाही. मंत्र्यांकरिता तासन तास प्रतीक्षा केली जाते त्यामुळे मंत्री मोठा आहे. सभापती महोदय, 113 (क) कलमामध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की , "राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन, महापालिकेला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे, बृहन्मुंबईतील कोणतेही क्षेत्र फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करता येईल " परतु त्यासाठी शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. " अन्यथा यामध्ये महानगरपालिकेचा अधिकार कोठे आहे हे मला यातून दाखवा. शासनाने मान्यता दिली तरच तसे करता येईल अन्यथा महानगरपालिकेच्या हातामध्ये काहीही अधिकार नाही. या कलमामध्ये तसे स्पष्टपणे म्हटलेले आहे आणि तेही शुध्द मराठीच म्हटलेले आहे. त्यापुढे असे म्हटलेले आहे की," ज्या ठिकाणी फेरीवाल्यांना फेरीने विकण्यास परवानगी असेल अशा रीतीने फेरीवाला क्षेत्रे घोषित केलेली क्षेत्रे ही तात्पुरते किंवा कायम स्वरुपी फेरीवाला क्षेत्र असतील." ही बाब सुध्दा राज्य सरकारच ठरविणार आहे. हे क्षेत्र तात्पुरते आहे आणि दुसरे क्षेत्र हे कायम आहे हे राज्य सरकार ठरविणार असल्यामुळे त्यासंबंधीचा अधिकार महानगरपालिकेकडे नाही.महानगरपालिकेने सांगितले की अमुक हे क्षेत्र फेरीवाला क्षेत्र आहे तर त्याला राज्य सरकार मंजुरी देईल त्यानंतर अमुक क्षेत्रे हे तात्पुरते आहे आणि अमुक क्षेत्र हे कायम आहे असे सांगितले जाईल. त्याबाबतीत सरकारकडे काही तक्रार आली आणि क्षेत्र बदलले तर पुन्हा ते पाठविले जाणार अशा प्रकारे हा आटयापाटयाचा खेळ सतत चालूच राहील. सभापती महोदय, 313 कलमामध्ये फेरीवाला कसा असावा, तो तात्पुरता असावा की कायम असावा याबाबतीत उल्लेख केलेला आहे तरी 313 (ड) (3)मध्ये असे म्हटलेले आहे की, " कलम 313,313 अ, 313 ब मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, " ज्या फेरीवाल्याला पोट कलम 2 अन्वये प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याला उपविधीन्वये घालून दिलेल्या शर्ती, निर्बध व मर्यादा याच्या अधीनतेने फेरीवालाक्षेत्रात फेरीची विक्री करता येईल. " यामध्ये पुन्हा नियम बदलण्यात आला आहे.त्याला आता लायसन्स मिळणार आहे आणि हे लायसन्स घेऊन तू तिकडे जा असे सांगण्यात येईल. या महाराष्ट्रामध्ये वकीलाने प्रमाणपत्र करुन दिलेले असते हा फेरीवाला कोठून आला हे वकीलाला माहीत नसते. बिहारी, भय्या,गुजराथी, पंजाबी,बंगाली हा नेमका कोठून आला हे त्याला माहीत नसते. वकीलापुढे तो अशील म्हणून उभा आहे.त्याने वकीलाला असे सांगितले की, मला पंधरा वर्षाच्या वास्तव्याचा

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते,

दाखला पाहिजे.त्यावर वकील त्याला असे सांगतो की , त्यासाठी तुला अमुक एवढे पैसे पडतील. तुझ्याकडे अमुक सर्टिफिकेट आहे काय ? तर तो अशील सांगेल की, माझ्याकडे ते सर्टिफिकेट नाही. अमुक कागद आहे काय असे वकील त्याला विचारील त्यानंतर तो अशील असे सागेल की तो कागद माझ्याकडे नाही.तो पुढे असेही सांगेल की," मैं कल परसो आया हूँ तेव्हा तो वकील त्याला असे सांगेल की ," आपको पाच हजार रुपये देना पडेगा.."

ॲड.उषा दराडे : तो अशील असतो.

श्री.दिवाकर रावते : कोर्टाच्या समोर अनेक वकील उभे असतात. मी आपल्याला किल्ला कोर्टात घेऊन जातो आणि आपल्याला हवे ते सर्टिफिकेट त्याच्याकडून करवून देतो मात्र आपण वकील आहात हे त्याला सांगता कामा नये.मुंबईतील किल्ला कोर्टासमोर वकील उभे असतात हे सर्वानाच माहीत आहे. माननीय सदस्यांनी सांगितले की, वकिलासमोर अशील उभा असतो.त्याप्रमाणे मी त्याच संदर्भात बोलतो. वकीला समोर अशीलच उभा असतो. आम्हाला अशीलाशी काहीही देणे घेणे नसते.तो जे काही सांगेल तेच आम्ही कोर्टात सांगत असतो.

ॲड.उषा दराडे : तो फक्त आयडेंटीफिकेशन करीत असतो.ॲफेडेव्हीटमधील कन्टेन्टशी वकीलाचा काहीही संबंध नसतो.

श्री दिवाकर रावते : माझे तेच म्हणणे आहे.

ॲड उषा दराडे : परंतु तसे म्हणणे रेकॉर्डवर येत नाही. 5 हजार रुपये वकील घेतो असे आपण म्हणाला आहात.

श्री.दिवाकर रावते : वकील पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे.कसाबनेसुध्दा वकील लावला होता.तू गोळया घातल्या नाहीस आणि पाकिस्तानातून आला नाही असे असत्य सांगण्यासाठी वकील पाहिजे असे सांगितल्यानंतर वकील नेमण्यात आला होता.वकिलाने सांगितलेली फी त्या व्यक्तीने दिली की त्याला पंधरा वर्षाच्या वास्तव्याच्या दाखल्यावर शिक्का मारुन आणून देतो. माननीय न्यायमूर्तीचा वकीलांवर विश्वास आहे आणि त्यांच्यावर तर विश्वास हा असलाच पाहिजे. त्यांच्यावर विश्वास असणे हा काही दोष नाही. वकिलांवर विश्वास असणे हा वकीलाचा सन्मान असतो त्यामुळे वकिलाने जी काही कागदपत्रे दिलेली आहेत त्यावर विश्वास ठेऊन त्यावर शिक्का मारण्यात येतो आणि ही व्यक्ती पंधरा वर्षे वास्तव्य करीत आहे असे सर्टिफिकेट मिळते त्यामध्ये वकिलाचे कसब अधिक असते..

नंतर श्री.सरफरे

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अशाप्रकारे हा काल परवा आलेला कायम फेरीवाला क्षेत्र, आणि तात्पुरता फेरीवाला क्षेत्र याचा परवाना घेणार आणि सरकार ठरवील त्याप्रमाणे तो नाचणार. शासनाने यामध्ये "कोणत्याही परिस्थितीत, ना - फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीने विक्री करता येणार नाही." असा महत्वाचा क्लॉज टाकला आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 नुसार त्याचा अपराध सिध्द झाला तर सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कैदेची तरतूद यामध्ये दिली आहे. मी यानंतर या संदर्भातील सुप्रिम कोर्टाचे जज्जमेंट वाचून दाखविणार आहे. त्यामध्ये क्रिमिनल प्रोसेडिंगच्या संदर्भात म्हटले आहे. या सर्व कायदेशीर तरतुदी असल्यामुळे यामधून वकील बाजूला जाऊ शकत नाही. कारण याठिकाणी तसे म्हटले आहे, त्याला मी काय करणार? अपराध सिध्द करण्याची जबाबदारी कुणाची? यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता येत असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीने विक्री करता येणार नाही असे तुम्ही कायद्यात म्हटले आहे. मंत्रिमहोदय, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 प्रमाणे त्यामध्ये महापालिका क्षेत्र आले, पोलीस खाते आले. फेरीवाला तिथे बसू नये याकरिता कारवाई करण्याचा अधिकार महापालिकेकडे आला. हा अपराध सिध्द करण्याची जबाबदारी कुणाची आहे? हा विषय ज्यावेळी येतो त्यावेळी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होते. मग या संदर्भातील जबाबदारी कशी घ्यायची हे राज्य शासनाने स्वयंस्पष्ट पध्दतीने ठरवावे लागेल, तरच हे सर्व अंमलात आणता येईल.

सभापती महोदय, पान क्रमांक 4 वर 25 अ मध्ये असे म्हटले आहे की, "फेरीवाला" याचा अर्थ मघाशी म्हटल्याप्रमाणे या क्लॉजमधील ओळ क्रमांक 3,4,5 आणि 6 मध्ये म्हटले आहे की, "यांची फेरीने विक्री करीत असेल किंवा विकण्यासाठी मांडत असेल किंवा जी लाभ मिळविण्यासाठी कोणत्याही हस्त व्यवसायात किंवा लोकांना सेवा पुरविण्यासाठी आणि त्यांच्या सुविधेसाठी त्यांचे कौशल्य वापरीत असेल" माननीय मंत्री महोदय, सरकारला या क्लॉजमध्ये काय अभिप्रेत आहे हे तुम्हाला सांगावा लागेल. फेरीवाला ही सोशल सर्व्हिस आहे काय? यामध्ये तेल मॉलिशवाला सुध्दा आहे काय हे आपण सांगावे. एका मॉलिशवाल्याच्या प्रकरणामध्ये आपल्याच विदर्भातील एका मंत्र्याला घरी जावे लागले. तुम्ही कायद्यामध्ये हे टाकले आहे त्यामुळे तुम्हाला हे स्पष्ट करावे लागेल. नाही तर तुम्हाला हा क्लॉज वगळावा लागेल.. लोकांना सेवा पुरविण्यासाठी म्हणजे काय? आपण फूटपाथवर डॉक्टर बसविणार काय? "त्यांच्या सुविधेसाठी त्याचे कौशल्य

श्री. दिवाकर रावते .....

वापरीत असेल" म्हणजे काय? कानातील मळ काढण्याचे कौशल्य यामध्ये अभिप्रेत आहे काय ते सांगा. एक फेरीवाला रस्त्यावर माल विकतो तो काय व कसली सुविधा पुरविणार? ज्यांच्यासाठी तुम्ही हा कायदा तयार करीत आहात तर मग त्याचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. "ना फेरीवाला क्षेत्र याचा अर्थ ज्या ठिकाणी फेरीने विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे असे कलम 385 अ अन्वये महानगरपालिकेने "ना फेरीवाला क्षेत्र" म्हणून घोषित केलेले शहरातील क्षेत्र" या ऐवजी "महानगरपालिकेने घोषित केलेले क्षेत्र" असे आपण म्हणावयास हवे होते. "आणि शासनाची मान्यता घेतल्यानंतर" असे तुम्ही म्हणावयास हवे होते. आपण सुरुवातीला म्हटले की, शासनाची पूर्व मान्यता घेतली पाहिजे. ही पूर्व मान्यता घेतल्यानंतर "महापालिकेने घोषित केलेले क्षेत्र"असे पाहिजे. तुम्ही 385 अ कलमामध्ये सुध्दा "छोटया मोठया महापालिकांसाठी राज्य शासनाची पूर्व मान्यता" हा शब्द आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, सगळीकडे पूर्व मान्यता हा शब्द छोट्या मोठ्या पंचायती, महापालिका, नगरपालिका या ठिकाणी लागू करणार. म्हणजे महाराष्ट्राचा कारभार सचिवालयामध्ये आला पाहिजे. म्हणजे हप्ते फक्त महानगरपालिकेच्याच लोकांनीच का जमवावयाचे ? पोलिसांनीच का जमवावयाचे ? तोही कोट्यवधी रुपयांचा आहे. मंत्रालयात फाईल आली पाहिजे. त्यामध्ये डेक्स ऑफीसर पाहिजे. महानगरपालिकेचा सगळा कारभार आपल्याकडे केंद्रिभूत करावयाचा, महाराष्ट्रामधील नगरपंचायती पर्यंतच्या फेरीवाल्यांचा कारभार आपल्या हातामध्ये ठेवावयाचा. काही फेरीवाले बाहुलीचे डोके, बाहुलीचा हात, बाहुलीचा पाय, बाहुलीचे आंगडे, बाहुलीचे झबले विकतात. म्हणजे प्रत्येक फेरीवाला जे विकेल त्याबाबतीत राज्य सरकारचे नियंत्रण असेल.

सभापती महोदय, हे सर्व गंभीर आहे. हे सर्व ऐकल्यानंतर हे किती गंभीर आहे ही बाब सर्वांच्या लक्षात येईल. फेरीवाला म्हणजे आपल्या डोळ्यासमोर अशी बाब येते की, फूटपाथवर बसून जो माल विकतो तो फेरीवाला. टोपली घेऊन बंगाली माणूस घरोघरी मासे विकण्यासाठी येतो तो फेरीवाला. करवा मण्यांची माळ घेऊन जो फिरतो तो फेरीवाला. मुंबई महानगरपालिकेने केळी विकण्यासाठी हातगाडीचे फक्त 400 लायसन्स दिलेले आहेत. श्री. वामनराव महाडिक आता हयात नाहीत. ते या सदनाचे सदस्य होते. त्यांनी हा प्रश्न मांडला होता. मुंबईमध्ये केळी विकण्याच्यचा गाड्या 8 हजार आहेत. त्या गाड्या अधिकृत नाहीत पण त्या गाडीवर लायसन्सची पाटी लावलेली असते. झेरॉक्स कॉपी लावलेली असते. अधिकृत लायसन्स 400 दिलेले आहेत आणि 8 हजार केळी विकण्याच्या गाड्या आहेत. 8 हजार फेरीवाले झेरॉक्स कॉपी लावून या गाड्या चालवितात. कै. वामनराव महाडिक यांनी तेव्हापासून हा विषय लावून धरलेला होता. ही परिस्थिती आहे. आपल्याला हे फेरीवाले अपेक्षित आहेत. तसे शासनाला अपेक्षित नाही.

सभापती महोदय, शासनाने आम्हाला एक डॉक्युमेंट दिले होते. मला एक पत्र आलेले आहे. ते मी मागितले होते. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या समस्या, राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या संदर्भात हे सगळे पेपर्स आहेत. त्यावेळी श्री. राजेश टोपे हे राज्यमंत्री होते. त्यांनी जे काही व्हर्जन तयार केले होते, त्यांनी जो काही वर्कशॉप घेतला होता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते ....

त्यामध्ये त्यांनी हे सगळे दिलेले आहे. त्यामध्ये किती फेरीवाले असावेत याबाबत असे दिले आहे की, लोकसंख्येच्या 2 ते 2.5 टक्के फेरीवाले असावेत. आता मुंबईची अधिकृत लोकसंख्या 1 कोटी 30 लाख आहे. बेकायदेशीर सोडून द्या. या लोकसंख्येच्या 2 टक्के म्हणजे साधारणत: अडीच ते तीन लाख फेरीवाले मुंबईमध्ये असले पाहिजेत. या राष्ट्रीय धोरणाप्रमाणे तसेच केंद्र सरकारच्या, सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्याप्रमाणे एवढे फेरीवाले असले पाहिजेत. आज मुंबईमध्ये जवळजवळ 25 लाखाच्या वर फेरीवाले आहेत. म्हणजे आपल्यासमोर काय आव्हान आहे ते बघावे. कोणाला काढावयाचे, किती लोकांना काढावयाचे, कसे काढावयाचे हा प्रश्न आहे. आपण हा कायदा मंजूर केल्यानंतर हे सर्व करावे लागणार आहे.

नागरी भागातील रस्त्यावरील विक्रेत्यांसाठी राष्ट्रीय धोरण 2004 यामध्ये फेरीवाल्यांकरिता जी मानके दिलेली आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, शहरातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत 2 ते 2.5 टक्के फेरीवाल्यांचे नियोजन असले पाहिजे. म्हणजे यांच्या पलीकडे जे आहेत त्या सगळ्यांना काढून टाकावयाचे आहे. हे कसे करणार हे आपल्या उत्तरामध्ये सांगावे लागेल. ना फेरीवाला क्षेत्र, फेरीवाला क्षेत्र तारांकित करणे हे बरोबर आहे. फेरीवाल्यांना सामाजिक सुरक्षा देण्याचे ठरवित आहेत. ठीक आहे. ती सुध्दा माणसे आहेत त्यामुळे हे करावे लागेल. मुंबई शहराची रोजची तरंगती लोकसंख्या म्हणजे फ्लोटींग पॉप्युलेशन 50 ते 55 लाख आहे. मुंबई शहरात रोज 55 लाख लोक येतात आणि संध्याकाळी कामधंदा झाल्यावर निघून जातात. तेवढ्या लोकांना मुंबई शहरामध्ये सर्व सुविधा पुरवाव्या लागतात. हागणे, मुतणे, सुलभ शौचालय, त्यांच्यासाठी पिण्याचे पाणी किंवा अमुक करावयाचे, तमुक करावयाचे हे सर्व करावे लागते. कारण ज्यावेळी मी नगरसेवक झालो त्यावेळी ही तक्रार होती. आमच्या झेंडूचा संपूर्ण फूटपाथ चोवीस तास लघवी करण्यासाठी वापरला जात होता. काल मी या ठिकाणी इकडच्या फ्लायओव्हर कडून आलो त्या ठिकाणी सुध्दा बाजूला लोक उभे असतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सुलभ शौचालयाच्या कल्पनेचा मी जनक आहे. त्यावेळी मुंबई महानगरपालिकेत श्री.तिनईकर हे आयुक्त होते. ही योजना आणण्यासाठी इच्छुक नव्हते. परंतु मी त्यांना सांगितले की, तुम्हाला ही योजना आणावी लागेल. ज्यावेळी आंतरराष्ट्रीय महापौर परिषद झाली त्यावेळी इंग्लंडमधील व मुंबईतील सार्वजनिक शौचालयांची तुलना झाली होती. आता सुलभ शौचालयांची संख्या किती तरी वाढली आहे. मराठी माणसांची किती इज्जत आहे त्याचे एक उदाहरण मी देतो. सभापती महोदय, हे सांगताना मला लाज वाटते. आयडिया मोबाईलची टी.व्ही.वर जाहिरात दाखविली जाते. ज्या प्रांतामध्ये गेल्यावर त्या प्रांताची भाषा बोलण्याची ती जाहिरात आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्यावर जाहिरातीतील माणसाने बसमध्ये रविंद्रनाथ टागोरांची कविता म्हटल्यावर त्याला बसण्यास लगेच जागा दिली जाते असे दाखविले जाते. मराठी माणसांची ओळख काय आहे ते आता तुम्हाला सांगतो. एक माणूस रेल्वेतून बाहेर येतो. वास्तविक रेल्वेत शौचालयाची सोय आहे. परंतु त्याला असे सांगितले जाते की, रेल्वेतून उतरताना सुलभ शौचालय कोठे आहे ते मराठीतून विचार म्हणजे मराठी माणूस म्हणून तुला लगेच स्वीकारतील. ही आमची जाहिरात. मी हगणे, मुतणे असा उल्लेख केला, त्याबद्दल समोरच्या सन्माननीय सदस्यांना राग आलेला दिसतो, पण आमची ही चीड आहे. त्या जाहिरातीमध्ये मराठी माणसाची हीच ओळख दाखविली आहे ना ? त्याने मराठीतून सुलभ शौचालय कोठे आहे असे मराठीतून विचारल्यावर, आपला माणूस आला, आपला माणूस आला, काय आयडिया आहे असे बोलले जाते. म्हणजे हगणे, मुतणे विचारल्यावर आमचा मराठी माणूस ओळखला जातो, परंतु संस्कृती विचारली तर मराठी माणूस ओळखला जात नाही. ही जाहिरात रोज सुरु असून आपण ती रोज टी.व्ही.वर बघतो. समोरच्या सन्माननीय सदस्यांना मी हे बोलल्यामुळे का खुपत आहे ?

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे बोलत होते, तो विषय आता मी उपस्थित करतो. मी स्थायी समितीचा अध्यक्ष होतो. तत्कालीन महापालिका आयुक्त श्री.तिनईकर यांचे असे म्हणणे होते की, फॅशन स्ट्रीटला दुसरीकडे स्थलांतरित केले पाहिजे. चर्चगेट येथे मार्बलचे सुंदर पुतळे आहेत. त्यात नामदार गोपाळ कृष्ण गोखले, महादेव गोविंद

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.दिवाकर रावते....

रानडे यांचे पुतळे आहेत. तेथे असलेले फेरीवाले त्यांच्या हातामध्ये बॅगा अडकवित असत. त्यामुळे मी एक मोहिम घेऊन त्यांना हटविले होते. एका पुतळयाच्या हातात बॅगा, एकाच्या हातात साडी असायची, त्या पुतळयांचा वापर हे फेरीवाले मस्त करीत होते. ती योजना मी अंमलात आणली. त्यानंतर न्यायालयाने तेथील झोनपैकी काही फुटपाथ फेरीवाला मुक्त करावे असे आदेश दिले होते, त्यामुळे एकूण 150 फेरीवाल्यांना फॅशन स्ट्रीटवर अधिकृतपणे आणले. आता त्याठिकाणी पाहिले तर 1500 लोक दिसतील. हे लोक कोठून, कसे आले, कोणी आणले ? आमच्या महानगरपालिकेच्या अधिका-यांनीच हप्ते खाऊन आणले आहेत. हे सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना आठवत असेल. आता तर त्या फॅशन स्ट्रीटवरील धंदेवाले मेट्रो थिएटरपर्यंत पोहोचले आहेत, त्याच्या पुढे जागा नाही म्हणून तेथेपर्यंत ते थांबले आहेत, ही परिस्थिती आहे.

या विधेयकात असे नमूद केले आहे की, ना फेरीवाला क्षेत्र कोणते असेल, 2 मीटरपेक्षा कमी रुंदीची फुटपाथ, गर्दीच्या ठिकाणी वाहतुकीच्या कोंडीचे ठिकाण, रेल्वेची स्थानके व त्याच्या बाहेरचे सर्व रस्ते यामध्ये आले. गोपनीय व सुरक्षिततेचे ठिकाण, गोपनीय व सुरक्षिततेच्या ठिकाणांची यादी काय आहे ते मला माहीत नाही. संवेदनशील ठिकाणे, उदा. धार्मिक स्थळे, शैक्षणिक स्थळे आणि रुग्णालये. आता मराठी माणसाच्या हातात केवळ हाराचाच धंदा राहिला आहे, बाकी कोणताही धंदा मराठी माणसांच्या हातात राहिलेला नाही. ना फेरीवाला झोनमध्ये काय असेल ते यात दिलेले आहे. हे सर्व जाणीवपूर्वक चालू आहे. मराठी माणसांना छोटया छोटया धंद्यातून उद्ध्वस्त करण्याचे हे धोरण आहे. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी फुलवाल्यांचा धंदा कोण करतात, तर मराठी माणसे, त्यांनी आता तेथे बसायचे नाही. आता सिध्दीविनायक मंदिराजवळच्या फुलवाल्यांना हटविले जाईल. शाळांजवळ जे फेरीवाले असतात त्यांना तर काढलेच पाहिजे, कारण त्या मुलांना नको ते खायला घालतात.चिक्की सारखे चिकट पदार्थ उघडयावर विकत असतात.

यानंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

रुग्णालयाच्या येथे फळविक्रेते बसतात, शहाळी घेऊन फेरीवाले बसतात. त्यांना देखील आता तेथून जावे लागणार आहे. दुकानाच्या पदपथावरील सर्व फेरीवाल्यांना आता उठवावे लागेल. त्यामुळे दादर येथील रानडे रोडवरील सर्व फेरीवाले हिंदू कॉलनीमध्ये आणावे लागतील. त्या रोडवरील सर्व फेरीवाल्यांना काढावे लागेल. मी लहान असताना आईचा हात धरुन दादरला जात होतो त्यावेळी विसावा हॉटेलच्या समोरच्या पदपथावर माळणी बसत होत्या. त्या देखील तेथून जातील. या विधेयकातील तरतुदी अमलात आणणे कठीण आहे. त्या कशा प्रकारे अमलात आणल्या जातील याबाबतचे विवेचन मंत्री महोदयांनी करावे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

सभापती महोदय, विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, "स्थिर फेरीवाला" याचा अर्थ, फेरीने विकण्यास परवानगी असलेल्या फेरीवाला क्षेत्रातील जागा, ज्या फेरीवाल्याने व्यापलेली असेल, असा फेरीवाला. म्हणजे एकाच जागी बसून पदार्थ तयार करुन ते विकण्यास परवानगी दिलेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की, रस्त्यावर पदार्थ तळता आणि शिजविता येणार नाहीत. आपल्या फेरीवाल्यांच्या धोरणामध्ये तीन प्रकारची वर्गवारी करण्यात आलेली आहे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे जे वाचून दाखवित आहेत ते माझ्या माहिती प्रमाणे मॉडेल बायलॉज मध्ये आहे. विधेयक क्रमांक 41 मध्ये त्यासंबंधीचा उल्लेख नाही. आपल्या चर्चेनंतर त्या मॉडेल बायलॉजमध्ये सुधारणा केलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : मॉडेल बायलॉजमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत असे सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्या सुधारणा कोणत्या आहेत हे त्यांनी सांगावे. या कायद्यामध्ये फेरीवाल्यांच्या तीन प्रकारच्या वर्गवारी करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये तयार खाद्यपदार्थ त्याच ठिकाणी तयार करुन विक्री करणारा फेरीवाला. म्हणजे फेरीवाल्याने स्थानिक हॉटेल काढायचे असे या विधेयकान्वये जाहीर करण्यात आलेले आहे. भाजीपाला, फळे, दूध-अंडी इत्यादीची विक्री करणारे फेरीवाले, आणि इतर फेरीवाले म्हणजे रेडीमेड गारमेंट, कटलरी इत्यादी वस्तू विकणारे फेरीवाले. अशा प्रकारे फेरीवाल्यांचे तीन प्रकार करण्यात आलेले आहेत. सुका कचरा आणि ओला कचरा या प्रमाणे फेरीवाल्यांची वर्गवारी करण्यात आलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. माननीय मंत्री महोदय ने यहां पर कहा है कि माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते कोड ऑफ कन्डक्ट में से पढ़कर बता रहे हैं. लेकिन इस बिल के साथ हमें कोड ऑफ कन्डक्ट की कॉपी नहीं मिली है. बाकी माननीय सदस्यों को यह कॉपी मिली है या नहीं, यह मुझे मालूम नहीं है. इस बिल के साथ अगर कोई मॉडल कोड है और अगर उसमें कुछ संशोधन करके फायनल कोड बनाया गया है तो मुझे ऐसा लगता है कि हम लोगों को भी इसकी जानकारी मिलनी चाहिए. इस बिल के द्वारा 4 कानूनों में संशोधन हमारे सामने आए हैं. 3 संशोधन लोकल बॉडीज के कानून में है और 1 संशोधन पुलिस के कानून में है. भारत सरकार ने जो नेशनल पॉलिसी बनाई है, यह आई.एल.ओ. के कनवेंशन पर आधारित है. इसके ऊपर बहुत चर्चा हुई है. मैंने भी कई मीटिंगो में भाग लिया है. सुप्रिम कोर्ट ने इसके बारे में गाइड-लाइन्स दी हैं और उसको लेजिस्लेटिव फ्रेमवर्क में लाने का प्रयास महाराष्ट्र सरकार ने किया है. कोड ऑफ कन्डक्ट की जो कॉपी माननीय सदस्य श्री. रावते जी के पास है, वह सभी माननीय सदस्यों को मिलनी चाहिए. हम लोगों का विदर्भ के कपास उत्पादकों के बारे में प्रस्ताव था, उसके ऊपर अभी तक चर्चा शुरु नहीं हुई है. मेरा सुझाव है कि कोड ऑफ कन्डक्ट की कॉपी हमें दी जाए और माननीय सदस्य श्री. रावते जी को "ऑन लेग" रखते हुए फिर बाद में इस बिल के ऊपर चर्चा की जाए.

. . . नंतर भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गर्दीच्या ठिकाणी फेरीवाले नसतील असे आपण म्हटले आहे. म्हणजे रेल्वे स्टेशन, धार्मिक स्थळे. खास करुन रेल्वे स्थानकाबाहेर. गर्दीची स्थाने झ ाली की नाही? यापुढे असे म्हटले आहे की, पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांकरिता जागा कोणती देणार? फूड प्लाझा तयार करणे. फेरीवाल्यांच्या नावाखाली मुंबईमध्ये 90 टक्के परप्रांतियांचे व्यवस्थित व्यवस्थापन चालू आहे. फूड प्लाझा तयार करणे. ठिकाणांचे उदाहरण दिले आहे. रेल्वे स्टेशन, स्थानक शब्द वापरण्याऐवजी स्टेशन शब्द वापरला आहे. बस स्थानक इत्यादीजवळ फूड प्लाझा तयार करणे. फेरीवाल्यांचा विषय असताना फूड प्लाझा तयार करण्याचा विषय याठिकाणी आणता. जर प्राधिकाऱ्याने किंवा खाजगी मालकाने स्वत:ची जागा फूड प्लाझासाठी उपलब्ध करुन दिली तर त्या जागेचा विकास हस्तांतर हक्क म्हणजे टीडीआर देणार. मुंबईच्या फेरीवाल्यांच्या निमित्ताने एफएसआय. मुंबईचे काय वाटोळे चालले आहे बघा. चटई क्षेत्र बिल्डरांकरिता. फेरीवाल्यांमध्ये बिल्डर. काय धोरण आहे तुमचे? साधा फेरीवाला कुठे असावा, कुठे असू नये एवढयापुरता मर्यादित विषय होता. फेरीवाला क्षेत्र, ना फेरीवाला क्षेत्र नाव दिले आहे. फूड प्लाझा उभारण्याकरिता एखाद्याने रेल्वे स्टेशनजवळ जागा दिली तर त्या जागेवर फूड प्लाझा उभा राहणारच. परंतु त्या जागेचा टीडीआर दिला जाणार आहे. त्यांनी त्या जागेचा एफएसआय बाहेर बिल्डरला विकायचा किंवा त्याच जागेवर प्रोत्साहनात्मक एफएसआय देणार. हे फेरीवाले आहेत ना. फेरीवाल्यांसाठी एक दोन मजले बांधा आणि वर पाच मजले बांधा. हे फेरीवाला धोरण आहे का? दोन मीटर फूटपाथ असेल तेथे फेरीवाले बसविणार. दुकानांसमोर नाही. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी नाही. रुग्णालयांजवळ नाही. संवेदनशील ठिकाणी फेरीवाला नाही, असे तुम्ही क्लासिफिकेशन केले आहे. मग ही भानगड काय आहे? एफएसआय देऊन इमारत बांधायची?

सभापती महोदय, एवढ्यावरच हे प्रकरण थांबलेले नाही. नाईट टाईम फूड कोर्ट. किती फेरीवाल्यांची काळजी आहे बघा. ज्या रस्त्यांवर संध्याकाळनंतर रहदारीचे प्रमाण कमी आहे अशा रस्त्यावर नाईट टाईम फूड कोर्ट उभारणार आहेत. म्हणजे रहदारीचे प्रमाण कमी आहे, आम्ही शांतपणे झोपतो तेथे नाईट टाईम फूड कोर्ट होणार. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित असणे आवश्यक होते. आम्हाला झिडकारणारे हे विधेयक आहे, यावर चर्चा करण्याची गरज नाही. मुंबईचे कसे वाटोळे करीत आहात हे सांगण्याकरिता माननीय मुख्यमंत्री सभागृहात असणे

..2..

श्री.दिवाकर रावते.............

आवश्यक होते. त्यांचा मुंबईशी काही संबंध नाही. त्यांना मुंबईशी काही देणे घेणे आहे काय? सभापती महोदय, ज्या रस्त्यांवर संध्याकाळी रहदारीचे प्रमाण कमी आहे......

नंतर 4डब्ल्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

अशा रस्त्यांची नाईट टाईम फुड कोर्ट म्हणून निवड करावी. कोणत्या सचिवांच्या बुध्दिमत्तेतून ही कल्पना निघाली आहे ती माननीय राज्य मंत्र्यांनी वाचली की नाही हेच मला समजत नाही. आपल्याच जन्मभूमीत मातृभूमीच्या कुशीमध्ये असे कीडे वळवळावे असे आपल्याला तरी वाटते काय, म्हणूनच हे फार गंभीर आहे. या मुंबईत आजही रात्री काही फेरीवाल्यांकडे जायचे, त्याच्याकडेच दारु प्यायची हे चालू आहे. पण कोण आपला काम धंदा सोडून त्यांच्या नादाला लागणार आहे ? कारण पोलीस व महापालिका सुध्दा त्यांच्याबरोबर आहे. जो कोणी तक्रार करील त्याचीच ते वाट लावायला मागे पुढे पाहत नाहीत. दोनच दिवसांपूर्वी मला असा अनुभव आला आहे. असे सर्वच विषय येथे मांडण्यासारखे नाहीत म्हणून मी ते मांडणार नाही. परंतु या राज्यात काय चालले आहे ते दुर्दैवच आहे, असे म्हणावे लागेल. अशा रस्त्यावर रात्री आठ वाजल्यानंतर वाहनामार्फत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्य पदार्थांची विक्री करता येईल, असे हे शासनाचे फेरीवाला धोरण आहे काय याचा खुलासा करावा. कदाचित सभागृहातील अनेक सदस्यांना वाटले असावे की, सन्माननीय सदस्य उभे राहून या विधेयकावर काय बोलणार ? परंतु यावर बरेच बोलण्यासारखे आहे म्हणूनच हे विधेयक सभागृहात मंजुरीसाठी आणू नये असे मी माननीय राज्य मंत्र्यांना सांगितले होते. कारण विधेयक सभागृहात आल्यानंतर त्यावर जितके तास बोलता येईल तेवढे बोलण्याची मुभा असते व तेवढा वेळ शासनालाही बसावे लागते, असा इतिहास आहे. या सभागृहात असेही वाटले असावे की, आता संध्याकाळचे सात वाजलेले आहेत, कोण या विधेयकावर बोलणार आहे. पण ज्याला संध्याकाळी मधुशालेची आठवण होते त्यांनाच सात वाजल्याची जाणीव होते. या विधेयकाच्या निमित्ताने शासनाने खुलासा करावा की, रात्री आठ वाजेनंतर वाहनामार्फत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्य पदार्थ विक्री करता येतील. म्हणजे रात्री तेथे रस्त्यावर हा तमाशा करणार काय ?

महोदय, नाईट टाईम कोर्ट नंतर आता डे टाईम कोर्टची देखील यामध्ये तरतूद आहे. त्यानुसार नवीन उद्याने व पार्क विकसीत करताना तसेच विद्यमान उद्यान व पार्क ज्यांचे क्षेत्रफळ एक एकरपेक्षा जास्त आहे त्याच्या 5 टक्के जागा असे पॅक फुड, पॅक एनर्जी वगैरेचा व्यवसाय व विक्री करण्यासाठी राखून ठेवण्यात येईल. एवढ्या मोठ्या बागेत हे ठीक आहे, कारण त्यात वृध्द

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/

श्री. दिवाकर रावते .........

व लहान मुले दिवसा येतील. परंतु कायद्यात बाटलबंद पेय असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. माननीय श्री. शरद पवार साहेब एकदा म्हणाले होते की, बियर आणि वाईन रेशन दुकानात सुध्दा विकली गेली पाहिजे. यासंबंधीचा निर्णय शासनाने घेतला तर अशा ठिकाणी बियर आणि वाईन सुध्दा येईल, पण हा विषय नंतरचा आहे.

महोदय, यानंतर लिटील फुड कोर्ट, असेही अंतर्भूत आहे. असेच फेरीवाला धोरण आहे काय ? अमेरिकेत तसेच परदेशात हे असे हॉलिडे असले तरी आपल्या देशात ते अभिप्रेत नाही. कारण परदेशात काय वाटेल ते झाले तरी चालेल पण कोणी थांबत नाही, माणूस मेला तरच थांबतात, परंतु आपल्याकडे रात्रपाळी वगैरे चालते, 24 तास लोक काम करीत असतात, अशा प्रकारचा स्टॅगरिंग हॉलिडे हा शब्द परदेशातूनच आपल्याकडे सुरु झाला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपल्याकडे स्टॅगरींग हा शब्द विजेमुळेच आलेला आहे. आपण आपल्या अधिका-यांना परदेशात पाठवता त्यामुळे त्यांच्या डोक्यात 'स्टॅगरींग हॉलीडे' हा शब्द भिनलेला आहे. आपण कोणत्याही अधिका-याला रविवारी फोन लावला तर तो आपल्याला बदंच असलेला दिसून येईल. आपल्याला ते सोमवारी फोन करुन सांगतात साहेब आपला मिसकॉल होता. मी एका अधिका-याला रात्री साडेअकरा वाजता फोन केला तेव्हा त्याने सांगितले की, साहेब आता साडेअकरा वाजले आहेत. त्यावेळी मी त्याला सांगितले "हो, मला माहिती आहे." आपण अधिका-याला केव्हाही बोलावू शकतो. कारण त्यांची 24 तास सेवा देण्याची डयूटी असते. त्याची कितीही तातडी असली तरी अधिका-याने अटेन्ड केले पाहिजे ही बाब त्यांच्या कोडमध्ये दिलेली आहे. विकेंड फूड कोर्टच्या संदर्भात लिहिले आहे की,, सार्वजनिक सुट्टीच्या तसेच सप्ताहाच्या अखेरच्या दोन दिवस, शनिवारी व रविवारी, शहरातील कमी गर्दीच्या असलेला काही भाग विकेंड कोर्टसाठी राखीव ठेवला जाईल."

आठवडा बाजाराची संकल्पना आपण या ठिकाणी आणलेली आहे. आठवडी बाजार चार-पाच तासाचाच असतो. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना नम्र विनंती आहे की, आपण आपला इयरफोन ऑन केला तर मी जे काही बोलतो आहे त्यामुळे आपले पल्स वाढतील. कारण माननीय मुख्यमंत्री हे तेवढे सोफेस्टीकेटेड आहेत. सांस्कृतिक जाण असलेले ते एक व्यक्तिमत्व आहे. मी जे काही बोलतो आहे ते जर ऐकले तर ते हे विधेयक पास करा असे मुळीच म्हणणार नाहीत. मला जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये म्हटले आहे की, मुंबईतील फेरीवाल्यांच्या समस्या इतर भागापेक्षा जटिल आहेत." रात्री आठ नंतर वाहनातून फूड विकले जाणार आहे. सुट्टी पडली की, रात्री बायका-मुलांना घेऊन जा,रात्री मजा करा, दारु प्या आणि दुस-या दिवशी रात्री झोपायला घरी जा. विकेंडच्या जागेवर बाथरुम बनविले जाणार आहेत, टॉयलेट बांधले जाणार आहेत. हे सर्व काम थरार करुन टाकणारे आहे. बिल्डरला टीडीआर देण्याचे आपण नक्की केलेले आहे. आपण महापालिकेत काम केलेले असल्यामुळे तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी सुध्दा महापालिकेत काम केलेले असल्यामुळे आपल्याला लगेच कळेल. रस्त्यावरील फेरीवाल्यांचा विषय असल्यामुळे आपल्याला तो लगेच कळेल. "भाजीपाला, फळे, दूध, अंडी इ. विक्री करणा-या फेरीवाल्यांकरिता

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

जागेचे नियोजन." यापुढे असे म्हटले आहे की, पालिका बाजार बांधतांना पुनरविकास करतेवेळी फेरीवाल्यांसाठी जागेचे नियोजन करावे. याकरिता वाढीव एफएसआय उपलब्ध करुन चटई क्षेत्राच्या 50 टक्के जागा फेरीवाल्यांना द्यावी". मार्केटमध्ये जे गाळयांमध्ये व्यवसाय करतात ते आता फेरीवाले झाले आहेत काय ? या विधेयकामध्ये आपण फेरीवाल्यांना म्हणजे भैय्यांना,हो या ठिकाणी मी भैय्ये शब्द अधिकृतपणे वापरतो आहे. या लोकांना आपण मार्केटमध्ये 50 टक्के एफएसआय वाढवून देत आहात. आपण कसले धोरण आखत आहात ? मी गरम झालो की, आपण मला बोलता की, तुम्ही भावनाविवेक झालेला आहात. आम्ही करायचे काय ? आमचे रिकामे फुटपाथ तुम्ही रात्रीसाठी वापरणार आहात. मार्केटमध्ये फेरीवाल्यांकरिता 50 टक्के एफएसआय द्यावयाचा, टीडीआर दिलेला आहे.

आपण एवढयावरच थांबला आहात असे नाही तर पुढे आपण असे म्हणाला आहात की, इमारतीच्या सर्वात वरचा मजला फूड कोर्टसाठी राखीव ठेवावयाचा आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिशन बाजोरिया)**

श्री.दिवाकर रावते...

म्हणजे लिफ्टने त्याने जायचे. इतर मजल्यांमध्ये 50 टक्के जागा दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांसाठी राखीव असेल व उर्वरित जागा इतर व्यावसायिकांना व दुकानदारांना देण्यात यावी जेणेकरुन गिऱ्हाईकांना आकर्षित करता येईल." असे म्हटलेले आहे. लोकांना आकर्षित करण्यासाठी त्याठिकाणी एक ओपन एक्स्टेन्डेड प्लॅटफॉर्म बांधून तेथे कॅप्सूल लिफ्टला जशी काच असते तशी काच बसवून तेथे आय.पी.एल.क्रिकेट खेळामध्ये जशा मुली उड्या मारत असतात तशांसाठी तिथे खास जागा करावी म्हणजे गिऱ्हाईक आकर्षित होतील... सभापती महोदय, विधेयकातील पुढील मुद्दा अतिशय गंभीर आणि भयानक आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, "जुन्या इमारतींचे पुनर्वसन करताना.... मी आजही माननीय मंत्रीमहोदयांना जाणीव करुन देतो की, आपण बोलता तसे वागत नाही ही माझी व्यथा आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिलेले आहे. आपण आता मूळ मुंबईकरांच्या मुळावर उठला आहात असे माझे मत झाले आहे. मुंबईतील 16 हजार चाळींमध्ये मूळ मुंबईकर राहतात. मुंबईतून फक्त पाच आमदार निवडून येतात. तेव्हा चाळीत राहणाऱ्या लोकांच्या समस्यांकडे लक्ष दिले किंवा नाही तरी त्याचा सरकारवर काही परिणाम होत नाही, त्यामुळे ते दुर्लक्ष करतात असा माझा आक्षेप आहे. झोपडपट्टीतील रहिवाशांना 225 चौ.फू. जागा द्यावी त्यासाठी 2.5 एफ.एस.आय. देण्यात यावा असा तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी निर्णय घेतला. या निर्णयास अजिबात दोष देण्यासारखे काही नव्हते. बेकायदेशीर झ ोपडपट्टी वसलेल्यांसाठी आपण उदार धोरण स्वीकारले त्याबद्दल आनंद आहे, मी आक्षेप घेत नाही. जे पिढ्यान पिढ्या जुन्या चाळीत राहतात त्यांच्यासाठी 300 चौ.फू. जागा देण्याचा चांगला निर्णय घेतला. तेव्हा 2.5 एफ.एस.आय.आहे तो 3 एफ.एस.आय. करावा असे सांगितले. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही 3 एफ.एस.आय.दिलेला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

आहे. फक्त आदेश काढायचा आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात जे वक्तव्य केले त्याचे कार्यवृत्त माझ्या पत्रासोबत जोडून याबाबत निर्णय घ्यावा असे मी सांगितले. परंतु गेली तीन वर्षे झाली अजून निर्णय होत नाही. माझ्या माहिती प्रमाणे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय घेतला आहे फक्त आदेश पारित व्हावयाचे आहेत. आताचे माननीय मुख्यमंत्री नवीन आहेत. ते सर्व नस्त्या चाळत असताना काळजी घेणार आणि त्यांनी तशी काळजी घ्यावी. कारण कोण काय लिहून त्यांच्याकडून सही घेईल हे सांगता येत नाही. तेव्हा त्यांनी काळजी घ्यावी असे माझेही त्यांना सांगणे आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांची सही होऊन तीन वर्षे झालेली आहेत. त्यावर आपली सही झ ाल्यास जुन्या चाळीतील लोकांचे भले होईल. आता आपण जुन्या चाळीमध्ये सहभाग मागत आहात. विधेयकात उल्लेख आहे की, "जुन्या इमारतींचे पुनर्वसन,झोपडपट्टी पुनर्वसन, एस.आर.ए., मुंबई शहरातील 16 हजार जुन्या इमारती अधिक मुंबई शहरातील एस.आर.ए. झोपडपट्टी पुनर्वसन आणि नागरी नूतनीकरण योजना (अर्बन रिन्युअल स्कीम ) इत्यादी योजनेमध्ये नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने इमारतीमध्ये दैनंदिन उपभोगाच्या वस्तूंच्या विक्रीकरिता राखीव गाळे बांधण्यात यावेत". जुन्या इमारतीमध्ये जे दुकानदार आहेत त्यांना जागा देण्यासाठी जागा नाही. अधिक फेरीवाला क्षेत्रामध्ये राखीव गाळे बांधायचे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

त्या मध्ये पुढे असेही म्हटलेले आहे की, "या गाळयाकरिता आवश्यक असलेल्या बांधकामाचे चटई क्षेत्र मुक्त अनुज्ञेय करण्यात यावे." जो चटई क्षेत्र मंजूर करण्यात येईल असे आपण सांगितले होते तो मंजूर केलेला नाही त्यामुळे प्रथम तो मंजूर करण्यात यावा.परंतु फेरीवाला क्षेत्रात बांधकामाचे चटई क्षेत्र मुक्त अनुज्ञेय करावे ही बाब फेरीवाला धोरणात येते काय ? सरकारच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याचा निर्णय घेतला व त्यातील दोन माळे फेरीवाल्यांसाठी बांधावयाचे आणि दोन माळे मुक्त बांधावयाचे आहेत. त्याकरता एफएसआय मोजावयाचे नाही.हे काय फेरीवाल्यांचे धोरण आहे काय ? एसआरए योजना आणि जुन्या इमारतीमध्ये हे माळे बांधून फेरीवाल्याला घुसवण्याचे शासनाने जे धोरण तयार केलेले आहे ते कितपत योग्य वाटते याबाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, पुढे असे म्हटलेले आहे की, "खाजगी इमारतींना बांधकाम परवानगी देते वेळेस त्यातील रहिवाश्यांच्या सोसायटीत किमान चार गाळे बांधण्याची मुभा असावी " हे कशासाठी करीत आहात ? हे मला समजत नाही. हा विषय फेरीवाल्यांचा आहे काय ? त्यानंतर पुढे असेही म्हटलेले आहे की, " या गाळयांकरिता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय करण्यात यावे सदरचे गाळे दैनंदिन उपभोगाच्या वस्तुच्या (डेली नीडस) विक्रीकरता राखीव असावेच." हा फेरीवालांचा विषय नाही. त्यानंतर पुढे असेही म्हटलेले आहे की, " मोठया क्षेत्राच्या अभिन्यासामध्ये सोडावयाच्या सुविधा क्षेत्रावर बांधकाम करतांना अनुज्ञेय बांधकाम चटई क्षेत्राच्या 20 टक्के बांधकाम क्षेत्र दैनंदिन गरजा वस्तू केंद्रासाठी अनुज्ञेय करावे व त्याच्या 50 टक्के क्षेत्र हे दैनंदिन गरजेच्या वस्तू विक्री करणा-या फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवावे " या क्षेत्राचे क्लासिफिकेशन देखील करण्यात आलेले आहे. त्यानंतर क मध्ये ," इतर फेरीवाले उदा.रेडीमेड गारमेंट,कटलरी इत्यादी करिता नियोजन करणे" हे शीर्षक दिले असून त्यात असे म्हटलेले आहे की, "महानगरपालिका क्षेत्रातील रहदारीच्या रस्त्यावर स्काय वॉक व सब वे तयार करण्यात यावेत उदा. रेल्वे स्थानके/बस स्थानके, बाजार पेठ, महामार्ग इत्यादी. सदरचे स्काय वॉक व सब वे तयार करतांना फेरीवाल्यांकरिता जागा निर्माण करावी. " हे काय चालले आहे ? हे आपल्याला मान्य आहे काय ? रस्त्यावरुन चालण्यासाठी पादचा-यांना जागा नाही म्हणून स्कायवॉक बांधण्यात आले होते.परंतु या स्कायवॉवरसुध्दा फेरीवाल्यांना बसाविण्यात येणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

आहे.स्टेशनच्या जवळच्या रस्त्यावर फेरीवाल्यांसाठी जागा नाही. म्हणून अंडरग्राऊन्ड सोय करुन तेथे फेरीवाल्यांना बसविण्यात येणार आहे.पुढे असे म्हटलेले आहे की," महानगरपालिका नगरपालिकेच्या क्षेत्रात भुयारी दोन मजली वाहनतळाचे बांधकाम करतांना वाणिज्यिक वापरासाठी अनुज्ञेय असणा-या क्षेत्राच्या 5 टक्के इतकी जागा फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवावी याबाबीची तरतूद महानगरपालिका, नगरपालिका स्वत:च्या विकास नियंत्रण नियमावलीत करावी " वाहन तळाचे तर मोठे स्कॅन्डल आहे. मुंबई शहरातील आदर्श सोसायटी व हिराणी बिल्डर यांचे स्कॅन्डल आहेतच परंतु त्याही पेक्षा मोठे स्कॅन्डल वाहन तळाच्या बांधकामाचे आहे. परप्रांतियांना निमंत्रण करणारे हे धोरण आहे, असा मी शासनावर थेट आरोप करीत आहे. पर प्रांतियामुळे केंद्रातील काँग्रेस सरकार हैराण झालेले आहे.घटनेप्रमाणे उघड बोलता येत नसले तरी एखादी गोष्ट कधी तरी असहय होतेच .घरात जर उंदीर फिरावयास लागले तर त्याला आपण मारतो. हल्लीच्या दिवसात तर जीवाभावाचा पाहुणासुध्दा दोन दिवसापेक्षा जास्त दिवस राहिला तर ते असहय होते हे सत्य आहे.काल केन्द्रीय मंत्री श्री चिदंबरम यांनी मत व्यक्त केले होते आणि त्यांना असहय झाले म्हणूनच त्यांनी ते मत व्यक्त केले होते.घटने प्रमाणे कोणतीही व्यक्ती कोठेही जावू शकते हे त्यांनाही माहीत आहे.केन्द्र सरकारमध्ये ते गेल्या अनेक वर्षापासून मंत्री असल्यामुळे त्यांना सर्व माहिती आहे तरी सुध्दा काल ते असे म्हणाले की, मी दिल्लीमध्ये उपरा आहे.

सन्माननीय सदस्य श्री संजय दत्त यांची माफी मागून मी सांगतो की आपण देखील आपल्या शहरातील काही बाबीमुळे हैराण झालेला आहात. मी जर काही बोललो तर सन्माननीय मंत्री श्री भास्कर जाधव यांना राग येतो परंतु माझे म्हणणे आपण समजावून घ्यावे. फेरीवाल्याचे जे धोरण ठरविण्यात येत आहे ते आम्ही सहन करु शकत नाही. 44 वर्षे शिवसेनेच्या लढयातून आम्ही उभे राहिलो असून 1967-68 साली फेरीवाल्यांसाठी पहिले आंदोलन मी केले होते.........................

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कोहिनूर सिनेमापासून रानडे रोडवरील सर्व फेरीवाल्यांसाठी झेंडे घेऊन आम्ही उभे राहिलो, त्यांच्यासाठी आम्ही पहिले आंदोलन केले आहे. आता जर तुम्ही ठरविलेच आहे की, या मुंबईत कुणीही या आणि धंदा करा. माननीय श्रीमती शिला दिक्षित आणि माननीय श्री. चिदंबरम यांनी आपले मत व्यक्त केले आहे. आदरणीय शिवसेनाप्रमुख मुंबईकरिता आणि महाराष्ट्राकरिता गेली चाळीस वर्षे सांगत होते त्यावेळी तुम्ही घटनेच्या आधारे परप्रांतियांच्या बाबतीत आमच्यावर शिक्के मारले. परंतु पाणी नाकात जायला लागल्यानंतर माकडीण सुध्दा पिलाला पायाखाली ठेवते. ही परिस्थिती काल तुम्ही दिल्लीमध्ये अनुभवली. माननीय श्रीमती शिला दिक्षितांच्या आणि माननीय श्री. चिदंबरम यांच्या माध्यमातून आपण अनुभवली आहे.

आमचे हे फेरीवाला धोरण काय आहे.? हे मंजूर करुन घेण्याची तुम्हाला किती घाई झाली आह? याबाबत सुप्रिम कोर्टाने जे सांगितले आहे, हायकोर्टाने जे सांगितले आहे ते मी पुढे सांगणार आहे. सभापती महोदय, यामध्ये अटी काय आहेत? जागेचे वाटप कसे करणार आहात? याबाबत मघाशी मी उल्लेख केला. यामध्ये "15 वर्षाचा वास्तव्याचा पुरावा असलेल्या परवानाधारक फेरीवाल्यांचा परवान्याच्या दिनांकाचा प्राधान्य क्रम ठरवावा यानंतर जागा शिल्लक असल्यास" म्हणजे जागा शिल्लक असली तर आपण त्यांना देणार. आता हे विधेयक या सभागृहात मी जाळून टाकावे असे आहे. हे विधेयक मी मनापासून जाळतो आहे अशा भावनेतून बोलत आहे. "ज्या फेरीवाल्यांकडे 15 वर्षाचे वास्तव्य नाही व परवाना नाही त्यांनी फिरता फेरीवाला म्हणून व्यवसाय करावा." मी हे मनातील वाचत नाही. मला हे देण्यात आलेले अधिकृत पत्र आहे. फेरीवाला क्षेत्रासंबंधीचा हा कायदा किती गंभीर आहे?. त्यासंदर्भात आपण एफ.एस.आय. कसा वाढविणार आहात, टी.डी.आर. कसा देणार आहात हे सर्व यामध्ये दिले आहे. सभापती महोदय, जागेचे वाटप कुणाला करणार? प्राधान्य क्रम कुणाला देणार? "प्रथम घोषित करण्यात येणारा ना फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणारे फेरीवाले". हा कायदा झाल्यानंतर आपण त्यांना उचलून या फेरीवाला क्षेत्रामध्ये आणले पाहिजे. "तात्पुरता फेरीवाला क्षेत्र 1 मध्ये व्यवसाय करणारा स्थिर फेरीवाला. महानगरपालिकेच्या विकास योजनेंतर्गत ताब्यात घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या जागेवर व्यवसाय करणारे फेरीवाले." मी त्याठिकाणी एफ.एस.आय. वाढवून फूड प्लाझा, नाईट प्लाझा, टेरेस प्लाझा निर्माण करणार. तसेच, जुन्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

इमारतीच्या बांधकामामधील गाळे, त्याचप्रमाणे वाहन तळांचे दोन-पाच मजले, त्यामध्ये 20 टक्के, 30 टक्के जागा घेणार असे सर्व यामध्ये अंतर्भूत आहे. हे सर्व झाल्यानंतर आम्ही हे क्षेत्र मुद्देसूद कसे वाटणार ते याठिकाणी दिले आहे. या फेरीवाल्यांमध्ये आपण क्रमवारी लावण्याचे ठरविले आहे. ते कोण आहेत? "15 वर्षाचा वास्तव्याचा पुरावा असलेला परवानाधारक फेरीवाल्यांना परवान्याच्या दिनांकापासून प्राधान्यक्रम ठरवावा व यानंतर जागा शिल्लक असल्यास त्यांना देण्यात यावी." त्यानंतर "ब" मध्ये "15 वर्षाचे वास्तव्य असलेला फेरीवाला" "ड" व "क" मध्ये "15 वर्षाचा वास्तव्य नसलेला पुरावा". परवानाधारक फेरीवाला म्हणजे त्याच्याकडे 15 वर्षाच्या वास्तव्याचा पुरावा नाही. अधिकाऱ्यांना पैसे चारुन त्याच्याकडे परवाना येत नाही. त्याला 15 वर्षाच्या वास्तव्याची गरज नाही असे याठिकाणी म्हटले आहे. आणि ज्याच्याकडे लायसन्स आहे त्याने पैसे दाबून म्हणजेच रिक्शाचे, टॅक्सीचे लायसन्स आहे अशाप्रकारे लायसन्स मिळविले म्हणजे त्याच्याकडे 15 वर्षाच्या वास्तव्याचा पुरावा नसला तरी चालेल. त्याला आपण प्राधान्यक्रमाने जागा दिली पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रावते साहेब त्या काळात केंद्र सरकारने जे फेरीवाला धोरण जाहीर केले होते, त्यामध्ये त्यांनी जी उपविधी आपल्याकडे विचारार्थ पाठविली होती त्याचा ड्राफ्ट वाचत आहेत असे मला वाटते. त्यानंतर आपण संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकांना व नगरपालिकांना तो ड्राफ्ट देऊन त्यांचे म्हणणे मागविले होते.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

त्यांचे त्यावर काय म्हणणे आहे, काय सूचना आहेत हे सर्व मागविले होते. त्यानंतर यावर बराच विचारविनिमय झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब जे वाचत आहेत त्यामध्ये मी त्यांना काही अडथळा करु इच्छित नाही. आपण हे बिल मंजूर करीत आहोत आणि त्यांचे म्हणणे आपण मानले नाही म्हणून कळत न कळत यासंदर्भात त्यांचा राग हळूहळू व्यक्त होत आहे असे मला दिसते. या विधेयक क्रमांक 41 मध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, अशा प्रकारचा कोणता फेरीवाला झोन असावा, फिरत्या फेरीवाल्याला आपण कोठे जागा ठरवून देणार, कोणत्या ठिकाण्ी आपण कायम स्वरुपी फेरीवाला ठेवणार, कोण फेरीवाला असणार, त्याची व्याख्या काय असणार, तो महाराष्ट्रामध्ये पंधरा वर्षे राहणारा असणार की नाही, त्यांनी लायसन्स घेत असताना कोणत्या अटी बाळगल्या पाहिजेत, लायसन्स घेतल्याशिवाय त्यांनी धंदा करता कामा नये, लायसन्स घेतल्याशिवाय धंदा केला तर त्याला कोणत्या प्रकारचे दंड करण्याची शिक्षा आहे, त्याला कारावासाची काय शिक्षा आहे अशा प्रकारच्या सगळ्या गोष्टी या विधेयक क्रमांक 41 मध्ये पूर्णपणे दिलेल्या आहेत. हे सर्व करुन जो कोणी मुंबईचा महापौर असेल, जो कोणी त्या नगरपालिकेचा नगराध्यक्ष असेल तो ठरवील आणि त्यांच्यानंतर यावर जी तांत्रिक समिती आहे त्यांनी ठरविल्यानंतर ते जो झोन ठरवतील तो झोन कायम करण्याकरिता शासनाकडे येणार आहे. शासन काही कोणत्या महानगरपालिकेला कळविणार नाही की, या जागेवर फेरीवाला झोन करा किंवा हॉकर्स झोन तयार करा. या ठिकाणी रामभाऊंची जागा आहे म्हणून त्या ठिकाणी हॉकर्स झोन तयार करा असे शासन सांगणार नाही. हे शासनाचे काम नाही. हे शासन करणार नाही. हे सगळे त्या नगरपालिकेने, ज्यांची कोणाची सत्ता असेल त्यांनी हे सर्व ठरवावयाचे आहे आणि अंतिम मंजुरीसाठी ते शासनाकडे पाठवावयाचे आहे. शासन त्यामध्ये काय व्हेरिफाय करणार ? त्या ठिकाणी कोणतीही सरकारी जागा सार्वजनिक उपक्रमासाठी, सार्वजनिक सोयीकरिता, सार्वजनिक कामाकरिता ठेवलेली असेल त्या जागेचा यामध्ये जाणीवपूर्वक वापर तर झालेला नाही ना, जाणीवपूर्वक कोठे तरी गैरवापर तर झ ालेला नाही ना एवढेच पाहण्याची त्यामध्ये शासनाची जबाबदारी राहणार आहे. यापेक्षा शासनाकडे कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

ज्यावेळी हे बिल मांडले त्याच वेळी जर खऱ्या अर्थाने मला या बिलाचा हेतू, उद्देश आणि हे बिल आणण्या मागची भूमिका जर स्पष्ट करण्याची संधी मला मिळाली असती तर त्यावेळी मी सर्व खुलासेवार बोलणार होतो. परंतु मला त्यावेळी ते मांडता आले नाही. माझी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना विनंती आहे. आपल्या हातामध्ये विधेयक क्रमांक 41 आहे. त्या विधेयकाच्या खंड 1, खंड 313 (क), खंड 313 (ड) यामध्ये याबाबत कोठेही उल्लेख नाही. तसेच आपण बिलाच्या उद्देश व कारणामध्ये पाहिले तर त्यामध्येही कोणताही उल्लेख नाही. म्हणून या ठिकाणी आपण आपल्या मनातील नाराजी व्यक्त करीत असताना मला पुन्हा एकदा आपल्याला विनंती करावयाची आहे की, मुंबई महानगरपालिका डोळ्यासमोर ठेऊन शासनाने हे बिल आणलेले आहे हे आपण आपल्या मनातून काढून टाकावे. दुसरी बाब अशी की, आपल्याकडे मुंबई महानगरपालिकेची सत्ता आहे. ही सत्ता राहील की नाही हे लोकांनी ठरवावयाचे आहे. ती सत्ता आमच्याकडेच राहणार आहे असे कोणी समजण्याचे कारण नाही. उदा. पुण्याची सत्ता आमच्याकडे आहे. ती सत्ता कशावरुन तुमच्याकडे जाणार नाही ? उद्याच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये या महानगरपालिकेची सत्ता आमच्या हातामध्ये येणार नाही हे कशावरुन ? मघाशी मी सांगितले की, तुमच्याकडे दोन किंवा तीन महानगरपालिका आहेत तसेच काही ठराविक नगरपालिका आहेत. परंतु उरलेल्या 17-18 महानगरपालिका आघाडी सरकारकडे आहेत. 213 नगरपालिकांपैकी बहुतांश नगरपालिका आघाडी सरकारकडे आहेत. आपल्या ज्या पाच नगरपंचायती आहेत त्या सर्व आघाडी सरकारकडे आहेत. आम्ही हा जो कायदा करीत आहोत तो मुंबई महानगरपालिकेला डोळ्यासमोर ठेऊन करीत नाही. आपल्या एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे मग 1888 चा कायदा असेल, 1848 चा कायदा असेल, 1849 चा कायदा असेल, 1965 चा कायदा असेल, 1951 चा कायदा असेल हे वेगवेगळे कायदे असल्यामुळे त्यासंदर्भातील वेगवेगळे उपविधी किंवा वेगवेगळे विश्लेषण या सगळ्या बिलामध्ये आहे. म्हणून दुर्दैवाने आपण असे म्हणून नका. याहीउपर आपल्याला जर असे म्हणावयाचे असेल तर त्याचे उत्तर तर मी देईनच पण ज्या मुंबई महानगरपालिकेची आपण काळजी करीत आहोत, मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत आपण मराठी माणसांबद्दल जे बोलत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. भास्कर जाधव ....

आहोत, त्या मुंबई महानगरपालिकेमध्ये आपण ज्या व्यवसायांचा उल्लेख करता ते आपल्याच कारकिर्दीमध्ये हे सगळे व्यवसाय कोणाच्या ताब्यामध्ये गेले ? ते आपण का घालविले ? त्यावेळी आपण काय करीत होतो ? याची सुध्दा जबाबदारी आता आपण घेण्याची गरज आहे. आम्ही काही तरी महापाप करावयास गेलेलो आहोत अशा प्रकारचा आपला जो समज आहे तो कृपया आपण दूर करावा. आपण जर या ठिकाणी राजकीय बोलावयास लागला तर मी सुध्दा राजकीय बोलल्याशिवाय राहणार नाही. आतापर्यंत मी शांत होतो पण त्याचा असा अर्थ नाही. 1992 सालापासून मधले 1996 हे साल सोडले तर बाकीचा काळ मुंबई महानगरपालिका तुमच्या ताब्यामध्ये आहे. आपण या गोष्टीला का आळा घातला नाही ? मराठी माणसाला का न्याय दिला नाही ? आपण 40 लाख लोकांना मोफत घरे देणार होता त्यावेळी गिरणी कामगारांचा का विचार केला नाही ? 27 लाख लोकांना रोजगार देतो असे सांगितले आणि आपण एकप्रकारे परप्रांतीयांना आमंत्रण दिले. याचा सुध्दा आपल्याला विचार करावा लागेल. मला या ठिकाणी राजकीय बोलावयाचे नव्हते पण आपण मर्यादा ओलांडावयास लागल्यानंतर मला राजकीय बोलावे लागेल. म्हणून माझी विनंती आहे की, आपण जे सांगत आहात ते प्रत्यक्षपणे विधेयकामध्ये नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ पूर्वी श्री.बरवड 19:40

श्री.भास्कर जाधव....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते जो विषय सभागृहात मांडत आहेत तो विषय या विधेयकात नाही. त्यामुळे दुरुस्ती विधेयकात जी तरतूद केलेली आहे, तेवढया पुरतेच त्यांनी बोलावे अशी माझ ी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : आमच्या पक्षाच्या हातामध्ये फक्त मुंबई महानगरपालिका असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितल्याबद्दल मी त्यांना घन्यवाद देतो. मी आतापर्यत कोणतेही राजकीय वक्तव्य केलेले नाही. माझ्याकडे जे पत्र आहे त्याच्यावरुन मी बोलतो. मी मुंबई असा कोठेही उल्लेख केला नाही. परंतु मुंबईत एफएसआय वाढविला जात आहे त्याबाबत मी बोललो. मी त्या बैठकीला हजर होतो. मला जे अधिकृत डॉक्यूमेंट दिलेले आहे, त्यात असे म्हटले आहे की, राज्यमंत्री, नगर विकास, नागरी जमीन कमाल धारणा, सामान्य प्रशासन, जलसंधारण व संसदीय कार्य यांचे हे पत्र आहे. सरकारकडे संपूर्ण महाराष्ट्र आहे त्याबद्दल मंत्री महोदयांचे मी कौतुक करतो. या पत्रात असे नमूद केले आहे की, "मुंबई महापालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या समस्यांविषयी महाराष्ट्र एकता हॉकर्स युनियन व इतर विरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर सिव्हिल अपील क्रमांक...ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहे." फेरीवाला धोरण हे राज्य सरकारने किंवा केंद्र सरकारने ठरविले आहे म्हणून आले आहे असे नाही. मुंबईतील याचिकेमुळे निर्माण झाले आहे. या पत्रात पुढे असे नमूद केलेले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या दिनांक 12.2.2007 रोजी दिलेल्या आदेशानुसार राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या कलम 101 नुसार फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी संस्थात्मक व कायदेशीर व्यवस्था निर्माण करणे तसेच इतर उपाययोजना करण्याची कार्यवाही राज्य शासनाने करायची आहे." त्याच्या अंतर्गत शासनाने हे विधेयक आणले आहे. पुढे असेही नमूद केले आहे की, "सदर याचिका बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांनी केली असल्यामुळे मुंबईतील फेरीवाल्यांची समस्या ही राज्यातील इतर भागांपेक्षा जटील असल्याने बृहन्मुंबईतील फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमन करण्यासाठी आपले मत जाणून घेण्याकरिता"..... हे पत्र माझ्याकडे पाठविले आहे. हे पत्र शासकीय असून ते अधिकृत आहे. मी चिडून जे बोलत आहे ते व्यवस्थापनाबाबत बोलत आहे.

2..

NTK/ KTG/ D/

श्री.दिवाकर रावते....

माझा राग मी कोणावर काढणार ? मंत्री महोदयांना बहुमताचा खूप गर्व आहे, शासन आम्हाला केव्हाही चिरडू शकते, हे आम्ही स्वीकारलेलेच आहे. त्यामुळे शासन येथे बहुमताच्या जोरावर कोणतेही विधेयक मंजूर करुन घेऊ शकते. त्या भ्रमात मी नाही. एखादी गोष्ट तळमळीने मांडणे म्हणजे चिडून बोलणे असा मंत्री महोदयांचा समज दिसतो. मी माझ्याजवळ असलेल्या कागदपत्रातील शेवटचे पान वाचत होतो. मी जे वाचले ते अधिकृत नाही, असे आपण म्हणावे. माझ्याजवळ जी सरकारी कागदपत्रे आहेत ती अमान्य मी करावीत असे जर तुमचे म्हणणे असेल तर ते चुकीचे आहे.

मागील एका वर्षामध्ये दोन अधिवेशने झाली. मला जर याबाबत बदल झाल्याचे कळविले असते तर मला आनंद झाला असता. ज्या फेरीवाल्यांचे 15 वर्षे वास्तव्य झालेले नाही व त्यांच्याकडे 15 वर्षे वास्तव्याचा परवाना नाही त्यांनी फिरता फेरीवाला म्हणून व्यवसाय असे यात नमूद केलेले आहे. मग परप्रांतियांनी येथे यावे आणि फेरीवाल्याचा धंदा करावा असे म्हटले तर मंत्री महोदय, कशासाठी आपण राजकीय बोलत आहात ? यानंतर मी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाच्या अनुषंगाने बोलणार आहे. सुप्रीम कोर्टाने प्रथम 2002 मध्ये शासनाला सांगितले. मी या विधेयकावर संवेदनशील असल्यामुळे आपल्या अधिका-यांनी किंवा आपण मागील 2-4 महिन्यात मला बोलवून शासन असा असा बदल करीत आहे असे सांगावयास पाहिजे होते. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला निर्णय प्रक्रियेत सामावून घेतले जाते, ते आपण केले नाही. विरोधी पक्ष काय बोलतात, सभागृहात काय आवाहन करतात ते पाहू, त्याला आपण उत्तर देऊ असे आपल्याला वाटत असावे. परंतु आपण उत्तर देण्यासाठी समर्थ आहातच. म्हणून काल माननीय श्री.शरदराव पवार यांच्या वाढदिवशी आपण जो लेख लिहिला आहे, त्यातील वाक्ये वाचल्यानंतर मला ती आवडली आहेत. त्यात तुम्ही असे म्हटले आहे की, "शिवसेना सोडल्यानंतर माझे राजकीय जीवन संपले असे मला वाटले होते. परंतु राजकीय जीवनामध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्याला योग्य कोंदण देऊन जीवंत ठेवण्याचे काम आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी केले, म्हणून हा भास्कर जाधव आज मंत्री आहे." हे वाक्य बरोबर आहे ना ? मंत्री महोदय तुमच्याकडे टॅलेण्ट आहेच.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणत आहेत ते जरी खरे असले तरी गेल्या 10 वर्षामध्ये मी शिवसेनेबद्दल कधीही वाईट उद्गार काढलेले नाहीत.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही
श्री. भास्कर जाधव...

माझ्या मनामध्ये अनंत वेदना आहेत. अनंत दु:ख आहे. तरीही त्यांनी मला दोन वेळा आमदार केले याची जाणीव मला आहे. मी शिवसेनेच्या विरोधात कधीच बोललो नाही. जे काही घडले तो माझ्या नशिबाचा भाग होता असे मी समजतो. माझे दु:ख मी माझ्या ह्रदयामध्ये बंद करुन ठेवलेले आहे.

श्री. हुसेन दलवाई : राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांच्यावर अन्याय केला तरी ते चुकूनही बोलत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : मी तसा आक्षेप घेतलेला नाही. मी प्रामाणिकपणे सांगतो की, एखाद्या विषयावर बोलत असताना मी राजकारण कधीच आणत नाही आणि तो माझा स्वभाव नाही. 10 वर्षात ते घडले] ते त्यांचे कर्तृत्व होते. त्यांनी आम्हाला कधीही दोष दिला नाही. त्यांनी कृतज्ञताच व्यक्ती केली आहे. सभापती महोदय, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांची "आयबीएन लोकमत" या दूरदर्शन वाहिनीवरील मुलाखत मी मन:पूर्वक ऐकत होतो. त्यांनी सांगितले की, "मी 70 वर्षाचा झ ाालो आहे. पंतप्रधान होण्याचा प्रश्न नाही. परंतु महाराष्ट्र घडविण्याकरिता मी माझे जीवन व्यथित करीन." ते पुढे म्हणाले की, "नवीन पिढी मी उभी केलेली आहे." नवीन पिढी सांगताना त्यांनी पहिले नाव आदरणीय आबासाहेबांचे घेतले, दुसरे नाव मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांचे घेतले. तिसरे नाव उप मुख्यमंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांचे घेतले, चौथे नाव मंत्री महोदय श्री. विजयकुमार गावित यांचे घेतले. त्याचवेळी मी असे म्हटले की, पाचवे नाव त्यांनी श्री. भास्कर जाधव यांचे का घेतले नाही. तेव्हा मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव हे राजकारणाबद्दल बोलले तर मी देखील राजकारणासंबंधी दोन शब्द बोलेन. मी आता विधेयकावर येतो.

सभापती महोदय, सन 2002मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. तो संपूर्ण निर्णय वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयामध्ये असे सांगितलेले आहे की, "They can only sale cooked food..." म्हणजे शिजविलेले वडे, "...cut fruits juices and the like. We are unable to accept submission..." महापालिकेने वडे बनवायला परवानगी द्या असे सब्मिशन केले होते. त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आम्हाला हे सब्मिशन स्वीकारणे शक्य नाही. "We are unable to accept submission

श्री. दिवाकर रावते...

that cooking should be permitted..." येथे "shall" या शब्दा ऐवजी "should" शब्द वापरण्यात आलेला आहे. "...We direct that no cooking of any nature whatsoever shall be permitted..." येथे "shall" शब्द वापरलेला आहे. फेरीवाल्याने काय काय विकावे यावर चर्चा झालेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सभापती महोदय, हे अत्यंत गंभीर आहे. "...We direct that no cooking of any nature whatsoever shall be permitted..." 'shall' असे म्हटले आहे. अजिबात अनुमती नाही. "...Even where cooked food or cut fruits or the like are sold, the food must not be adulterated or unhygienic. All municipal licensing regulations and the provisions of the prevention of Food Adulteration Act must be complied with;" त्यामध्ये भेसळ असता कामा नये आणि ते आरोग्याला घातक असता कामा नये. म्हणजे पुन्हा सरकारची जबाबदारी आली. महानगरपालिका आणि सरकारने याबाबत दक्षता बाळगावी असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मला ते आदेश महत्वाचे वाटले म्हणून मी वाचून दाखवित आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने काय विकावे याबाबत काय म्हटले आहे? "Vending of costly items e.g. electrical appliances, video and audio tapes and cassettes, cameras, phones etc are to be prohibited.." म्हणजे महानगरपालिका मुख्यालय इमारतीपासून हुतात्मा चौकापर्यंत फेरीवाले बसतात आणि वस्तूंची विक्री करतात. मला मुंबई शहराबाबत अनुभव आहे. मी मद्रासमध्ये फिरलेलो नाही. संभाजीनगरमध्ये फिरलेलो नाही. इतर शहरांमधील माहिती मला नाही. तुमची सत्ता असल्यामुळे तुम्हाला सगळया ठिकाणची माहिती असेल. मी मुंबईच्या फेरीवाल्यांच्या संदर्भातील आंदोलन अनुभवले आहे. मार खाल्ला आहे. त्यामुळे मला मुंबईची अधिक माहिती आहे. "Vending of costly items e.g. electrical appliances, video and audio tapes and cassettes, cameras, phones etc are to be prohibited.." फेरीवाल्यांनी अशा वस्तू विकण्यावर बंदी घातली पाहिजे."...In the event of any hawker found to be selling such items his license must be cancelled forthwith." जागेवरच त्याचा परवाना रद्द करावा असे सर्वोच्च न्यायालयाचे 2002 मधील आदेश आहेत. त्यावर निर्णय होऊ शकला नाही. मग डिसेंबर, 2003 मध्ये हे आदेश पारित झाले. त्यानंतर सुप्रीम कोर्ट ऑफ इंडियाच्या प्रोसिडिंगमध्ये सगळे आलेले आहे. त्याची तारीख 2004 ची आहे. 2004 मध्ये अपील करण्यात आले. "These Appeals and Writ Petitions were called on for hearing today" म्हणजे दिनांक 30.6.2004 रोजी सुनावणी घेण्यात आली. यामध्ये मराठी माणसांबद्दल कसा भुलभुलैय्या आहे हे सांगतो. "We" म्हणजे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणतात. "We, however, modify our order dated 9th December, 2003 by permitting handicapped persons who have been granted license for running the PCOs/Aarey/Sarita stalls to continue to run those stalls even in non-hawking Zones..." अपंगांना ते परवानगी देत नव्हते. त्यावेळेला या सदनामध्ये एक कायदा पास झाला. मुंबई महानगरपालिकेच्या उपआयुक्त पदावरील व्यक्ती आय.ए.एस.दर्जाची नसेल तर त्या व्यक्तीला अतिरिक्त आयुक्त पदावर नेमता येत नव्हते. महाराष्ट्र कॅडरमधील आय.ए.एस.अधिकारी असलेले श्री.पाटणकर यांचे बंधू मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत उपआयुक्त पदावर कार्यरत होते. ते माझ्या महानगरपालिका सदस्य काळात महापालिकेचे अधिकारी असल्यामुळे मी त्यांच्यासोबत काही लोकांची बाजू घेऊन गेलो होतो. नंतर ते महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त झाले. मुंबई शहरातील दूध विक्री केंद्रे तोडायचे आदेश दिले होते. ती केंद्रे न तोडण्याकरिता आणि अपंग आहेत त्यांच्याकरिता महानगरपालिकेने कोर्टात अपील केले होते. त्या संदर्भातील सुनावणीचे आदेश असे आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

नंतर 5जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"We, however, modify our order dated 9th December, 2003 by permitting handicapped persons who have been granted license for running the PCOs/Aarey/Sarita stalls to continue to run those stalls even in non-hawking zones..." म्हणजे हॉकर्सना उठविता येत नाही, नॉन हॉकर्स असेल तर त्यातील हँडीकॅप्डना बसण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे."..No further or new licenses to be granted to any other person even a handicapped person in non-hawking zones. We, however, clarify that a license to run the PCO stalls would mean running a PCO stall. No other activity can be carried out from the PCO stall. Similarly, even in respect of other stalls, only the activity permitted by the license can be carried on." मी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचतो...अडथळा.... आपल्याला मराठीतून भाषांतर हवे असेल तर मी उद्या तुमच्या घरी येईन, प्रथम "राष्ट्रगीत" म्हणणार आणि नंतर मराठीतून सांगणार. महोदय, नॉन हॉकिंग झोनमध्ये अपंगांना बसवायचे व त्यांना दिलेली जागा त्यांनी त्यांच्याचसाठी वापरावी असेही निदेश न्यायालयाने दिलेले आहेत. परंतु कदाचित फेरीवाल्यांना उठविल्यानंतर न्यायालयाच्या लक्षात आले असावे की हा प्रश्न फार जटिल आहे. म्हणून ज्या ठिकाणी 15, 16 किंवा 22 सदस्य संख्या असलेल्या नगरपालिका आहेत, त्यांच्यावर ही जबाबदारी टाकली नाही, ती शासनावर टाकली आहे. कदाचित मंत्र्यांनाही याची जाणीव नंतर होईल की शासनाची ही जबाबदारी आहे. "The Police is directed to give full and complete protection to the Municipal staff as and when they go to clear the hawkers as per the directions of this Court. It will be the duty of the Commissioner of Police, Greater Bombay to see that such protection is given. The Police Commissioner shall also ensure that there is regular patrolling...." म्हणजे ही जबाबदारी महापालिकेची नसून पोलिसांची आहे."....to ensure that once the hawkers are removed from a particular place, they do not come back to that place." हप्ता घेऊन हॉकर्सना बसवू नका. तसेच कोर्टाच्या वतीने हे आदेश सुध्दा न्या. जसबीर सिंग यांनीच दिलेले आहेत. या हॉकिंग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते ........

प्लाझाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, " In our order dated 9.12.2003, we noticed as under : 'It will be open for BMC to set up hawking plazas. However, when BMC sets up a hawking plaza the allotment of 1m X 1m pitches in those hawking plazas must be made on the above terms and conditions..." या सर्व टर्म्स अँड कंडिशन्स सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. पुन्हा 12 फेब्रुवारी, 2007 ला, सुप्रिम कोर्टाचा हा निर्णय सुरुच आहे.........

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "We further clarify that the schemes and directions issued by this Court are purely temporary in nature and subject to regulations framed by the State Government in terms of Section 10.1 of the National Policy on Urban Street Vendors." हे विधेयक कशासाठी आले आहे ? सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, आमचे आदेश हे टेम्पररी आहेत. जोपर्यंत राष्ट्रीय धोरण व जोपर्यंत राज्याचे धोरण जाहीर होत नाही तोपर्यंतच आमचे हे आदेश राहणार आहेत. राष्ट्रीय धोरण आणि राज्याचे धोरण जाहीर झाल्यानंतर, तयार झाल्यानंतर आमचे आदेश राहणार नाही. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, "In other words, the schemes and directions issued by this Court shall be valid only till the regulations are framed and implemented." आज हे विधेयक पास जरी झाले नाही तर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हे धोरण पुढे तसेच सुरुच राहील. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "We would like to reiterate that no other Court shall interpret the order of this court or pass any order touching upon the subject matter dealt with by this Court concerning the issues in hand. Any writ petition pending in any High Court on the same subject shall remain stayed. कुठलेही कोर्ट यामध्ये पडणार नाही. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "If any clarifications/modifications are required, the same must be obtained from this Court" अशा प्रकारचे बंधन टाकल्यामुळेच हे विधेयक आपल्यापुढे आलेले आहे.

माननीय राज्यमंत्र्यांनी वाईट वाटून घेऊ नये. आपण जे सांगितले आहे त्याबाबतीतील ठराव सुध्दा माझ्याकडे आहे. फेरीवाल्यांच्या धोरणाविषयी मुंबई महानगरपालिकेत चर्चाच झाली नव्हती. यासाठी स्पेशल आयटम घेतला होता, सभा घेतली होती परंतु गोंधळ झाला आणि एक शब्दाची सुध्दा चर्चा मुंबई महानगरपालिकेत झाली नाही. ही चर्चा सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने सुध्दा केली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. परंतु इम्प्रुव्हमेंट कमिटीमध्ये फेरीवाल्यांविषयी धोरण कसे असावे याबाबत चर्चा झाली होती. या ठिकाणी मी जे काही मुद्दे मांडलेले आहेत ते आपण दिलेल्या मुद्यावरुनच मांडलेले आहेत. फेरीवाला झोन, हॉकर्स

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

प्लाझा, मंडई, अमुक, तमूक नसेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उद्या या महाराष्ट्रात जे काही हॉकींग झोन उभे राहणार असेल व त्याची सर्व जबाबदारी पोलिसांवर राहणार असेल तर यामध्ये थोडी उणीव राहणार आहे. हा कायदा झाल्यानंतर कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थीत झ ाली नाही तर अधिका-याच्या बाबतीतील कोणतीही शास्ती या विधेयकामध्ये दिलेली नाही. हॉकर्सला दंड वगैरे सर्व काही आहे. एवढे कडक धोरण तयार केले जाणार असेल आणि केवळ सर्वोच्च न्यायालयाने आपल्याला हे करावयास भाग पाडले म्हणून आपण हे विधेयक करीत आहात. या संपूर्ण विधेयकामध्ये कायद्याची अंमलबजावणी न करणा-या अधिका-यावर कोणत्याही प्रकारची शिक्षेची किंवा दंडाची तरतूद केलेली नसल्यामुळे तुम्ही कितीही धोरण आखले तरी त्याचा काही एक उपयोग होणार नाही. त्यामुळे या ठिकाणचा अधिकारी पैसे वसूल करण्याचे चालूच ठेवेल, हॉकर्स बसवण्याचे चालूच ठेवेल व हे धोरण केवळ कागदावरच राहील. या विधेयकाच्या मागचा जो मूळ उद्देश आहे तो निघून जाईल अशी परिस्थिती आहे.

या विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांकडून फार मोठया उत्तराची अपेक्षा नाही. मुंबई महानगरपालिकेने एकूण 223 हॉकिंग झोन पाठविले होते परंतु त्यातील केवळ 183 मंजूर झ ालेले असून बाकीचे रद्द करण्यात आलेले आहेत. हे मी अधिकृतपणे सांगतो आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 2 किंवा 2.5 टक्केच हॉकर्स आपल्याला बसवता येत असतील तर इतर हॉकर्सना आपण बाहेर कसे काढणार आहात याचीही माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

इतर हॉकर्सना बाहेर कसे काढणार आहात ? आपल्याला माहीत आहे की, लिंकिंग रोडवर प्रचंड हॉकर्स होते. त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन केल्यामुळे त्याठिकाणी नवीन हॉकर आला नाही आणि आजही येत नाही. लोकांना देखील चालायला चांगली जागा मिळत आहे. लोकांनी याबाबत स्वागत केलेले आहे. तेव्हा याठिकाणी निर्णय घेत असताना त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करणार आहात ? अंमलबजावणीमध्ये कुचराई झाली तर संबंधित अधिकाऱ्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे याचा उल्लेख यामध्ये नाही. हे ऑन गोईंग आहे...

सभापती महोदय, मी या विधेयकावर बोलताना काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. माझ या दृष्टीने त्या फार महत्वाच्या आहेत. आज कोल्हापूर महानगरपालिकेने पूर्णपणे हॉकर्स उठविण्याचे काम सुरु केले आहे. अकोला शहरात देखील हेच काम सुरु आहे. त्यामुळे लोकांना आनंद होत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु महानगरपलिकेचे अधिकार महानगरपालिकेकडे असावेत त्यामध्ये शासनाने हस्तक्षेप करु नये असे मला वाटते आणि हे मघापासून सांगताना संवाद वाद संवाद सुरु आहे... ज्याच्या हाती ससा तो पारधी या उक्तीप्रमाणे आपल्याकडे बहुमत आहे त्या जोरावर आपण हे विधेयक मंजूर करु शकता. मी इतका वेळ बोलत आहे परंतु समोरच्या बाकावरील सदस्य कंटाळून देखील बाहेर जाण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही. मी ज्या सूचना केल्या आहेत त्याचा जरुर विचार व्हावा. हॉकर्स झोनमध्ये योग्य माणसाचा विचार व्हावा. स्थानिकांना प्राधान्य मिळाले पाहिजे. व्यवसाय करण्याचा हक्क सर्वांना आहे. तेव्हा माझ्या सूचनेचा विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 41 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक येथे चर्चेसाठी आले आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विचार मांडले. त्यानंतर या सदनातील ज्येष्ठ व अभ्यासू सदस्य आदरणीय श्री.दिवाकर रावते यांनी या विधेयकाची चिरफाड केली असे बोलण्यापेक्षा प्रत्येक बाब उलगडून सांगितली असे म्हणणे योग्य ठरेल. त्यांचा अनुभव दांडगा आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 20.10

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, हे विधेयक याठिकाणी मांडण्यात आले आहे, त्या मागे कोणताही राजकीय हेतू नाही. किंबहुना हे विधेयक महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार, शहरांमध्ये नागरी वस्तीतील लोकसंख्या 42 टक्क्यापर्यंत पोहचली आहे अशी आपल्याकडे अधिकृत आकडेवारी आहे. आता 2010 ची जनगणना अधिकृतरीत्या जाहीर झालेली नसली तरी देखील मी सांगू इच्छितो की, जवळजवळ 47 ते 48 टक्क्यापर्यंत नागरी लोकवस्ती वाढलेली आहे. फार पूर्वी पासून मुंबई महानरपालिकेचा कारभार सन 1888 च्या कायद्याने चालतो. काही महानगरपालिकांचा किंवा नगरपालिकांचा कारभार हा सन 1965 च्या कायद्यानुसार चालतो. नागपूर महानगरपालिकेचा कारभार सन 1948 च्या कायद्यानुसार चालतो. यामध्ये वेगवेगळया शहरानुरुप थोडेसे वेगवेगळे कायदे आहेत. वेगवेगळया शहरांचे वेगवेगळे डीसीआर आहेत तसेच निरनिराळया शहरांचे डेव्हलपमेंट प्लान्स देखील वेगवेगळे आहेत. काही विषयामध्ये सर्व समावेशक व एकसूत्री धोरण शासनाकडून अवलंबण्याकरिता नगरपालिका व महानगरपालिकांना भाग पाडणे आवश्यक झालेले आहे, गरजेचे झालेले आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहेच. म्हणून काही दिवसापूर्वी सभागृहाने रेटेबल व्हॅल्यूवर आधारीत असलेला प्रॉपर्टी टॅक्स कॅपिटल व्हॅल्यू बेसीस वर आणला.

सभापती महोदय, एखादे चुकीचे काम सुरु झाले असेल तर त्या संदर्भात लोक लोकप्रतिनिधींकडे जातात. काही वर्षापूर्वी किंवा काही दिवसापूर्वी अशी परिस्थिती होती की, लोकप्रतिनिधींनी सहजपणे अशा एखाद्या शासकीय अधिकाऱ्याला फोन केला व सांगितले की, हे चुकीचे काम थांबवा तर अशा वेळी त्याच्यावर कारवाई केली जात असे. नियम 353 अंतर्गत सरकारी कामामध्ये अडथळा आणला म्हणून संबंधित लोकप्रतिनिधीवर कारवाई केली जायची. तसेच त्याला कधी कधी निलंबित देखील केले जायचे. मात्र ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिकाऱ्यांच्या संगनमताने 8 ते 10 इमारती उभ्या राहिल्या असतील तर त्या बाबत कोणी तक्रार करेपर्यंत जणू काही त्यांना माहीतच नसते अशा पद्धतीने ते अधिकारी वावरायचे. या संदर्भात काही तरी थातूर मातूर कारवाई केली जायची. मात्र त्यांना जबाबदार धरले जायचे नाही. नुकतेच त्या संदर्भात एक बिल आपण संमत करुन घेतले आहे. अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

होत असतील व ते काम तोडायला गेल्या नंतर एखादा लोकप्रतिनिधीने ते थांबावयास सांगितले असेल व या करिता लोकप्रतिनिधीला जर जबाबदार धरले जात असेल तर ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहे, त्यांना देखील जबाबदार धरले पाहिजे, अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये करण्यात आली. म्हणून मी आपणास सांगू इच्छितो की, आता हळूहळू सर्वसमावेशक कायदे करण्याची सुरुवात नगर विकास विभागाने केलेली आहे.

सभापती महोदय, महानगरपालिका, नगरपालिका,नगरपंचायती या स्वायत्त संस्था आहेत असे आपण समजतो. आपण त्यांना प्रत्यक्षपणे काही निदेश देऊ शकत नाही, त्यांना काही सूचना करु शकतो. मात्र येणाऱ्या काळामध्ये आपल्याला काही महत्वपूर्ण गोष्टींमध्ये निदेश देण्याचा अधिकार आपल्या सर्वांच्या संमतीने दिला जाईल. याचा अर्थ असा नाही की, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार सरकारला कोठे तरी कमी करावयाचे आहेत. स्थानिक संस्थांचे अधिकार शासनाला आपल्या हातामध्ये घ्यावयाचे आहेत, अशातला भाग अजिबात नाही. कामामध्ये सुसूत्रता आली पाहिजे या करिता ही तरतूद केली जात आहे. कायद्याचे बंधन सर्वांना समान असले पाहिजे. कोठे तरी चुकीचे काही घडले तर त्यामध्ये सर्वांना समान शिक्षा करण्याची तरतूद असली पाहिजे. त्यामध्ये सर्वाची जबाबदारी समान आहे. अशा प्रकारचे कायदे हळूहळू अंमलात आणण्याची आवश्यकता सरकारला भासत आहे.

सभापती महोदय, आपण हे विधेयक या सभागृहामध्ये आणले आहे, त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी काही बाबी सांगितल्या आहेत. मघाशी ते बोलत असताना मी त्यांना थोडेसे डिस्टर्ब केले. त्यांना थोडेसे थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी असे सांगितले की, या संदर्भात मुंबई महानगरपालिकेची शेवटपर्यंत बैठकच होऊ शकली नाही. त्यांचे खरे दु:ख हे आहे की, मुंबई महानगरपालिकेने जी काळजी घ्यावयास पाहिजे होती, त्यांनी देखील काळजी घेतली नाही.

यानंतर श्री. सरफरे....

अप्रकाशित / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहाची वेळ 8.15 पर्यंत वाढविण्यात आली होती. सभागृहाची वेळ मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री भास्कर जाधव : सभापती महोदय, म्हणून त्याठिकाणी काळजी घेतली नाही . त्यांची अशी अपेक्षा होती की, त्यांच्या मनातील ज्या भावना समाज हिताच्या आहेत, ज्यांच्याबद्दल त्यांना संभाव्य भिती वाटते त्या संदर्भातील आहेत. त्यांच्या भावना देखील तेवढयाच जहालपणे त्यांनी मांडण्याची आवश्यकता होती. त्या भावना खालच्या सभागृहामध्ये मांडल्या गेल्या नाहीत. मग त्यांनी सांगितले की, त्यांच्या भावनेची दखल आमच्या सरकारने घेतली पाहिजे. म्हणजे त्यांचा आमच्या सरकारवर किती विश्वास आहे हे याठिकाणी स्पष्ट दिसते. त्यांनी असे समजू नये की, त्यांच्या भावनांची दखल न घेता पाशवी बहुमताच्या जोरावर हा कायदा आम्ही संमत करीत आहोत. असे अजिबात नाही व त्याची आवश्यकता सुध्दा नाही. मी याबाबत खुलासा केला आहे. त्यामुळे केवळ एखादी महानगरपालिका, एखादी नगरपालिका किंवा एखादी व्यक्ती, एखादी संस्था किंवा एखादी संघटना डोळयासमोर ठेवून हा कायदा केला जात नाही. हा कायदा शहरी भागातील नागरी संस्थांकरिता, वस्तीकरिता केला जात आहे मी त्यांना मघाशी स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणून गेल्या दोन-तीन अधिवेशनामध्ये हा विषय पुन्हा पुन्हा सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यामुळे आम्ही जे करीत आहोत ते कुणावरही अन्याय करणारे नाही याची सरकारला खात्री झाली आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर परप्रांतीय आहेत, हे सांगत असतांना त्यांनी भैय्यांचा उल्लेख केला. तो करण्यास हरकत नाही. मी त्यांना विनंती करणार आहे की, आपण महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या हिताच्या जपणुकीकरिता धडपडत आहात, हा कायदा मराठी माणसांच्या हिताच्या दृष्टीने अडचणीचा वाटत आहे असे आपल्याला वाटत आहे. तसे अजिबात नाही. केवळ मराठी माणसांच्या बाबतीत याठिकाणी चर्चा करुन चालणार नाही. आपल्या हातामध्ये असलेल्या सत्तेच्या माध्यमातून ज्या मराठी माणसांची दु:खे आपण वेशीवर मांडीत आहोत, ज्या मराठी माणसांच्या व्यथा मांडून स्वत: व्यथित होत आहोत. माझा आपणास प्रश्न आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून मराठी माणसाच्या हिताकरिता हा कायदा झाल्यानंतर मराठी माणसाच्या फायद्याकरिता आपण या कायद्याचा उपयोग कशाप्रकारे करणार आहात? त्यावेळी आपण कोणती

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. भास्कर जाधव...

माफी मागणार आहात? त्यावर या कायद्याचे यश अवलंबून आहे. सभापती महोदय, याठिकाणी हे केवळ बोलून भागणार नाही. मुंबई महानगरपालिका आपल्या हातामध्ये आहे. असे कोणते धोरण किंवा असा कोणता कार्यक्रम आपण याठिकाणी आखला, असा कोणता निर्णय मुंबई महानगरपालिकेमध्ये केला जो मराठी माणसांच्या हिताचा होऊ शकतो?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रीमहोदय, आपण आता वक्तव्य केले की, मराठी माणसांच्या फायद्याकरिता आपण या कायद्याचा उपयोग करा. आपले हे वक्तव्य सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द आहे हे याठिकाणी सांगण्यासाठी मी उभा आहे. मराठी माणसांचे आम्ही काय भले केले हे मघाशी माझ्या भाषणामध्ये सांगितले आहे. श्री.पाटणकर साहेब होते त्यावेळी मराठी लोकांचे 1800 दूध विक्री केंद्र संभाळण्याकरिता आणि पी.सी.ओ. केंद्र संभाळण्याकरिता मी स्वत: प्रयत्न करुन ते अधिकृत केले आहेत हे सांगितले आहे. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार एकही फेरीवाला , एकही गाळा किंवा दुकान तुम्हाला नव्याने देता येणार नाही. मंत्री महोदय, तुम्हाला वाटते की, माझ्या भावाला गाळा देता येईल परंतु तो तुम्हाला देता येणार नाही. त्यामुळे ते बंधन आल्यामुळे या आपल्या सर्व निर्णयांना लूप लागला आहे. त्यामुळे आहे त्यांचे पुनर्वसन करा हाच विषय या विधेयकामध्ये आहे. मी बोललो म्हणून मला सुनविण्याकरिता मराठी माणसांचे भले करा असे सांगत आहात. भले नाही करता येणार. हे परप्रांतीय तुमच्या ऊरावर बसले आहेत त्यांना संभाळण्याकरिता हे सर्व चालले आहे हे माझे म्हणणे चुकीचे असेल तर आपण सांगा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार फेरीवाल्यांवर आता बंधन ठेवले नाही. तसे आपण सांगितले तर आनंद होईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला वास्तव परिस्थिती बाहेर काढावयाची होती ती माननीय सदस्यांच्या मुखातून बाहेर आली. माझ्या सहकाऱ्यांना मला हेच सांगावयाचे आहे की, आम्ही मराठी माणसांकरिता काहीतरी करीत आहोत अशा भ्रमात त्यांना ठेवण्यासाठी, त्यांना स्वप्नामधून जागविण्याकरिता, त्यांच्या भविष्याचे आणि भवितव्याचे खोटे मनोरे उभे करण्यापेक्षा वास्तवतेला आपण सामोरे गेले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण त्यांचे पावणे दोन तास भाषण ऐकले माझे एक वाक्य देखील ते ऐकण्यास तयार नाहीत...

(गोंधळ) (यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

मघापासून सारखे मराठी माणसाला, मराठी माणसाला, मराठी माणसाला असे चालले होते...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कार्ले किती कडू असते ते मी अनुभवतो. सभापती महोदय, आपण मला बोलावयास देणार की नाही ? आपण माझे सुरुवातीपासून ते आतापर्यंतचे सर्व भाषण काढून बघावे. मराठी माणसावर अन्याय झाला आहे, मराठी माणसे फेरीवाल्यांमध्ये मिळत नाहीत असे माझे एकही वाक्य नाही. पण मराठी माणसांचा पुळका आणून मी भाषण केले अशा प्रकारचा अविर्भाव आणून तलवारीच्या भाषेमध्ये कडवटपणा दाखविण्याचा जो प्रयत्न आहे तो दुर्दैवी आहे. मी असे बोललो नाही. ते राजकारण करीत आहेत.

श्री. विनायक मेटे : (बसून) अविर्भाव आणून म्हणजे काय ?

श्री. दिवाकर रावते : अहो, थांबा हो जरा.

श्री. विनायक मेटे : आपण मला थांबण्यास कसे काय सांगू शकता ?

श्री. दिवाकर रावते : आपण बसून मला बोललात. आपण उभे राहून बोला. मी आपल्याला बसविणार नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बसून मला बोलले म्हणून मी म्हणालो की, थांबा हो जरा. हे काय चालले आहे ? सभागृहामध्ये काय वात्रटपणा चालला आहे ?

श्री. विनायक मेटे : आपण सभागृहात काहीही आरोप करु शकता काय ?

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. दिवाकर रावते : आपण बसून बोलला आणि मी आपल्याला अहो, जाहोच्या भाषेत बोलत आहे. आपण बसून मला बोलला म्हणून मी आपला आदर करुन बोललो. आपण गप्प बसा हे मी आदराने बोललो. आपण कशाला हातवारे करीत आहात ? ते हातवारे बाहेर जाऊन करा. हे तुमचे काय चालले आहे ? सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे मला बसून बोलले. त्यावर मी एवढेच बोललो की, मेटे, थांबाहो जरा. ते म्हणाले की तुम्ही मला थांबविणारे कोण ? या ठिकाणी सभापती असताना ते उभे राहून बोलले तर मी त्यांना थांबवू शकत नाही. एवढेही ज्ञान नसलेला आमदार या सभागृहामध्ये असेल तर मला आपली कीव कराविशी वाटते. हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

काय चालले आहे ? आपण बोला. आपल्याला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. हे काही राखीव नाही. आपल्याला बोलण्याचे स्वातंत्र्य आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्यांचे बोलणे झाल्यानंतर आपण बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, मला गप्प बसविणारे आपण कोण ? या ठिकाणी सभापती आहेत हे मलाही कळते. सन्माननीय सदस्य माझ्याशी बोलले म्हणून मी आदराने बोललो की, मेटे साहेब, तुम्ही बोलू नका. गप्प बसा हे मी आदराने बोललो. मी अरे तुरेच्या भाषेत बोललो नाही. आपण माझ्याशी बोलत होता. उभे राहून बोलण्याची परवानगी माननीय सभापती देतील तेव्हा मी आपल्याला बसा म्हणून कसे म्हणणार ? या सदनामध्ये आपण पहिल्यांदाच आलेला नाहीत. आपण वादासाठी उभे राहणार असाल तर आपण वाद घालू. तसा काही प्रश्न नाही. आपण असे करु नका. माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, आपण उगाच अविर्भाव वगेरे आणून आम्ही मराठी माणसांबद्दल काय करतो हे सांगू नका. आपण इतकी वर्षे आमच्याबरोबर होता. आम्ही करत होतो, आजही करतो आणि उद्याही करणार. तो भाग नाही. मी माझ्या भाषणामध्ये असा कोणताही अविर्भाव आणून बोललो नाही. अशा प्रकारे जर माननीय मंत्री महोदय काही राजकीय बोलणार असतील तर आम्ही गप्प बसावयाचे काय ? मी तसे भाष्यच केले नाही. आपण माझ्या भाषणात ते काढून दाखवा. मी जे भाष्यच केले नाही त्यासंदर्भात जर ते असे बोलणार असतील तर आम्ही ते ऐकावयाचे काय ? मी उपस्थित केलेल्या मुद्यांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर ते मी समजू शकतो परंतु अशा पध्दतीने राजकीय अविर्भाव आणून, हातवारे करुन बोलणार असतील तर आम्ही ते कसे काय ऐकणार ? त्यांनी असे बोलू नये अशी मी त्यांना विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी बिलाच्या मेरिट, डीमेरिटवर अधिक बोलावे. आपला अभ्यास सुध्दा दिसतो. तो अभ्यास ऐकण्यासाठी आम्ही जास्त उत्सुक आहोत. आपण बिलाच्या मेरिटवर बोलला तर अधिक योग्य होईल.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या सभागृहामध्ये या बिलाच्या अनुषंगाने नेमके राजकीय आणि सामाजिक परिणाम काय होणार आहेत त्यावर माननीय मंत्री महोदय बोलणारच. आपण असे कसे बोलत आहात ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हे जे विधेयक क्रमांक 41 आलेले आहे...

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी येथे विधेयकावर बराच वेळ आपले विचार मांडले आहेत. ते आम्ही सर्वांनी शांतपणे ऐकले आहेत. आम्ही कोणीही त्यांच्या भाषणात अडथळा आणला नाही किंवा ते आपल्या विचारापासून दूर जातील असे वर्तन कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी केले नाही. आता मी त्यांना विनंती करतो की, मंत्री महोदय उत्तर देत आहेत, ते आपण ऐकावे, त्यानंतर आपल्याला काही बोलावयाचे असेल ते आपण बोलू शकता.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हॉकर्स झोन संदर्भातील हे जे बिल आहे त्यामध्ये सगळया छोटया, मोठया, बारीक सारीक गोष्टींचा शासनाने विचार केलेला आहे. मग स्थिर फेरीवाला कोणाला म्हणायचे, फिरता फेरीवाला कोणाला म्हणायचे, त्याची व्याख्या काय असेल, स्थिर फेरीवाल्याची व्याख्या काय असेल, हे झोन कोठे कोठे असावेत, कशा प्रकारे असावेत, हे देखील नमूद केलेले आहे. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, रस्त्यावरच हे हॉकर्स झोन करणार आहेत. त्यांनी असेही म्हटले की, अडीच मीटरचा रस्ता असेल व सव्वा मीटरवर हॉकर्स झोन असेल, अशी कोणतीही व्यवस्था या बिलात केलेली नाही. यामध्ये कायद्याने जो कोणी फेरीवाला आहे, त्याला आता कायद्याने अधिकार मिळणार आहेत, त्याची नोंदणी होणार आहे, त्याला अधिकृतपणे लायसन्स दिले जाणार आहे. त्याला महानगरपालिकेमध्ये रजिस्ट्रेशन करावे लागेल. त्याच्याकडून महिन्यासाठी फी घेतली जाईल. त्यामुळे आता अधिकृत फेरीवाला कोण आहे ते स्पष्ट होईल. आता कोणीही उठतो, 10 फेरीवाल्यांना जवळ करतो, त्यांना रस्त्यावर उभे करतो आणि हे माझे आहेत, त्यांना कोणी हात लावायचा नाही असे सांगतो. त्याला लायसन्स नाही, तेथील महानगरपालिका किंवा नगरपालिकेला त्यांच्याकडून उत्पन्न मिळत नाही. सध्या उत्पन्न कोणाला मिळते ? जो कोणी त्याला बसवितो त्याला उत्पन्न मिळते किंवा तेथे जे अधिकारी जातात त्यांना उत्पन्न मिळते. चल उठ, तुझ्याजवळ लायसन्स असेल तर ते मला दाखव असे सांगितले जाते. (अडथळा) त्याला अधिकृत लायसन्स मिळणार आहे. सध्या अधिकृत, अनधिकृतपणे फेरीवाले असतात त्यांच्याकडे अधिकारी जातात, त्यांच्याकडे लायसन्सची विचारणा करतात, त्यांच्याकडून पैसे काढतात, पोलीस पैसे काढतात, हे तर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

NTK/ KGS/ MMP/

श्री.भास्कर जाधव...

सर्वश्रृत आहे, ते लपून राहिलेले नाही. आता त्यांना लायसन्स घ्यावे लागेल. तो जर अनधिकृतपणे रस्त्यावर बसत असेल तर त्याला 500 रुपयांपासून दंड भरावा लागेल, त्याला सहा महिन्याची शिक्षा सुध्दा होऊ शकेल. तसेच एकदा, दोनदा असा गुन्हा करीत असताना तो सापडला तर त्याला 500 रुपयांपासून 5 हजार रुपये प्रत्येक दिवसासाठी दंड भरावा लागेल अशी तरतूद या विधेयकात केलेली आहे. जो कोणी याठिकाणी 15 वर्षे वास्तव्यास असेल त्याने वास्तव्याचा दाखला दिल्यास त्याला लायसन्स देण्याची तरतूद केलेली आहे. तसेच अपंग व्यक्तींना 3 टक्के, मागासवर्गीयांसाठी 20 टक्के, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना 10 टक्के, महिलांसाठी 30 टक्के जागा राखून ठेवलेल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

जर कुणावर अन्याय होत असेल आणि कुणाला तक्रार करावयाची असेल तर नगरपालिका स्तरावरचे अपील जिल्हाधिका-यांकडे करण्याची तरतूद विधेयकामध्ये केलेली आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये तक्रारी येण्यापूर्वीचे अपील असेल तर ते डायरेक्टर लेव्हलवर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, हे सर्व शासन ठरविणार आहे. सभापती महोदय, या बाबतीत तेथील महानगरपालिका आणि नगरपालिकेने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानंतर त्याबाबतीत त्यांना तांत्रिक समितीने सल्ला द्यावयाचा आहे. त्यानंतर आपण ठरविलेले धोरण महानगरपालिका किंवा नगरपालिकेला योग्य वाटले तर ते धोरण त्यांनी शासनाकडे पाठवाचे आहे. याचा अर्थ हे धोरण राबविण्याच्या बाबतीत शासनाने महानगरपालिका आणि नगरपालिकांवर कोणतेही बंधन घातलेले नाही किंवा त्यांना शासनाने हे धोरण राबविण्याच्या बाबतीत जबरदस्ती केलेली नाही. शासनाच्या कायद्याचा बडगा किंवा तगादा महानगरपालिका किंवा नगरपालिका या संस्थावर असणार नाही अशी विधेयकामध्ये तरतूद आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आता ठराविक लायसन्स होल्डर्स असतील असे सांगितले. लोकसंख्येच्या 2 ते अडीच टक्के इतके हॉकर्स असले पाहिजेत अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये आहे.त्यामुळे महानगरपालिका किंवा नगरपालिकेला फेरीवाल्यांची सोय करावीशी वाटली तर ती त्याना करता येईल. म्हणून त्या ठिकाणी कोणाला बसवायचे, कोणाला कोणते लायसन्स द्यायचे, त्या ठिकाणी कापड विक्रेते कुठे बसवायचे, फळविक्रेते कुठे बसवायचे, भाजी विक्रेते कुठे बसवायचे, अन्य छोटयामोठया वस्तू विकणा-यांना कुठे बसवायचे हे ठरविण्याचा अधिकार सुध्दा महानगरपालिकेला आहे. तो अधिकार शासनाला नाही. फूडकोर्ट कुठे करायचे हे ठरविण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे. विकेण्डला या फेरीवाल्यांनी कोणत्या रस्त्यावर बसायचे, सायलेन्स झोनवर बसावे की नाही हे सुध्दा महानगरपालिकेने ठरवायचे आहे.

. सभापती महोदय, या फेरीवाल्यांची आज नितांत गरज बनलेली आहे. सारे पदपथ या फेरीवाल्यांनी वेढलेले आहेत. आता आपण असे म्हणतो की यानांच का लायसन्स द्यायचे ? जेव्हा शहरे व्यवस्थित वसलेली नव्हती, ती गजबजलेली नव्हती, व्यापार उदीम वाढला नव्हता, लोकांच्या गरजेच्या वस्तू मिळण्याची सहज सोय नव्हती त्यावेळी आपल्याला या लोकांची अतिशय गरज होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.

त्यामुळे त्यांना सांगावे लागत होते की, बाबारे, तू इथे कुठे तरी बस आणि लोकांना चार वस्तू मिळतील अशा त-हेने त्या तू विक. अशा पध्दतीने छोट्या छोट्या शहरामध्ये या फेरीवाल्यांची गरज होती आणि हे आपल्याला नाकारता येणार नाही. आज बाजारपेठा वाढल्या आहेत, स्पर्धा वाढली आहे, सगळया गोष्टी आपल्याला सहजासहजी मिळू लागल्या आहेत.आज आपल्याकडे जागतिक बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. या सगळया गोष्टी आता मिळत असल्या तरी एकेकाळी छोट्या शहरामध्ये दैनंदिन गरजेच्या गोष्टी लोकांना मिळत नव्हत्या त्यावेळी याच लोकांनी त्यांना फार मोठा फायदा होत नसताना सुध्दा त्यांनी लोकांची सोय केलेली आहे, लोकांना सेवा पुरविलेली आहे. म्हणून यांना वा-यावर सोडता येणार नाही आणि ती नैतिक जबाबदारी आपली असल्यामुळे या फेरीवाल्यांना या कायद्याच्या चौकटीमध्ये सामावून घेणे हे आपले काम आहे. हे माणुसकीचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे.

सभापती महोदय, आपल्याला कुठे हॉकर्स झोन करायचे असतील, तिथे कोणाची सोय करायची असेल तर काही हरकत नाही. परंतु कुठे तरी हे घडून गेल्यानंतर हे घडले नाही असे म्हणण्यापूर्वी हे घडण्याकरिता आपल्याकडे एक मोहीम असली पाहिजे, आपल्याकडे निश्चित अश स्वरुपाचा मास्टर प्लॅन असला पाहिजे, आपल्याकडे काम करण्याची आणि नियोजनबद्ध आराखडा आखण्याची तयारी असली तर अन्याय होण्याऐवजी न्यायच मिळेल अशी माझी स्वत:ची खात्री आहे. एक शहर मोठे झाले म्हणजे काही सगळी शहरे मोठी होत नाहीत. भविष्यामध्ये शहरे वाढणार आहेत, शहरातील लोकसंख्या वाढणार आहे.आज जर आपण नियोजन केले, आज तुमच्या आमच्या मनामध्ये यासंबंधीचे जे काही धोरण असेल ते धोरण आखून त्यादृष्टीने त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्लॅनिंग ॲथॉरिटी तयार केली तर हे सगळे होऊ शकत होते. पण झाले नाही म्हणून हे आम्ही केले हे सांगण्याची आपली सर्वांची तयारी असली पाहिजे अशी माझी विनम्र विनंती आहे.यावर मी फार काही बोलणार नाही. एका गोष्टीचा मी या ठिकाणी जरुर उल्लेख करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या सभागृहामध्ये भाषण केले. ते आता सभागृहामध्ये हजर नाहीत. ...(अडथळा)...

...नंतर श्री. भोगले....

अध्यक्षीय प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव............

ते या सभागृहात बोलले आणि बाहेरही बोलले. हरकत नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महत्वाचा मुद्दा मांडला. तो मुद्दा मला पटला आहे. हे सगळे आम्ही करीत आहोत. कडक कायदे करीत आहोत. कायदे कसे करावेत हे फ्रेम करणारे अधिकारी आहेत, परंतु कायद्याची अंमलबजावणी झाली तरी स्वत:वर जबाबदारी नाही अशी अधिकाऱ्यांची नेहमीची प्रवृत्ती मला दिसून येते. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे एखाद्या अधिकाऱ्याकडून आपल्या कारकिर्दीमध्ये एखाद्या प्रभागामध्ये, आपल्या कार्यक्षेत्रामध्ये चुकीचे काम होत असेल तर त्याला जबाबदार धरले जाईल. ही तरतूद अत्यंत व्हेग आहे. अनधिकृत बांधकामासंबंधी आहे. मी निश्चितपणे सांगेन की, या बिलामध्ये तशी तरतूद नसली तरी या संदर्भात जी नियमावली तयार करणार आहोत त्यामध्ये त्यांना जबाबदार धरण्याची निश्चित तरतूद करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक सूचना करु इच्छितो. पुढील अधिवेशनामध्ये शास्तीच्या संदर्भात नवीन विधेयक आणून कायदा करावा लागेल. नियम करुन चालणार नाही एवढीच माझी विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पुढील अधिवेशनात विधेयक आणू असे मी सांगणार नाही. परंतु मला तात्काळ मान्य आहे. यासंदर्भात कायद्यात तरतूद करावी लागेल. तात्पुरता उपाय म्हणून नियमावली करणार आहोत. त्यामध्ये या संदर्भातील तरतूद करण्याचे मी स्वत:हून जाहीर करतो. आपण सांगितले की, महानगरपालिकेचे अधिकार महानगरपालिकेकडेच असावेत. ही वस्तुस्थिती खरी आहे. महानगरपालिकेचे अधिकार मी मघाशी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याकडेच राहतील याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे याठिकाणी वाचन केले. एकदा फेरीवाला उठल्यानंतर पुन्हा त्याठिकाणी त्याला बसविता येणार नाही. म्हणून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना त्यांनी जबाबदार धरण्याऐवजी पोलिसांना जबाबदार धरले जावे अशी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची ओळ वाचून दाखविली. मी या संदर्भात गोष्टी तपासून बघण्याचा प्रयत्न करेन. कलम 313 (क) आणि 313 (ड) मध्ये सगळ्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सुधारणा करण्यामागे निश्चितपणे या शहराची चांगल्याप्रकारे रचना व्हावी. वाटेल तिथे त्यांनी यावे, कुठूनही यावे, कसेही यावे, कुठेही पथारी पसरावी, कुठेही व्यवसाय करावा, कोणालाही हाताशी धरुन फेव्हर करुन आपला कार्यभाग साधावा आणि त्यातून सर्वसामान्य माणसाला अडथळा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव............

निर्माण होऊ नये, त्रास होऊ नये या उद्देशाने हे विधेयक आणले आहे. या विधेयकामध्ये कोणा एकाला नजरेसमोर ठेवून, कोणा एकाला फेव्हर करावे किंवा कोणा एकाला त्रास द्यावा असा अजिबात हेतू नाही. सर्वांना सामावून घ्यावे, सर्वांना न्याय मिळावा, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार अबाधित ठेवावेत अशा उदात्त हेतूने सुप्रीम कोर्टाच्या गाईडलाईन्स लक्षात घेऊन, त्यानंतर केंद्र सरकारकडे आपण केलेला ड्राफ्ट पाठवून, केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर खालच्या सभागृहात विधेयक मंजूर केल्यानंतर आपल्या सर्वांशी चर्चा करुन या सभागृहापुढे हे बिल ठेवले आहे. आपण केलेले उत्तम मार्गदर्शन आम्हासारख्या सदस्यांना मार्गदर्शक स्वरुपामध्येच उपयोगी पडतील अशा प्रकारची भावना व्यक्त करतो आणि सभागृहाला पुन्हा एकदा विनंती करतो की, वि.स.वि.क्रमांक 41 वर आपण आपले विचार व्यक्त केल्यानंतर बहुमताने नव्हे, पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर करुन न घेता, सर्व संमतीने बहुमताच्या जोरावर मंजूर करु या अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आग्रही भूमिका मंत्रीमहोदयांनी सांगितली. सरकारला काही देणे घेणे नाही. महानगरपालिका सर्व करणार आहे. महानगरपालिका करणार असली तरी सरकारच्या मंजुरीनेच करावे एवढे माझ्या उपस्थितीत मान्य करावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय रावते साहेबांना माझी विनंती आहे, त्यांनी मांडलेल्या उपसूचनेकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्षित केलेले नाही. त्या संदर्भात स्पष्टीकरण केले आहे. त्यांनी सुचविल्याप्रमाणे पुढच्या काळात सूचना स्वीकारण्याची तयारी दर्शविली असल्यामुळे मांडलेली उपसूचना मागे घ्यावी अशी मी विनंती करतो.

नंतर 5ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव प्रथम मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

**तालिका सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 20 (दोन्ही संम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 41 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 41 संमत झाले आहे.

-------

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही